म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १४८८९

REFBK-0013742

संदर्भ निबंध
१८८९
१३७४२
५।५६४

ग्रं. क्र. १३७४२

REFBK-0013742

# श्रीसमर्थ रामदास

## विचार आणि कार्य

लेखक

पद्मश्री काकासाहेब कारखानीस

श्रीज्ञानेश्वर अभ्यास मंडळ, विजापूर

प्र का श क
ना. ब. जोशी
ज्ञानेश्वर अभ्यास मंडळ
विजापूर

सं क ल न क र्ता
दत्तराज देशपाण्डे
साहित्य-विशारद
१२५ शुक्रवार पेठ, पुणें २

प्रथमावृत्ति : रामनवमी
शके १८८६

पद्मश्री काकासाहेब कारखानीस

मु द्र क
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणें २

मूल्य : पांच रुपये

श्रीगुरुदेवांच्या चरणीं

स वि न य स म र्प ण

—लेखक

# प्रकाशकाचे दोन शब्द

पद्मश्री गणेश गोविंद तथा काकासाहेब कारखानीस यांच्या पंचाहत्तराव्या जन्मदिनीं त्यांच्या संशोधनपर व चर्चात्मक संतवाङ्मयाच्या लेखांचे दोन खंड प्रसिद्ध करण्यास फार आनंद होत आहे.

पद्मश्री काकासाहेबांची हरिजन सेवा प्रसिद्ध आहे. फावल्या वेळांत त्यांनीं महत्त्वाचें लिखाणहि केलें आहे. पण तें निरनिराळ्या नियतकालिकांतून व निरनिराळ्या प्रसंगानें छापलें गेलें असल्यानें अभ्यासकास मिळण्यास अवघड आहे. ही परिस्थिति जाणून त्यांच्यावर सादर व नितांत प्रेम करणारे हरिवरदा प्रकाशनकार श्री. दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर यांच्या मनांत तें सर्व वाङ्मय एकत्र करून छापण्याचें आलें व त्यांच्या तडफेप्रमाणें तें तीन महिन्यांत छापलेंहि गेलें. मात्र यामध्यें फक्त संतवाङ्मयावरील लेखांचाच समावेश आहे. आज त्यांचे दोन्ही ग्रंथ पद्मश्रींच्या हवालीं करण्यांत येत आहेत.

श्री. कोपर्डेकरांच्या मनांत आलें तरी सर्व वाङ्मय एकत्र करणें, पुस्तकरूपानें छापतांना त्यास लागणारे अवश्य ते संस्कार करणें, प्रुफें पहाणें वगैरे कामें कोणातरी जबाबदार व अधिकारी व्यक्तीनें पत्करणें अवश्य होतें, तें सुप्रसिद्ध संशोधक व अभिजात लेखक श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनीं करण्याचें मान्य केले होतें. पण त्यांच्यामागचा लेखनाचा व्याप, एम्. ए. च्या परीक्षेची घाई, यामुळें त्यांना या दुसऱ्या खंडाकडे वेळ देतां आला नाहीं. त्यांनीं सर्व प्रकारची प्राथमिक तयारी केली नसती तर हे दोन्ही खंड एवढ्या लवकर बाहेर पडणें अशक्य होतें.

दुसऱ्या खंडाची प्राथमिक जुळणी झाली होती पण पुढील काम कोणातरी जाणकारानें करणें प्राप्त होतें. तें कार्य श्री. दत्तराज देशपाण्डे, साहित्य-विशारद, पुणें यांनीं अनेक व्यापांतून वेळ काढून व श्री. कोपर्डेकरांच्या सहकार्यानें केलें याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

श्री. दत्तराज देशपाण्डे संतवाङ्मयप्रेमी आहेत. श्रीसमर्थांच्या कार्याबद्दल जाणीवेने अभिमान बाळगणाऱ्यापैकीं असून ते श्रींचे 'जाणते भक्त' आहेत, व्यापक राष्ट्रीय दृष्टीचे तरुण कीर्तनकार आहेत. त्यांनीं संतांच्या ऐहिक सामर्थ्यावर कांहीं लेखनहि केलेलें आहे. संतसाहित्यविषयक लेखमालेंतील 'श्रीसमर्थ रामदास : विचार आणि कार्य' ह्या दुसऱ्या खंडाचें संकलन कार्य त्यांचेकडे सोपविण्यांत आलें आहे.

संत आणि समाज, श्रीसमर्थ रामदास: विचार आणि कार्य या दोन्ही साहित्य खंडांतील लेख पूर्वी रामदास आणि रामदासी व पुरुषार्थ मासिकें, सज्जनगड

पत्रिका आणि इंद्रायणी मासिक व इतर नियतकालिकें यांतून प्रसिद्ध झाले होते. ते येथें आवश्यकतेप्रमाणें संकलित करून घेतले आहेत.

इ. स. १९४८ मध्यें स्थापन झालेल्या आमच्या 'ज्ञानेश्वरी वाचन मंडळा'चाच एक भाग 'ज्ञानेश्वरी अभ्यास मंडळ' आहे. या मंडळाचे आधार व स्फूर्तिस्थान पद्मश्री काकासाहेब कारखानीस यांचे हे संत साहित्यविषयक लेख प्रसिद्ध करून मंडळ एका नव्या दिशेनें पाऊल टाकीत आहे. याचें जनता सहर्ष कौतुक करील व हा नवा उपक्रम असाच पुढे चालू राहण्यास जनता जनार्दनाची सहानुभूति मिळेल अशी आशा आहे.

पद्मश्री काकासाहेबांचे गुरुबंधु व संत वाङ्मयाचे चिकित्सक भाष्यकार श्री. ग. वि. तुळपुळे यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन पद्मश्रींच्या जीवनाचा परिचय करून दिला याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों.

पद्मश्री काकासाहेबांच्याबद्दल माझ्यासारख्यानें कांहीं लिहिण्याचा प्रयत्न करणें अप्रस्तुत झालें असतें व त्यांच्या जीवितकार्यासंबंधीं कांहीं गोष्टींचा खुलासाहि अवश्य होता. अशा परिस्थितींत त्यांची मुलाखत घेऊन ती पुस्तकास जोडणें औचित्यास धरून होईल असें वाटल्यानें प्रा. गो. म. कुळकर्णी व मी त्यांची त्या संदर्भात मुलाखत घेतली.

संतवाङ्मयावरील बहुतेक सर्व लेख एकत्र प्रसिद्ध करण्यास परवानगी दिल्याबद्दल पद्मश्री काकासाहेबांचें मंडळ फार आभारी आहे. हें कार्य उत्साहानें व निरपेक्ष बुद्धीनें पार पाडल्याबद्दल श्री. रा. चिं. ढेरे, श्री. दत्तराज देशपाण्डे, श्री. द. र. कोपर्डेकर वगैरे सर्वांचे ज्ञा. अ. मंडळ ऋणी आहे.

लेखांची जुळणी वगैरे झाली तरी सुबक व वक्तशीर छपाई करून मिळणें ही एक अत्यंत अवघड गोष्ट आहे. ती जबाबदारी 'सुलभ मुद्रणालया'चे व्यवस्थापक व काकासाहेबांचे एके काळचे विद्यार्थी श्री. रा. ना. सरनाईक यांनीं अतीव कार्यक्षमतेनें पार पाडली. तसेंच प्रेसमधील त्यांच्या सहकाऱ्यांची तत्परता खरोखरच वाखाणण्यासारखी आहे. या सर्वांचा मी फार आभारी आहे.

ज्ञानेश्वरी मंडळानें मला पुढें केलें असलें तरी खरे काम करणारे प्रा. गो. म. कुलकर्णी, श्री. वा. व्यं. रानडे, श्री. ग. ना. शिंदे वगैरे सदस्यच होत. त्यांचे आभार मानल्यास त्यांना संकोच वाटेल म्हणून त्यांच्या कार्याचा निर्देश येथें कर्तव्यबुद्धीनें करीत आहे.

नवीन विठ्ठल मंदिर,
विजापूर
दि. २०-४-१९६४

**ना. ब. जोशी**
ज्ञानेश्वरी अभ्यास मंडळ, विजापूर

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

## पद्मश्री काकासाहेब कारखानीस

# यांचा जीवन-परिचय

सुविख्यात हरिजनसेवक पद्मश्री काकासाहेब कारखानीस यांचा अमृत-महोत्सव साजरा करण्याची योजना त्यांच्या विजापूरच्या अनेक चाहत्या मित्रांनीं केली, ही खरोखर अत्यंत औचित्यपूर्ण गोष्ट झाली. पद्मश्री काकासाहेबांसारखा निःस्वार्थी, निःस्पृह, निष्ठावंत निरभिमानी, दयाळू व शुद्धचरित कार्यकर्ता विरळाच. अशा समाजसेवकाच्या अमृत-महोत्सवाच्या निमित्तानें काकासाहेबांचा मी चिरपरिचित मित्र व गुरुबंधु या नात्यानें त्यांचा जीवन-परिचय लिहावा असें मंडळानें सुचविलें.

गणेश गोविंद तथा काकासाहेब कारखानीस यांचा जन्म मलकापूर (कोल्हापूर) येथें ता. २० एप्रिल १८९० रोजीं झाला. त्यांचें प्राथमिक व इंग्रजी शिक्षण मलकापूर, कोल्हापूर, फलटण व जमखिंडी येथें होऊन, जमखिंडी हायस्कूलमधून ते १९०९ मध्यें मॅट्रिक झाले, १९१० चा कांहीं काल ते गाणगापुरास राहिले. १९१७ मध्यें बी. ए. झाले. पुढें ते एक वर्ष लॉ कॉलेजमध्यें होते. नंतर १९१९ ते १९२७ पर्यंत चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेंत शिक्षक. १९२० त ते पुणे येथें "अध्यात्मभुवनांत" गु. रानडे यांचेकडे राहिले होते व १९२२–२३ साली त्यांनीं मुळशी पेटा सत्याग्रहांत भाग घेतला व त्यांत चार महिने सश्रम कारावासाची शिक्षा झाली. १९२७ – २९ या कालांत काकासाहेब साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांत खादीसंबंधी शिक्षण घेण्यासाठीं राहिले. व १९३० मध्यें गलगलीच्या खादी केंद्रांत ते शिकवीत. त्याच वर्षीं कन्नड प्रदेश अस्पृश्यतानिवारण कमिटीचे ते कार्यवाह होते. व १९३० – ३३ या कालखंडांत सत्याग्रहाबद्दल त्यांना तीन वेळां मिळून एकूण १ वर्ष १० महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली.

१९३३ सालीं, तुरुंगांतून सुटून आल्यावर १९६३ पर्यंत विजापूर हरिजन सेवक संघाचे सेक्रेटरी म्हणून त्या कार्यास त्यांनीं आपल्याला सर्वस्वी वाहून घेतलें आणि त्या कार्याचा झपाट्यानें विकास केला. १९३३ मध्यें त्यांनीं हरिजन मुलांसाठीं बोर्डिंग सुरू केलें व १९३७ मध्यें मुलींसाठीं विजापुरास बोर्डिंग सुरू केलें. या दोन बोर्डिंगांच्या कामाच्या व्यापाव्यतिरिक्तहि, शेकडों खेड्यांत जाऊन त्यांनीं अस्पृश्यतानिवारणावर व्याख्यानें दिलीं व अनेक लहान-थोर पुढाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन अस्पृश्यतानिवारणाबद्दल त्यांच्याशीं चर्चा केली व त्या चळवळीचा प्रसार केला. काकासाहेबांच्या या अविश्रांत कार्याचा राजकीय पुढाऱ्यांच्या मनावर साहजिकच प्रभाव पडून, ते पद्मश्रींवर अधिकाधिक जबाबदारी टाकीत गेले. १९५४ मध्यें क. प्रा. ह. से. स. चे सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ति झाली आणि १९५४ मध्यें त्या

संस्थेचें उपाध्यक्षपद व १९६० सालीं अध्यक्षपद काकासाहेबांनीं विभूषित केलें. १९५९ मध्यें त्यांना 'पद्मश्री' ही पदवी अर्पण करून भारत सरकारनें व सामाजिक कार्याबद्दलचें सुवर्णपदक देऊन म्हैसूर सरकारनें त्यांच्या कार्याचा उचित गौरव केला. त्याचप्रमाणें, केंद्र सरकारनें १९६१ मध्यें सेंट्रल अॅड्व्हायसरी बोर्ड फॉर शिड्यूल्ड कास्टच्या सभासदत्वाचा मान त्यांना दिला.

पद्मश्रींची साहित्यसंपदाहि उल्लेखनीय आहे, हें या व ता. २०-४-६४ दिनीं प्रसिद्ध व्हावयाच्या ग्रंथांवरून सहज दिसून येईल. महाराष्ट्रीय संत विशेषतः ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास त्यांनीं गुरुवर्य रानडे यांच्या आठवणी लिहिल्या आहेत. त्याहि यथाकाल प्रसिद्ध होतील.

पद्मश्रींच्या ठिकाणीं त्याग, विरक्ति, देशभक्ति, सेवाभाव इत्यादि सद्‌गुणांचें बीज प्रथमपासूनच होतें. व्यायामाची व शरीरबलाची आवड, कांहींशी आग्रही वादप्रिय वृत्ति, मित्राबद्दल प्रेम, सांघिक जीवनाबद्दल आवड हे गुणहि त्या वेळे-पासूनच दृष्टोत्पत्तीस येत. लो. टिळकांच्याविषयीं नितांत प्रेमादर त्यांना होता. १९१० त जमखिंडीस गुरुदेव रानडे यांचें दर्शन झालें. काकासाहेबांच्या बंधूंची व गुरुदेवांची ओळख होतीच. काकासाहेबांचें, कॉलेजमध्यें जाण्यासाठीं मन वळवितां आलें तर पहा, अशी त्यांनीं गुरुदेवांना विनंति केली. काकासाहेब सहज गुरुदेवांच्या भेटीला आले, तेव्हां पुढें काय करणार आहां, असा प्रश्न त्यांनीं त्यांना विचारला. आपल्या निर्भीड, प्रांजल स्वभावाला अनुरूप असें उत्तर त्यांनीं तात्काळ दिलें, "मला विवेकानंद व्हावयाचें आहे." यावर गुरुदेव शांतपणें म्हणाले, "होय ना? फार चांगलें. पण त्यासाठीं चांगलें शिक्षण घेतलें पाहिजे. ही पूर्व-तयारी अवश्य आहे." काकासाहेबांना तें पटलें; व ते डेक्कन कॉलेजांत गेले.

पद्मश्री काकासाहेबांचा ध्येयवाद 'प्रतिपच्चंद्रलेखे' प्रमाणें वार्धिष्णु, प्रभविष्णु ठरला हेंच त्यांचें वैशिष्ट्य व पुढील कार्याचें व मोठेपणाचें बीज. सुमारें १९३३-३४ मध्ये याच गोष्टीचा उल्लेख करून आमचे एक कॉलेजमधील मित्र म्हणाले, "कॉलेजमध्यें बोलल्याप्रमाणें कृति आपणापैकीं एका कारखानिसांनीं केली; इतरांचे शब्दच राहिले." हें विधान किती सत्य आहे!

पद्मश्री काकासाहेब १९१७ मध्यें पदवी संपादन करून आपल्या देशसेवेच्या क्षेत्रांत उतरण्यास सिद्ध झाले. कै. बाळूकाका कानिटकरांच्या चिंचवड येथील शाळेंत राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या कार्यांत कांहीं वर्षें ते सहभागी झाले. महात्माजींनीं खादीचा आदेश देतांच, पद्मश्रींनीं सूत कातण्यास सुरुवात केली; तो नित्ययज्ञ आजपर्यंत अखंड सुरू आहे. सूतकताई, विणाई इत्यादि शिक्षण घेण्यासाठीं ते कांहीं काल साबरमती आश्रमांत राहिले होते. तेथेंहि स्वतंत्र वृत्ति व शिस्तपालन

या त्यांच्या कांहींशा विरोधी वृत्तीचें दर्शन घडलें. महात्माजी आश्रमांत नसत तेव्हां पद्मश्री आश्रमांतील सकाळच्या प्रार्थनेला नियमानें जात नसत. पुढें ही तक्रार महात्माजींच्या कानावर गेल्यावर त्यांनीं पद्मश्रींना याचें कारण विचारलें. त्यांनीं उत्तर दिलें; मी आश्रमाची सर्व शिस्त पाळणारा सभासद म्हणून येथें आलों नाहीं; केवळ कताई–विणाई शिकण्यासाठीं आलों आहे. पूर्ण नास्तिकहि या कामासाठीं येथें येईल. त्याच्यावर आश्रमाची सर्व शिस्त लादणें योग्य होणार नाहीं. ती आश्रमाच्या कायमच्या सभासदासाठीं आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपण माझे परमार्थाचे गुरु नाहीं. ते निराळे आहेत. आतां आपण येथें नसतांना येथील प्रार्थना म्हणजे कांहीं भक्तिपर व नीतिपर पद्यें पाठ म्हणणें. रोज ज्ञानेश्वरीच्या ३०० ओव्या मी न चुकता वाचतों. हें वाचन येथील प्रार्थनेपेक्षा किती तरी अधिक आहे. मग प्रार्थनेलाच येण्याचें काय कारण आहे ? ही स्पष्टोक्ति ऐकल्यावर काकासाहेबांनीं प्रार्थनेला येण्याचें कारण नाहीं, असा निर्णय महात्माजींनीं दिला.

लो. टिळकांच्या पश्चात् अनेक टिळकभक्त महात्माजींच्या तत्त्वज्ञानानें व कार्यपद्धतीनें प्रभावित झाले आणि लोकमान्य व महात्माजी या दोघांहिविषयीं नितांत आदराचा संगम त्यांच्या ठिकाणीं दिसूं लागला. यांपैकीं पद्मश्री एक आहेत. ते महात्माजींची कार्यपद्धति अनुसरत असले तरी त्यांचा लोकमान्यांविषयीं आदर रतिमात्रहि कमी झालेला नाहीं.

साबरमती आश्रमांतील आणखीहि एक विनोदी पण अर्थपूर्ण गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. तेथें ब्रह्मचर्य-रक्षणाच्या दृष्टीनें आहार कोणता असावा याची वरचेवर चर्चा होई. पद्मश्री तेथेंहि तालीम करीत असतच व खुराक म्हणून वाटीभर चणे रात्रीं भिजत घालून सकाळीं खात असत. आश्रमाच्या सभासदांना हा आहार म्हणजे " अब्रह्मण्यम् " वाटे. महात्माजींच्या कानावर ही गोष्ट गेल्यावर त्यांनी, इतके चणे पचतात कसे, असा प्रश्न विचारला व रोज मी पुष्कळ तालीम करतों, पचण्याची तक्रार राहण्याचें कारणच नाहीं, हें उत्तर मिळाल्यावर त्यांना कौतुक वाटलें. पद्मश्रींपासून हा धडा शिका असें रडक्या ब्रह्मचाऱ्यांना त्यांनीं हसत हसत सांगितलें.

कारागृहवास हें पद्मश्रींच्या जीवनांतील एक महत्त्वाचें पर्व आहे. त्यांच्या सर्व सद्गुणांना तेथें कस लागला, त्यांचा विकासहि पण अटळपणें झाला. ती तपस्या फार मोठी, अवघड आहे. स्वाभिमानी, निःस्पृह पुरुषाला तर तें अग्नि-दिव्यच आहे. पद्मश्री त्यांतून पूर्ण यशस्वीपणें बाहेर आले. त्यांनीं अनेक वेळां स्वेच्छेनें कारावास भोगला. मुळशी धरण सत्याग्रहांतील सश्रम शिक्षा हा त्याचा ओनामा होय. तोच सर्वांत कठोर होय. थोर माणसें मोठ्या संख्येनें तुरुंग भरूं लागलीं नव्हती, त्यामुळें सत्याग्रह्यांच्या तक्रारीकडे किंवा यातनांकडे सरकारला लक्ष

देण्याचें कांहींच कारण वाटलें नाहीं. भाग पाडल्याशिवाय कोणतेहि निर्बंध शिथिल करावयाचे नाहींत, पोलादी सत्ता लवचिक करावयाची नाहीं, हें त्या सरकारचें ब्रीदवाक्य होतें. म्हणून या पहिल्या सत्याग्रह्यांना तुरुंगांत फार हाल सोसावे लागले. सात दिवस खोडाबेडीच्या यातनाहि पद्मश्रींनीं सोसल्या. परंतु, यामुळें, पुढें कारावास पत्करायचा योग आला. तेव्हां कच खाऊन त्यांनीं तो टाळला नाहीं. ते लष्करी शिस्तीचे गृहस्थ आहेत. नायक देईल ती आज्ञा मानावयाची येवढेंच ते जाणतात. नायक ठरवितांना मात्र ते खूप चिकित्सा करतात. बुद्धि, भावना व क्रियाशक्ति यांपैकीं त्यांच्या भावना प्रबल आहेत, त्यांना भावनाप्रधान म्हणावें लागेल. पोलादी इच्छाशक्ति या भावनांच्या पाठीशीं ततत उभी आहे आणि विवेक पुढें उभा राहून त्यांना मार्गदर्शन करीत आहे. म्हणून त्यांचें ध्येयवादी जीवन अधिकाधिक तेजानें तळपत पुढें जात आहे. त्यांनीं उत्तम नायक निवडले. याचेंहि बीज वरील तीन शक्तींच्या कार्यांतच आहे. असो. मुळशी सत्याग्रहाच्या शिक्षेनंतर तर त्यांनीं ३ वेळां कारावास भोगला, तो त्या मानानें सौम्य होता. त्या कालाचा ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाकडे त्यांनीं उत्तम उपयोग करून घेतला. तुरुंगांत असतांना प्रति सप्ताह ज्ञानेश्वरींचें एक पारायण होत असे.

देशसेवेचे असे बरेच आपापल्यापरी उपयुक्त पर्याय झाल्यावर शेवटीं हरिजनसेवेच्या कार्यांत पद्मश्री स्थिर झाले आणि गेलीं सुमारें ३० वर्षें त्यांचें हेंच कार्य त्यांच्या नेहमीच्या अविश्रांत कष्टानें, कळकळीनें, आत्मसर्वस्वानें व शिस्तीनें सुरू आहे. हरिजन-कार्यकर्त्यांमध्यें अखिल भारतीय महत्त्वाचें उच्च पद त्यांना मिळालें आहे. या कार्यानेंच ते सर्व भारतांत प्रसिद्धि पावले आहेत. या कार्याबरोबरच, त्या विषयाचा सर्वांगीण सखोल अभ्यासहि त्यांनीं केला आहे. सरकारी वा बिनसरकारी कोणीहि थोर व्यक्ति विजापुरास येवो, पद्मश्रींच्या हरिजन-बोर्डिंगांना भेट त्यांच्या कार्यक्रमांत असावयाचीच. कांहीं स्थानिक राजकारणामुळें ही भेट कार्यक्रमांत घालूं नये असे क्वचित प्रयत्न होत असत; पण त्यांना यश येत नसे. कारण, विजापुरास येण्यास निघतांनाच, त्या थोर व्यक्तींना बोर्डिंगला भेट देण्याची सूचना त्यांचे हरिजनप्रेमी मित्र करीत असत. पद्मश्रींच्या दयाळू स्वभावाला देशकार्याच्या सर्व पर्यायांत हरिजनसेवाच अधिक पसंत पडली, याचें कारण त्यांची परमार्थामुळें वाढत चाललेली वृत्तीची सात्त्विकता. याचा उल्लेख पुढें त्यांच्या पारमार्थिक जीवनाच्या विचारांत येणार आहे.

देशकार्यांतहि तिन्ही गुणांचीं कार्यें असतात. सर्वच उपयुक्त, अवश्य असतात, परंतु प्रत्येक कार्यकर्ता शेवटीं आपल्या प्रकृतिगुणानुरूप कार्यांत स्थिर होतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसें ज्यांचें होत नाहीं, त्यांच्या वांट्याला अपयश व निराशा येते, असें मला वाटतें. असो. पद्मश्री काकासाहेबांचें आपल्या

हरिजन विद्यार्थी-विद्यार्थिनींविषयीं वात्सल्य आगळेंच आहे. त्यांनीं सुखी, सुशिक्षित, सद्गुणी व शक्य तितके वैभवशाली व्हावें, यासाठीं त्यांची अखंड खटपट सुरू असते. स्वतःसाठीं कोणाजवळ कांहींहि न मागणारा हा त्यागी पुरुष या बालबालिकांच्यासाठीं स्वतः स्पेशल क्लासेस घेतो, डॉक्टरांना विनंति करून त्यांना फुकट औषधोपचार करवितो, समाजाकडून द्रव्य व धान्य मागून आणतो, धनिकांना सांगून इमारती बांधवितो. अशा किती गोष्टी सांगाव्या! पद्मश्रींच्या पूर्ण निष्काम भूतदयेच्या सेवा-तपोबलानें हें सर्व कार्य यशाला जातें, त्यांचा शब्द खालीं न पडूं देणें हें अनेकांना कर्तव्य वाटतें. उच्च शिक्षण घेऊन अधिकारपदावर चढलेल्या आपल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उल्लेख ते प्रेमळ वात्सल्ययुक्त अभिमानानें करतात तेव्हां, त्यांचें मुख अत्यंत प्रसन्न दिसतें. एक हरिजन कन्या एम्. बी. बी. एस झाल्याचें वर्तमान कळतांच, ते तिला निंबाळास घेऊन आले व त्यांनीं स्वखर्चानें निंबाळास प्रसाद म्हणून पेढे वांटले. ज्यांच्या ठिकाणीं परमार्थ-प्रवृत्ति दिसेल त्यांना निंबाळास आणून गुरुदेवांकडून ते अनुग्रह देववीत. कोणा विद्यार्थ्यांच्या कुटुंबांत आर्थिक अडचणी असल्या किंवा आई-बाप आजारी असले तर त्यांना हस्ते-परहस्ते आर्थिक साह्य ते करतात, कांहीं सरकारी कामांत योग्य अडचण असेल तर अधिकाऱ्यांना भेटून ती दूर करवितात. पद्मश्रींच्या हरिजन कार्याचा विस्तार फार मोठा आहे. त्यांनीं ३० वर्षांपूर्वीं १०-१२ मुलांचें बोर्डिंग विजापुरास सुरू केलें; आतां एक मुलांचें व एक मुलींचें अशीं दोन बोर्डिंगें तेथें आहेत व त्यांत अनुक्रमें सुमारें २०० विद्यार्थी व १०० विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. त्यांचा सर्व खर्च बोर्डिंग चालवितें.

हरिजनसेवेबरोबरच, त्यांच्या देवदासी-उद्धाराच्या कार्याचा उल्लेख करणें अवश्य आहे. भ्रामक समजुतीनें आईबापांनीं बालपणींच देवाला वाहिलेल्या या अभागी स्त्रिया अज्ञतेनें कुमार्गाला लागतात. देवाला मुली वाहण्याची ही प्रथाच बंद झाली पाहिजे. त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू आहेतच. परंतु या अभागिनींपैकीं शक्य तितक्यांना पुन्हां सन्मार्गाला लावण्याचें पुण्य-पावन कार्य पद्मश्री करीत आहेत आणि अशा अनेक देवदासींना माणसांत आणून, शिक्षण देऊन, त्यांचे विवाह करवून त्यांना समाजांत सदाचरणाने जगण्याचें भाग्य मिळवून दिलें आहे. आमच्यासारख्या गृहस्थ मित्रांना पद्मश्री विनोदानें पण निश्चित सत्यार्थानें सांगतात : तिनचार, फार तर सातआठ मुलामुलींचा संसार करतां आणि त्यांत कष्ट होतात म्हणून बढाई मारतां. माझा दोनशे मुलांचा व शंभर मुलींचा संसार पहा. या आपल्या धर्माच्या अपत्यांसाठीं पद्मश्री जे करीत आहेत, ते जनक आईबापदेखील आपल्या अपत्यांसाठीं करूं शकतील कीं नाहीं याची मला तरी शंका आहे. या सर्वांचे पद्मश्री खरोखर धर्मपिता आहेत.

पद्मश्रींच्या पारमार्थिक जीवनाच्या वर्णनाला आरंभ करण्यापूर्वीं त्यांच्या नसलेल्या प्रापंचिक जीवनाबद्दल चार शब्द लिहिणें योग्य होईल. त्यांच्या बंधूंचा

व मित्रांचा प्रपंच म्हणजे त्यांचा प्रपंच. आपल्या बंधूंच्या मुलांमुलींवर त्यांचें अत्यंत प्रेम आहे व त्या अपत्यांना बालपणीं "काका" म्हणजे आपले एक खेळगडीच वाटत. थट्टा, विनोद, दंगा, कुस्ती या सर्व गोष्टींत त्यांचे सोबती "काका". त्याबरोबरच "काकां"ची भीतिहि त्यांना वाटे. पद्मश्रींच्या मित्रांच्या सर्व कुटुंबियांशीं त्यांचा चांगला परिचय असतो. ते एकाद्या मित्राच्या घरीं गेले कीं त्याची पत्नी, मुलें, नातवंडें अशा सर्वांशीं थट्टामस्करी करतात सर्वांची आस्थेनें चौकशी करतात व आनंदानें काल घालवितात. त्यामुळें, ते घरीं आल्याचा आनंद शब्दश: आबालवृद्धांना होतो.

इतर कितीहि कार्यें पद्मश्री करीत आले असले, तरी परमार्थावरील नितांत श्रद्धा हा त्यांच्या आंतरिक जीवनाचा गाभा आहे. त्यांचें विवेचन करून हा परिचय संपवावयाचा आहे. १९१० मध्यें गुरुदेवांची भेट झाल्यापासून, पद्मश्रींची त्यांच्यावरील भक्ति अखंड वाढत गेली. व त्यामुळें अर्थात् परमार्थ हेंच जीवनाचें ध्येय ही त्यांची श्रद्धाहि वाढत जात आहे. गुरुदेवांचे अनेक शिष्य व भक्त गुरुदेवांना ईश्वरतुल्य मानतात. पद्मश्री त्यांना तसेंच मानतात.

पद्मश्रींची भक्तींतील उत्कटता अत्युच्च आहे. मतभेदामुळे पद्मश्री अनेकांवर कडक टीका करतात; पण ती तात्त्विक भूमिकेवरून असते; त्यांत अभिमानाचा भाग नसतो. स्वत:विषयीं ते म्हणतात. गुरुदेवांच्या कृपेनें मी पशूंतून माणसांत आलों; त्यांच्याच कृपेनें, त्यांना पुढच्या जन्मीं देवपणहि लाभेल. गुरुदेवांच्या सान्निध्यांत इतकी विनम्र वृत्ति त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली आहे. ईश्वरप्राप्ति हेंच ध्येय, हरिजनसेवेचें कार्य हें ईश्वरप्राप्तीच्या साधनाचें, चित्तशुद्धि करणारें उपांग हीच त्यांची दृढ श्रद्धा आहे. म्हणून हें कार्य ते भगवद्गीतेच्या कर्मयोग्याच्या भूमिकेवरून, 'सुखदु:खे समे कृत्वा' करण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणूनच माझ्या मतें, देशभक्तीच्या राजस–तामस कार्यांचा स्वीकार न करतां, हरिजनसेवेच्या प्रधान कार्यांत ते स्थिर झाले. कार्यशीलता हा त्यांचा स्वभाव आहे; हा रजोगुणाचा धर्म आहे. तेव्हां त्यांची प्रकृति राजस आहे; पण ती सत्त्वानें शुद्ध झाल्यानें परमार्थोपकारी आहे. श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर, यांनीं एका पत्रांत म्हटलें आहे; "रजोगुणानें भक्ति होते, तमो गुणानें भक्ति होते; मात्र ते सत्त्वानें शुद्ध झाले पाहिजेत" हा सत्यसिद्धान्त देशकारणालाहि लागू आहे. जगांत वाईट कांहींच नाहीं; मात्र योजक दुर्लभ आहे. असो.

स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पुढारी कार्यकर्त्यांत निर्माण झालेले, स्वार्थ सत्तास्पर्धा, लाच-लुचपत, भोगलालसा, दंभ, इत्यादि दुर्गुण उच्चपदस्थांनाहि आतां अस्वस्थ करूं लागले आहेत. यांपैकीं कशाचाहि स्पर्शदेखील पद्मश्रींनीं स्वत:स होऊं दिला नाहीं, अग्निरूप होऊन त्यांना दूर ठेवलें, या त्यांच्या शुचितेचा उगम माझ्या

मतें, त्यांच्या परमार्थांतच आहे. देवाची सेवा, गुरुदेवांची — म्हणून ते हरिजनसेवा करतात. तिला अमंगलतेचा डाग ते कसा लागून देतील ? असे अनेक शुभ परिणाम परमार्थानें त्यांच्यावर झाले आहेत; त्याचप्रमाणें त्यांच्या अभ्यासालाहि त्यामुळें निश्चित दिशा लागलेली आहे. ज्ञानेश्वरीवरील त्यांचीं प्रवचनें सर्वांना सुपरिचित आहेतच. तो त्यांचा परम भक्तिप्रेमाचा ग्रंथ आहे. दासबोध, तुकारामांचे अभंग, एकनाथांचें भावार्थ रामायण यांचाहि त्यांचा सखोल अभ्यास आहे व त्यावर ते उत्कृष्ट प्रवचनें करतात. निंबर्गी-इंचगेरी – निंबाळ हीं त्यांच्या संप्रदायांतील श्रेष्ठांचीं स्थानें हींच त्यांचीं पुण्यक्षेत्रें होत. नामस्मरण हेंच ईश्वरप्राप्तीचें एकमेव साधन, "नान्यः पंथा विद्यतेऽनाय ।" हा सिद्धान्त त्यांना पूर्णतः मान्य आहे. त्या साधनाकडे ते बराच काल देतात. तरीहि "प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति" हें सत्य त्यांच्या बाबतींत विशेषेंकरून प्रत्ययाला येतें.

शेवटीं पद्मश्री काकासाहेबांच्या जवळ उभे राहून सद्‌गुरुमहाराजांना एक प्रार्थना करावयाची आहे. आतां सर्व काळ निंबाळास घालवावा अशी काकांना उत्कंठा लागली आहे; परंतु कांहीं कारणानें तें घडत नाहीं. आपल्या दुर्दम्य आशावादाला अनुसरून ते ७० व्या वर्षी म्हणाले, "उरलेलीं ३० वर्षें महाराजांच्या कृपेनें निंबाळास त्यांच्या सेवेंत जावीं." तिसाची संख्या प्रतिवर्षी एकाएकानें कमी होते. या वर्षीच्या त्यांच्या प्रार्थनेबरोबर माझीहि प्रार्थना आहे कीं, "महाराज, काकांच्या नियोजित आयुष्यांत जितकी भर घालणें शक्य आहे तितकी घाला, शंभरावर सहज जाता येईल. मात्र हीं नवीं वर्षें निंबाळास आपल्या सेवेंत त्यांनीं घालविलीं पाहिजेत अशी अट ठेवा." ते निंबाळास सतत राहू लागले म्हणजे त्यांचा काल सर्वतोपरी "स्वात्मसुखाय जगतो हितायच" जाईल. त्याचा लाभ लहान वयाच्या माझ्या अनेक गुरुबंधु-गुरुभगिनींना मिळेल. पद्मश्री काकासाहेब दीर्घायुषी होवोत हीच श्रीगुरुचरणीं प्रार्थना !

व मित्रांचा प्रपंच म्हणजे त्यांचा प्रपंच. आपल्या बंधूंच्या मुलांमुलींवर त्यांचें अत्यंत प्रेम आहे व त्या अपत्यांना बालपणीं "काका" म्हणजे आपले एक खेळगडीच वाटत. थट्टा, विनोद, दंगा, कुस्ती या सर्व गोष्टींत त्यांचे सोबती "काका". त्याबरोबरच "काकां"ची भीतिहि त्यांना वाटे. पद्मश्रींच्या मित्रांच्या सर्व कुटुंबियांशीं त्यांचा चांगला परिचय असतो. ते एकाद्या मित्राच्या घरीं गेले कीं त्याची पत्नी, मुलें, नातवंडें अशा सर्वांशीं थट्टामस्करी करतात सर्वांची आस्थेनें चौकशी करतात व आनंदानें काल घालवितात. त्यामुळें, ते घरीं आल्याचा आनंद शब्दशः आबालवृद्धांना होतो.

इतर कितीहि कार्यें पद्मश्री करीत आले असले, तरी परमार्थावरील नितांत श्रद्धा हा त्यांच्या आंतरिक जीवनाचा गाभा आहे. त्यांचें विवेचन करून हा परिचय संपवावयाचा आहे. १९१० मध्यें गुरुदेवांची भेट झाल्यापासून, पद्मश्रींची त्यांच्यावरील भक्ति अखंड वाढत गेली. व त्यामुळें अर्थात् परमार्थ हेंच जीवनाचें ध्येय ही त्यांची श्रद्धाहि वाढत जात आहे. गुरुदेवांचे अनेक शिष्य व भक्त गुरुदेवांना ईश्वरतुल्य मानतात. पद्मश्री त्यांना तसेंच मानतात.

पद्मश्रींची भक्तीतील उत्कटता अत्युच्च आहे. मतभेदामुळे पद्मश्री अनेकांवर कडक टीका करतात; पण ती तात्त्विक भूमिकेवरून असते; त्यांत अभिमानाचा भाग नसतो. स्वतःविषयीं ते म्हणतात. गुरुदेवांच्या कृपेनें मी पशूंतून माणसांत आलों; त्यांच्याच कृपेनें, त्यांना पुढच्या जन्मीं देवपणहि लाभेल. गुरुदेवांच्या सान्निध्यांत इतकी विनम्र वृत्ति त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली आहे. ईश्वरप्राप्ति हेंच ध्येय, हरिजनसेवेचें कार्य हें ईश्वरप्राप्तीच्या साधनाचें, चित्तशुद्धि करणारें उपांग हीच त्यांची दृढ श्रद्धा आहे. म्हणून हें कार्य ते भगवद्गीतेच्या कर्मयोगाच्या भूमिकेवरून, 'सुखदुःखे समे कृत्वा' करण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणूनच माझ्या मतें, देशभक्तीच्या राजस–तामस कार्यांचा स्वीकार न करतां, हरिजन-सेवेच्या प्रधान कार्यांत ते स्थिर झाले. कार्यशीलता हा त्यांचा स्वभाव आहे; हा रजोगुणाचा धर्म आहे. तेव्हां त्यांची प्रकृति राजस आहे; पण ती सत्त्वानें शुद्ध झाल्यानें परमार्थोपकारी आहे. श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर, यांनीं एका पत्रांत म्हटलें आहे; "रजोगुणानें भक्ति होते, तमो गुणानें भक्ति होते; मात्र ते सत्त्वानें शुद्ध झाले पाहिजेत" हा सत्यसिद्धान्त देशकारणालाहि लागू आहे. जगांत वाईट कांहींच नाहीं; मात्र योजक दुर्लभ आहे. असो.

स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पुढारी कार्यकर्त्यांत निर्माण झालेले, स्वार्थ सत्तास्पर्धा, लाच-लुचपत, भोगलालसा, दंभ, इत्यादि दुर्गुण उच्चपदस्थांनाहि आतां अस्वस्थ करूं लागले आहेत. यांपैकीं कशाचाहि स्पर्शदेखील पद्मश्रींनीं स्वतःस होऊं दिला नाहीं, अग्निरूप होऊन त्यांना दूर ठेवलें, या त्यांच्या शुचितेचा उगम माझ्या

मतें, त्यांच्या परमार्थांतच आहे. देवाची सेवा, गुरुदेवांची — म्हणून ते हरिजनसेवा करतात. तिला अमंगलतेचा डाग ते कसा लागून देतील ? असे अनेक शुभ परिणाम परमार्थानें त्यांच्यावर झाले आहेत; त्याचप्रमाणें त्यांच्या अभ्यासालाहि त्यामुळें निश्चित दिशा लागलेली आहे. ज्ञानेश्वरीवरील त्यांचीं प्रवचनें सर्वांना सुपरिचित आहेतच. तो त्यांचा परम भक्तिप्रेमाचा ग्रंथ आहे. दासबोध, तुकारामांचे अभंग, एकनाथांचें भावार्थ रामायण यांचाहि त्यांचा सखोल अभ्यास आहे व त्यावर ते उत्कृष्ट प्रवचनें करतात. निंबर्गी-इंचगेरी – निंबाळ हीं त्यांच्या संप्रदायांतील श्रेष्ठांचीं स्थानें हींच त्यांचीं पुण्यक्षेत्रें होत. नामस्मरण हेंच ईश्वरप्राप्तीचें एकमेव साधन, "नान्यः पंथा विद्यतेऽनाय ।" हा सिद्धान्त त्यांना पूर्णतः मान्य आहे. त्या साधनाकडे ते बराच काल देतात. तरीहि "प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति" हें सत्य त्यांच्या बाबतींत विशेषेंकरून प्रत्ययाला येतें.

शेवटीं पद्मश्री काकासाहेबांच्या जवळ उभे राहून सद्गुरुमहाराजांना एक प्रार्थना करावयाची आहे. आतां सर्व काळ निंबाळास घालवावा अशी काकांना उत्कंठा लागली आहे; परंतु कांहीं कारणानें तें घडत नाहीं. आपल्या दुर्दम्य आशावादाला अनुसरून ते ७० व्या वर्षी म्हणाले, "उरलेलीं ३० वर्षें महाराजांच्या कृपेनें निंबाळास त्यांच्या सेवेंत जावीं." तिसाची संख्या प्रतिवर्षी एकाएकानें कमी होते. या वर्षीच्या त्यांच्या प्रार्थनेबरोबर माझीहि प्रार्थना आहे कीं, "महाराज, काकांच्या नियोजित आयुष्यांत जितकी भर घालणें शक्य आहे तितकी घाला, शंभरावर सहज जाता येईल. मात्र हीं नवीं वर्षें निंबाळास आपल्या सेवेंत त्यांनीं घालविलीं पाहिजेत अशी अट ठेवा." ते निंबाळास सतत राहू लागले म्हणजे त्यांचा काल सर्वतोपरी "स्वात्मसुखाय जगतो हितायच" जाईल. त्याचा लाभ लहान वयाच्या माझ्या अनेक गुरुबंधु-गुरुभगिनींना मिळेल. पद्मश्री काकासाहेब दीर्घायुषी होवोत हीच श्रीगुरुचरणीं प्रार्थना !

० ० ०

# पद्मश्री काकासाहेब कारखानिसांची एक मुलाखत

*पद्मश्री काकासाहेब कारखानिसांचें त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करतांना, त्यांच्या जीवनाची बैठक समजून घेण्याची जी जिज्ञासा निर्माण झाली तिचीच परिणति म्हणजे ही मुलाखत. श्री. काकासाहेबांनीं मुलाखतीच्या वेळीं जें सौजन्य दाखविलें, जी मनमोकळी चर्चा केली त्याबद्दल आम्ही त्यांचे फार ऋणी आहोंत.*

**गो. म. कुलकर्णी**

**ना. ब. जोशी**

**प्रश्न १ ला:—** आपल्या जीवनांत परिवर्तन घडवून आणणाऱ्या प्रमुख व्यक्ति कोणत्या ? यापैकीं कोणाचा विशेष ठसा आपल्या जीवनावर उमटला आहे ?

**उत्तर:—** गुरुदेव रानडे हा माझ्या जीवनाचा ध्रुवतारा. १९१० सालीं जमखंडीस त्यांची प्रथम भेट झाल्यापासून माझ्या जीवनविषयक कल्पनांत आमूलाग्र बदल झाला. सुदैवानें सुमारे ४० वर्षे त्यांचा निकट सहवासहि लाभला. यासाठीं त्यांना मी माझ्या जीवनाचे प्रमुख शिल्पकार मानतों. माझ्या जीवनावर लो. टिळकांच्या त्यागाचा व धैर्याचाहि फार मोठा परिणाम झाला आहे. लोकमान्यांच्या खालोखाल माझ्या जीवनावर जर कोणाचें संस्करण असेल तर तें महात्मा गांधींचें. वडील बंधूंची त्यागवृत्ति व त्यांच्या अंतःकरणाचा विशालपणा माझ्या अंतःकरणावर कायमचा कोरला गेला आहे. कर्नाटकांत आल्यानंतर, कै. हणमंतराव कौजलगी यांच्या व्यक्तिमत्त्वाचाहि कांहीं एक परिणाम मजवर झाला आहे. त्यांच्याइतकी मोठ्या मनाची अन्य कोणी व्यक्ति सबंध कर्नाटकांत मला तरी आढळली नाहीं.

**प्रश्न २ रा:—** राजकारण, समाजकारण व परमार्थ या तिहींचाहि मेळ आपल्या जीवनांत आढळतो; हा असा मेळ, सकृत्दर्शनीं तरी विसंगत वाटतो; आपलें याबद्दल काय म्हणणें आहे ?

**उत्तर:—** सर्व जीवनच अध्यात्ममय मानल्यास, या जीवनांतच अंतर्भूत असलेल्या राजकारण, समाजकारण वगैरेसारख्या गोष्टी परस्पर विसंगत वाटणार नाहींत. अध्यात्म हाच जीवनाचा पाया मानल्यास हें शक्य आहे. निदान मी तरी तसें मानतों व त्या दृष्टीनेंच राजकारण, समाजकारण वगैरेकडे पाहतों.

**प्रश्न ३ रा:—** गुरुदेव रानडे यांनीं राजकारणांत प्रत्यक्ष कधीं भाग घेतलेला दिसत नाहीं; हें कसें ?

दा. क्र.

**उत्तर:**-- गुरुदेव रानडे यांनीं राजकारणांत भाग घेतला नाहीं याचें कारण त्यांची ' Destiny ' तशी नव्हती. आपली सारी हालचाल 'वरून' येणाऱ्या आदेशानुसार चालत असल्याची त्यांची धारणा होती. ' महाराजांनीं सांगितलें असतें तर आपण राजकारणांत भाग घेतला असता का ? ' या माझ्या प्रश्नाला ' त्यांत काय संशय ! ' असें निःसंदिग्ध उत्तर गुरुदेवांनीं दिलें होतें. संतांना राजकारण, समाजकारण वगैरेचें वावडें असतें, असें नव्हे, पण दैनंदिन जीवनाच्या सामान्य घडामोडींत भाग घेण्यापेक्षां या साऱ्या जीवनाला आध्यात्मिक पातळीवर नेण्याच्या कार्यांत ते अखंड मग्न असतात. राजकारणांत भाग घेण्या-पेक्षांहि तें कार्य श्रेष्ठतर नव्हे श्रेष्ठतम आहे.

**प्रश्न ४ था:**—मग महात्मा गांधींनीं आपल्या जीवनांत राजकारण व अध्यात्म यांची सांगड घातली ती कशी ?

**उत्तर:**— म. गांधींच्या जीवनांत राजकारण व अध्यात्म यांची सांगड होती, असें म्हणण्यापेक्षां राजकारण व नीति यांची सांगड होती, असें मी म्हणेन. नीति व अध्यात्म एक नव्हेत. नीति ही व्यावहारिक आचरणाला शुद्धत्व प्राप्त करून देण्याच्या दृष्टीनें केवळ उपयुक्त ठरतें, तर अध्यात्म हें नीति-अनीतीच्या अतीत सारें जीवन ब्रह्ममय असल्याची प्रतीति घेणारें असतें.

**प्रश्न ५ वा:**— इंचगिरी संप्रदायाकडे आपण विशेष आकृष्ट होण्याचें कारण कोणतें ? आपल्या मतें या संप्रदायाचीं खास वैशिष्ट्यें कोणतीं ?

**उत्तर:**— या संप्रदायाकडे आकृष्ट होण्याचें कारण गुरुदेव रानडे. बाह्यतः कुठल्याहि संप्रदायाचीं ' वैशिष्ट्यें ' शोधीत राहण्यापेक्षां तो पंथ साक्षात्कारी संतांचा आहे किंवा नाहीं एवढेंच पाहणें इष्ट. सर्व साक्षात्कारी संत हे फक्त संत असतात. आंतरिकदृष्ट्या त्यांचीं कांहीं खास वैशिष्ट्यें नसतात.

**प्रश्न ६ वा:**-- संतसाहित्याची गोडी आपल्याला केव्हांपासून लागली ? गोडी लागण्यास विशेष कांहीं कारण घडलें का ?

**उत्तर:** — आमचे आईवडील व वडील बंधू यांना धर्मोपासनेचा फार नाद होता. गुरुचरित्र, शिवलीलामृत यांसारखीं पुस्तकें कुटुंबियांच्या नित्य वाचनांत होती. बाळपणींच पुष्कळ संतसाहित्य कानावरून गेलें होतें. कांहीं मुखोद्गतहि झालें होतें. घरांत सोवळ्याओवळ्याचे नियम फार. वडील शिवोपासक. पार्थिव लिंगाची पूजा करण्याचें व्रत त्यांनीं घेतलें होतें. केवळ सोवळ्यानें नव्हे तर ओलेत्यानें गुरुचरित्र वाचण्याचा वडील बंधूंचा नियम होता. अशा वातावरणांत, मी लहानपणीं वाढल्यानें धर्माचा संस्कार मजवर दृढ होताच.

पुढें मॅट्रिकनंतर (१९०९) 'केसरी'च्या वाचनानें राजकारणाकडे माझें विशेष लक्ष वेधलें. आणि शिक्षण न घेतां देशसेवा करावी असा मनानें निश्चय केला. देशस्वातंत्र्याच्या चळवळीला भगवंताचें अधिष्ठान प्राप्त व्हावें म्हणून गाणगापुरास जाऊन तेथें गुरुचरित्राचीं पारायणें चालू केलीं. तेथील उन्हाळा न मानवल्यामुळें कांहीं महिन्यांनीं जमखंडीस परत आलों. तेथेंहि संतसाहित्याचें वाचन चालूच राहिलें. जमखंडीसच १९१० मध्यें गुरुदेव रानडेची गाठ पडली. गुरुदेवांची भेट म्हणजे माझ्या आजपर्यंतच्या धर्मकल्पनांवर पडलेला बॉम्बशेल. शुद्ध नामस्मरणाच्या जोरावर गीतेंतील अकराव्या अध्यायांतील विश्वरूपदर्शनासारखा दिव्य साक्षात्कार अनुभविता येतो, ही त्यांनी मला दिलेली जाणीव अगदी नवी होती. या जाणिवेनें माझ्या अध्यात्मविषयक विचारांत क्रांति झाली. अध्यात्माच्या वाटचालींतील महत्त्वाचें पाथेय म्हणून संतसाहित्याचें मग अधिक चिंतन सुरू केलें. तो क्रम अद्यापिहि चालूच आहे.

**प्रश्न ७ वा:—** संतसाहित्य हें निष्क्रियतेला पोषक ठरतें; असा अपसमज प्रसृत होण्याचीं आपल्या मतें कारणें कोणतीं ?

**उत्तर:—** संतसाहित्याचा अर्थ जो तो आपल्या पातळीवरून आपल्या कल्पनेप्रमाणें वा स्वतःला सद्यःफलदायी ठरेल किंवा नाहीं, या दृष्टीनें लावीत असल्यामुळें हें असें होतें. संतसाहित्याचा नीट अभ्यास केल्यास ते निष्क्रियतेला थारा देत असल्याचें आढळून येणार नाहीं. श्वसन करणें, स्वस्थ बसणें, हीसुद्धा एक क्रियाच असें मानणारे संत निष्क्रियतेची शिकवण देतीलच कशी ?

**प्रश्न ८ वा:—**रामदासांसारख्या प्राचीन किंवा विवेकानंदांसारख्या आधुनिक संताची गोष्ट सोडल्यास, श्रीज्ञानेश्वरांसारख्या महान् संताच्या जीवनांत ही क्रियाशलिता विशेषतः प्रत्यक्ष राजकीय कार्याच्या संदर्भात कुठें आढळते ?

**उत्तर:—** बारकाईनें पाहिल्यास पुढील साऱ्या संतांच्या शिकवणुकीचें मूळ ज्ञानेश्वरींतच आढळेल. शंकराचार्यांप्रमाणें संन्यासमार्गाचा पुरस्कार ज्ञानेश्वरांच्या गीताभाष्यांत कुठेंहि आढळत नाहीं. शंकराचार्यांनीं संन्यासमार्गाचा पुरस्कार करूनसुद्धां आचरणांत कर्ममार्गच आणला ! 'देखे प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले । तयाहि कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ॥' असेंच ज्ञानेश्वर सांगतात.

दुसरें असें कीं, ज्ञानेश्वरांनीं प्रत्यक्ष पद्धतीचें कांहीं राजकारण केलेंच नाहीं हें म्हणणेंहि माझ्या मतें तितकेंसें खरें नाहीं. तीर्थयात्रेला जाण्यामागें व नामदेवरायांची स्थापना पंजाबसारख्या दूरस्थ पण मोक्याच्या जागीं करण्यांत ज्ञानेश्वरांचा उद्देश राजकीय असावा, हें मी माझ्या 'ज्ञानेश्वरीचें विहंगमावलोकन' या लेखांत सुचविलें आहे. तें तुम्ही पाहिलें असेलच.

**प्रश्न ९ वा**:—संतसाहित्याकडे पाहण्याच्या निरनिराळ्या दृष्टिकोणांत ऐतिहासिक व आध्यात्मिक असे जे दोन दृष्टिकोण आहेत, त्यांचा कांहीं परस्पर-संबंध आहे काय ?

**उत्तर**:—आध्यात्मिक व ऐतिहासिक दृष्टिकोण यांचें कांहीं जिव्हाळ्याचें नातें आहे, असें मला वाटत नाहीं. ग्रंथ आध्यात्मिक दृष्ट्या मोलाचा आहे किंवा नाहीं, तो साक्षात्कारी व्यक्तीनें लिहिला आहे नाहीं, हेंच पाहणें सर्वांत महत्त्वाचें; मग त्याचा लेखक केव्हांहि झालेला असो. त्या साहित्याबद्दलची ऐतिहासिक माहिती त्या संताबद्दलची जिज्ञासा तृप्त करण्यास मदत करतें इतकेंच.

**प्रश्न १० वा**:—संतसाहित्याच्या होतकरू अभ्यासकाला कृपया आपण कांहीं उपयुक्त सूचना देऊं शकाल काय ?

**उत्तर**:—अभ्यासकाची दृष्टि आध्यात्मिक असेल तर त्यानें देवावर दृढ विश्वास ठेवून कोणत्या तरी एका ग्रंथाचें नीट परिशीलन केलें पाहिजे. मग तुलनेसाठीं इतर ग्रंथांचें त्याला साह्य होईल. केवळ वाङ्मयाच्या दृष्टीनेंच अभ्यास करणाऱ्या व्यक्तीनेंहि प्रथम कोणत्या तरी एका संतग्रंथावर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करावा. उदाहरणार्थ ज्ञानेश्वरीचा अभ्यास करणाऱ्याला त्याचा इतर संत-साहित्यांशीं मग मेळ घालून पाहणें सोपें जाईल.

**प्र. ११ वा**:— प्रारंभींच 'ज्ञानेश्वरी' सारखा कठीण ग्रंथ अभ्यासाला घेण्यापेक्षां 'दासबोध' किंवा तत्सम ग्रंथ घेणें अधिक इष्ट नाहीं काय ?

**उत्तर**:— कोणत्याहि ग्रंथापासून प्रारंभ केल्यास हरकत नाहीं. मला सारे संत सारखेच प्रिय आहेत. पण ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ 'कठीण' असल्यामुळें तो अभ्यासाला प्रथम घेऊं नये, या तुमच्या म्हणण्याशीं मात्र मी सहमत नाहीं. ज्ञानेश्वरी 'कठीण' असल्याचा आपण उगीचच भ्रम करून घेतला आहे, अंतरंग समजण्याच्या दृष्टीनें सारेच संत तसे 'कठीण' आहेत. या बाबतींत ज्ञानेश्वरीलाच वेगळें काढण्याचें कारण नाहीं, तिच्या भाषेच्या जुनेपणाचा अकारण बाऊ करण्यांत अर्थ नाहीं. उलट ज्ञानेश्वरीचेंच प्रथम अध्ययन केल्यास इतर संतसाहित्य उलगडणें फार सोपें जातें, असा अनुभव आहे.

**प्रश्न १२ वा**— कर्नाटक ही आपली कर्मभूमि बनविण्यामागें कांहीं विशिष्ट उद्दिष्ट होतें कीं केवळ योगायोग ?

**उत्तर**:— योगायोगच म्हणावयास हरकत नाहीं. निंबाळ, इंचगिरी, निंबर्गी, हीं तीनहि गुरुस्थळें कर्नाटकांत असल्यामुळें या त्रिस्थळींच्या सान्निध्यांत राहावयास मिळावें म्हणून ही भूमि मुख्यतः निवडली. दुसरें कारण म्हणजे या भागांत काम करण्यास कै. हणमंतराव कौजलगी यांनीं आग्रहानें केलेलें पाचारण.

**प्रश्न १३ वा:—** कर्नाटक व महाराष्ट्र यांच्यामध्यें आज जो दुजाभाव निर्माण झाल्यासारखा आहे, तो दूर करण्याच्या दृष्टीनें काय करणें आवश्यक आहे, असें आपल्याला वाटतें ?

**उत्तर:—** तुम्ही म्हणतां तसा दुजाभाव आजचा नसून तो बराच जुना आहे. त्याची येथें तपशीलवार चर्चा न करतां एवढेंच सांगतां येईल कीं, ज्या महाराष्ट्रीयाला हा दुजाभाव दूर करावासा वाटतो, त्यानें कर्नाटकची निष्काम भावनेनें अर्थात् आपलें सत्व न सोडतां सेवा केली पाहिजे. या योगानें कर्नाटकीय बंधूंचीं मनें आपोआप बदलतील. हें वैमनस्य दूर करण्याचा माझ्या मतें हा एकमेव उपाय आहे. महाराष्ट्रीय माणसानें येथील भाषा व संस्कृति यांचें अध्ययन केलें पाहिजे. गुरुदेव रानडे यांनी कन्नड साहित्याची केलेली सेवा या दृष्टीनें पुष्कळच मार्गदर्शक ठरणारी आहे. तसा विचार केल्यास इंचगिरी संप्रदाय मूळचा लिंगायतांनीं स्थापिलेलाच ना ? पण पंथीयांत हा भेदभाव आज कोठें आढळतो ? व्यापक दृष्टिकोण व प्रेमभाव असल्यास सारे भेदभाव सहज लोपतात.

**प्रश्न १४ वा:—** आजच्या भारतीय जीवनांत स्वराज्य-प्राप्तीनंतरहि जी सर्वांगीण अधोगति दिसून येते, ती दूर करण्यास आपल्या मतें उपाय कोणता ?

**उत्तर:—** चारित्र्यहीनता हें आपल्या अधोगतीचें प्रमुख कारण. खऱ्या आध्यात्मिक तत्त्वांचा अंगीकार केल्यास ही चारित्र्यहीनता जाऊं शकेल. आध्यात्मिक तत्त्वें समजून घेण्याच्या व आचरण्याच्या संदर्भांत संतसाहित्य पुष्कळच मार्गदर्शक ठरेल.

**प्रश्न १५ वा:—** आपल्या भावी जीवनांतील संकल्पांबद्दल आपण कांहीं सांगूं शकाल काय ?

**उत्तर:—** भावी जीवन किती शिल्लक आहे, हें कोण सांगूं शकणार ? सारेंच ईश्वराधीन आहे, माझ्या संकल्पांचेंहि तेंच. माझी सारी कार्यशक्ति सुदैवानें अद्यापि धड आहे. तो असेतोंपर्यंत अखंड कार्यमग्न राहावें, एवढाच संकल्प.

**प्रश्न १६ वा:—** आपल्या दीर्घकालीन विविध व्यासंगाचें व चिंतनाचें कांहीं भरीव वाङ्मयीन फलश्रुतींत रूपांतर व्हावें, अशी आपल्या चाहत्यांची उत्कट इच्छा आहे. आपल्या वाङ्मयीन कार्याच्या कांहीं योजना आहेत काय ?

**उत्तर:—** मनांत पुष्कळ आहे. गुरुदेवांच्या आठवणी लिहिण्याचें काम जवळजवळ पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. संतसाहित्यावरहि कांहीं लिहावेंसें वाटतें. आत्मचरित्रपर असें कांहीं लिहिण्याचाहि विचार मधूनमधून डोकावतो. यांतील काय व किती जमेल तें खरें !

**प्रश्न १७ वा:—** आपण तरुण पिढीला कांहीं संदेश द्यावा अशी नम्र विनंती आहे. आपला संदेश कोणता ?

**उत्तर:—** संदेश देण्याइतका मी कोणी मोठा नाहीं. पण गीतेंत सांगितल्या-प्रमाणें निष्काम सेवा करणें हाच मला सर्वश्रेष्ठ संदेश वाटतो. तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्यच हा गीतेचा श्लोकार्ध माझा फार आवडता आहे, वेळीं-अवेळीं मी तो गुणगुणत असतो. हा श्लोकार्ध म्हणजेच माझा संदेश असें वाटल्यास तुम्ही माना.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रकाशकाचे दोन शब्द | पांच ते सात |
| जीवन परिचय : ग. वि. तुळपुळे | सात ते तेरा |
| पद्मश्री काकासाहेबांची मुलाखत | चौदा ते एकोणीस |

~ ~

| | |
|---|---|
| श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली काय ? | १ |
| श्रीसमर्थांचें आचार-विचार-स्वातंत्र्य | २८ |
| श्रीसमर्थ व इतर संत : शिकवणींतील अंतर | ७६ |
| श्रीसमर्थांच्या तत्त्वज्ञानावरील माध्व छाया | ८९ |
| श्रीसमर्थांवरील कांहीं आक्षेपांचा परामर्श | १०२ |
| श्रीसमर्थ व नाना उपासना | ११४ |
| श्रीसमर्थ व त्यांचें ब्राह्मणपक्षपातित्व | १२२ |
| श्रीसमर्थ व राजकारण | १५५ |

~ ~

| | |
|---|---|
| संकीर्ण टिपणें | १८६ |


❀ ❀ ❀



पद्मश्री गणेश गोविंद तथा काकासाहेब कारखानीस

( जन्म : दि. २० एप्रिल १८९० )

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि ....................

# श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली काय ?

श्रीसमर्थांचा अवतार समाप्त होऊन गेल्यास आज जवळजवळ पावणेतीनशें वर्षें होत आलीं. या कालांत या भारतभूंत अनेक स्थित्यंतरें झालीं. मुसलमानी सत्ता नष्ट झाली, स्वराज्य आलें व गेलें, व त्या ठिकाणीं ब्रिटिश राजवट चालू झाली. या राजकीय पालटाचा परिणाम या देशाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय इत्यादि गोष्टींवर साहजिकपणें व्हावयाचा तो झाला आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या सहवासाने देशांतील लोकांच्या एकंदर आचारविचारांत मोठीच क्रान्ति घडवून आणलेली आहे. विशेषतः आधिभौतिक शास्त्रांच्या भरमसाट प्रगतीमुळें जीवनाकडे पाहाण्याचा समाजाचा एकंदर दृष्टिकोन पार पालटून गेला आहे व जात आहे. अशा परिस्थितींत तीनशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रास दिल्या गेलेल्या श्रीसमर्थांच्या शिकवणीचा सद्यःस्थितींत कितपत उपयोग होणार आहे, आधुनिक विचारप्रवाहांत तिला स्थान आहे काय, ती शिकवण जशीच्या तशी आजहि देशास आचरणार्ह आहे काय, का ती अजिबात त्याज्य झाली आहे, इत्यादि प्रश्नांचा ऊहापोह या लेखांत करण्याचा अल्पसा प्रयत्न आम्हीं करणार आहोंत.

सार्वजनिक कार्यांच्या निमित्तानें गेल्या दोन तपांत प्रस्तुत लेखकाचा संबंध विविध प्रकारच्या विचारप्रणालींतील लहानमोठ्या सज्जनांशीं आला. त्यांतील कांहीं वारकरी संप्रदायाचे नेते आहेत, कांहीं रामदासी संप्रदायाचे अध्वर्यु आहेत. बरींच वर्षें श्री लोकमान्यांच्या सहवासांत घालविलेले कांहीं महाभाग त्यांत आहेत, महात्माजींचे निकटवर्तीहि कांहीं जण त्यांत आहेत, कांहीं कम्युनिस्ट मताचे मित्र आहेत, तर कांहीं स्वतंत्र वृत्तीनें विचार करणारी मंडळीहि त्यांत आहेत. प्रसंग-विशेषीं गाठीभेटी झाल्यावेळीं अनेक विषयांचा विचारविनिमय त्यांच्याशीं होत असे. त्यांत आधुनिक ग्रन्थ प्रसिद्ध ग्रन्थकाराप्रमाणें ऐतिहासिक कालांतील ग्रन्थकारांचा साधुसंतांचा– परामर्शहि घेतला जात असे. अशा वेळीं पूर्वपक्ष व उत्तरपक्ष हटकून व्हावयाचेच, ऐतिहासिक कालांतील संतांचा विषय चालू असतां, एकानें म्हणावें कीं, साधुसंतांच्या खुळ्या बंडामुळें देश अधोगतीला गेला, दुसऱ्यानें प्रतिपादावें कीं, श्रीसमर्थ मात्र या गोष्टीला अपवाद आहेत, देशाला त्यांचा उपयोग झाला आहे, तों तिसऱ्यानें म्हणावें कीं त्यांचें वाङ्मयांतसुद्धां आतां तीनशें वर्षांचें जुनें झाल्याकारणानें नव्या जगताला मार्गदर्शन करण्याचें सामर्थ्य नाहीं, अतएव तेंसुद्धां आतां टाकाऊच झालें आहे, इत्यादि अनेक प्रकारचीं भिन्न भिन्न मतें त्या वेळीं प्रतिपादिलीं जात. एकदां तर मौज अशी झाली कीं, प्रस्तुत लेखकाचें

व्याख्यान एका शहरीं एका मंडळाच्या वतीनें ठरविलें गेलें. व्याख्यानाचा विषय ' श्री ज्ञानेश्वरमहाराजांचें कार्य ' असा होता व तो व्याख्यानाच्या आधीं १-१॥ महिना ठरविण्यांत आला होता. असें असतांनासुद्धां ठरलेल्या दिवशीं तेथें मी व्याख्यानास गेलों असतांना, व्याख्यानमालेचे चिटणीस शिष्टाचाराप्रमाणें व्याख्यानाचे आधी तास दोन तास भेटीस आले असतांना म्हणतात काय ? तर काय हो ! सहाशें वर्षांपूर्वींचा विषय तुम्ही घेतला आहे, या व्याख्यानाचा हल्लींच्या काळीं उपयोग काय ? व तुमच्या व्याख्यानास लोक तरी येणार किती व कसे ? ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास हे आतां फार जुने झाले आहेत म्हणून निरुपयोगी झालेले आहेत असें तुम्हास वाटत नाहीं काय ? त्यांच्यांत काय राजकारण आहे, का सामाजिक सुधारणा आहे, का मजुरांचा प्रश्न आहे, समाजसत्तावाद आहे, काय आहे तरी काय ? येऊन जाऊन तें तुमचें ब्रह्म व ती तुमची माया ! कोण विचारतो या तुमच्या निरुपयोगी वेदान्ताला ! इ. इ. ह्या प्रसंगाचा उल्लेख करण्याचें कारण एवढेंच कीं, या चिटणिसांच्या उद्गारांत महाराष्ट्रीय सुशिक्षित म्हणविणाऱ्या जनतेचें साधुसंतांच्या शिकवणीच्याबद्दलचें प्रतिबिंब पडलेलें आहे असें आम्हांस वाटतें. तेव्हां अशा प्रकारची विचारसरणी सत्यास धरून कितपत आहे, याचा विचार करणें आवश्यक आहे. सध्यां आपण केवळ श्रीसमर्थांच्याच शिकवणीचा विचार करूं या.

साक्षात्कारी पुरुषांचे ग्रन्थ अनुभवाच्या दृढतम पायावर रचलेले असल्यामुळें त्यांची शिकवण एक प्रकारें शाश्वतच असते. विद्वानांचे ग्रन्थ हे केवळ विद्वत्तेच्या जोरावर आधारलेले असतात. त्यांच्यांतहि अनुभव नसतो असें नाहीं. पण लौकिक अनुभव व आत्मप्रचीति यांत महदंतर आहे. त्यामुळें स्वानुभूतीच्या शाश्वत भूमिकेवरून लिहिलेले ग्रन्थ हे जसे त्रिकालाबाधित असतात, तसे त्या बैठकीचा ज्यास आधार नसतो ते ग्रन्थ शाश्वत होऊं शकत नाहींत; मग लिहिणारा कितीहि जाडा विद्वान् असो. याच कारणास्तव उपनिषदांची शिकवण वा गीतेची शिकवण ही शाश्वत आहे. देशकालपरत्वें या ग्रन्थांच्या शिकवणींत जो बदल झालेला दिसतो तो त्यांच्या मूलभूत सिद्धान्तांत नसून, त्या त्या कालास ते ते कसे कसे लावावयाचे, त्यांच्या योजनेंत—त्यांच्या बाह्य स्वरूपांत पडलेला असतो हें आपणास ह्या ग्रन्थाकडे पाहिल्यास दिसून येईल. हाच प्रकार श्रीसमर्थांच्या वाङ्मयाचा आहे. त्यांत रामदासी महंत कसा असावा किंवा श्रीसमर्थ संप्रदायाचीं लक्षणें कोणतीं यांची जी चर्चा जागोजाग आढळते ती पाहिली असतां निःशंकपणें असें विधान करण्यास प्रत्यवाय नाहीं, कीं श्रीसमर्थांनीं त्या कालीं महाराष्ट्राला दिलेली शिकवण एक प्रकारें शाश्वत आहे व आजहि ती बव्हंशीं जशीच्या तशी आचरणांत आणण्यास योग्य अशीच आहे, नव्हे ती ताबडतोब कृतींत आणण्यास महाराष्ट्रानें आतां मुळींच कालावधि करूं नये. श्रीसमर्थांनीं आपल्या कालीं ज्या वेळीं आपल्या कार्यास

महाराष्ट्रांत प्रारंभ केला, त्याला आज तीनशेंवर वर्षें होऊन गेलीं खरीं. पण त्या वेळीं देशाची जी स्थिति होती तीच पुष्कळ अंशीं आजहि कायम आहे. त्या वेळीं देश पारतंत्र्यांत होता, आजहि तो तसाच आहे, पारतंत्र्यामुळें प्रजेची जी सर्वांगीण दैना व जें अधःपतन त्या कालीं झालें होतें तें आजहि दिसून येत आहे. तेव्हां आपल्या काळच्या दुःस्थितीचा नायनाट करण्यासाठीं श्रीसमर्थांनीं ज्या साधनांचा अवलंब केला, आपल्या महतांस, आजच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास सार्वजनिक कार्यकर्त्यांस– जी शिकवण दिली व जे धडे दिले व ज्यांचा प्रचार या महंतांनीं महाराष्ट्रभर व बाहेरहि केला व जनतेची परकीय सत्तेविरुद्ध उठावणी करून त्या सत्तेचीं पाळेंमुळें खणून काढून टाकण्याचा प्रयत्न केला, ती त्यांची तेजस्वी शिकवण आपणांस त्यांच्या ग्रन्थांत पहावयास मिळते. ती पाहिली असतां 'श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली' अशी अज्ञानानें ओरड करणाऱ्या आधुनिक कार्यकर्ते व विचारवंत म्हणविणारांची कींव येते. आपल्या महंताच्या अंगीं कोणते गुण पाहिजेत, त्यानें काय केलें पाहिजे याचें टिपण श्रीसमर्थांनीं एका अभंगांत केलें आहे.

प्रथम लिहीणें दुसरें वाचणें । तिसरें सांगणें अर्थांतर ॥ १४.१
आशंका निवृत्ति ऐसी चौथी स्थिती । पांचवी प्रचीती अनुभवें ॥ २
साहावें तें गाणें सातवें नाचणें । ताळी वाजवणें आठवें तें ॥ ३
नवां अर्थभेद दाहावा प्रबंद । आक्रांवां प्रबोध प्रचीतीसी ॥ ४
बारावें वैराग्य तेरावा विवेक । चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५
पंध्रावें लक्षण तें राजकारण । सोळावें तें जाण अवेग्रता ॥ ६
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा सर्वांठाईं ॥ ७
आठ्रावें लक्षण वृत्ती उदासीन । लोलंगता जाण तेथें नाहीं ॥ ८
ऐकोणीसावें चीन्ह सर्वांसी समान । राखे समाधान ज्याचें त्याचें ॥ ९
विसावें लक्षण रामउपासना । वेध लावी जना भक्तीरंगें ॥ १०

वरील वीस लक्षणांपैकीं विसावें लक्षण– रामउपासना हें आत्मज्ञानासंबंधींचें आहे, बाकीचीं एकोणीस या आत्मज्ञानास पोषक अशीं आहेत. 'श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली' असें मानणारांस आम्हीं विचारतों, कीं यांपैकीं कोणतीं लक्षणें आजच्या बदललेल्या परिस्थितींतहि सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या अंगीं असणें आवश्यक नाहींत? कोणतीं लक्षणें टाकाऊ आहेत, हें त्यांनीं दाखवावें व मगच त्यांनीं आपल्या आग्रही मत-प्रतिपादनाच्या भानगडींत पडावें. आमच्या मतें यांतील प्रत्येक लक्षण अत्यंत महत्त्वाचें आहे. ज्यांच्या अंगीं हीं लक्षणें ज्या प्रमाणांत वास करीत आहेत, त्या त्या व्यक्ती त्या कमीअधिक प्रमाणांत समाजांत

आज प्रत्यक्ष रीतीनें कार्य करीत असलेल्या दृष्टोत्पत्तीस पडत आहेत. तेव्हां ज्यांना कांहीं प्रत्यक्ष भरीव कार्य करून दाखवावयाची मनीषा आहे, त्यांनीं यांपैकीं शक्य तितकीं लक्षणें आपल्या अंगीं बाणविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचें उद्दिष्ट सत्वर साधेल, असें निःसंशय समजावें. देशांत — महाराष्ट्रांत — हल्लीं अनेक कार्यकर्ते विद्यमान आहेत. आपल्या शक्तीप्रमाणें ते सार्वजनिक सेवेचें व्रत अविरतपणें चालवीत आहेत. तरी पण आक्षेपकांस असें विचारावेंसें वाटतें, कीं वरील अभंगांत वर्णिलेल्या गुणांनीं मंडित असे त्यांत कितीसे आहेत ? का त्यांस वरील सर्व लक्षणें कालबाह्य झालीसे वाटतें ?

'अतिपरिचयें अवज्ञा घडे' या न्यायानें असें वाटतें, कीं संतांच्या विशेषतः श्रीसमर्थांच्या प्रत्येक कृतीकडे व उक्तीकडे गंभीरपणें पहाण्याचा आमचा अभ्यास सुटत चाललेला आहे, आम्हांस त्यांत कांहीं खोल हेतु आहे असें वाटेनासें झालें आहे. नाहींतर आम्हांकडून या गोष्टींची होत आलेली अवहेलना झाली नसती, व त्यांत कांहीं तरी मोठा अर्थ भरला आहे असें वाटलें असतें. याबद्दल आपण श्रीसमर्थांच्या चरित्रांतील, त्यांच्या अलौकिकत्वाची व विभूतिमहत्त्वाची पहिली चमक ज्या प्रसंगापासून दिसूं लागली तेंच उदाहरण घेऊं या. आक्षेपकांस नम्र विनंति ही, कीं त्यांनीं अगदीं चिकित्सक दृष्टीनें श्रीसमर्थांच्या प्रत्येक कृतीकडे पहावें, पण त्यांत स्वमताभिनिवेश मात्र नसावा. म्हणजे त्यांस कळून येईल, कीं श्रीसमर्थांच्या आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट आधुनिक कार्यकर्त्यांस अनुकरणीय आहे. होऊं घातलेला विवाह हा त्यांच्या आयुष्यांतील पहिला महत्त्वाचा प्रसंग. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीं हा बिकट पाश व मोह तोडण्याचें सामर्थ्य श्रीसमर्थांशिवाय दुसऱ्या कोणा प्रसिद्ध व्यक्तींत प्रतिपक्षीयांस दिसून आलेलें विद्यमान जगाच्या इतिहासांत आहे काय ? केवढें कोंवळें वय व काय हें प्रखर वैराग्य ! श्रीसमर्थांच्या चरित्रांतील ही घटना ऐतिहासिक प्रमाणानें सिद्ध आहे. ही कांहीं कविकल्पना नव्हे. देशाभिमानानें प्रेरित झालेली शेंकडों तरुण मंडळी आजन्म ब्रह्मचारी राहून देशाची सेवा करण्याचा संकल्प करीत आलेली व असलेली नित्यशः आपण ऐकतों व पाहतों, पण त्यांच्या आयुष्यांत हा परीक्षेचा — विवाहाचा प्रसंग आला रे आला, कीं मग भावनेच्या भरांत केलेले त्यांचे ते निश्चय व तीं उच्च ध्येयें कोठच्या कोठें 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः' या उक्तीप्रमाणें पार लयाला जातात व त्यांचें आयुष्य, तोडण्यास अशक्य असलेला मायेचा पाश गळ्यांत पडल्यानें, सर्व-सामान्य माणसासारखेंच होतें. जगाच्या या सनातन राहाटीकडे पाहिलें असतां श्रीसमर्थांनीं आपल्या ध्येयपूर्तीसाठीं अगदीं अल्पवयांत केलेला हा लोकोत्तर त्याग अपूर्व आहे असें आक्षेपकांस वाटत नाहीं काय ? ध्येयप्राप्तीसाठी श्रीसमर्थांची केवढी ही मनाची कठोरता ! या व असल्याच प्रसंगांना उद्देशून एकवीस समासांतील पुढील वचनें त्यांच्या मुखांतून पडलीं असलीं पाहिजेत : —

तुजकारणें सर्व संग । त्यक्त केला ।। २.२
तुजविण मज माया । कांहीं नाहीं रे रामराया । २.४
तुजकारणें जिवलगांचा । संग सोडिला ।। २.५

हातांत घेतलेल्या कार्याच्या पूर्तीसाठीं 'देह पडे का देव जोडे' अशा प्रकारची श्रीसमर्थांची अल्पवयांतील हांव पाहून मन आश्चर्यानें स्तंभित होऊन जातें. ध्येयपूर्तीसाठीं कराव्या लागणाऱ्या त्यागाच्या श्रीसमर्थांनीं पायऱ्या लावलेल्या नाहींत. यासाठीं केवढें वैराग्य, ज्याला आधुनिकांनीं स्वार्थत्याग हें नांव दिलेलें आहे, आंगीं बाणलें पाहिजे त्याबद्दलची ग्रंथराजांतील ती सुप्रसिद्ध ओंवी वाचकांच्या परिचयाची आहेच :—

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तोहि वेचावा ।। ४.८.८

श्रीसमर्थांनीं हें स्वतः आचरिलें, एवढेंच नव्हे तर, आपल्या तपश्चर्येच्या प्रभावानें आपणांसारखेच देशासाठीं सर्वस्वाची होळी करणारे शेंकडों कार्यकर्ते त्यांनीं उत्पन्न केले. 'देशासाठीं' हा शब्दप्रयोग पाहून कांहीं मंडळी बिचकतील पण त्यांस एवढेंच सांगतों, कीं श्रीसमर्थांनीं देव आणि देश हे भिन्न आहेत असें मानलेलें नाहीं. असो. सव्वातीनशें वर्षांपूर्वीं श्रीसमर्थांनीं घालून दिलेलें हें जाज्वल्य उदाहरण, ज्याला देशासाठीं कांहीं खरोखरींच करावेंसें वाटतें, त्याला आजहि अनुकरणीय नाहीं काय ?

ज्या देवाच्या सख्यत्वासाठीं श्रीसमर्थांनीं आपल्या सर्वस्वावर लाथ मारली त्या देवाच्या स्वरूपाकडे पाहिल्यास कट्टर नास्तिकहि त्या उपासनेस लागेल. श्रीसमर्थांची उपासना एकांगी नाहीं. ती विश्वव्यापिनी आहे. म्हणून या उपासनेला त्यांनीं पहिलें स्थान दिलें आहे.

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषईं ।। ११.५.४
चौथा अत्यंत साक्षेप । ५

ही त्यांची प्रसिद्ध चतुःसूत्री होय. या चतुःसूत्रींतील पहिलें सूत्र जें 'हरिकथा निरूपण' यांत श्रीसमर्थांनीं उपासना करावयास सांगितलें आहे उपासना अर्थातच सगुणाची होय. निर्गुणाची उपासना संभवतच नाहीं. मात्र सगुणाची उपासना याचा जो संकुचित अर्थ कांहीं विद्वान करीत असतात तो येथें अभिप्रेत नाहीं. सगुणोपासना याचा प्रचलित अर्थ मूर्तिपूजा इतकाच करण्यांत येतो. अधिकारपरत्वें श्रीसमर्थांनीं साधकांसहि ही उपासना सांगितली आहे. पण ते येथेंच थांबत

नाहींत. त्यांची उपासना ब्रह्मांडव्यापिनी आहे. त्यांच्या रामाचें रूप नभासारखें विस्तीर्ण आहे. इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. जगताची सेवा म्हणजे 'हरिभजन' अशी श्रीसमर्थांची व्याख्या आहे,

नारायण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।
या कारणें तोषवावी। कोणी तरी काया॥

या ओंवीवरून श्रीसमर्थ देशसेवा व देवसेवा यांत कांहींच अंतर मानीत नव्हते हें स्पष्ट दिसून येत आहे या ठिकाणीं विश्व याचा अर्थ देश —स्वदेश असा करण्यांत आला आहे. श्रीसमर्थ विश्वकुटुंबी असतांना त्यांच्या अंगीं हा संकुचित अर्थ चिकटविण्यांत कां येत आहे, अशी शंका येणें साहजिकच आहे. याचें उत्तर असें आहे कीं, श्रीसमर्थांच्या वर्तनांत जो मनस्वी नेमकेपणा दिसून येतो, त्याला अनुसरून हा अर्थच घेणें योग्य आहे. तात्पर्य, जेणेंकरून आपला देश सर्वतोपरी सुखी राहील असें वर्तन करणें यालाच श्रीसमर्थांनीं हरिभजन किंवा उपासना म्हटलें आहे, व ती ज्याची करावयाची तें विश्वच, तो देशच त्यांचें सगुण दैवत होतें.

ते म्हणतात :—

राम तो जाणिजे आत्मा। सर्वांतरात्मा तो चि तो। च. मा. १.१

अशी ही सर्वांतरात्म्याची श्रीसमर्थांनीं महाराष्ट्राला आपल्या कालीं उपासना दिली होती. त्या कालीं तो त्या उपासनेंतून उत्तीर्णहि झाला होता! आजचा महाराष्ट्र ही उपासना करीत आहे काय? श्रीसमर्थांप्रमाणें कितीश्या मंडळींनीं या उपासनेकरितां आपलें तनमनधन झिजविलें आहे, किती कार्यकर्त्यांच्या अन्तःकरणांत,

सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे।

अशी श्रीसमर्थांप्रमाणें,

निशीदिनीं जनचिंता लागलीसे अपारा।

असें झालें आहे? समाजाचीं नानाविध दुःखें पाहून,

उदंड दुःख लोकांचें। ऐकतां ऊर फुटतो।

अशा रीतीनें किती जणांची छाती दुःखभरानें फुटूं लागली आहे? हे व अशाच तऱ्हेचे प्रश्न विचारल्यास त्याचें समर्पक उत्तर महाराष्ट्रानें द्यावयास नको काय? श्रीसमर्थांस महाराष्ट्र आपल्या गुरुस्थानीं मानतो. त्याचें त्यांच्यावर गाढ प्रेम आहे. पण गुरूनें सांगितलेल्या या उपासनेकडे मात्र त्याचें असावें तसें लक्ष नाहीं. तसें असतें तर देशाच्या प्रत्येक आंदोलनांत तो उसळून पडला असता. पण तो तसा पडलेला नाहीं, हें अगदीं स्पष्ट आहे, पण असें करण्यांत गुरुद्रोहाचें पातक आहे.

तें टाळावयाचें असल्यास महाराष्ट्रानें आतां या गुरूपदिष्ट उपासनेची कांस पुन: धरली पाहिजे. पुरे झाली आतां अन्य देवतांची उपासना ! ‘ जितके गांव तितके देव ’ आहेत, त्यांच्या उपासनेपासून इष्ट कार्यसिद्धि व्हावयाची नाहीं. कारण,

अज्ञान जनाचे देव नानापरी ।
त्यांची संख्या करी कोण आतां ।। स्फु. ओं. ३.१

तेव्हां आतां सर्वांनीं या उपरिनिर्दिष्ट उपासनेच्या मार्गें लागावें हें हितावह आहे.

श्रीसमर्थांच्या चतु:सूत्रींत राजकारणाचा अनुक्रम दुसरा लागतो, एवढें त्याचें महत्त्व श्रीसमर्थ मानतात. आधुनिक काळांतील श्रीसमर्थ अशी ज्यांच्याबद्दल आमची भावना आहे ते श्री लोकमान्य याबद्दल एके ठिकाणीं असें म्हणतात कीं, “धर्म व राजकारण दोन नाहींत असेंच श्रीरामदासांनीं शिकविलें.” लोकमान्यांच्या या उक्तीवरून श्रीसमर्थांनीं राजकारणास एवढा उच्चांक कां दिला असावा हें ध्यानांत येतें. श्रीसमर्थांच्या पूर्वीं व नंतर आतांपर्यंतच्या कोणत्याहि महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर संतानें राजकारणास एवढें महत्त्व दिल्याचें उभ्या हिंदुस्थानांत आढळून येत नाहीं. सनातन धर्माचा त्रिभुवनांत डंका गाजविणारे एवढे मोठे संत स्वामी विवेकानन्द त्यांनींसुद्धां आपल्या संप्रदायांत राजकारणास असें स्थान दिलेलें आढळून येत नाहीं. परकीय राजवटींत राजकारणास प्रपंचामध्यें केवढें महत्त्व असतें हें विसाव्या शतकांतील, कीं ज्या शतकांत राजकारणास पहिल्या प्रतीचें महत्त्व प्राप्त झालें आहे, संतांच्या लक्षांत न येतां, सतराव्या शतकांतील, कीं ज्या-वेळीं राजकारणास अजून विशेष महत्त्व प्राप्त झालें नव्हतें, तें अजून शास्त्रत्वाप्रत पोहोंचलें नव्हतें, श्रीसमर्थांच्या ध्यानांत आलें, एवढेंच नव्हे तर त्यांनीं तें आपल्या संप्रदायाचें एक प्रमुख अंग मानलें, यांतच त्यांचें अलौकिकत्व दिसून येतें. सर्व साधुसंतांनीं प्रपंच नेटका कसा करावा हें सांगितलें आहे. श्रीसमर्थांनींहि तें सांगितलें आहे. पण राजकारणाशिवाय केलेला प्रपंच तो खरा प्रपंचच नव्हे, त्याला प्रपंच म्हणतां यावयाचें नाहीं, असें श्रीसमर्थांनीं अगदीं हडसून खडसून सांगितलें आहे हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. या संबंधीं,

प्रपंचीं जाणें राजकारण । परमार्थीं साकल्य विवरण । १९.४.१७

असें त्यांचें सूत्र आहे. या ठिकाणीं राजकारण याचा अर्थ आपण हल्लीं जो करतो तोच आहे, तसेंच

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।

या ठिकाणींहि पण राजकारण म्हणजे Politics असाच अर्थ अभिप्रेत आहे. असा राजकारणप्रधान राष्ट्रप्रपंच श्रीसमर्थांनीं केला, व राष्ट्रालाहि तो तसा करण्याचा

कित्येक युद्ध प्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले ।
रात्रंदिवस करूं लागले । युद्धच चर्चा ॥
उदिम्यास व्यासंग लागला । अवकाश नाहींसा जाला ।
अवघा पोट धंदाच लागला । निरंतर ॥

* * *

स्मार्थी आणि वैष्णवी । उरलीं सुरलीं नेलीं आघवी ।
ऐसी पाहता गथागोवी । उदंड जाली ॥

या वर्णनावरून अनुमानें निघतात तीं अशीं कीं, पोटासाठीं परधर्मांत जाणें, पोटासाठीं परकीयांची नोकरी करणें, पोटासाठीं केवळ व्यापार करणें या व इतर गोष्टी श्रीसमर्थांस बिलकुल मान्य नव्हत्या. त्यांचा ते मनापासून तिरस्कार करीत. श्रीसमर्थांच्या या वर्णनांत धार्मिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक या सर्वांचें रूप दृष्टीस पडतें. पण हें वर्णन आजच्या परिस्थितीला अगदीं तंतोतंत लागूं पडत नाहीं काय? तात्पर्य, श्रीसमर्थांची उपासना जशी विश्वव्यापिनी तसेंच त्यांचें राजकारणहि ब्रह्मांडाला गवसणी घालणारें व्यापक, हेंच या वर्णनावरून सिद्ध होतें.

राजकारणांत कार्यकर्त्यांस योग्य तो उपदेश व मार्गदर्शन करणें हें कमी महत्त्वाचें नाहीं. श्रीसमर्थांनीं तें भरपूर केलें असावें असें उपलब्ध प्रमाणांवरून वाटतें. चंद्रराव मोरे प्रकरण, अफजुलखानवध-प्रकरण हीं प्रकरणें श्रीसमर्थ प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेत असत, याचींच प्रमाणें होत.

अशा या श्रीसमर्थांच्या राजकारणपर शिकवणींत आजहि कांहीं धडा घेण्यासारखा आहे, असें आक्षेपकांस वाटत नाहीं काय?

श्रीसमर्थांसारखे निष्ठुर ध्येयवादी श्रीसमर्थच! देशासाठीं व धर्मासाठीं त्यांच्यासारखे दुसऱ्या कोणी कष्ट केलेले आढळत नाहीं. वयाच्या बाराव्या वर्षापासून त्यांच्या शारीरिक व मानसिक कष्टांस प्रारंभ झाला, तो जवळ जवळ त्यांच्या समाधिकालापर्यंत चालूं होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्राच्या सबंध इतिहासांत श्रीशिवछत्रपतींखेरीज या तोडीचें दुसरें उदाहरण नाहीं, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. धगधगीत ब्राह्मण्य कसें असावें याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्रीसमर्थांचेंच. "ब्राह्मणाचा देह संसारांतील तुच्छ भोग भोगण्यासाठीं निर्माण झालेला नाहीं, तर या लोकीं जिवंत असेपर्यंत कष्ट करून तप करण्याकरितां, आणि मरण पावल्यानंतर परलोकीं अनंत सुख भोगण्याकरितां आहे,"

ब्राह्मणस्य तु देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते ।
कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानन्त सुखाय च । ११.१७.४२

या भागवतोक्त उक्तीप्रमाणें श्रीसमर्थांचा आयुष्यक्रम शेवटपर्यंत अक्षरशः होता. ‘ब्राह्मण स्त्री गर्भ धारण करत्ये तो त्यानें जन्माला येऊन तप करावें म्हणून.’

तपोर्थीयं ब्राह्मणी धत्त गर्भम् । ११.२६.५

हें महाभारतकारांचें वचन श्रीसमर्थांनीं मातोश्रीच्या उदरीं येऊन अगदीं सार्थ केलें. तप म्हणजे ध्येयपूर्तीसाठीं शारीरिक व मानसिक कष्ट होय. श्रीसमर्थांचें ध्येय काय होतें, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. “आघवेचि सुखी असावे । ऐसी वासना” असें आपल्या ध्येयाचें त्यांनीं स्वतःच वर्णन केलें आहे. गिरिधरांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास “रामराज्य करणें सर्वत्र हो” हा श्रीसमर्थांच्या सबंध आयुष्याचा ध्रुव तारा होता. या ताऱ्यावरील त्यांची दृष्टि वयाच्या पांचव्या वर्षांपासून तों त्यांच्या त्र्याहत्तराव्या वर्षापर्यंत क्षणभर देखील, कोणत्याहि बिकट प्रसंगांत, कितीहि कष्ट सोसण्याचा प्रसंग आला असतां, इकडे तिकडे चळली नाहीं, इतका त्यांचा कठोर ध्येयवाद होता. त्यांचा प्रत्येक श्वासोच्छ्वास या ध्येयपूर्तीसाठीं होता.

श्रीसमर्थांच्या एकंदर आयुष्यक्रमावरून असें अनुमान वा सिद्धान्त निघतो कीं, ब्राह्मणत्व आणि सौख्य (अर्थात् शारीरिक सौख्य) या गोष्टी त्यांस परस्परविरुद्ध वाटत असाव्यात. त्यांच्या ग्रंथावरूनहि हेंच सिद्ध होतें. दा. १४.१ हा समास हेंच सांगतो, शिवाय

घरींच बैसतां खोटें । ब्राह्मणु हिंडता बरा
आळसी घातघेणा तो । कष्टाला म्हणजे बरा ॥

तसेंच,

अत्यंत साक्षपी व्हावें । न व्हावें आळसी कदा ॥

हें वचन, त्याचप्रमाणें दासविश्रामधामकारकृत,

समर्थां घरीं ऐसा कायदा । आळसासी टेंको न देती कदा ।
करिती शिष्यांनीं सर्व काळ धंदा । सद्गुरुकडे लक्षीत ॥

हें श्रीसमर्थांच्या कडक शिस्तीचें वर्णन व इतरहि एतत्सदृश अनेक वचनें हेंच दर्शवितात. त्यांतल्या त्यांत ब्राह्मणवर्गावर सर्व समाजाच्या नेतृत्वाचा फार मोठा भार आहे, असें श्रीसमर्थांचें प्रामाणिक मत असल्यानें, ब्राह्मणानें कष्टांतच सौख्य मानलें पाहिजे असें त्यांस वाटत होतें,

कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळची पाविजे ।
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्माण्ड भोगवी ॥

या व इतर उद्गारांवरून असें वाटतें कीं ब्राह्मण्य = तप = कष्ट असें त्यांचें समीकरण होतें. 'घरींच बैसतां खोटें' इ. वचनांवरून श्रीसमर्थांचा ब्राह्मणासंबंधींचा दुसरा सिद्धान्त असा निष्पन्न होतो कीं, ब्राह्मण म्हणजे तो त्यांच्या मतें कायमचाच प्रचारक असला पाहिजे, त्यानें घरीं न बसतां समाजामध्यें सतत ज्ञानाचा प्रसार करीत. जागृति उत्पन्न करीत हिंडलें पाहिजे. ब्राह्मणांबद्दल महाभारतकारांचा हाच अभिप्राय असल्याचें दिसून येतें. 'युद्ध न करणारा राजा आणि प्रवास न करणारा ब्राह्मण या दोघांना, बिळांत राहणाऱ्या प्राण्यांना सर्प खाऊन टाकतो त्याप्रमाणें भूमि गिळून टाकते."

भूमिरेतौ निगरति सर्पो बिलशयानिव ।
राजानं चाप्ययोद्धारं ब्राह्मणं चाप्रवासिनम् ॥ १२.२३.१५

यांत ब्राह्मणानें प्रवास करावयाचा तो पोटास मिळत नाहीं म्हणून भिक्षा मागण्याकरितां नव्हे, तर त्याचा हेतु वर सांगितल्याप्रमाणें आहे. समाजाकरितां कांहीं एक न करतां फुकट भिक्षा मागणाऱ्या अव्रती व अध्ययनशून्य ब्राह्मणांना राजानें शिक्षा करावी असें महाभारतांतच एके ठिकाणीं सांगितलें आहे.

अव्रता ह्यनधीयाना यत्र भैक्षचरा द्विजाः ।
तं ग्रामं दण्डयेद्राजा ।

महाभारतकार व श्रीसमर्थ हे ब्राह्मणवर्गाकडून केवळ त्यागाची अपेक्षा करीत आहेत हें आतांपर्यंत आपण पाहिलें. त्यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं, ब्राह्मण ह्या वर्गाचें स्वतःसाठीं – स्वार्थासाठीं – अस्तित्वच मुळीं नाहीं. त्याची प्रत्येक गोष्ट जगासाठींच असली पाहिजे. शांतिपर्व अ. २४५ मध्यें 'ज्याचें जीवित धर्मासाठीं, ज्याचा धर्म देवासाठीं, ज्याचें आयुष्य तपासाठीं असतें तोच खरा ब्राह्मण होय,' अशी एके ठिकाणीं ब्राह्मण शब्दाची व्याख्या केलेली आहे.–

जीवितं यस्य धर्मार्थे धर्मो हर्यर्थमेव च ।
अहोरात्रिश्च पुण्यार्थं देवा ब्राह्मणं विदुः ॥

व तीच त्यांस अभिप्रेत असल्याचें, त्यांच्या आयुष्यावरून व ग्रन्थांवरून दिसतें.

श्रीसमर्थांस आपले गुरु समजणाऱ्या आधुनिक सुशिक्षित महाराष्ट्रानें वरील त्यांच्या मताचा विचार करावा. श्रीसमर्थांचें ब्राह्मणांबद्दलचें हें मत कोणीकडे व समाजांत हल्लीं या वर्गाच्या कांहीं पुढाऱ्यांकडून प्रतिपादिलें जात असलेलें मत कोणीकडे ? ब्राह्मणांनीं आपली दुःस्थिति सुधारण्याकरितां वाटेल तो धंदा करावा असें हे अट्टाहासानें सांगत असतात. परिस्थितींत अंतर पडलें आहे. तेव्हां वारा येईल तशी पाठ फिरवली पाहिजे. असें यांचें मत आहे. यांना असा प्रश्न

विचारावासा वाटतो कीं, श्रीसमर्थांच्या कालीं जी समाजाची स्थिति होती तीच आज जवळजवळ आहे ना? समाजाची आजची जी नैतिक व आचारात्मक कल्पना आहे तीच तीनशें वर्षांपूर्वी होतीना? का त्यांत व आतांच्या स्थितींत दृष्टींत भरण्याजोगें अन्तर पडलें आहे? तें विशेष पडलेलें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. असें असतांना सुद्धां देशकालवर्तमानाकडे पाहून पावलोंपावलीं सावधानतेचा पुकारा करणारे श्रीसमर्थ ब्राह्मणांस जें सांगत आहेत तें आजच्या काळांत या ब्राह्मण-कवाऱ्यांस कां पटूं नये याचें सखेदाश्चर्य वाटतें! ब्राह्मणांच्या त्या कालाच्या दुःस्थितीचें श्रीसमर्थकृत वर्णन आजच्या ब्राह्मणवर्गास अक्षरशः लागतें. आपल्या हृदयाच्या रक्ताच्या शाईनें तें वर्णन श्रीसमर्थांनीं लिहिलें आहे कीं काय असें वाटतें; इतकें तें कळवळून लिहिलें आहे :—

नीच प्राणी गुरुत्व पावला। तेथें आचार चि बुडाला।
वेदशास्त्रब्राह्मणाला। कोण पुसे॥

ब्रह्मज्ञानाचा विचारु। त्याचा ब्राह्मणासीच अधिकारु।
वर्णानां ब्राह्मणो गुरुः। ऐसें वचन॥

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आचारापासून भ्रष्टले।
गुरुत्व सांडून जाले। शिष्य शिष्यांचे॥

कित्येक दावलमलकास जाती। कित्येक पीरास भजती।
कित्येक तुरुक होती। आपले इछेनें॥

ऐसा कलयुगींचा आचार। कोठें राहिला विचार।
पुढें पुढें वर्णसंकर। होणार आहे॥

गुरुत्व आलें नीच याती। कांहीं येक वाढली महंती।
शूद्र आचार बुडविती। ब्राह्मणांचा।
हें ब्राह्मणांस कळेना। त्यांची वृत्तिच वळेना।
मिथ्या अभिमान गळेना। मूर्खपणाचा॥

राज्य नेलें म्लेंचिं क्षेत्रीं। गुरुत्व नेलें कुपात्रीं।
आपण अरत्रीं ना परत्रीं। कांहींच नाहीं॥

ब्राह्मणांस ग्रामणीनें बुडविलें। विष्णूनें श्रीवत्स मिरविलें।
त्याच विष्णूनें श्रापिलें। फरशरामें॥

आह्मीहि तेचि ब्राह्मण। दुःखें बोलिलें हें वचन।
वडिल गेले ग्रामणी करून। आम्हां भोंवतें॥

आतांचे ब्राह्मणीं काये केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुम्हां बहुतांचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ॥
—दा. १४.७.२९ ते ३९

यांतील कोणती ओंवी आजच्या ब्राह्मणांना लागू नाहीं ? गेलीं कित्येक शतकें ब्राह्मण-वर्गाचें काय हें अधःपतन चाललेलें आहे ! आतां ही घसरगुंडी थांबणार तरी कोठें ? का ही अशीच चालावयाची ? खरोखर पाहतां एका कालाला ब्राह्मणांचा केवढा अधिकार होता ! " या देशांत जन्मलेल्या ब्राह्मणांच्या चरणांजवळ बसून जगांतील सर्व मानवजातीनें आपापलीं कर्तव्यें समजून घ्यावीं ":—

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥

असें मनूचें वाक्य आहे. असें असतां ऐहिक सुखाच्या मोहाला बळी पडून त्यांनीं आपलें महत्त्व घालविलें व सगळ्यांच्या रोषाला पात्र होऊन बसले, समाजांत उच्चनीचत्वाची नसतीं ग्रामण्यें, नसते वाद उपस्थित न करितां, श्रीसमर्थांनीं सांगितल्याप्रमाणें, समाजाच्या सर्वांगीण उद्धाराचें कार्य ढुंगणाला लंगोटी लावून निरपेक्षपणानें, खोट्या मोठेपणाची हांव न धरितां, जर या वर्गानें चालू ठेविलें असतें, तर आज समाजांत जी बजबजपुरी, जी अनवस्था माजलेली दिसून येत आहे ती दिसती ना ! आपल्या कालीं, श्रीसमर्थांनीं हें जाणलें होतें व जाणून वेळेवर ब्राह्मणांस सावध केलें होतें. त्याचा परिणाम काय व्हावयाचा तो झाला होता. तेव्हां श्रीसमर्थांनीं ब्राह्मणांस केलेला हा उपदेश व शिकवण आजहि त्यांस मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे, अशी आमच्याप्रमाणेंच आमच्या आक्षेपक मित्रांची खात्री पटेल, असा आम्हांस दृढ भरवसा आहे.

सर्वस्वाचा त्याग करून जनीजनार्दनाची सेवा करण्यास बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांस दोनप्रहरची चिंता न पडावी म्हणून श्रीसमर्थांनीं त्यांच्या हातांत भिक्षेची कामधेनु दिली आहे. यांत श्रीसमर्थांचा फार खोल हेतु आहे. त्यांच्या-पूर्वीं हा भिक्षेचा सांप्रदाय होता व हल्लींहि तो अजून विद्यमान आहे. पण श्रीसमर्थांनीं भिक्षा मागण्यांत जी शिस्त घालून दिली आहे, त्यांत जो उद्देश त्यांचा दिसून येतो, ती शिस्त व तो उद्देश मात्र इतरांच्यांत दिसून येत नाहीं. बहुतेक लोक ती पोटासाठींच मागतात. कांहीं थोडे निःस्पृहपणानें मागत असतील, नाहीं असें नाहीं. पण या थोड्यांत श्रीसमर्थोक्त निःस्पृहांचीं तीं इतर लक्षणें नाहींत. भिक्षा मागण्यास सांगण्यांत श्रीसमर्थांचे अनेक हेतु दिसून येतात. कार्यकर्त्यांचा जास्तींत जास्त वेळ समाजकार्याकडे लागावा, आपल्या पोटासाठीं तो दुसऱ्याचा मिंधा नसावा, भिक्षा घालणारास आपण ती घालतांना ती घेणारावर मोठा उपकार

करीत आहोंत असें न वाटावें, तसेंच घेणारालाहि आपण कोणाचें उपकृत झालों आहोंत असें न वाटावें, कार्यकर्ता कोणा एकट्यावर अवलंबून नसावा, तो तसा राहिल्यास त्याच्या आन्तर्बाह्य स्वातंत्र्यास बाधा येण्याचा संभव आहे, जनतेच्या पुढें असले भिक्षेकरी नेहमीं आल्यानें तिला ते करीत असलेल्या कार्याची नेहमीं जाणीव व जागृति राहावी, हे व इतर उद्देश श्रीसमर्थांच्या मनांत ती चालू करतांना असावेत असें दा. १४.२ मधील वर्णनावरून वाटतें व काहींचीं अनुमानें बांधतां येतात. भिक्षा मागतांना कार्यकर्त्यानें आपले डोळे, कान व इतर इंद्रियें जागृत ठेवावयास पाहिजेत हें पुढील उद्गारांवरून दिसून येतें:—

प्रत्यहीं मागणें भिक्षा। मिळाली न मिळे तरी।
नित्य नूतन हिंडावें। धुंडावे भक्त प्रेमळ॥ स्फु. प्र. ३.६
हिंडतां पारखी लोकां। कार्यकर्ता जिवीं धरीं॥ स्फु. प्र. १.६

श्रीसमर्थांच्या भिक्षेसंबंधींच्या शिकवणीचा साकल्यानें विचार केल्यास असें दिसतें कीं ही भिक्षा मागावयाची ती स्वतःसाठीं नसून जगासाठींच आहे. कारण ती मागणाराचें, ती मागत असतांना स्वतःचें स्वतंत्र असें अस्तित्वच उरलेलें दिसून येत नाहीं. वैयक्तिक मोक्षासाठीं भीक मागणारे अनेक झाले व होतीलहि पुढें. पण तो तरी उच्च कोटीचा पण एक प्रकारें पराकाष्ठेचा स्वार्थच होय. श्रीसमर्थांस हें नको होतें. आपण तरून इतरांस तारणारीं धडाडीचीं माणसें त्यांना पाहिजे होतीं.

"जयाचें धड नाहीं। तयाचें परत्र पुससी काई"

म्हणजे पारलौकिक स्वराज्य ऐहिक स्वराज्याशिवाय शक्य नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत होतें :—

प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल।

तेव्हां असला प्रपंच करून जगाचा उद्धार करणारीं माणसें श्रीसमर्थांना पाहिजे होतीं. त्यांच्यासाठीं ह्या भिक्षेच्या संप्रदायाचा आपला नवावतार त्यांनीं अस्तित्वांत आणला व हीच

"भिक्षा वांचवी विपत्ती। होणार काळीं॥" १४. २. २२

असें पुढील भविष्यहि वर्तवून टाकिलें.

लोकमान्यांचें यासंबंधींचें मत त्यांच्या एका आठवणींत पुढीलप्रमाणें आढळतें. तो प्रसंग बंगालच्या फाळणीमुळें राष्ट्रांत जी जागृति उत्पन्न झाली, ती समाजाच्या शेवटच्या थरांत कशी न्यावयाची, याबद्दल 'आठवणीचे संपादक' त्यांस विचारावयास गेल्यावेळचा होता. लोकमान्य त्यांस उत्तर देतात :—

" राष्ट्राकरितां फकीर बनण्यास तुम्ही तयार आहांत काय? तसे असाल, तर राष्ट्रोन्नति झालीच पाहिजे. नुसता सल्ला काय विचारतां? बुद्धिवान् ब्राह्मणांचीं मुलें महाराष्ट्रांत रामदासांच्या शिष्याप्रमाणें फकीर म्हणून हिंडण्याची वेळ आतां आली आहे. उद्योगास लागा." याचा अर्थ असा कीं, लोकमान्यांस ही श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य वाटत नव्हती, हें निश्चित. मग आक्षेपकांस ती तशी कां वाटावी, हें कळत नाहीं. लोकमान्यांच्या अपेक्षेप्रमाणें महाराष्ट्रांत घडून आलें किंवा कसें याचें उत्तर कोण देणार?

संघटना करावी श्रीसमर्थांनींच! या कार्याला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी त्यांस पूर्ण परिचित होत्या. त्यांचें सर्व ज्ञान त्यांनीं आपल्या पर्यटनकालांत प्राप्त करून घेतलें होतें. त्यांचें निरीक्षण किती सूक्ष्म होतें याविषयीं त्यांच्या ग्रंथांत पदोपदीं प्रत्यंतर मिळतें. भोंवतालच्या परिस्थितीचें पूर्ण आकलन, समाजाला लागलेल्या रोगाचें अचूक निदान व त्यावर योजण्याचे रामबाण उपाय, तसेंच जनतेच्या अंतःकरणाची पारख व ती आपणांकडे ओढून घेण्याची हातोटी, या सर्व बाबतींत श्रीसमर्थांचा हात धरणारे पुरुष फारच थोडे उत्पन्न झालेले आहेत. आधुनिकांनीं श्रीसमर्थांच्या चरणांपाशीं बसून या शिकवणुकीचे धडे आजहि घ्यावेत, इतकी ती शिकवण महत्त्वाची व मार्गदर्शक आहे. ती आतां आपण येथें थोडक्यांत क्रमशः पाहूं याः—

तत्कालीन परिस्थितीचें वर्णन श्रीसमर्थांनीं दासबोध, अस्मानी-सुलतानी, परचक्र-निरूपण, करुणाष्टकें इत्यादि ठिकाणीं वारंवार केलेलें आहे. वाचकांनीं तें त्या त्या ठिकाणीं पहावें. अनेकांनीं तें अनेकदां आपल्या लेखनांत उपयोगिलें असल्यानें येथें तें पुनः देऊन जागा अडवीत नाहीं. या सर्व वर्णनांचा सारांश थोडक्यांत पुढें देत आहोंत. तीर्थक्षेत्रें भ्रष्ट करणें, बायका पोरें बाटविणें, हिंदुधर्माचा नायनाट करणें, व्यापारी लोकांस लुटणें, या बाबी श्रीसमर्थकालीं मुसलमानांच्या नित्याच्याच होत्या; तसेंच दुष्काळ, लुटालूट, चोऱ्या व दरोडे. स्त्रियांस गुलाम म्हणून विकणें, वाटमाऱ्या करणें, चांचेगिरी करणें इत्यादि अनन्वित प्रकारांस श्रीसमर्थांच्या पूर्वकालीं व पूर्ववयांत नुसता ऊत आलेला होता. या लोकस्थितीचें इतकें सूक्ष्म वर्णन श्रीसमर्थांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणी केलेलें आढळांत नाहीं. यावरून त्यांस लोकस्थितीचें ज्ञान किती उत्कृष्ट होतें हें दिसून येतें. कार्यकर्त्यांच्या आंगीं तें असावेंच लागतें. तें नसल्यास तो कार्य तरी काय करणार?

समाजस्थितीचें श्रीसमर्थांचें हें ज्ञान किती अचूक होतें याची वाचकांस बरोबर कल्पना यावी म्हणून ताडून पाहण्याकरितां ऐतिहासिक कागदपत्रांतील एक दोन उतारे देतों. पुढील उतारा श्री शंभू छत्रपतींच्या मृत्यूनंतरच्या औरंगजेबाच्या एका फर्मानापैकीं आहे :— " दरोबस्त दक्षण साध्य होऊन फत्ते

जाली.......या उपरी एक वर्ण करावा; हिंदू ठेऊच नये, म्हणून ओलें अन्न विकावें ऐसा हुकूम केला." आतां दुसरा उतारा पहा. हा वाड व पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेल्या सनदापत्रांपैकीं असून तो विजापुरच्या सुलतान महमद आदिलशहाचा आहे:— "धर्माप्रमाणें (ह्या मुसलमानी धर्माप्रमाणें) सर्व लोकांस वागविणें.......व मराठी देवळांतील मूर्ति वगैरे फोडणें....... लोकांस निराकाराचे भजण्याकारितां बोलावणें व दारू पिणारे लोक व कैफ करणारे लोक व शिवाय वाईट करणारे लोक यांस मर्यादा देणें व देवांच्या मूर्ति दगडाच्या वगैरे आकारी बिनआकारी मोडून टाकणें." सनातन धर्मावर कसला बिकट प्रसंग होता, हें यांत स्पष्ट दिसून येतें.

पारतंत्र्याच्या रोग लागल्यामुळें देशाची स्थिति कशी झाली होती, हें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें श्रीसमर्थांनीं पूर्ण ओळखलें होतें. याच्या वरची उपाययोजनाहि श्रीसमर्थांनीं 'संक्षेपतः क्रियायोगो निदान परिवर्जनम्' या वैद्यकीय सिद्धान्ताप्रमाणें केली म्हणजे रोगाचा नाश करणें झाल्यास, तो ज्या कारणास्तव झाला तें कारणच समूळ नष्ट करणें हें होय. म्हणून श्रीसमर्थांनीं मूळ गड्डयालाच हात घातला. पारतंत्र्याचा विषारी वृक्षच समूळ नष्ट करण्याचें ठरवून तत्कालीन समाजास,

देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥

असला जळजळीत संदेश दिला, व

देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्होळ करावा ।
मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥

अशी जिकडे तिकडे दंगल उडवून देण्यास त्यांनीं सांगितलें.

हें कार्य करण्यास संघटना पाहिजे होती. ती त्यांनीं समुदाय करून व निरनिराळे संघ स्थापून केली, याबद्दल त्यांचे पुढील उद्गारच साक्ष देत आहेत.

ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ दा. १९.६.१४

तसेंच,

मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
ये विषयीं करितां तकवा । पूर्वज हांसती ॥

आपल्या त्या 'अपूर्व आज्ञापत्रांत' श्रीसमर्थ शिष्यास हेच सांगत आहेत कीं, बाबांनो! 'संघे शक्तिः कलौ युगे' म्हणून तुम्ही संघ काढा, संघटना करा, तसें न कराल तर, तुमच्या परमार्थाला कमीपणा येईल,

कांहीं समुदाय करणें । ये विशीं आलस्य न करणें ।
आलस्य करितां उदंड उणें । दिसेल परमार्थीं ॥ ४ ॥ आ. प.

कारण वैयक्तिक मोक्षाला श्रीसमर्थ फार महत्त्व देत असावेत, असें त्यांच्या उद्गारांवरून वाटत नाहीं. ' आपण तरून इतरास तारणाऱ्यांस ' ते मानीत. नाहीं तर त्यांनीं पुढील उद्गार काढलेच नसते,

पोहणारें बुडते तारावे । सामर्थ्यें बुडों नेदावें ॥ आ. प. ५ ॥

तात्पर्य, संघटना करणें— समुदाय करणें हें श्रीसमर्थांनीं आपल्या संप्रदायाचें एक लक्षणच बांधून टाकिलें आहे.

ही संघटना कोणत्या लोकांची करावयाची याबद्दलहि श्रीसमर्थांचे कांहीं नियम आढळतात. भोळ्यांस किंवा बावळटांस यांत वाव नसे. कारण,

भोळा भाव सिद्धि जाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ॥
दा. २.९.११

अशक्तांचें व दुर्बळाचें येथें काम नसे,

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ॥

म्हणून श्रीसमर्थ बुद्धिमानाला व अशक्तालाच हातीं धरीत,

नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनि शिकवाव्या ॥ दा. १९.१०.२२

' आज्ञापत्रांत ' शिष्यांना कसलीं मुलें हातीं धरावीं हें सांगतांना,

सोईऱ्या धाईऱ्याचीं मुलें । तिक्षण बुद्धीचीं सखोलें ॥ ७ ॥

असेंच त्यांनीं बजाविलें आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. बरोबरच आहे कीं, श्रीसमर्थांना आपल्या सांप्रदायिकांकरवीं कांहीं उत्कट कार्य घडवून आणावयाचें होतें, तेव्हां, त्यांनीं शिष्य निवडण्यांत इतकी चिकित्सा करावी. त्यांना आपल्या शिष्यांची संख्या प्रतिष्ठेसाठीं उगीचच फुगवावयाची नव्हती, डोळ्यासमोर प्रचंड कार्य दिसत होतें, तें मोठ्या उलाढालीचें होतें, त्याला चतुरस्र माणसेंच पाहिजे होतीं व तीं श्रीसमर्थांनीं आपल्या अलौकिक सामर्थ्यानें जमविलीं. येथें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, त्यांत श्रीसमर्थांचें धोरण व चातुर्य परमावधीचें दिसून येतें. शिष्यांची निवड करतांना त्यांनीं जीं त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे असें वाटतें कीं, ज्याला केवळ सध्यांच्या भाषेंत परमार्थी म्हणतात तसला एकांगी परमार्थी— केवळ स्वतःपुरता परमार्थी— श्रीसमर्थांस नको होता. अशक्ताला बुद्धिमंतांनाहि हा परमार्थ ( व्यक्तिगत ) साधण्यासारखा आहे.

पण श्रीसमर्थांस आपले शिष्य शरीरानें धष्टपुष्ट, बुद्धीनें तल्लख, गायनादिकलेंत निष्णात असलेले, सुंदर अक्षर लिहिणारे, उत्कृष्ट वक्ते असलेले, सुखाला आंग न देणारे, कष्टांत सौख्य मानणारे इत्यादि उत्तम गुणांनीं संपन्न पाहिजे होते. यावरून त्यांचें मनोगत काय असावें तें स्पष्ट दिसतें. त्यांना राष्ट्रकार्य करावयाचें होतें व त्या कार्यासाठीं जी प्रचंड संघटना करावयाची होती, त्यासाठीं त्यांना वर उल्लेखिलेल्या गुणांनीं युक्त अशीं कर्तृत्ववान माणसें पाहिजे होतीं, तीं त्यांनीं जमविलीं, त्यांना निव्वळ स्वार्थी परमार्थी नको होता, किंबहुना असल्या परमार्थास ते परमार्थ मानण्यास सिद्ध नव्हते. श्रीसमर्थ स्वतः उत्तम गुणांचें माहेरघर होते, प्रत्ययज्ञानी होते, तेव्हां आपल्या संघटनकार्यांत त्यांनीं आत्मसदृश माणसांचाच भरणा करावा हें त्यांच्या जतुरस्रतेस साजेसेंच होतें. आपल्या पर्यटनकालांत देशाची जी स्थिति त्यांनीं अवलोकन केली, त्यावरून त्यांनीं, ज्या समाजाला व राष्ट्राला जिवंत राहून कांहीं विशिष्ट कार्य करून दाखवावयाचें आहे, त्यानें संघटित झालेंच पाहिजे, असा आपल्या मनाशीं ठाम सिद्धान्त ठरविला व पुढें योग्य कालीं तो आचरणांतहि आणला.

संघटनाशास्त्रांतील श्रीसमर्थ आचार्य होते. या शास्त्रांतील आणखी एक महत्त्वाचें अंग, एक अत्यंत आवश्यक शिकवण, त्यांनीं कार्यकर्त्यांस दिली आहे, ती आतां आपणांस पहावयाची आहे. श्रीसमर्थांचा वेळेस समाजांत नाना मतें, नाना पाखांडें, प्रचलित होतीं. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता, ‘ जो जे मती सांपडला तया तें चि थोर ” अशी स्थिति होती, ‘ अवघें अनावेक ( अनायक ) जाले चहूंकडे ’ असा प्रकार होता. हा ‘ मतामतांचा गलबला मोडून, लोकांस चुचकारून, त्यांना त्यांच्या हिताचा मार्ग दाखवून, आपल्या अधोगतीस परकीय जसे कारणीभूत आहेत तसे अज्ञानजन्य आपले स्वतःचे अनेक दोषहि आहेत हें गोड शब्दानें त्यांस दाखवून देऊन समाजाच्या अगदीं वरील थरापासून तों थेट खालच्या थरापर्यंत सर्वांस एका सूत्रांत गोंवून कार्यभाग करावयाचा होता. तो केवळ परकीयांची उठल्यासुटल्या निंदा करून किंवा स्वकीयांचे ‘ दोष अखंड बोलून ’ सिद्धीस जावयाचा नव्हता. गोड बोलूनच हें काम करावयाचें होतें. समाजांतील बखेडे मोडून, ‘ बंडपाषांडाचे वाखें ’ करून महायोगी जे श्रीसमर्थ त्यांनीं हें अवघड कार्य केलें. ग्रंथराजांत ‘ योगी ’ शब्दाच्या ज्या दोन तीन व्याख्या आहेत, त्यांपैकीं लोकांचीं अन्तःकरणें जो राखतो तोच योगी होय अशी एक आहे,

समेमध्यें कळहो जाला । शब्द येतो जाणत्याला ।<br>
( लोकांचीं ) अन्तरें राखों नाहीं सिकला । कैसा योगी ॥

१८.१०.३४

समाजाचें अन्तःकरण राखण्याच्या या शिकवणीबद्दल श्रीसमर्थांचे किती तरी उल्लेख आहेत, हें कार्य जर महंत-कार्यकर्ता– करूं शकला नाहीं तर त्यांच्या हातून जगदुद्धाराचें कार्यच होणार नाहीं, महंत ही पदवी त्याला योग्य होणार नाहीं,

या कारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥ १३.१०.२९

लोक राजी राखण्यावर श्रीसमर्थांचा फार मोठा कटाक्ष आहे. याबद्दल कांहीं थोडीं वचनें उद्धृत करतोंः—

वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक । १३.१०.२३
परांतरासी राखणें । सर्व काळ ॥ १८-१०.१२
बहुतांचें मनोगत । हातीं घेतलें पाहिजे ॥ १२.१०.३७
मनुष्य राखिलें राजी । तो प्राणी शाहाणा बरा ॥ स्फु. प्र. १-५
सकळांसीं सख्य राखावें । वर्तावें तें मनोगतें ॥ स्फु. प्र. ३-२३
सर्वांसी नीवउं जाणे । धन्य तो जाणता गुणी ॥ स्फु. प्र. ४०.५
जाणते नेणते राजी । राखावें बहुतांपरीं ॥ च. मा. ३.७

असे आणखी किती तरी उल्लेख आहेत. कार्यकर्त्यांस ते बजावतात कीं, कार्य सुरळीतपणें शेवटास जावें, अशी इच्छा असेल तर जनतेंच्या अन्तःकरणास जेणें करून धक्का लागेल असें त्यानें वागतां कामा नये,

अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका ॥ १९.४.१९

समाजाचें अन्तःकरण कोठवर राखावयाचें याची श्रीसमर्थांनीं दोन ठिकाणीं अगदीं सीमा केली आहे. बाकी विश्वच ज्यांनीं नारायणाच्या जागीं मानलें व त्याचीच उपासना ज्यांनीं जगाला उपदेशिली, त्यांच्या मुखांतून जर असलीं वाक्रत्नें जगास मिळावयाचीं नाहींत, तर तीं त्याला मिळणार तरी कोठून म्हणा! जनतारूपी जनार्दनास संतुष्ट राखणें ही मुख्य भक्ति होय, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. याचा अर्थ असा कीं नवविधा भक्तीमध्यें जी मुख्य आत्मनिवेदन भक्ति, तिच्या जोडीला श्रीसमर्थांनीं ह्या भक्तीला आणून बसविलें आहे.

लोकांसी राखणें राजी । हे मुख्य भक्ती जाणिजे ॥ स्फु. प्र. ४२.५

श्रीसमर्थांचा देव कोणता, हें आतां पुनः सांगण्याची आवश्यकता नाहीं. या जनीं जनार्दनाच्या—विराट्-स्वरूपी या विश्वांतील नारायणाच्या– कोणत्याहि अवयवाची पूजा ही त्याचीच पूजा होय. श्रीसमर्थांची ती भजनाची सुप्रसिद्ध दुसरी व्याख्या (कारण वर उल्लेखलेली पहिली) वाचकांस पूर्ण परिचित असणारच,

भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार।
त्याचें राखावें अंतर। याचें नांव भजन ॥ करुणाष्टकें २१५

काय ही अंतःकरणाची उदारता व विशालता! भजनाची व्याख्या श्रीसमर्थांप्रमाणें कोणी तरी अशी केली आहे काय? समाजाचें त्यांनीं असें रंजन केलें म्हणून त्यांच्या हातून ती प्रचंड संघटना झाली व म्हणूनच त्यांना समर्थ म्हणावयाचें! असें वाटतें कीं इतरांना ती करणें साधावयाची नाहीं म्हणून आपणच त्यांनीं ती 'समर्थ' शब्दाची व्याख्या केली काय?

बहुत जनास चालवी [ नाना मंडळें हालवी।
ऐसी हे समर्थपदवी। विवेकें होते ॥ १८.१०.४६

संघटनेची वैदिक आर्यांची हीच परंपरा आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. श्रीसमर्थांचीहि 'रामकथा ब्रह्मांड भेदूनी। पैलाड न्यावी ॥" अशी प्रतिज्ञा होती. प्राचीन आर्यांचे संघटनेचे ते दोन प्रसिद्ध मंत्र, 'संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्' म्हणजे, तुम्ही सर्व एकत्र व्हा एकमेकांशीं बोला व एकमेकांचें मनोगत ओळखा, ' हा एक व दुसरा

समानीव आकूतिः समाना हृदयानि वः।
समानस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥

म्हणजे "तुमचा अभिप्राय एकसारखा, तुमचीं अंतःकरणें एकसारखीं व तुमचें मन एकसारखें असो; जेणेंकरून तुमची संघशक्तीची बळकटी होईल." याच्या शिकवणींत व वर प्रतिपादलेल्या श्रीसमर्थांच्या शिकवणींत कांहीं अंतर आहे काय? श्रीसमर्थांची ही शिकवण त्रिकालाबाधित आहे. आक्षेपकांनीं तिचें शांत चित्तानें मनन करावें म्हणजे त्यांस आपली चूक आढळून येईल.

दैव श्रेष्ठ का पौरुष– प्रयत्न– श्रेष्ठ या प्रश्नाचा ऊहापोह रामायण, महाभारत व योगवासिष्ठ या ग्रंथांत पुष्कळच केला गेलेला आहे. श्रीसमर्थांनींहि हा विषय पुष्कळ चर्चिला आहे. पण श्रीसमर्थांच्यांत जें आहें, तें इतरांत नाहीं असें वाटतें. प्रथमतः पहिले तीन ग्रंथ याबद्दल काय म्हणतात तें पाहूं व नंतर श्रीसमर्थांकडे वळूं. यत्नावांचून कांहींहि मिळावयाचें नाहीं, असा या तीनहि ग्रंथांचा अभिप्राय आहे. 'जे भेदरट आणि कर्तृत्वशून्य असतात तेच दैवावर विसंबून राहतात, सुज्ञ व पौरुषयुक्त माणसें दैवावर विसंबून बसत नाहींत, असें रामायणामध्यें म्हटलेलें आहे.

विक्लवो वीर्यहीनो यः स दैवमनुवर्तते।
वीराः संभावितात्मानो न दैवं पर्युपासते ॥

रामायणांतील या वचनावरून दैव ही चीज अस्तित्वांत आहे किंवा नाहीं, याबद्दल ग्रंथकाराचा अभिप्राय काय आहे हें कळून येत नाहीं. महाभारतकार दैवाचें अस्तित्व मानतात व तें मनुष्याच्या प्रयत्नांत थोडीबहुत लुडबुडहि करतें, असें त्यांचें मत आहे. पण त्यांचा बहुंशीं भर प्रयत्नावर आहे असें स्वच्छ दिसतें. केवळ दैवावर अवलंबून राहणारा मनुष्य सर्वथैव नाश पावतो असा त्यांचा पहिला सिद्धान्त आहे:—

असंशयं दैवपरः । क्षिप्रमेव विनश्यति ॥

' सतत यत्न करीत असावें ! म्हणजे दैवयोगानें यश मिळेल असा त्यांचा दुसरा सिद्धान्त आहे:—

यत्नोहि सततं कार्यस्ततो दैवेन सिध्यति ।

अनुशासनपर्वाच्या सहाव्या अध्यायांत दैव व उद्योग यांमध्यें श्रेष्ठ कोण याचा विचार चालू असतांना, ग्रन्थकार असें सांगतात कीं उद्योग व दैव यांची सांगड घातल्याशिवाय पुरुषार्थप्राप्ति व्हावयाची नाहीं. दैव हें बीजाच्या जागीं व उद्योग हा क्षेत्राच्या जागीं मानावा. यांचा उत्तम संयोग झाला म्हणजे उत्तम प्रकारचें पीक येतें :—

क्षेत्र पुरुषकारस्तु दैवं बीजमुदा हृतम् ।
क्षेत्रबीजसमायोगात्ततः सस्यं समृध्यते ॥

असा जरी सिद्धान्त त्यांनीं प्रतिपादिला आहे, तरी त्यांचा मुख्य भर प्रयत्नावरच आहे, हें पुढें दिलेल्या वचनावरून सिद्ध होत आहे,

उदाराणां तु सत्कर्म दैवं क्लीबा उपासते ॥

म्हणजे मोठीं माणसें सत्कर्मावर भरंवसा ठेवतात तर दुबळे लोक दैवावर ठेवतात.

आतां योगवासिष्ठकार काय म्हणतात तें पाहूं या. यांच्या कोशांत " दैव हा शब्दच आहे असें दिसून येत नाहीं. इतके हे कट्टर प्रयत्नवादी आहेत. " दैव ही केवळ मूर्खांची कल्पना आहे ' खरोखर तें नाहींच,

मूढैः प्रकल्पितं दैवम् ॥

ज्याला ' दैव ' म्हणतात तें दुसरें तिसरें कांहीं नसून आपलें पूर्वकर्मच होय.

प्राक्स्वकर्मेतराकारं दैवं नाम न विद्यते ।

तें मुळांत नाहींच मुळीं, मंदबुद्धीच्या लोकांची ती कल्पना आहे,

कल्पितं मोहितैर्मन्दैर्दैवं किंचिन्न विद्यते ।

असल्या दैवाचा–पूर्वकर्मांचा–नाश या जन्मांतील कर्मांनीं नष्ट करतां येणें शक्य आहे, असें ह्या ग्रन्थकाराचें मत आहे,

प्राक्तनोऽद्यतनेनाशु पुरुषार्थेन जीयते ।

याविषयींचा यांचा ठाम सिद्धान्त हा कीं, उद्योगी लोकांना जगांत मिळविण्यास कांहींहि कठीण नाहीं,

नहि सत्त्ववतामस्ति दु:साध्यमिह किंचन ।

या तिघांहि ग्रन्थकारांहून श्रीसमर्थांचें वैशिष्ट्य काय आहे, हें दाखविण्यासाठीं हें विवरण करावें लागलें. महाभारतकार यत्नाच्या जोडीला दैव पाहिजे असें म्हणतात. श्रीसमर्थांस त्याची–दैवाची आवश्यकता भासत नाहीं. याबाबत त्यांचें योगवासिष्ठकारांशीं चांगलें पटतें. प्रारब्धाची रेषा–प्रारब्धकर्मसुद्धा पुसून टाकतां येतें, असें श्रीसमर्थांचें मत आहे,

रेखा तितुकी पुसोनि जाते ।

मात्र हें साध्य होण्यास 'अचुक' यत्न पाहिजे. तो करंट्यास करितां येत नाहीं, म्हणून तो सर्व दोष प्रारब्धावर ढकलतो,

अचुक यत्न करवेना । म्हणून केलें तें सजेना ।
आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या । – दा. १२.२.६

म्हणून,

कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरी घालिती ॥ १२.२.५

योगवासिष्ठांत थेट याच अर्थाचें वचन आहे: —

सर्वमेवेह हि सदा संसारे रघुनंदन ।
सम्यक्प्रयुक्तात्सर्वेण पौरुषात्समवाप्यते ॥

म्हणजे, या जगांत योग्य दिशेनें प्रयत्न केला असतां वाटेल ती वस्तु प्राप्त करून घेतां येते, या जगांत प्रयत्नास अशक्य अशी कोणतीच वस्तु नाहीं, लहान मोठा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे असें श्रीसमर्थांनीं कितीदां तरी सांगितलें आहे. संबंध राष्ट्र आळसांत लोळत असल्याचें व कष्टाला चुकवीत असल्याचें श्रीसमर्थ आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहात होते. असल्या मृत समाजाला त्यांना जागृत करावयाचें म्हणून हताश होऊन बसलेल्या कांहीं सुचत नाहीं, आतां काय करूं म्हणून निराश झालेल्या राष्ट्राला, त्यांनीं,

लहान थोर काम कांहीं । केल्या वेगळें होत नाहीं ।
करंट्या सावध पाहीं । सदैव हौसी ॥ दा. १२.९.६

असा, कांहीं तरी, आपल्या अल्पस्वल्प शक्तीप्रमाणें, प्रत्यहीं करीत जा, असा, प्रत्येकास संदेश दिला, तसेंच उदंड कष्ट करण्याची शक्ति अंगीं असेल, तर ब्रह्मांडालाहि तुम्हाला गवसणी घालण्याचें सामर्थ्य प्राप्त होईल असेंहि सांगितलें,

घालुनि अकलेचा पवाडा । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।
तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटपण ।। दा. १२.९.२९

' लहान थोर काम कांहीं । केल्या वेगळें होत नाहीं '

हा संदेश याच कालांत जनतेस विद्यमान पुढाऱ्यांनीं दिला आहे ना ? त्याची वाट आपण कशी लावली व लावीत आहोंत याचा विचार विचारवंतांनीं व आक्षेपकांनीं करावयास नको काय ?

अशा या प्रयत्नाला श्रीसमर्थांनीं जें ' देवत्व ' दिलें आहे, तें मात्र आजवर कोणी दिल्याचें दिसत नाहीं. ' यत्न तो देव जाणावा ' असें म्हणणारे श्रीसमर्थ पहिलेच. आपापल्या परीनें ज्यानें त्यानें ' यत्नाची ' स्तुति केली आहे खरी, पण ती श्रीसमर्थांनीं केलेल्या स्तुतीपुढें अगदींच फिकी पडते. त्यांनीं यत्नाला देवत्व कोणत्या कारणास्तव दिलें असलें पाहिजे, हें ' त्यांच्या, उद्योग आधीं का प्रारब्ध आधीं ' या प्रश्नाची चर्चा ज्या १२ व्या ओवी शतकांत केली आहे त्यांत सांपडतें. प्रारब्धापेक्षां यत्न श्रेष्ठ. कां, तर,

आहे निराकार निर्मळ निश्चळ । तेथूनी चंचळ प्रेत्न जाला ।।
प्रेत्न जाला आधीं म्हणोनियां थोर । प्रारब्ध विचार ऐलीकडे ।।
ऐलीकडे कर्म पाहतां भूतळीं । प्रेत्न अंतराळीं मूळारंभ ।।

प्रारब्धापेक्षां प्रयत्न श्रेष्ठ कां तर ब्रह्माच्या ठिकाणीं जें पहिलें स्फुरण झालें तो प्रयत्न. तो आधीं झाला म्हणून तो प्रारब्धापेक्षां श्रेष्ठ अशी ही श्रीसमर्थांची विचारसरणी आहे. या ठिकाणीं वाचकांचें लक्ष आम्हीं एका प्रश्नाकडे वेधूं इच्छितों. ' अंतरात्म्याची व्याख्या श्रीसमर्थांनीं

मुळीं मुळींचें स्फुरण । तेंचि अन्तरात्म्याचें लक्षण ।। दा. १६.७.४

अशी केली आहे. ब्रह्माचे ठिकाणीं जी पहिली चेतना वा स्फुरण तोच अन्तरात्मा, असा या ओव्यर्धाचा अर्थ आहे. यावरून अन्तरात्मा = प्रयत्न असें समीकरण संभवतें. कारण प्रयत्नहि ब्रह्माच्या ठिकाणचें पहिलें स्फुरण असल्याचें आपण वर पाहिलेंच आहे. आतां श्रीसमर्थ अन्तरात्म्यालाच देवांचा देव म्हणतात. तेव्हां यत्नालाच त्यांनीं ' देव ' म्हटलें आहे, तें बरोबरच ठरत आहे व तें ओघानेंच प्राप्त होत आहे. प्रयत्नवादाला श्रीसमर्थ येवढें महत्त्व कां देतात, तें आतां

वाचकांच्या ध्यानांत चांगल्या रीतीनें ठसलें असेल असें वाटतें. प्रयत्नवादासंबंधींचें हें विशिष्ट प्रकारचें प्रतिपादन प्राचीन ग्रन्थांत दिसून येत नाहीं. तो श्रीसमर्थांचा विशेष होय. यांतच त्यांचें समर्थत्व दिसून येतें.

सतराव्या शतकांतील श्रीसमर्थांची सामाजिक कामगिरी विसाव्या शतकांतील सुधारकाग्रणी म्हणविणारांस लाजवील अशीच आहे. विशेषतः स्त्रियांच्या सुधारणे-बाबत श्रीसमर्थांइतकी आघाडी दुसऱ्या कोणीच आजवर मारलेली नाहीं. नाहीं म्हणावयास स्वामी विवेकानन्दांनीं यासंबंधीं कांहीं थोडें कार्य केलें आहे. पण मौज अशी आहे कीं स्वामीजींच्या स्त्रीशिष्यांत नांव घेण्याजोगी भारतीय स्त्री एकहि नाहीं. याच्या उलट प्रकार श्रीसमर्थांच्या शिष्यिणींचा आहे. या कार्यास प्रारंभ श्रीसमर्थांच्या पूर्वीं तीनशें वर्षें श्रीज्ञानेश्वरांनीं चालू केला होता हें खरें आहे. पण एका श्री मुक्ताबाईव्यतिरिक्त व श्री जनाबाईव्यतिरिक्त नांव घेण्याजोगी एकहि स्त्री संत, नंतरच्या ३००–३५० वर्षांत झालेली दिसून येत नाहीं. ' प्रतापां ' त तेरा स्त्री महंतांचीं नांवें आहेत. पैकीं श्री वेणाबाई, श्री अंबिकाबाई, श्री आक्काबाई व श्री वेणाबाईच्या शिष्यिणी बयाबाई या सर्व मोठ्या योग्यतेच्या उच्च कोटीच्या ब्रह्मवादिनी होत्या. उत्तम स्त्री काव्यग्रंथकार या नात्यानें श्री वेणाबाईच्या तोडीची स्त्री अजून कोणी झालेली नाहीं, असें म्हटल्यास तें सत्यास सोडून होणार नाहीं.

स्त्रियांत ब्रह्मवादिनी होण्याचें भाग्य फार थोड्यांच्याच वाट्याला आलेलें आहे. औपनिषदिक व पौराणिक कालांतील ब्रह्मवादिनींची मिळून बेरीज केली तरी एकट्या श्रीसमर्थांच्या ब्रह्मवादिनी शिष्यिणींच्या बेरजेइतकी ती भरणार नाहीं, असा अभूतपूर्व चमत्कार श्रीसमर्थांनीं करून दाखविला. याचा सरळ अर्थ असा कीं, राष्ट्रकार्यांत, मग तें राजकीय, धार्मिक व सामाजिक असो, योग्य अवसर व परिस्थिति दिल्यास व योग्य मार्गदर्शकत्व मिळाल्यास स्त्रियांसहि समाज-कार्य करतां येतें, तें पुरुषांच्या तोडीनें करतां येतें, हें राष्ट्राला श्रीसमर्थांनीं इतिहासांत पहिल्यानेंच शिकविलें. स्त्रिया आणि त्या महंती करितात, ही सनातन धर्मांत अपूर्व व ' कधीं देखिलें ना ऐकिलें ' या सदरांत येणारी गोष्ट होती. पण श्रीसमर्थांनीं श्रीवेणाबाई, अंबिकाबाई या दोघींस मठपति करून, तीहि सत्य सृष्टींतील घटना आहे असा अपूर्व चमत्कार जगास दाखविला, या शिकवणीवरून आधुनिकांनीं योग्य तो बोध घ्यावा.

मृत राष्ट्रास ज्यांनीं जिवंत केलें, त्यांनीं सामाजिक कार्य अमुक केलें व तमुक केलें, म्हणून सांगणें, ह्यांत स्वारस्य तरी काय ? आपल्या संजीवनी मंत्रानीं त्यांनीं प्रत्येक व्यक्तीस आपल्या स्वत्वाची जाणीव करून दिली, प्रत्येकास तूं मुक्त आहेस असें सांगितलें व त्याचें अज्ञानपटल दूर केलें.

कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतीस्तव भुलले जन । ५.६.५७

असा संदेश दिला. श्रीसमर्थांनीं कार्यास प्रारंभ करण्यापूर्वी बहुजन समाज होता कसा व तें कार्य संपल्यानंतर तो कसा झाला याचें सुंदर वर्णन उद्धवांच्या त्या प्रसिद्ध अभंगांत आहे,

पाषाणीं अवेव नाना कमाविले ।
तैसे लोक केले समर्थांही ।।

काष्ठींहि अवेन नाना कमाविले ।
तैसे लोक केले समर्थांही ।।

धातूला अवेव नाना कमाविले ।
तैसे लोक केले समर्थांही ।।

लोक हि पाषाण जडजीव जाण ।
कमाऊनी पूर्ण नीट केले ।।

आम्ही हि पाषाण श्रींनीं कमाविलों ।
शिवराम जालों पावन चि ।।

श्रीसमर्थांच्या कार्याचें वर्णन यापेक्षां सरस रीतीनें करण्याची आमची शक्ति नाहीं.

अशा रीतीनें श्रीसमर्थांच्या शिकवणींपैकीं ६–७ धड्यांचेंच विवरण करण्याचा अल्पसा प्रयत्न यथामति वर करण्यांत आला आहे. अजून कितीतरी शिकवणी राहिल्या आहेत. श्रीसमर्थांची ती अखंड सावधानता, त्यांची दूरदृष्टि, चाळणा, एकान्त, त्यांचें नेमस्तपण, राजकारणपर शिकवण, महंतास घालून दिलेले वागण्याचे नियम इत्यादि अनेक शिकवणींची चर्चा राहिली आहे. त्यांनीं राष्ट्रास वेळोवेळीं दिलेले हे धडे आहेत. हजारों शिष्यांकरवीं या शिकवणींचा त्यावेळीं प्रचार करण्यांत आला व त्यामुळें सबंध राष्ट्र आपल्या कर्तव्याला जागलें.

जी गोष्ट तीनशें वर्षांपूर्वी झाली, ती आज होणें शक्य आहे. कारण देशाची परिस्थिति पूर्वींचीच जवळजवळ आजहि आहे. महाराष्ट्रानें या गोष्टीचा विचार करण्यांत आतां व्यर्थ कालापव्यय करण्यांत अर्थ नाहीं. आधींच बराच काल फुकट गेला आहे. आतां त्यानें सावध होऊन स्वकर्तव्योन्मुख व्हावें हें राष्ट्राच्या सद्यःस्थितींत अत्यंत हितावह आहे.

श्रीसमर्थांच्या आक्षेपकांस अशी नम्र प्रार्थना आहे कीं, त्यांनीं श्रीसमर्थांचे ग्रन्थ, त्यांच्या चरित्रांतील प्रत्येक कृति यांचा शांतपणानें विचार करावा. हल्लींची

परिस्थिति लक्षांत घ्यावी. म्हणजे, आम्ही वर प्रतिपादिल्याप्रमाणें, त्यांच्या ध्यानांत येईल कीं, श्रीसमर्थांची शिकवण तीनशें वर्षांपूर्वींइतकीच आजहि ताजी आहे, तितकीच उपयोगी पडणारी आहे, ती जीर्ण म्हणून टाकाऊ झाली नसून तिचा त्या वेळचा जोम व तेज अजूनहि पूर्ववत् कायम आहे व ती राष्ट्रास पुनश्च कार्यक्षम करण्यास समर्थ आहे.

श्रीसमर्थचरणीं नम्र प्रार्थना शेवटीं अशी कीं,

समर्थीं पूर्वीं प्रार्थिलें होतें । प्रतापगडीं भवानीतें ।
तुझा राजा आह्मां देखतें । तूं चि सत्वरीं वाढवी गे ॥

आह्मी हि तें चि मागणें । आपणांसी याचितों या चि कारणें ।
नशीबीं येत दुःख भोगणें । यथापूर्व प्रकारें ॥

तरी धांव धांव गा श्रीसमर्थराया । सवें घेऊन येणें श्रीशिवराया ।
उद्धरावया भारतभूसि या । परदास्यपंकीं रुतली जे ॥

करावें अज्ञानखंडण । करवावें सन्मार्गदर्शन ।
जेणें योगें समाधान । संपूर्ण राष्ट्र पावेल ॥

० ० ०

# श्रीसमर्थांचें आचार-विचार-स्वातंत्र्य

श्रीसमर्थांचा अवतार कशासाठीं होता, हें निदान सुशिक्षितांस तरी सांगण्याची आवश्यकता आहे, असें वाटत नाहीं. धर्माची ग्लानि घालविणें चातुर्वर्ण्याची विसकटलेली घडी पुनः नीट करणें, होत असलेल्या वर्णसंकरास आळा घालून तो थांबविणें, श्रौतस्मार्त सनातनधर्मास उज्ज्वल करणें, अज्ञानी जनतेस आपल्या कर्तव्याची व व्यक्तित्वाची जाणीव करून देऊन तिला कार्यक्षम करणें इत्यादि कार्यें श्रीसमर्थावताराचीं प्रयोजनें होत. हें कार्य श्रीसमर्थांनीं आपल्या आयुर्मानांत प्रचलित केलें व ' याचि देहीं याचि डोळां ' पूर्णत्वास नेलें. श्रीसमर्थांचें चरित्र त्यांचे ग्रंथ व त्यांच्या सांप्रदायिकांचे इतर ग्रंथ वाचीत असतांना वाचकांस मधूनमधून कांहीं शंकास्थळें दिसतात, कांहीं ठिकाणीं श्रीसमर्थांचें आचरण पूर्व-परंपरा व शास्त्रास सोडून असावें अशी शंका व कल्पना येते. तेव्हां या गोष्टींचा खल स्पष्टपणें व्हावा व तज्ज्ञ वाचकांसमोर मांडून त्या निरसन करून घ्याव्यात, येवढाच हा लेख लिहिण्याचा हेतु आहे.

श्रीसमर्थांच्या ' रामदास ' या नांवापासूनच शंकेस प्रारंभ होतो. श्रीसमर्थांचें मूळचें नांव ' नारायण ' असें आहे, पण श्रीसमर्थांनीं पुढें आपणांस अनेक नांवें ठेवून घेतलीं होतीं. त्या सर्वांस ' रामदास ' हें नांव त्यांच्या विशेष आवडीचें होतें, हें त्यांच्या शेंकडों उल्लेखांवरून स्पष्ट आहे. पण हें नांव सनातन धर्माच्या प्राचीन परंपरेविरुद्ध आहे. ब्राह्मणानें आपल्या नांवाच्या शेवटीं ' दास ' हा शब्द लावतां कामा नये, असा स्मृतींचा दंडक आहे. ' दास ' केवळ शूद्रांनीं आपल्या नांवापुढें लावावयाचें असें आहेः—

शूद्रस्य प्रेष्य संयुतम् ॥ मनु. २.३२

असें मनु सांगत आहेत. मेधातिथींनीं या चरणाचा अर्थ

प्रेष्यो दासो ब्राह्मणदासो देवदासः ।

असा केला आहे. ' संस्कारमयूख ' कर्त्यांनीं हेंच मत प्रतिपादिलें आहेः—

पूर्वः पुरस्य वर्णस्य हीनस्यापि न धारयेत् ।

याचा अर्थ असा कीं, पहिल्या वर्गानें पुढच्या वर्णाचें नांव धारण करतां कामां नये पण या साध्या बाबतींतहि श्रीसमर्थांनीं सनातनी शास्त्राला कसें धाब्यावर बसविलें आहे, याचें हें उदाहरण आहे. इकडे आधुनिक सनातनीयांचें लक्ष जाईल काय !

दुसरी शंका ही कीं, श्रीसमर्थांचा आश्रम कोणता ? श्रीसमर्थ बालब्रह्मचारी होते, ते आमरणान्त तसेच होते, हें सर्वांस माहीत आहे पण शास्त्रीय दृष्टीनें त्यांचा आश्रम कोणता हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे शास्त्रीय दृष्टीनें त्यांचा ब्रह्मचर्याश्रम, त्यांच्या होऊं घातलेल्या विवाहाचे वेळेस संपला होता. म्हणजे समावर्तन विधि पूर्ण जाहला होता, असें मान्य करणें प्राप्त आहे. कारण समावर्तनाशिवाय विवाह होणें, शास्त्रदृष्टीनें तरी शक्य नाहीं. व्यावहारिक भाषेंत बोलायचें झाल्यास त्यांची सोडमुंज झालेली होती. तेव्हां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, इकडे सोडमुंज झालेली पण तिकडे विवाह न झालेला, तेव्हां अशा अर्धवट स्थितीला कोणता आश्रम म्हणावयाचें ? शास्त्राच्या दृष्टीनें ही स्थिति अत्यंत गर्ह्य मानली गेली आहे; येवढेंच नव्हे तर अशा स्थितींत केलेलीं तपदानादि कर्में निष्फळ होतात व तीं करणारास शेवटीं नरकावस्था प्राप्त होते, असें शास्त्रें म्हणत आलीं आहेतः—

अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।
आश्रमेण विना तिष्ठन्प्रायश्चित्तीयते हि सः ॥

जपे होमे तथा दाने स्वाध्याये वा रतः सदा ।
नासौ फलमवाप्नोति कुर्वाणोऽप्याश्रमायुत्तः ॥ दक्षस्मृतिः

अनाश्रमी व्यपेतश्च आश्रमी च निरर्थकः ।
मिथ्याश्रमी च सर्वे वै निरयं यान्ति मानवाः । हारीतस्मृतिः
अनाश्रमी न तिष्ठेतयावज्जीवं द्विजोत्तमः ॥ बृ. हारीत

तिसरी शंका येते ती भिक्षेसंबंधींची. श्रीसमर्थ संप्रदायाच्या बाह्य चिन्हांपैकीं भिक्षा मागणें हें एक महत्त्वाचें चिन्ह समजलें जातें:—

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
वों भवति या पक्षा । रक्षिले पाहिजे ॥

ही ओवी सर्वांस मुखोद्गत आहे. 'वों भवति' हीं अक्षरें ओंवीत आहेत. पण त्यांचा अर्थ संप्रदायांत मात्र निराळा केलेला दिसतो. मधुकरीच्या वेळीं 'वों भवति' असें मधुकरी मागणारा गृहस्वामिनीला उद्देशून म्हणतो व भिक्षा ओली —कोरडी नव्हे—घेतो. ही ओली म्हणजे शिजवलेली भिक्षा मागण्याचा प्रघात शास्त्रांस अनुसरून आहे. पण श्रीसमर्थ संप्रदायाच्या कोरडी भिक्षा मागण्याच्या प्रघातास शास्त्रांत कोठें आधार दिसत नाहीं. कारण

यतिश्च ब्रह्मचारी च पक्वान्न स्वामिनावुभौ ।

असें स्पष्ट स्मृतिवचन आहे. याचा अर्थ असा कीं संन्यासी व ब्रह्मचारी यांना केवळ शिजविलेलें अन्नच विहित आहे. श्रीसमर्थ सांप्रदायांत चतुर्थाश्रमास मुळींच

अवकाश नाहीं. तेव्हां ह्या आश्रमाच्या आपणांस ह्या भिक्षेपुरत्या प्रश्नाबाबत विचार कर्तव्य नाहीं. ब्रह्मचाऱ्यास मग तो शास्त्रविहित ब्रह्मचारी असला तरी (श्रीसमर्थ हे तसे नसावेत असें वर येऊन गेलेंच आहे) कोरड्या भिक्षेचा निषेध आहे, हें वरील स्मार्त वचनावरून स्पष्ट आहे.

तेव्हां प्रश्न असा कीं, ह्या प्रकारच्या भिक्षेचा संप्रदाय श्रीसमर्थांनीं कोणत्या शास्त्राधारावर स्वीकारला व प्रचारांत आणला ?

दासबोध द. १४. २ मध्यें श्रीसमर्थांनीं आपल्या भिक्षासंप्रदायाला परंपरेचें पाठबळ कसें आहे, हें दाखविण्यासाठीं

दत्त गोरक्ष आदि करूनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं ।

असा पूर्वींच्या भिक्षासांप्रदायिकांचा आधार दिला आहे. पण मुख्य मुद्दा भिक्षा मागणारे कोण हा नसून, ती भिक्षा कोरडी कीं ओली व यांपैकीं शास्त्रविहित कोणती व शास्त्रनिषिद्ध कोणती याबद्दलचा आहे. श्रीसमर्थांनीं वर निर्दिष्ट केलेले संत, हे नेमकी कोणती भिक्षा (कोरडी कीं ओली) मागत यासंबंधीं जे उल्लेख आहेत, त्यांतील सत्यांश काढणें फार बिकट आहे. श्रीगुरुचरित्र, नवनाथ भक्तिसारादि ग्रंथांत या गोष्टीचा उल्लेख येतो, नाहीं असें नाहीं. पण हा उल्लेख समाधानकारक नाहीं याचें कारण उघड आहे. हे संत जवळजवळ पौराणिक कालांतील असल्यानें यांच्याभोंवतीं त्यांच्या चरित्रकारांनीं अगदीं नवी सृष्टि निर्माण केली आहे. सबब या प्रश्नाचें उत्तर आपणांस त्यांच्या या चरित्रग्रंथांत समाधानकारक मिळत नाहीं.

आम्हांस येवढेंच दाखवायचें आहे कीं, श्रीसमर्थांनीं हा प्रचलित केलेला नूतन भिक्षा संप्रदाय मनुयाज्ञवल्क्यादि शास्त्रांस, निदान ब्रह्मचाऱ्यापुरता तरी, प्रतिकूल भासतो. तेव्हां याचें समाधान कोणास सुचल्यास फार बरें होईल.

चौथा प्रश्न श्रीसमर्थांनीं चालू केलेल्या संप्रदायाबद्दलचा. ह्या प्रश्नाचा थोडाबहुत ऊहापोह प्रसिद्ध इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं 'रामदास व रामदासी' या मासिकाच्या 'सांप्रदायिक विविध विषय भाग पहिला लेखांक सदतीस' मध्यें केला आहे. पण त्यानें समाधान होत नाहीं. राजवाड्यांच्या प्रतिपादनांत शास्त्रीय दृष्टि आम्हांस तरी दिसत नाहीं. श्रीसमर्थ स्वतन्त्र आचारविचाराचे होते, गतानुगतिकत्व त्यांच्यांत नव्हतें, सबब ते इतर संतांहून श्रेष्ठ होते, येवढेंच त्यांस सिद्ध करावयाचें होतें. राजवाड्यांप्रमाणेंच कांहीं अंशीं आमचेंहि मत आहे. पण या ठिकाणीं प्रश्न असा उपस्थित होतो कीं, श्रीसमर्थ स्वतन्त्र बाण्याचे असतील व ते आहेतहि, त्यांनीं पूर्वपरंपरेला झुगारून दिलें हेंहि कदाचित् चांगलें केलें असेल व त्याचा परिणामहि पाहिजे तोच झाला

असेल, पण त्यांचें हें करणें पूर्वींच्या सनातनी शास्त्राला धरून आहे काय ? शास्त्रांत सांगितलेल्या चार आश्रमांत श्रीसमर्थांचा संप्रदाय कोठें बसतो ? या शास्त्रविहित चार आश्रमांप्रमाणें श्रीसमर्थसंप्रदायांत क्रम आहे काय ? हुर्मुजी वस्त्रें, संन्यासनिषेध, कुबडी, मेखला इत्यादि बाह्य चिन्हें कोणत्या श्रुतिस्मृतींचा आधार घेऊन श्रीसमर्थांनीं आपल्या संप्रदायांत चालू केलीं ? श्रीसमर्थसंबंधींच्या असल्या अनेक बाबींची सूक्ष्म चिकित्सा होणें अत्यंत आवश्यक आहे.

पांचवा मुद्दा असा कीं, स्त्रियांनीं आपल्या पतिव्यतिरिक्त इतरांस गुरु करावें किंवा नाहीं ? मग त्या सुवासिनी असोत वा विधवा असोत. सुवासिनी स्त्रियांस पतिव्यतिरिक्त दुसरा कोणताहि गुरु करणें शक्य नाहीं व इष्ट नाहीं असें मन्वादि स्मृतिकार कंठरवानें सांगत आहेत. 'पतिरेव गुरुः स्त्रीणाम् ।' पति हाच स्त्रियांचा गुरु होय. पतिशुश्रूषेनेंच स्त्रीला सर्व गोष्टींचा लाभ होत असतो, असें याज्ञवल्क्य सांगत आहेत:—

पतिशुश्रूषयैव सर्वान्कामान्समश्नुते ॥

स्त्रियांना आपल्या पतिशुश्रूषेशिवाय दुसरें व्रत, तप किंवा यज्ञ नाहीं असें मनुहि सांगतात :—

नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।
पतिः शुश्रूष्यते येन तेन स्वर्गे महीयते ॥ ५. १५४

स्त्रीला पतिपूजनाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें स्वर्गप्राप्ति होत नाहीं, असें शंख ऋषींचें मत आहे :—

न व्रतेनोपवासेन धर्मेण विविधेनच ।
नारी स्वर्गमवाप्नोति प्राप्नोति पतिपूजनात् ॥

हे निर्बन्ध झाले सुवासिनींच्या बाबतचे. पण शास्त्रकार विधवांनाहि तेच नियम लागू करतात. पति जिवन्त असतांना स्त्री जशी त्याच्याशीं वागत असते, तसेंच तिनें तो मृत झाल्यानंतरहि त्याच्याशीं वागलें पाहिजे, असें मनु सांगत आहेत:—

तं शुश्रूषेन जीवन्तं संस्थितं च न लंघवेत् ।

तेव्हा अशी शास्त्र मर्यादा असतांना मोक्षगुरु म्हणून पतिव्यतिरिक्त दुसरा कोणी तरी करण्याची किंवा मानण्याची जी पद्धत आहे, ती निदान शास्त्रकारांस तरी संमत नाहीं.

वस्तुस्थिति अशी असतांना श्रीसमर्थांनीं अक्कास्वामी, वेणुस्वामी, बाइयाबाई, अंबिकाबाई इत्यादि जे स्त्रीमहंत केले ते कसे ? श्रीसमर्थांना हे शास्त्रनिर्बन्ध माहीत

नव्हते असें म्हणणें अज्ञानाचें, धाष्टर्याचें व मर्यादातिक्रमणाचें द्योतक होईल. हें पातक आम्ही आपल्या माथीं घेण्याचें साहस करीत नाहीं. श्रीसमर्थांस हें सर्व माहीत असूनहि त्यांनीं हें शास्त्रनिषिद्धाचरण कसें केलें, यास कारणें कोणतीं असावींत एवढ्याच गोष्टींचें स्पष्टीकरण आम्हांस पाहिजे आहे.

परंतु एवढ्यावरच हें भागतें तर कांहीं हरकत नव्हती. स्त्रियांना केवळ ज्ञानोपदेश करून व त्यांना त्यांच्या उन्नतीचा मार्ग दाखवून श्रीसमर्थ स्वस्थ बसते तरी ठीक होतें. पण ते एवढ्यावरच न थांबतां याच्यापुढें फारच गेले आहेत. मग त्यांच्या ह्या अशा करण्यांत 'पापयोनी' म्हणून चिरकाल अज्ञानांत शास्त्रकारांनीं दडपून टाकलेल्या अबलांना अनुकूल परिस्थिति प्राप्त करून दिली असतां, त्या त्यांच्यावर जुलूम करणाऱ्या पुरुषांच्या जोडीला केवळ ऐहिक गोष्टींतच नव्हे, तर अत्यंत सूक्ष्म व बिकट अशा पारमार्थिक गोष्टींतसुद्धां त्याच्या इतकीच नव्हे तर कांकणभर जास्त प्रगति करून दाखविण्यास समर्थ आहेत, हें जगाला सिद्ध करून दाखविण्याचा परम कारुणिक श्रीसमर्थांचा हेतु होता कीं काय न कळे! आपल्या स्त्रीमहंतांना मठ करणें, मन्त्रोपदेश देऊन शिष्यशाखा वाढविणें इत्यादि गोष्टींस श्रीसमर्थांनीं पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. श्रीवेणुस्वामी, श्रीअंबिकाबाई व श्रीबाइयाबाई यांचे मठ असून त्यांची शिष्यशाखाहि बरीच असावी, असें अनुमान उपलब्ध वाङ्मयावरून दिसतें. श्रीवेणाबाईंच्या शिष्य श्रीबाइयाबाई व श्रीबाइयाबाईंचे शिष्य श्रीसमर्थांचे प्रसिद्ध चरित्रकार व स्वतंत्र ग्रंथकार बीड मठाचे अधिपति श्रीगिरिधर गोसावी, हें सर्वविश्रुत आहे.

स्त्रियांना पतिशिवाय दुसरा गुरु–मोक्षगुरु करतां येतो, असें या श्रीसमर्थ-प्रतापकार गिरिधरांचें मत आहे. तें येणेंप्रमाणें:—

> स्त्रियांसी कर्मदेह भर्तार गुरु । तयांसी कासयासी व्हावें श्रीगुरु ।
> ऐसें म्हणाल तरी मोक्षार्थ सद्गुरु । बहुतां स्त्रियांहि सेविले ॥
>
> प्रताप ११.३१

असें सांगून अशा रीतीनें ज्यांनीं गुरु केले आहेत अशा पंधरा स्त्रियांचीं नांवें त्यांनीं 'प्रतापांत' उद्धृत केलीं आहेत व आणखी अशा प्रकारचीं उदंड उदाहरणें देतां येतील अशीहि ग्वाहि 'प्रताप'कार देत आहेत.

गिरिधरांनीं दिलेल्या या पंधरा नांवांची आपण जरा छाननी करूं या. पैकीं गार्गी व सुलभा या पौराणिक स्त्रिया असून त्या विवाहित नाहींत. मुक्ताबाई या ऐतिहासिक आहेत व त्याहि कुमारिकाच आहेत. या तीनहि स्त्रिया कुमारिका असल्यानें (शास्त्रानें स्त्रियांना ज्ञानाधिकार दिला असल्यास, कारण त्या पापयोनि आहेत) त्यांना गुरु करणें शक्य आहे. मैत्रेयी, अनसूया, अरुंधती व उमा यांचे

पतिव्यतिरिक्त निराळे गुरु असल्याचें प्रसिद्ध नाहीं. तेव्हां ब्रह्मनिष्ठ असलेल्या आपल्या पतीस अशा स्त्रियांनीं मोक्षार्थ गुरु केलें असल्यास त्यांत वावगें कांहींच नाहीं. 'पतिरेव गुरुःस्त्रीणाम्' याच सदरांत या स्त्रिया पडतात. मीराबाई ऐतिहासिक आहेत. यांचें लग्न यांच्या इच्छेविरुद्ध लावण्यांत आलें होतें. कारण यांनीं लहानपणीं देवालाच आपला पति म्हणून वरलें होतें इत्यादि प्रकार इतिहासज्ञांस विदित आहेच. कौसल्यामातेनें श्रीरामास आपला मोक्ष गुरु केल्याचें कोठें उपलब्ध नाहीं व तिची ब्रह्मनिष्ठ स्त्री म्हणून ख्यातीहि पण नाहीं तिला श्रीरामचंद्रांनीं ब्रह्मज्ञान सांगितलें असेल, पण तें गुरुशिष्य या नात्यानें सांगितल्याचें ऐकिवांत नाहीं. एऱ्हवीं ज्ञान सांगणें निराळें व गुरुशिष्यसंबंधानें ज्ञान सांगणें निराळें. भगवान् श्रीकृष्णांनीं आपल्या यशोदा मातेला व धृतराष्ट्राला आपलें विश्वरूप दाखविलें होतें; तसेंच आपले पट्टशिष्य जे अर्जुन व उद्धव यांनाहि तें दाखविलें होतें. पण अर्जुन व उद्धव यांस जसें भगवंतांचे शिष्य मानण्यांत येते, तसें यशोदामातेला किंवा धृतराष्ट्राला मानीत नाहींत. त्याचप्रमाणें कौसल्यामातेलाहि श्रीरामचंद्रांची शिष्या मानल्याचें कोठें आढळांत नाहीं. जो प्रकार कौसल्येचा तोच कपिलमाता देवहूतीचा. ध्रुवमाता एका श्रेष्ठ भक्ताची माता म्हणून मोठी असली तरी ब्रह्मनिष्ठांच्या पंक्तींत पुराणांनीं तिला बसविलेलें व मोक्षार्थ तिनें कोणाला गुरु केल्याचें दिसून येत नाहीं. कौसल्या, देवहूति व सुनीति यांचीं नांवें ब्रह्मवेत्त्यांच्या सदरांत गिरिधरांनीं कां व कशीं घातलीं हें कळत नाहीं. आतां राहिलेल्या चार स्त्रियांपैकीं मदालसा, चूडाला व लीला या तीनहि उच्च पदवीला पावलेल्या ब्रह्मनिष्ठ म्हणून प्रसिद्ध आहेत. पैकीं मदालसेला साक्षात् श्रीशंकरांचा अनुग्रह होता, पण तो ती आपल्या पतीबरोबर—ऋतुध्वजाबरोबर या भूलोकीं नांदत असतांना झालेला नसून, पतिनिधनाची खोटी वार्ता ऐकून स्वर्गास गेल्यावर तेथें झालेला आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. चूडाला व लीला या कोणापासून ज्ञानप्राप्ति करून घेऊन कृतकृत्य झाल्या, हें योगवासिष्ठावरून स्पष्ट होत नाहीं. मैनावतीनें मात्र जालंदरनाथांस गुरु केल्याचें प्रसिद्ध आहे.

वरील विवरणावरून वाचकांच्या लक्षांत सहज येईल कीं, गिरिधरांनीं "मोक्षार्थ सद्‌गुरु । बहुतां स्त्रियां हि सेविले ॥" या आपल्या सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थ जीं पंधरा उदाहरणें घेतलीं आहेत, त्यांतील बारा त्यांच्या अजिबात विरुद्ध जात आहेत, दोनींबद्दल संशय आहे व एक मात्र त्यांच्या म्हणण्यास दुजोरा देत आहे. आमची सुज्ञ वाचकांत विनंति ही कीं त्यांनीं आपल्या मनाशींच गिरिधरांच्या विधानाचा विचार चिकित्सापूर्वक करून आपलें मत बनवावें. पण घटकाभर आम्ही गृहीत धरतों कीं, हीं गिरिधरांचीं सर्व उदाहरणें बरोबर आहेत. पण आमचा मुख्य प्रश्न असा आहे कीं, हीं सर्व उदाहरणें स्मृतींना विरुद्ध जातात त्याची वाट काय ?

समाजामध्यें अशा प्रकारें अभूतपूर्व सुधारणा सर्व शास्त्रें विरुद्ध असतांना, श्रीसमर्थांपूर्वीं, भगवान् श्रीकृष्णांशिवाय, दुसऱ्या कोणी महात्म्यानें घडवून आणल्याचें माहीत नाहीं. स्त्रियांनीं मठमहंतादि करणें, इतरांस ज्ञानोपदेश करणें हें बौद्ध संप्रदायांत एका कालीं फार ज्यारींत होतें. जैन, महानुभाव व लिंगायत या संप्रदायांतहि प्रचलित होते. पण हे सर्व संप्रदाय अवैदिक होते. तेव्हां या प्रश्नाबाबत आपणांस त्यांशीं कर्तव्य नाहीं. पण श्रीसमर्थांनीं घालून दिलेलें हें उदाहरण सनातनीयांस अगदीं नवीन होतें. त्यांच्यापूर्वीं वारकरी सांप्रदायांत मात्र या प्रश्नाचा थोडा विचार होऊन या गोष्टीस थोडी चालना देऊन ती प्रत्यक्ष कृतींत आणण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. श्रीमुक्ताबाई व श्रीनामदेवशिष्या जनाबाई हीं त्याचीं फलें होत. श्रीज्ञानेश्वर-नामदेवांनंतर श्रीसमर्थांचे कालापर्यंत वारकरी संप्रदायांत नांव घेण्यासारखा वर उल्लेखिलेल्या दोन स्त्रियांखेरीज, कोणी स्त्री-महंत झालेला आढळून येत नाहीं. जीं नांवें आढळतात तीं किरकोळ आहेत. श्रीसमर्थांचे कालीं त्यांचे समकालीन श्रीतुकाराम महाराज यांच्या शिष्यवर्गांतसुद्धां बहिणाबाईसारखी कर्तबगार एकादीच दिसते. पण श्रीसमर्थांनीं आपल्या आयुर्मानांत केलेल्या साक्षेपी स्त्रीमहंतांच्या नामावलीकडे पाहिलें, तर मति गुंग होऊन जाते. कोणत्याहि आधुनिक स्त्रीकैवाऱ्याला श्रीसमर्थांचें हें सामाजिक कार्य सदैव उदाहरण होऊन राहण्यासारखें आहे. तात्पर्य, ऐतिहासिक कालांत ही आचारविचारांतील क्रांति अगदीं नवी होती. आपल्या धगधगीत वैराग्यानें, प्रचंड तपश्चर्येनें व भगीरथ प्रयत्नानें श्रीसमर्थांनीं ही सामाजिक सुधारणा समाजाच्या गळीं उतरविली होती हें समर्थसांप्रदायिक वाङ्मयाच्या भक्तांस सांगण्याची फारशी आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. श्री वेणाबाई व अंबिकाबाई यांचे मठ अनुक्रमें मिरज व राशिवडें येथें अद्याप विद्यमान आहेत. यासंबंधीं जास्त माहितीबद्दल जिज्ञासूंनीं ‘ प्रतापा ’स वाट पुसावी, एवढें सांगून मुख्य मुद्याकडे वळतों.

परम कारुणिक श्रीसमर्थांनीं हें सर्व त्या वेळेच्या परिस्थितीला अनुरूप केलें असेल, तत्कालीन समाजाची सर्वांगीण उन्नति त्यायोगें घडून आली असेल, संसाराचीं दोन चक्रें तुल्यबल होऊन तो त्या वेळीं अगदीं कार्यक्षम जाहला असेल; नाहीं असें नाहीं. किंबहुना श्रीसमर्थांच्या या सम, व्यापक व उदार दृष्टीनें त्या वेळीं समाजांत केवढी धार्मिक, राजकीय व सामाजिक क्रान्ति घडवून आणली व त्यायोगें केवढें प्रचंड आंदोलन जाहलें याची साक्ष मराठ्यांचा इतिहास देतच आहे. पण आपला मुद्दा असा आहे कीं, स्त्रियांस, मग त्या कितीहि ज्ञानवैराग्यसंपन्न असोत, इतरास ज्ञानोपदेश करण्याची अनुज्ञा पूर्वशास्त्रकारांनीं दिली आहे काय ? असल्यास कोठें ? नसल्यास हें शास्त्रनिषिद्ध आचरण नव्हे काय ? का, ही श्रीसमर्थांनीं समाजांत नवीन क्रान्ति घडवून आणून जगास एक सामाजिक सुधारणेचा नवा पाठ भविष्यत्कालासाठीं घालून दिला ? या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर पाहिजे

आहे. श्रीसमर्थांची त्यांच्या सांप्रदायिक वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांत, भक्तांत—मग ही मंडळी सांप्रदायिक असोत वा नसोत—व अभिमान्यांत ते सामाजिक सुधारणावादी होते अशी प्रसिद्धि नाहीं, ऐवढेंच नव्हे, तर उलट ते पुराण-मताभिमानी सनातनी होते, असेंच हे विद्वान् व इतर, वेळीं-अवेळीं आपल्या व्याख्यानांत, प्रवचनांत, लेखांत व खासगी संभाषणांत प्रतिपादितांना दिसतात. तेव्हां हे विद्वान् या प्रश्नाचें उत्तर निर्विकारपणें व समाधानकारक देतील काय ?

मोक्षगुरु ब्राह्मणच पाहिजे, मग तो क्रियाहीन असला तरी चालेल, नीच यातीचा माणूस केवढाहि ज्ञानी झाला तरी त्याला गुरुत्व घडणें शक्य नाहीं व इष्ट नाहीं, असें मत श्रीसमर्थ ठिकठिकाणीं प्रतिपादितात.

(अ) गुरु तो सकळांसी ब्राह्मण । जऱ्ही तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासी च शरण । अनन्यभावें असावें ।। ५.१.६

(ब) नीच यातीचा गुरु करूं नये । दा. २.२.३९

(क) नीच यातीचा गुरु । तो हि कानकोंडा विचारु ।। ५.२.५८

(ड) नीच यातीस गुरुत्व न घडे । ५.२.६२

या सर्वाचें तात्पर्य असें कीं, श्रीसमर्थमतें ब्राह्मणेतर मनुष्य ब्राह्मणांचा मोक्षगुरु केव्हांच होणें शक्य नाहीं. त्याला त्यांनीं कारणें दिलीं आहेत. पण तीं मुळींच तर्कशुद्ध दिसत नाहींत. जन्मजात ब्राह्मणांचा कैवार श्रीसमर्थांनीं दा. द. ५.१.६—१६ मध्यें बराच घेतला आहे. पण त्याच्या उलट

करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
ते चि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ।। ६.४.६४

या ठिकाणीं ते जन्माला मान देत नसून गुणकर्माला मान देत आहेत, हें स्पष्ट आहे. या ओवीचा अर्थ शब्दच्छल करून निराळा लावल्याचें आम्हीं कांहीं वेळां ऐकिलें आहे. पण आम्हीं त्यास डावलून पुढें जातों. ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला तोच ब्राह्मण, असा या ओवीचा स्पष्ट अर्थ आहे. असें असतांना ब्राह्मणच मोक्षगुरु पाहिजे हा आग्रह कां हें कळत नाहीं.

ब्राह्मणेतर गुरु केल्यास त्या गुरूचें तीर्थ घेतां येत नाहीं, त्याचें तीर्थ टाकून दिल्यास गुरुभक्तीस बाधा येते, इतकाहि दोष पत्करून एखाद्यास असलाच गुरु करावासा वाटल्यास एकट्यानेंच भ्रष्टावें, पण इतरांस आपणांसारखें भ्रष्टवूं नये इत्यादि जें श्रीसमर्थ दा. द. ५.२ मध्यें प्रतिपादितात, त्याच्या उलट 'दासविश्रामधाम'-कार श्रीआत्माराम महाराज आपल्या 'धामाच्या' अध्याय सत्तराव्यामध्यें प्रतिपादित आहेत, त्याची वाट कशी लावावयाची ? श्रीसमर्थांचे दत्तोबा व कृष्णाप्पा नांवाचे

दोन न्हावी जातीचे शिष्य होते. यांचें वर्णन आत्माराम महाराजांनीं अध्याय एकविसाव्यांत केलें आहे. पैकीं प्रस्तुत प्रकरणीं आपणांस कृष्णाप्पाशीं कर्तव्य आहे. यांचें कोणी जयराम नांवाचे शिष्य होते. श्रीसमर्थाज्ञेनेंच कृष्णाप्पांनीं या जयरामांस अनुग्रह देऊन पावन केलें होतें. तेव्हां आतां या गोष्टीची व 'गुरु तो सकळांसी ब्राह्मण' किंवा 'स्वयातीचा पाहिजे गुरु। नाहीं तरी भ्रष्टाकारु। नेमस्त घडे ।।' ५.२.६४ या वचनांची सांगड कशी घालावयाची? श्रीसमर्थ चुकले म्हणावयाचे, कीं आत्माराम महाराजांस या वचनांचा भावार्थ समजला नाहीं म्हणावयाचा? का आत्माराम महाराजांचें

भाव मात्र येक असावा चांग। यातीस कारण नाहीं कीं ।। धाम २१.६६

हें वाक्य प्रमाण मानावयाचें? पण असें केल्यानें 'गुरु तो सकळांस ब्राह्मण' इत्यादि वचनांस हरताळ लागतो याची वाट काय? आत्माराम महाराजांचें वरील वाक्य प्रमाणभूत मानल्यास व त्यांनीं दिलेला कृष्णाप्पा न्हाव्यांचा इतिहास विश्वसनीय धरल्यास इतर संतांत व श्रीसमर्थांत काय भेद राहिला? पण असें होणें आमच्यांतील कांहीं विद्वानांस इष्ट नाहीं. त्यांच्या मतें श्रीसमर्थच काय ते 'येकंकार गजावरि पंचानन' व बाकीचे सर्व संत सबगोलंकाराला अनुकूल. तेव्हां या सांकडींतून कसें पार पडावयाचें? श्रीसमर्थ प्रमाण, का आत्माराम महाराज प्रमाण? आत्माराम महाराजांनीं दिलेली कथा प्रमाणभूत मानल्यास श्रीसमर्थ-वाक्यांचें प्रामाण्य कमी होत नाहीं काय?

मनुस्मृतीच्या चवथ्या अध्यायांत

न शूद्राय मतिं दद्यात् ... ... ... ।
न चास्योपदिशेद्धर्मं न चास्य व्रतमादिशेत् ।। ८०

असा एक श्लोक आहे व त्याचा अर्थ शूद्राला सल्ला देऊं नये, त्याला धर्मोपदेश व कोणत्याहि व्रताचा उपदेश देऊं नये, असा आहे. अशा प्रकारचीं आणखी कितीतरी शास्त्रवचनें देतां येतील. पण आपणांस सध्यां एवढें एकच पुरें. श्रीसमर्थांच्या संप्रदायांत ब्राह्मणेतर शिष्य किती तरी होते व श्रीसमर्थमतें हे सर्व शूद्र असावेत असें वाटतें. तसें नसतें तर त्यांनीं ब्राह्मणाबरोबरच निदान इतर दोन वर्णांस म्हणजे क्षत्रिय व वैश्य या दोन वर्णांस वेदाधिकार आहे असें म्हटलें असतें. पण त्यांनीं तसें म्हटलेलें दिसत नाहीं. वेदाध्ययनाचा अधिकार केवळ ब्राह्मणांचाच असें त्यांचें स्पष्ट मत दासबोधांत दिसून येतें:—

तया ब्राह्मणदेहास पाहो। अधिकार वेदीं ।। १०.२.१७

श्रीसमर्थांचें हें मत श्रुतिस्मृतींस धरून नाहीं, हें या वचनावरून स्पष्ट आहे. असें असतांना सुद्धां श्रीसमर्थ या शूद्रादिकांस नुसते सल्लामसलत देऊन थांबले असें

मुळींच नाहीं; तर आत्मसाक्षात्कारापर्यंतचें ज्ञान त्यांनीं आपल्या मराठे, कुणबी, न्हावी इत्यादि शिष्यांस दिल्याचें इतिहासप्रसिद्ध आहे. या त्यांच्या कृतीस धर्मशास्त्राचा टेकू आहे काय, असा प्रश्न आहे.

तया ब्राह्मणदेहास पाहो । अधिकार वेदीं ।।

या वचनावरून आणखी एक शंका उपस्थित होते कीं, ब्राह्मणाव्यतिरिक्त वेदांचा अर्थात् त्याबरोबर वेदोक्त कर्मांचा अधिकार जर इतरांस म्हणजे क्षत्रिय व वैश्यांस-सुद्धां नाहीं, तर मग त्यांनीं श्रीशिवछत्रपतींस पंडितवर्य गागाभट्टांकरवीं वेदोक्त-मंत्रांनीं राज्याभिषेक करविण्याचा खटाटोप कां करावा ? श्रीशिवछत्रपतींचें क्षत्रियत्व सिद्ध करविण्याची यातायात कां करावी ? हें समजत नाहीं. " त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करण्याच्या अगोदर आसनविधि व प्रणवकार पृथ्वीत्यादि तांत्रिक व वैदिक मंत्रांनीं करण्यास समर्थसंप्रदायाची त्रैवर्णिक अशा सर्व रामदासी सांप्रदायिकांस व अर्थात् भोंसल्यास अनुज्ञा होती, " " पुरश्चरणें करण्यासहि समर्थसंप्रदायाची त्यांस ( भोंसल्यास ) अनुज्ञा होती, " " षोडश संस्कार वेदोक्त मंत्रांनीं करण्याचीहि वहिवाट भोंसल्याच्या कुळांत असावी " इत्यादि जें राजवाडे प्रतिपादितात ( सां. वि वि. भा. १ ले. ३४ ) त्याचा व दासबोधांतील वर उद्धृत केलेल्या वचनाचा समन्वय कसा करावयाचा ? अशी शंका मनास त्रास देऊं लागते. ' मनस्यन्यद्वचस्यन्यत्कर्मण्यन्यत् ' अशा आचरणाची श्रीसमर्थचरणीं स्वप्नांतसुद्धां चुकून शंका घेणें म्हणजे महत्पातकाचें आस्पद होणें आहे. ' विचारून व विवंचून बोलण्याचा ' त्यांचा बाणा होता, ' बोला ऐसी क्रिया ' हें त्यांचें ब्रीदवाक्य होतें. असें असतां हें लेखनांत व क्रियेंत विसंवादित्व कां ? याचें उत्तर पाहिजे आहे.

( ८ ) दासबोधांत एके ठिकाणीं श्रीसमर्थ

अंतर येक तों खरें । परी सांगातीं घेऊं न येती माहारें ।

१३.१०.१३

असा उपदेश समाजाला—सवर्ण म्हणविणाऱ्या समाजाला—करीत आहेत. सर्वांचीं अन्तःकरणें आपल्या हातीं धरणारा व इतरांस तसें करा असा उपदेश करणारा हा योगी, व्यवहारांत का होईना, अशी भेदनीति कां शिकवितो हें कळत नाहीं. पण प्रत्यक्ष श्रीसमर्थच आपल्या या वचनाविरुद्ध एके ठिकाणीं बोलत आहेत. जनीजनार्दनास तोषविण्यासाठीं भजन कसें करावयाचें या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं पुढीलप्रमाणें दिलें आहेः—

भेटो कोणी येक नर । धेड महार चांभार ।
त्याचें राखावें अंतर । या नांव भजन ।। करुणाष्टकें २१५.९

पण या वचनाचा अर्थ काय करावयाचा ? स्त्रीशूद्रासंबंधीं श्रीसमर्थांचें धोरण काय होतें हें वर येऊन गेलेंच आहे. प्रस्तुत आपणांस वर उद्‌धृत केलेल्या करुणाष्टकांतील वचनाचा विचार कर्तव्य आहे. हल्लींच्या भाषेंत ज्यांना सनातनी म्हणतात, त्याप्रमाणेंच श्रीसमर्थ होते, असें कांहीं विद्वानांचें मत आहे व याला आधार म्हणून ते ग्रंथराजांतील पुढील ओंवी पुढें करतात :—

> भेद ईश्वर करूनि गेला । त्याच्या बाचेन न वचे मोडिला ।
> मुखामध्यें घांस घातला । तो अपानीं घालवा ॥ १७.४.२७

यांच्या मतें नीच तो नीच च, तो कितीहि ज्ञानी झाला, तरी त्यास उत्तम वर्णाची सर कधीं यावयाची नाहीं. याच सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ श्रीसमर्थांचें आणखी एक वचन त्यांस आपणांसारखे सनातनी समजणारे हे विद्वान् उद्‌धृत करीत असतात:—

> जरी ज्ञान जालें जनीं नीच याती ।
> तरी तें नव्हे वंद्य कांहीं महंतीं ॥ करुणाष्टकें १३४.८७

शास्त्रकार स्त्रीयोनीला पापयोनि म्हणतात. पण स्त्रियांपैकीं कित्येक अधिकारी महंत श्रीसमर्थांचे पट्टशिष्य असून संप्रदाय वाढवीत होते ना ? श्रीसमर्थमतें ब्राह्मणेतर सर्व शूद्र होत. मग शिरवळचे बाजी गोसावी व पारगांवचे शंकराजी गोसावी हे काय ब्राह्मण होते ? शूद्र असूनसुद्धां ते महंतगिरी करीत होतेच ना ? नीच योनींत जन्म घेतलेल्या सेना न्हावी, कान्होपात्रा, गोरा कुंभार, रोहिदास चांभार, चोखामेळा, बंका महारप्रभृति संतांना श्रीसमर्थांनीं व पट्टशिष्यांनीं — कल्याणांनीं— आपल्या ‘ संतनामावळींत ’ व ‘ आरतींत ’ नमन केलें आहे तें कां ? नीच जातीचा मनुष्य मग तो केवढाहि ज्ञानी असो, तो उच्चवर्णीयांस नमनार्ह कसा ? आणि याला शास्त्राधार कोणता ? तेव्हां श्रीसमर्थांचें वाक्य ‘ जरी ज्ञान जालें जनीं नीच याती ’ इत्यादिचा व त्यांच्या वर लिहिलेल्या प्रत्यक्ष कृतींचा मेळ कसा घालावयाचा ?

आमच्या लिहिण्याचा आशय सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आला असेल. सनातनी म्हणविणाऱ्या रामदासी वाङ्मयाच्या अभ्यासकांचा आग्रह असा कीं, श्रीसमर्थ हे सर्वतोपरी श्रुतिस्मृत्युक्त आचारांचें तंतोतंत पालन करणारे होते. आम्हांस तसें वाटत नाहीं. आम्हांस श्रीसमर्थांच्या आचारांत व विचारांत पूर्ण स्वातन्त्र्य दिसतें. त्यांचें हें स्वातन्त्र्य देशकालवर्तमानाप्रमाणें शास्त्रांच्या आचारांत केलेल्या योग्य सुधारणा असाव्यात किंवा काय असें वाटतें. तरी वर उपस्थित केलेल्या शंकांचें साधार समाधान कोणाकडून झाल्यास प्रस्तुत प्रसंगीं तें अनेक दृष्टींनीं अनेकांस मार्गदर्शक व हितावह होईल अशी खात्री आहे.

कांहीं दिवसांपूर्वी ' नवशक्ति ' या मराठी दैनिकांत, आह्मी ' श्रीसमर्थांचें आचारस्वातन्त्र्य व विचारस्वातन्त्र्य ' म्हणून एक लेख लिहिला होता. मंगळूरच्या श्री. दुर्गाराम रामदासी यांनीं ' पहिला सुमनहार ' यांत ' श्रीसमर्थ व सनातन धर्म ' म्हणून एक लेख लिहून आमच्या लेखाचें खंडण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांनीं आमच्या लेखांतील कांहीं थोड्या मुद्द्यांचा विचार केलेला दिसतो.

श्री. दुर्गाराम रामदासी यांनीं आमच्या विधानांचें जें खंडण केलें आहे, तें कितपत शास्त्रांस धरून आहे तें पाहूं या:—

" श्रीसमर्थांचा आश्रम कोणता ? " या आमच्या प्रश्नास श्री. दुर्गाराम उत्तर देतात कीं, " श्रीसमर्थांचा आश्रम विद्यास्नातक ब्रह्मचारी ". ' विद्यास्नातक ब्रह्मचारी ' हा शब्दप्रयोग शास्त्रदुष्ट आहे. स्नातक व ब्रह्मचारी हे शब्दच परस्पर-विरोधी अर्थाचे आहेत. स्नातक याचा अर्थच मुळीं विवाहाकरितां स्नान केलेला असा आहे. श्री. दुर्गाराम यांनीं याज्ञवल्क्य स्मृतींतील १. ५१ हा श्लोक आपल्या बाजूचें प्रमाण म्हणून दिला आहे. पण तो चूक आहे. तो त्यांच्याच विरुद्ध जात आहे. या श्लोकापासून प्रारंभ होणाऱ्या प्रकरणाला 'विवाहप्रकरण' असें नांव दिलें असून विज्ञानेश्वरांनीं त्याचा प्रारंभ ' यः पुनर्विवाह्यस्तस्यस्नानमाह ' असा या श्लोकाच्या आधीं केला आहे. तेव्हां विद्याध्ययन पूर्ण करून ब्रह्मचर्य व्रतानें राहणारा तो विद्यास्नातक, अशी जी ' विद्यास्नातक ' शब्दाची व्याख्या श्री. दुर्गाराम देतात ती स्वकपोलकल्पित आहे. शास्त्रीय नव्हे. ' विद्यास्नातक ' शब्दाचा अर्थ ' धर्मसिंधु ' कार पुढीलप्रमाणें करतात :—

तत्र एकं द्वौ त्रीन् चतुरो वेदान् वेदैकदेशं वा अधीत्य तदर्थंच
ज्ञात्वा द्वादशवर्षादि ब्रह्मचर्य कालावधेः प्रागेव स्नाति सः विद्यास्नातकः

म्हणजे त्यामध्यें एक, दोन, तीन अथवा चार वेद किंवा वेदाचा एक भाग यांचें पठण करून व त्याचा अर्थ जाणून बारा वर्षे इत्यादिक ब्रह्मचर्यकालाचा जो अवधि सांगितला, त्याचे पूर्वींच जो स्नान म्हणजे समावर्तन म्हणजे सोडमुंज करतो तो विद्यास्नातक.

' स्नातक ' बद्दल मनु म्हणतात—

वेदविद्याव्रतस्नाताञ्छ्रोत्रियान्गृहमेधिनः ।
पूजयेद्धव्यकव्येन विपरीतांश्च वर्जयेत् ॥ ४. ३१

याचा अर्थ:— वेदविद्याव्रतस्नातक असलेल्या श्रोत्रियगृहस्थाश्रम्यांचें पूजन ( गृहस्थानें ) हव्यकव्यांनीं करावें... ...इ. या श्लोकांवर कुल्लूकभट्टांचे भाष्य असें आहे:—

वेदविद्यास्नातानिति विद्यास्नातकव्रतस्नातकोभयस्नातकास्त्रयोऽपि गृह्यन्ते ।

म्हणजे ‘ वेदविद्याव्रतस्नातान् ’ या शब्दानें विद्यास्नातक, व्रतस्नातक व विद्याव्रतस्नातक या तिघांचेंहि ग्रहण आहे. श्री. दुर्गारामांचा ‘विद्यास्नातक’ यांत आला आहे व तो गृहस्थाश्रमीच आहे, हें श्लोकांतील ‘ गृहमेधिनः ’ या पदानें माध्याह्नकालाच्या सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. असें असतांना ‘ विद्याध्ययन पूर्ण करून ब्रह्मचर्यव्रतानें राहणारा तो विद्यास्नातक ’ असा अर्थ ते कोणत्या स्मृतीच्या आधारावर देतात तें कोण जाणे ? मनु अ. १.११३ या श्लोकांतील “ स्नातकस्य व्रतानि च ’ या पदांतील ‘ स्नातकस्य ’ शब्दाचा अर्थ कुल्लूकभट्टांनीं ‘ गृहस्थस्य ’ असा केला आहे. स्नातक म्हणजे गृहस्थ.

( २ ) ‘ अनाश्रमी न तिष्ठेच्च दिनमेकमपिद्विजः ’ हें वाक्य मानणें कठीण आहे. असें श्री. दुर्गाराम म्हणतात. कां तर “ समावर्तनोत्तर त्रिरात्र आशौच सांगितलेलें आहे. मग आशौचांत विवाह कसा होईल ” अशी आपत्ति येते असें त्यांचें म्हणणें आहे. पण ही अडचण मुळीं उपस्थितच होत नाहीं. कारण ‘ समावर्तनोत्तर त्रिरात्र आशौच ब्रह्मचर्यावस्थेंत दहा दिवस आशौच धरण्यासारखा कोणी आपल्या सपिंडांतला मृत झाला असेल, तर समावर्तन झाल्यावर मृताला तिलांजलि देऊन तीन दिवस अतिक्रान्त आशौच धरावें, असा निर्णय ‘ धर्मसिंधु ’कार देतात. म्हणजे कोणी मृत झाला नसल्यास हें त्रिरात्र आशौच पाळण्याची आवश्यकता नाहीं. असा याचा अर्थ झाला. अशा रीतीनें श्री. दुर्गाराम यांच्या विधानांतील आमच्या विरुद्ध येणारी एक नड दूर झाली. दुसरी अडचण अशी कीं, ब्रह्मचर्यावस्थेंत, वर लिहिल्याप्रमाणें, कोणी मृत झाला असल्यास ‘ अतिक्रान्त आशौच ’ धरलें पाहिजे ही होय व ती मान्य केल्यास श्लोकांतील ‘ दिनमेकमपि द्विजः ’ याची वाट कशी लावावयाची असा प्रश्न उभा राहतो. पण याचें उत्तरहि श्री. दुर्गाराम समजतात तसें बिकट नाहीं. मग हें त्रिरात्र आशौच ‘ कर्मांग ’ या विधींत पडतें व तें शास्त्रविहितच आहे. याप्रमाणें दुसरी अडचण दूर झाली. या ठिकाणी वाचकांस आणखीहि एक गोष्ट सांगावीशी वाटते. ती ही कीं या ‘ अतिक्रान्त आशौचा ’बाबत पंडितांत मतभेद आहे. विज्ञानेश्वर तें पाळण्याची आवश्यकता नाहीं असें म्हणतात, तर माधव तें पाळलें पाहिजे असें म्हणतात.

“ ब्रह्मचर्य सोडलेल्या दिवशींच जर विवाह व्हावा, तर स्मृति व सूत्रें यांत इतके स्नातकाचे धर्म सांगण्याची जरूरी नव्हती ” असें श्री. दुर्गाराम म्हणतात. स्नातकाचे धर्म शास्त्रकारांनीं कितीहि सांगितले तरी त्यांत बिघडलें कोठें ? श्री. दुर्गारामांच्या समजुतींत, या ठिकाणीं घोटाळा झाला आहे. ते धरून बसले आहेत की स्नातक म्हणजे ब्रह्मचारी. त्याला शास्त्रकारांनीं काय करावें ?

दोष स्मृतिकारांचा नाहीं. तो त्या समजून घेणारांचा आहे. याज्ञवल्क्य स्मृतींत गृहस्थधर्मप्रकरणानंतर स्नातक धर्मप्रकरण दिलें आहे. त्यांत एक श्लोक आहे:--

शुक्लांबरधरो नीचकेशश्मश्रुनखः शुचिः ।
न भार्यादर्शनेऽश्नीयान्नैकवासा न संस्थितः ॥ १.१३१

विज्ञानेश्वरांचा या श्लोकावरील अभिप्राय असा आहे:- स्नातकानें- मग तो तीनहि स्नातकांपैकीं कोणता का असेना - नित्य दोन शुभवस्त्रें धारण करावींत; केस, श्मश्रु व नखें काढावींत; ......चंदन, सुवासिक पुष्पांच्या माळा याचें आदरानें सेवन करावें, ......वैभव आल्यास सुवर्णाच्या व रत्नांच्या माळा घालाव्यात;... ...भार्या समोर असतांना जेवूं नये इ. इ. वरील श्लोकाचा पूर्वार्ध व मनु ४.३५ चा पूर्वार्ध जवळजवळ एकच आहे. वर आम्ही ' स्नातक ' शब्दाचा अर्थ मनुस्मृति ( ४.३१ ) काय करते याचें विवरण केलेंच आहे. त्या स्मृतीच्या चौथ्या अध्यायांत गृहस्थानें कसें वागावें, काय करावें. त्याचे धर्म कोणते इ. चें वर्णन आहे. अर्धा अधिक अध्याय यांतच खर्च झाला आहे. या अध्यायाचा प्रारंभ

चतुर्थमायुषो भागमुषित्वाऽद्यं गुरौ द्विजः ।
द्वितीयमायुषो भागं कृतदारो गृहे वसेत् ॥

म्हणजे आयुष्याचा पहिला चतुर्थ भाग होईपर्यंत गुरूचे संनिध वास्तव्य करून ब्राह्मणानें दार परिग्रह करावा इ. अशा प्रस्तावनेनें झाला आहे. असें असतांना

वैणवीं धारयेद्यष्टिं सोदकं च कमण्डलुम् ।
यज्ञोपवीतं वेदं च शुभे रौक्मे च कुण्डले ॥ ४.३६

म्हणजे कळकाची काठी, उदकयुक्त कमंडलु, यज्ञोपवीत, दर्भमुष्टि आणि शुभ सुवर्ण कुंडलें ब्राह्मणानें धारण करावीं असें या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें श्रीसमर्थ होते असें श्री. दुर्गारामांचें मत आहे व याला प्रमाण म्हणून "श्रीसमर्थांचे हातांतील वेणुयष्टि सज्जनगडावर अजून आहे. कुंडलें होतीं तीं त्यांच्या अनुष्ठानयात्रा इत्यादि कालांत हरवलीं असावीं. पुनः प्रतापगडावरी देवीनें आपल्या हारांतील मोतीं काढून स्वहस्तें चौकडा कुंडलें लेवविल्याचें प्रसिद्ध आहे इ." चिकित्सक बुद्धीस न पटणाऱ्या गोष्टी दिल्या आहेत. गृहस्थप्रकरणांतील हा श्लोक आहे. श्री. दुर्गारामांनीं दिला तो चिकटवून दिला श्रीसमर्थांना ! या छत्तिसाव्या श्लोकापुढील चाळिसाव्यां श्लोकांत—

नोपगच्छेत् प्रमत्तोऽपि स्त्रियमार्तवदर्शने ।
समानशयने चैव न शयीत तया सह ॥ ४.४०

गृहस्थानें स्वस्त्रीसंबंधानें कसें वागावें याचें वर्णन आहे. वर दिलेला याज्ञवल्क्य-स्मृतींतील श्लोक, त्यावरील विज्ञानेश्वराची टीका व तसेंच नुकताच वर दिलेला मनुस्मृतींतील श्लोक या सर्वांचा श्री. दुर्गारामांनीं शांतपणें विचार करावा व आपलें लिहिणें कितपत साधार आहे हें ठरवावें, म्हणजे 'विद्यास्नातक' या शब्दाचा अर्थ आपण किती विलक्षण चुकीचा केला आहे हें, त्यांच्या लक्षांत येईल. मनु, याज्ञवल्क्य इ. स्मृतींतील त्या त्या वचनांचा पूर्वापार संदर्भ सावधानतेनें न पाहिल्याकारणानें व पक्षाभिनिवेशाच्या भरांत सत्यान्वेषणाकडे दुर्लक्ष झाल्यानें त्यांच्या हातून हें असें झालें असावेसें वाटतें.

'वैणवीं धारयेद्यष्टिं' इ. श्लोक ब्रह्मचर्याश्रम्याचे वर्णनपर नसून तो गृहस्था-श्रम्याचे वर्णनपर आहे याबद्दलचें आणखी एक निःसंदिग्ध प्रमाण श्री. दुर्गारामांस सादर करतों. श्री श्रेष्ठांच्या भक्तिरहस्याच्या एकूणचाळिसाव्या प्रकरणांतील तें आहे. हें संबंध प्रकरण गृहस्थधर्मवर्णन करण्याकडे श्रेष्ठांनीं खर्च केलें आहे.

वेदाभ्यासपर्यंत गुरुगृहीं बसोन । सेवापूर्वक करून अध्ययन ।
मग गुरुआज्ञा घेऊन । दारागृहण करावें ॥ भ. र. ६९.११

असा या प्रकरणाचा प्रारंभ आहे. या ओवीपुढील वर्णन वाचलें असतां श्रेष्ठांच्या पूर्वसूरींच्या ग्रंथाध्ययनाचें आश्चर्य वाटतें व त्यांच्या दांडग्या व्यासंगाची कांहींशी कल्पना येते. सर्व विद्यमान स्मृतींशीं त्यांचा गाढ परिचय होता याबद्दल शंका उरत नाहीं. असें वाटतें कीं त्यांनीं स्मृति पुढें ठेवूनच हें वर्णन केलें आहे कीं काय ? पुढें दिलेल्या ओव्या मनु व याज्ञवल्क्य या स्मृतींतील गृहस्थाश्रमपर वर्णनाच्या श्लोकांचें अक्षरशः भाषांतर आहेत :--

गृहस्थाश्रमावलंबनीं । यज्ञोपवीतें धरावीं दोनीं ।
एक ब्रह्मसूत्र उत्तरी स्थानीं । दुसरें हें अगत्य ॥
सुवर्णकुंडलें धौतवस्त्रयुग । चंदनानुलेपन लिप्तांग ।
श्मश्रुकर्म वैणदण्डधारण योग । जळपूर्ण कमंडलु ॥
भ. र. ६९.२७,२८

वर दिलेली दुसरी ओंवी व वैणवीं धारयेद्यष्टिं ओंवींतील 'गृहस्थाश्रमावलंबनीं' या शब्दप्रयोगाकडे लक्ष द्यावें व हें सर्व प्रकरणच श्री. दुर्गारामांनीं वाचावें.

अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।

हें वाक्य जसेंच्या तसेंच पाळलें जावें याबद्दल 'धर्मसिंधु' कारांचा केवढा कटाक्ष आहे, हें त्यांच्या 'समावर्तनकालः' या प्रकरणांत दिसून येतें. आमच्या कार्यापुरता त्यांतील भाग आम्हीं पुढें देत आहोंतः—

मार्गशीर्षे विवाहप्रसक्तौ दक्षिणायनेऽपि भवति ।
अन्यथा अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।

'इति निषेधातिक्रमापत्तेः' म्हणजे मार्गशीर्ष मासांत एकाद्याचा विवाह करण्याचा प्रसंग आल्यास दक्षिणायनांतहि समावर्तन करावें. विवाह नसतां समावर्तन केल्यास 'द्विजानें एक दिवसहि आश्रमावाचून राहूं नये' असा जो निषेध सांगितला आहे, त्याचें उल्लंघन होईल.

"अनाश्रमी न तिष्ठेत" इ. वाक्यांसंबंधीं 'धर्मसिंधु'कारांचा जो अभिप्राय आहे, तसाच अभिप्राय बाळंभट्टी टीकेचाहि आहे. समावर्तन झाल्याबरोबर स्नातकांनीं (विद्यास्नातक, व्रतस्नातक व विद्याव्रतस्नातक) लगेच विवाह केला पाहिजे असें या टीकाकारांचें मत आहे. ही टीका विज्ञानेश्वरांच्या टीकेवरील उपटीका आहे. आचाराध्यायाच्या ५२ व्या श्लोकापूर्वी विज्ञानेश्वरांचें

स्नानानंतरं किं कुर्यात्

असें वाक्य आहे. यावरील बाळंभट्टी टीका

त्रिविधेनापि तेन तऽतोविलंबितः विवाहः कार्यः ।
"अनाश्रमी न तिष्ठेत्तुदिनमेकमपि द्विजः" इति दक्षोक्तेः

म्हणजे समावर्तन झाल्यावर काय करावें या प्रश्नाला टीकाकारांचें उत्तर असें कीं, या तीनहि स्नातकांनीं ताबडतोब विवाह करावा, कारण दक्षस्मृतींत तसें सांगितलें म्हणून.

यत्रैनं पूजयिष्यन्तो भवन्ति तत्रैतां रात्रिं वसेत् । ३.९.३

असें दुर्गारामांनीं दिलें आहे व याचें तात्पर्य "अर्थात् एके ठिकाणीं फार दिवस राहूं नये" म्हणून दिलें आहे. कोणी राहूं नये याचें उत्तर त्यांनीं दिलें नाहीं. पण त्यांच्या लिहिण्याचा संदर्भ ध्यानांत घेतला असतां त्यांच्या 'विद्यास्नातकानें' हें विक्षित आहे. 'विद्यास्नातक' याचा अर्थ स्मार्त वचनान्वयें आम्ही वर दिलाच आहे. वरील सूत्राचा अर्थ "जेथें याची पूजा करणारे असतील तेथें त्यानें त्या रात्रीं रहावें" असा आहे. या सूत्रावर 'गार्ग्यनारायणीय' वृत्ति अशी आहेः—

यत्रात्मानं मधुपर्केण पूजयन्ति तत्रैतां रात्रिं वसेत् वसतिं कुर्यात् । कुतः एतत् । स्नातकायोपस्थितायेति वचनान्मधुपर्केण पूजनमीति लब्धम् ।

म्हणजे ज्या ठिकाणीं मधुपर्कविधीनें लोक आपली पूजा म्हणजे आदरसत्कार करतील त्या ठिकाणीं त्यानें त्या रात्रीं रहावें. असें करण्यास प्रमाण कोणतें ? तर

" स्नातकायोपस्थिताय " आ. गृ. सू. १.२४.२ हें सूत्र. आतां या सूत्रावर 'गार्ग्यनारायणीय' वृत्तींत काय पाण्डित्य केलें आहे, तें आपण पाहूं या.

उपस्थिताय कृतसमावर्तनाय तस्मिन्नहनि गृहानभ्यागताय विवाहार्थिने च ।

असें या सूत्राचें स्पष्टीकरण केलेलें आहे व याचा अर्थ 'ज्याचें समावर्तन झालें आहे व जो विवाहेच्छु असा जो त्या रात्रीं आपल्या घरीं आलेला असतो त्याचा मधुपर्कानें सत्कार करावा 'मधुपर्कमाहरेत्' या त्याच्या आधींच्या सूत्रानें होतो. तेव्हां या सूत्रांतील 'स्नातक' याचा अर्थ श्री. दुर्गारामांस इष्ट असलेला 'विद्यास्नातक' नसून विवाहेच्छु असा आहे. तसेंच 'एतां रात्रिं वसेत्' याचा अर्थ त्यांस अभिप्रेत असलेला " येके स्थळीं राहों नये " असा नसून 'त्या रात्रीं-पुरतेंच तेथें रहावें' असा साधा आहे.

'स्नातक' शब्दाचा अर्थ आश्वलायनगृह्यसूत्रांतील

महद्वैभूतं स्नातको भवतीति विज्ञायते ।। ३.९.८

या सूत्रावरील गार्ग्यनारायणीय टीकेंत त्या टीकाकारांनीं मुद्दाम उद्धृत केलेल्या स्मार्तवचनांवरून ते कोणता समजतात हें स्पष्ट होत आहे:—

देवैश्चापि मनुष्यैश्च तिर्यग्योनिभिरेवच
गृहस्थः सेव्यते यस्मात्तस्माच्छ्रेष्ठो गृहाश्रमी ।

म्हणजे देव, मनुष्य नीच योनींतील प्राण्यांकडून ज्या अर्थीं गृहस्थ सेविला जातो, त्या अर्थीं गृहस्थाश्रमी हा श्रेष्ठ आहे. सूत्रांतील 'स्नातक' म्हणजे गृहस्थाश्रमी. श्री. दुर्गारामांनीं " यत्रैनं पूजयिष्यन्तो " इ. दिलेलें सूत्र गृहस्थाश्रम्यासंबंधाचें आहे, हें वरील विवेचनावरून स्पष्ट आहे.

आतां त्यांनीं दिलेल्या गौतम सूत्रांकडे आपण वळूं या. तीं सूत्रें पुढें दिल्याप्रमाणें आहेत व तीं गौ. सू. प्रथम प्रश्न अ. ९ पैकीं ६८ ते ७४ आहेत. तीं अशीं:—

सत्यधर्मा । आर्यवृत्तः । शिष्टाध्यापकः । शौच शिष्टः ।
श्रुतिनिरतःस्यात् । नित्यमहिंस्रो मृदुर्दृढकारी दमदानशीलः ।
एवमाचारो मातापितरौ पूर्वापरांश्च संबंधान्दुरितेभ्यो
मोक्षयिष्यन् स्नातकः शश्वद्ब्रह्मलोकान्न च्यवते न च्यवते ।

या अध्यायांत स्नातकाचे धर्म सांगितले आहेत. तेव्हां 'स्नातक' याचा अर्थ गौतमांनीं व त्या सूत्रांवरील टीकाकारांनीं काय केला आहे तें पाहिलें म्हणजे हीं सूत्रें श्री. दुर्गारामांनीं श्रीसमर्थांना बरोबर लागूं होतात असें सांगतांना 'वडाची

साल पिंपळाला लावण्या ' चा कसा प्रयत्न केला आहे, तें पटकन ध्यानांत येईल. गौतमसूत्र, प्रथम प्रश्न अ. आठ मध्यें

स्नानं सहधर्मचारिणीसंयोगः ॥१६

असें आहे. याच्यावरील हरदत्तांची टीका

स्नानं समावर्तनं सहधर्मचारिणीसंयोगः विवाहः ।

अशी आहे व तिचा अर्थ समावर्तनानंतर विवाह करावा असा आहे. यावरून ' स्नान केलेला ' तो ' स्नातक ' याचा अर्थ काय होतो तें स्पष्ट आहे. नवव्या अध्यायांत २६, २७ व २९, ३०, ३१ हीं सूत्रें पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—

न मिथुनी भूत्वा शौचं प्रति विलम्बेत ।

न च तस्मिन्शयने स्वाध्यायमधीयीत ।

नाकल्पां नारीमभिरमयेत् ।

न रजस्वलाम् । न चैनां श्लिष्येन्न कन्याम् ।

श्री. दुर्गारामांस आम्ही नम्रपणानें विचारतों कीं, हीं सूत्रें ते समजतात त्या ' विद्यास्नातक ' ब्रह्मचाऱ्यासंबंधींचीं आहेत काय ?

भट्ट गोपीनाथ दीक्षित विरचित ' संस्काररत्नमालेंत ' समावर्तनाचें फल सांगतांना आम्हीं वर दिलेलें ' महाभूतं स्नातको भवतीति ' असें आश्वलायन सूत्र व त्यावर दिलेलें " देवैश्चापि " स्मृतिवचन, स्नातकाचें महत्त्व सांगण्याकरितां देऊन, शिवाय श्रुतिहि स्नातकाचें म्हणजे गृहस्थाश्रमाचें महत्त्व काय समजते, हें दर्शविण्यासाठीं

यः स्नातकः स भवति महाभूतम् ।

असें वाक्य दिलें आहे. या प्रतिवाक्यांतील ' स्नातक ' शब्दाचा अर्थ काय आहे हें त्यांनींच पुढें दिलेल्या स्मृतिवाक्यांवरून स्पष्ट आहेः——

स्नातकस्यैव महात्म्यं महाभूतमयं यतः ।

यथामातरमाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।

तथा गृहस्थमाश्रित्य सर्वे जीवन्ति भिक्षुकाः ॥

शास्त्रकारांनीं कांहीं स्थलीं गृहस्थाचे धर्म व स्नातकाचे धर्म म्हणून निरनिराळीं प्रकरणें दिलीं आहेत यावरून कदाचित् शंका येण्याचा संभव आहे कीं, गृहस्थ व स्नातक निरनिराळे म्हणून. पण तसें नसून स्नातक हा इतर गृहस्थासारखाच गृहस्थ. ती एक पदवी आहे.

आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ – विद्याध्ययन करून ब्रह्मचर्यव्रतानें राहणारा तो विद्यास्नातक – म्हणून श्री. दुर्गारामांनीं आश्वलायन स्मृतींतील जे श्लोक दिलेले आहेत, त्यांत त्यांनीं केलेली शब्दाची ओढाताण फारच मौजेची आहे. आमच्याजवळ ही स्मृति नसल्यानें आम्हांस या श्लोकांबद्दल विशेष लिहितां येत नाहीं. तरी पण त्यांनीं दिलेल्या श्लोकांवरून पहातां ते श्लोक गृहस्थाश्रम्यासंबंधींचेच आहेत असें वाटतें व त्यांनींहि तें मान्य केलें आहे. पण त्यांस हे श्लोक आपल्याला अनुकूल करून घ्यावेसें वाटल्यानें त्यांनीं आपण दिलेल्या पहिल्या श्लोकांतील ' सुस्वस्थः ' व ' सुसमाहितः ' या पदांच्या अर्थाची तर चांगलीच ओढाताण केली आहे. ' सुस्वस्थः ' चा अर्थ श्रीसमर्थांसंबंधीं करतांना " श्रीसमर्थांचें मन जगाच्या चिंतेनें अस्वस्थ होतें, " असा केला तर ' सुसमाहितः ' चा अर्थ " श्रीसमर्थांचें मन भवाच्या भयें भ्यालें होतें " इ. केला आहे. पण त्यांचा हा प्रयत्न कितपत साधला आहे, हें वाचकांनीं ठरवावें.

" समावर्तन म्हणजे विद्या पूर्ण करून गुरुकुलांतून परत येणें; तेवढ्यावरून त्यानें ब्रह्मचर्य सोडलें असा अर्थ होत नाहीं; म्हणून तो अनाश्रमी ठरत नाहीं " इ. जें श्री. दुर्गाराम प्रतिपादितात, तें कितीसें शास्त्रोक्त आहे, हें वरील विस्तृत विवेचनावरून वाचकांस चांगलें कळून आलें असेल, अशी आमची खात्री आहे.

( ३ ) श्रीसमर्थांनीं चालू केलेली कोरान्न भिक्षा ब्रह्मचाऱ्यांस निषिद्ध आहे, असें आम्हीं

यतिश्च ब्रह्मचारी च पक्वान्नस्वामिनावुभौ ।

या वचनाधारें लिहिलें आहे. हें वचन चूक आहे, असें श्री. दुर्गारामांनीं सिद्ध केलेलें नाहीं. ' शास्त्रांत भिक्षेचा ऊहापोह पुष्कळ केलेला आहे ' असें मोघम म्हणून त्यांनीं आपल्या भिक्षेच्या पुष्टिकरणार्थ

आममेवाऽऽददीतास्मादवृत्तावेकरात्रकम् ।

... ... ... ... ...

तस्मादामं गृहीतव्यं शूद्रादप्यंगिरोऽब्रवीत् ॥

हीं वचनें दिलीं आहेत. यांतील " अवृत्तौ ' व ' एकरात्रकम् ' या पदांकडे त्यांनीं द्यावें तसें लक्ष दिलें नाहीं असें कष्टानें म्हणावें लागतें. जेथें मधुकरी मिळणें शक्य नाहीं, तेथेंच कोरान्न भिक्षा मागावी, अशा आपत्तींत ती शूद्राकडूनसुद्धां घ्यावी, पण ती एकरात्रकम् म्हणजे एक दिवसापुरतीच, कायमची नव्हे, असें या श्लोकांचें तात्पर्य आहे. बाळंभट्टांनीं कोरान्नभिक्षा ही केवळ आपत्कालाकरितांच आहे, असा निर्णय दिला आहे. तेव्हां श्री. दुर्गाराम यांस असें विचारावेंसें वाटतें कीं, रामदासी

ब्रह्मचाऱ्यांचा हा आपत्काल ( कोरान्न भिक्षा मागण्याचा ) गेलीं तीनशें वर्षें चालूंच आहे काय ?

शेवटीं श्रेष्ठांचें भिक्षेसंबंधीं मत देऊन हें भिक्षा प्रकरण संपवितों. ब्रह्मचाऱ्यानें

जनीं भिक्षान्न भोजन । भक्ति. र. ६८. ३९
भिक्षान्न श्रोत्रियागारीचें । भ. र. ४०
नित्य भिक्षान्न भक्षावें । कदा एकान्न न सेवावें ।
अनिंद्य विप्रगृहीं मागावें । त्यागावें निंद्य जनांसी ॥

भ. र. ६८. ४३

यावर दिलेल्या वचनाप्रमाणें भिक्षा मागावी. श्रेष्ठांनीं सांगितलेली ही भिक्षा ओली आहे, कोरडी नव्हे. श्रेष्ठ व समर्थ हे दोघे बंधु खरे. पण त्यांच्यांत कसें मतवैचित्र्य आहे तें पाहून असें कां व्हावें, असा प्रश्न उपस्थित होतो. श्रीसमर्थ संप्रदायी गृहस्थाश्रमी भिक्षा मागतात. पण श्रेष्ठांनीं, गृहस्थाश्रम्यानें भिक्षा मागावी, असें कोठेंहि म्हटलेलें आढळत नाहीं. शास्त्रांनीं गृहस्थास भिक्षा मागण्यास प्रत्यवाय नाहीं, असें सांगितलें असतांनासुद्धां 'श्रेष्ठ' त्या बाबतींत कांहींच बोलत नाहींत याचें आश्चर्य वाटतें. विद्वानांनीं या गोष्टीचा अवश्य विचार करावा असें आम्हांस वाटतें. उभयतां बंधूंतील हें मतवैचित्र्य ही एक विचारणीय गोष्ट आहे.

श्री. दुर्गाराम "दासबोधांत भिक्षेच्या समासांत दत्त, गोरक्ष वगैरे भिक्षेची परंपरा सांगितली आहे. पण हे सारे सिद्धान्न मागणारे होते" असें आमचें वाक्य म्हणून देतात. यास आम्ही येवढेंच उत्तर देतों कीं, आम्हीं तसें विधान केलेलें नाहीं. उलट हे संत नेमकी कोणती भिक्षा मागत असत याबद्दल आम्ही संशय प्रगट केला आहे, निश्चित विधान त्याबाबत केलेलें नाहीं.

( ४ ) 'श्रीसमर्थसंप्रदायांत संन्यासाश्रमाचा निषेध आहे, या आमच्या विधानास "हा आक्षेप निराधार आहे, श्रीसंप्रदायांत शास्त्रविहित कोणत्याहि वर्णाचा किंवा आश्रमाचा निषेध नाहीं" असें हे रामदासी लिहितात. पुनः त्यांस विचारावेंसें वाटतें कीं, मग हीं शास्त्राधार नसलेलीं हुर्मुजी वस्त्रें, कुबडी, मेखला इ. आलीं कोठून ? श्री. दुर्गारामांनीं याचें उत्तर देण्याचें आपल्या लेखांत टाळलें आहे.

( ६ ) शास्त्रकार स्त्रियांस पापयोनि समजतात या आमच्या विधानास श्री. दुर्गारामांचें उत्तर असें कीं, "शास्त्रानें स्त्रियांस पापयोनि म्हटलेलें नाहीं." आपल्या या विधानाच्या सिद्ध्यर्थ त्यांनीं जगदुत्पत्ति प्रकरणांत आलेलें मनुस्मृतींतील

१.३२ वचन दिलें आहे. तें अगदीच अप्रस्तुत आहे. श्री. दुर्गाराम यांच्या नित्यपाठांत गीता असेलसें वाटतें. त्यांतील

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपिस्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ९.३२

या श्लोकाकडे त्यांचें दुर्लक्ष झालेलें दिसतें. नाहीं तर ते तसें म्हणतेना ! श्लोकांत ‘ पापयोनि ’ शब्द स्पष्ट आहे. एवढ्यानें त्यांचें समाधान होत नसल्यास व आपलें विधान चुकीचें आहे, असें त्यांस मान्य करवत नसल्यास या श्लोकावरील शांकरभाष्य त्यांनीं पहावें व आपल्या मनाशींच काय तें ठरवावें. श्रीमदाचार्यांचें भाष्य पुढीलप्रमाणें आहे:—

पापयोनयः पापा योनिर्येषां ते पापयोनयः ।
के त इत्याह स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः ... .. ।

याचा अर्थः—“ पापयोनीमध्यें जन्मास येऊन उत्कृष्ट गतीला जाणारे कोण ही शंका येऊं नये म्हणून ‘ स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः ’ असें म्हटलें आहे ” यानें तरी श्री. दुर्गारामांचें समाधान होईल काय ?

श्री. दुर्गाराम यांनीं ज्या ब्रह्मवादिनींचीं नांवें आपल्या बाजूचीं म्हणून दिलीं आहेत, तीं ज्या कालीं स्त्रियांस ब्रह्मज्ञानप्राप्त्यर्थ शास्त्रांचा प्रतिबंध नव्हता त्या कालांतील आहेत, या आमच्या विधानासाठीं त्यानीं शांतिपर्वांतर्गत सुलभा-जनक संवाद प्रकरणीं नीलकंठी टीका पहावी. आमच्यांतील स्त्रियासुद्धां केवढ्या योग्यतेच्या होत्या या मिथ्या अभिमानाच्या समर्थनार्थ हीं ठराविक व अपवादात्मक उदाहरणें सनातनी म्हणविणारे पुढें आणीत असतात. हीं उदाहरणें बाजूला सारल्यास एतत्सदृश दुसरीं कितीशीं उदाहरणें श्री. दुर्गाराम यांस दाखवितां येतील असा आमचा त्यांस प्रश्न आहे. स्त्रिया शूद्रासमान आहेत याबद्दल आमचीं शास्त्रें अट्टाहास करीत. आहेत शूद्रांइतकें त्यांस शास्त्रकारांनीं दूर लोटलें नाहीं याचें कारण त्यांचा स्वार्थीपणा इतकेंच.

श्रेष्ठहि स्त्रियांस ‘ पापयोनि ’ समजत याबद्दल त्यांचे दोन चार उद्गार पुढें देतों:—

स्त्रियां शूद्रांस आचार । पुराणोक्त हा निर्धार । भ. र. ६८.२१
स्त्रियांसि अमंत्रता काळविधि प्रकार । भ. र. ६७.२२
स्त्रिया शूद्र अनुपनीत विधि । ७०.५४
स्त्रीशूद्रासमीप वेद पढे । तो अनुक्रमें नरकीं चढे । भ. र. ७५.९५

आणखी प्रमाणें पाहिजे असल्यास श्री. दुर्गारामांनीं भक्तिरहस्य चाळावें.

वदन्ति केचिद्विद्वांसः स्त्रीणां शूद्रसमानताम् ।

या वचनाकडेहि त्यांनीं लक्ष द्यावें.

श्री. दुर्गाराम यांस आम्ही विचारतों कीं 'पतिरेव गुरुःस्त्रीणाम्' या वचनाविरुद्ध त्यांनीं केलेलें समर्थन जातें, याची वाट ते कशी लावतात ?

श्री. दुर्गारामांनीं आपल्या लेखांत आम्हांस 'सुधारक' म्हटलें आहे; पण आमचा उद्देश एकच तो म्हणजे श्रीसमर्थांच्या प्रत्येक लहानमोठ्या कृतीची व विचारांची योग्य चिकित्सा व्हावी. कारण श्रीसमर्थांच्या प्रत्येक विचारामागें व कृतीमागें कांहीं तरी विशिष्ट हेतु होता, अशी त्यांच्या वाङ्मयावरून प्रस्तुत लेखकाची भावना झालेली आहे. तेव्हां त्याची चर्चा या चिकित्सेच्या युगांत झाल्यास श्रीसमर्थांचें वाङ्मय नव्या रूपांत, अधिक उज्ज्वलतेनें, भविष्यकालीं व सध्यासुद्धां, जनतेस मार्गदर्शक होईल असा दृढ भरंवसा आहे.

अगा ये प्रचीतीचे लोक हो । प्रचित नस्तां अवघा शोक हो ।
रघुनाथकृपेनें राहो । प्रत्यय निश्चयाचा ॥ १०.१९.६८

गेल्या कित्येक वर्षांत श्रीसमर्थांच्या ग्रंथाचें आमच्या शक्त्यनुसार आम्ही परिशीलन केलें आहे, तत्संबंधीं अनेकांच्या लेखांचें वाचन व व्याख्यानादि श्रवण केलीं आहेत, त्यांच्या ग्रंथांतील तत्त्वें समजून घेऊन तीं स्वतःच्या मगदुराप्रमाणें आचरण्यांत आणण्याचा प्रयत्न चालू आहे व त्यांतील पुष्कळ प्रश्नांवर विद्वान् व स्नेही मंडळींशीं चर्चा केली आहे. तरीपण कांहीं शंकांचा परिहार झाला नाहीं. त्याच शंका आम्ही उघडपणें व प्रामाणिकपणें लेखाद्वारें विद्वानांच्या पुढें मांडल्या. यांत स्वाभाविक असें कांहींच नसतांना श्री. दुर्गारामांस आम्हीं "श्रींचीं व्यंगें काढलीं व श्रींवर शिंतोडे उडविले" असें वाटलें. तें त्याचें वाटणें कसें चूक हें आपण पाहूं.

( १ ) **रामदास हें नांवः**—कोणतेंहि काम न्यायासनापुढें आल्यावेळीं त्यासंबंधीच्या लौकिक गोष्टींचाच विचार करणें योग्य असतें. श्रीसमर्थांचें नांव 'रामदास' असें त्यांच्या गुरूनीं—श्रीरामांनीं—ठेविलें हा पुरावा चिकित्सक युगांत उपयोगाचा नाहीं. आम्हीं आमच्या मागील लेखांत श्रीसमर्थांनीं आपणांस 'रामदास' हें नांव स्वतःच ठेवून घेतल्याचें लिहिलें आहे. त्यास 'दासविश्रामधाम'-कारांचा पाठिंबा आहे. श्रींचीं नांवें अनेक असल्याचें ते लिहितात. तेव्हां श्रींनीं शास्त्रनिषिद्ध असें नांव कां धारण केलें ही आमची शंका.

भारतभागवतादि ग्रंथांतील कांहीं नांवें त्यांनीं आमच्या विरुद्ध पुराव्यासाठीं पुढें आणलीं आहेत. ऐतिहासिक कालांतील श्रीभानुदासांचें नांवहि त्यांनीं दिलें

आहे. श्री भानुदासांनीं आपणांस तें नांव स्वतःच ठेवून घेतल्याचें इतिहास सांगत नाहीं. तोच प्रकार भारत-भागवतांतील नामांचा. मातापितरांनीं आपल्या मुलांचें नांव ठेवणें व स्वतः नांव ठेवून घेणें यांत अंतर आहे. शास्त्रनिषिद्ध नांव मुलांचें आई-बापांनीं ठेविल्यास तो दोष नांव ठेवणारांचा आहे, मुलाचा नव्हे, श्रीसमर्थांच्या बाबतींत तसें घडलेलें नाहीं.

श्रीपुरंदरदासप्रभृति कर्नाटकांतील दासकूटांतील संतांचीं नांवें श्री. दुर्गारामांनीं पुरावा म्हणून आम्हांस सादर केलीं आहेत. या कर्नाटकी संतांस श्रीसमर्थांप्रमाणें आपल्या मताप्रमाणें सनातनी बनविणारा श्री. दुर्गारामांचा कोणी समानधर्मा पुढें आल्यास मगच त्याचें उत्तर देऊं. आमच्या मताप्रमाणें हे सर्वच संत पूर्ण नवमतवादी होते. तेव्हां श्री. दुर्गारामांचें म्हणणें फोल आहे.

( २ ) **क्षुद्र शंका**:— आम्ही श्रीसमर्थांस आमचा आदर्श पुरुष ( Hero ) समजतों. तेव्हां त्यांच्या अगदीं लहानसहान गोष्टी सुद्धां आम्हांस कौतुकास्पद वाटतात. त्यांच्या साध्या गोष्टींतहि आम्हांस कांहीं महत्त्वाचा हेतु आहे असें वाटतें. तो काय असावा हें पाहण्यासाठीं तर आमची धडपड. ' The Hero is hero from all points of view. ' म्हणजे आदर्श पुरुष सर्व बाजूंनीं आदर्शभूत असतो अशी आमची दृढ भावना. हीच दृष्टि ' प्रताप ' कारांची आहे. म्हणून आम्हीं त्यांस कौतुकानें श्रीसमर्थांचे ' बॉस्वेल् ' म्हणतों. बॉस्वेलनें डॉ. जॉनसनचें वर्णन केलें आहे, तसेंच गिरिधरांनीं अल्प प्रमाणांत का होईना, श्रींचें ' प्रतापां 'त केलें आहे. श्रीसमर्थ कसे चालत, त्यांचें बोलणें कसें असे, ते काय खात, किती खात, त्यांची दृष्टि ( पहाणें ) कोठें असे, ते निजत केव्हां, किती वेळ निजत, कशावर निजत, विडा खात काय इत्यादि वर वर क्षुद्र दिसणाऱ्या गोष्टींतसुद्धां आम्हांस मोठा अर्थ भरलेला दिसतो. याला अनुसरून आम्ही त्या विभूतीकडे पाहतों. तेव्हां कांहीं ठिकाणीं त्या पुरुषांचें वागणें आम्हांस अगम्य व चमत्कारिक भासतें, त्यामुळें कांहीं शंका उद्भवतात. त्या आम्ही पुढें मांडतों. पण त्या, कांहीं नाजुक प्रकृतीच्या लोकांस, मानवत नाहीं. त्यांस धक्का बसतो. तशी स्थिति श्री. दुर्गारामांची दिसते. म्हणूनच ते आमच्यावर नसते आरोप करून आमच्या शुद्ध हेतूंबद्दल शंका घेऊन त्या क्षुद्र आहेत असें म्हणतात.

( ३ ) **खोटा आरोप**:—याच प्रकरणीं " इतिहासाकडे इतकेंच नव्हे, प्रत्यक्ष व्यवहाराकडेदेखील डोळेझांक " आम्ही करीत आहोंत, असा त्यांचा आमच्यावर आरोप आहे. आम्हांस तर याच्या उलट म्हणावयाचें आहे. श्री. दुर्गारामांसारखे तथाकथित सनातनी श्रीसमर्थांस देश, काल वर्तमान स्थिति पाहून वागणाऱ्या चाणाक्ष संतास – भिन्न परिस्थितींत शेंकडों वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या शास्त्रांप्रमाणें तंतोतंत वागणारा ठरवितात, तेव्हां तेच इतिहासाकडे व व्यवहाराकडे पूर्ण दुर्लक्ष

करीत आहेत असें आम्हांस म्हणावयाचें आहे. 'ऐतिहासिक दृष्टीनें शास्त्रांकडे पहूं या' हीच तर आमची — नवमतवादी सनातन्यांची मुख्य — ओरड व मागणी. आम्ही श्री. दुर्गारामांस एकच प्रश्न नम्रपणें विचारतों कीं, श्रीसमर्थांसारखा चिकित्सक धोरणी पुरुष हजार-पंधराशें वर्षांपूर्वींच्या जुन्या काळांत, कीं ज्या कालीं देशांत एकीएक आर्यसंस्कृतिच नांदत होती, त्या दूरच्या काळांतील शास्त्रें, आपल्या वेळेच्या बदललेल्या काळांत, कीं ज्या काळीं परकीय व सर्वस्वीं भिन्न अशा एका अवैदिक दुष्ट संस्कृतीनें आर्यसंस्कृतीचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा व तिचीं शकलें पाडण्याचा चंग बांधून भगीरथ प्रयत्न चालविला होता, जशींच्या तशींच आचरणांत आणण्यास योग्य होतीं असें समजेल काय? युगऱ्हासानुरूपतः धर्मांत, चालींत, रूढींत व समाजाच्या एकंदर जीवनांत अंतर पडत जातें, हें श्रीसमर्थांस काय माहीत नसेल? श्रीसमर्थांसारखा डोळस पुढारी इतकें अंधानुकरण करील काय? उलट असें डोळस पुढारीपण हेंच तर आमच्या मतें श्रींचें वैशिष्ट्य.

(४) **एक ऐतिहासिक चूकः**— श्रीभानुदासांसंबंधीं लिहितांना एक चूक थोड्याशा अनवधानत्वामुळें श्री. दुर्गारामांकडून घडली गेली आहे. प्रस्तुत प्रकरणीं त्याचा कांहीं संबंध नाहीं खरा. पण ती सुधारली पाहिजे. पंढरपुरच्या श्री पांडुरंगाची मूर्ति विजापुरांत नेली गेली होती, ती पंढरपूरास परत श्रीभानुदासांनीं आणली असें त्यांनीं म्हटलें आहे. तें इतिहासास धरून नाहीं. ती मूर्ति अनागोंदीस—हंपीस—विजयानगरास—नेली गेली होती. विजापुरास नव्हे. येथून विजयानगर—हल्लींची हंपी—दोन अडीचशें कोस दूर आहे. व विजापूर व विजयानगर या नामसादृश्यामुळें हा घोंटाळा झाला.

(५) **एक सूचना** :— श्री. दुर्गारामांस येथें एक सूचना द्यावीशी वाटते कीं, त्यांनीं श्री समर्थांच्या बाबींचा विचार करतेवेळीं वारकरी संत मध्यें न आणल्यास बरें. श्रीसमर्थांच्या संबंधींचीं ते करीत असलेलीं विधानें वारकरी संतांसहि ते लागूं करीत असतील तर मग माझें कांहीं म्हणणें नाहीं. मला ती इष्टापत्तीच आहे. माझा मार्ग ते अशानें बराच सुलभ करीत आहेत.

(६) **हुर्मुजी वस्त्रें** :— श्रीरामआज्ञेनें श्रींनीं धारण केलीं, कुबडी श्रींचें योगमार्गांत जे गुरु श्रीदत्त यांनीं त्यांना दिली, श्रीगुर्वाज्ञेनें— श्रीरामाज्ञेनें— मेखळा त्यांनीं गळ्यांत घातली, असला अलौकिक पुरावा श्री समर्थांस कट्टर सनातनी ठरविण्यास उपयोगाचा नाहीं. ज्या श्लोकांत ह्या गोष्टी वर्णिल्या आहेत ते श्लोक माझ्या दृष्टीसमोर गेलीं कित्येक वर्षें आहेत. त्यांचा मी विचार केला आहे. पण ते श्लोक म्हणजे कांहीं शास्त्र नव्हत. कोणी तरी केलेल्या असल्या श्लोकांच्या आधारें श्रीसमर्थांना सनातनी ठरविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे स्मॉल कॉजेस कोर्टाच्या निवाड्यानें हायकोर्टाचा निर्णय फिरविण्यासारखें हास्यास्पद होय!

शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें विद्यास्नातक श्रीसमर्थ होते. त्यांचा वेषसुद्धां त्यांत सांगितल्याप्रमाणें होता, हें सिद्ध करण्यासाठीं 'धारयेद्-वैणवीं यष्टिम्' इ. श्लोक ते आधार म्हणून देतात. यावर आम्ही त्यांस विचारतों कीं, स्नातकानें शुभ्रच वस्त्रें धारण करावींत (हुर्मुजी नव्हेत), तीं दोनच असावींत (मेखला नव्हे), जटा व दाढी राखूं नयेत इ. जें म्हटलें आहे त्या प्रमाणें श्रीचें वागणें होतें काय? 'वैणवीं धारयेद् यष्टिं' हा आपणांस अनुकूल वाटलेला (पण तो तसा नाहीं) श्लोक मात्र घ्यावयाचा व त्यानें श्रींस कट्टर सनातनी ठरविण्याचा प्रयत्न करावयाचा व आम्ही मात्र 'शुक्लाम्बरधरो नीचकेशश्मश्रुनखः शुचिः' ह्या श्लोकाप्रमाणें श्रींचें वर्तन नसल्याचा प्रश्न विचारल्याबरोबर आमच्यावर आरोप करण्यास प्रवृत्त व्हावयाचें हें योग्य नव्हे.

काषाय वस्त्र, त्यागाचें निदर्शक असल्याचें शास्त्रानें ठरविलें असेल व आहेहि. पण हुर्मुजी वस्त्र किंवा रंग त्यागनिदर्शक असल्याचें कोणत्या शास्त्रांत आहे? यास आधार काय? श्रीसमर्थांनीं त्या रंगास सनाथ करण्यापूर्वी तो त्यागाचा दर्शक म्हणून दुसऱ्या कोणी सनातन्यानें अस्तित्वांत आणल्याचें सनातनी शास्त्रकार सांगतात काय?

(७) **संन्यासनिषेध** :—संन्यासाश्रमाचा निषेध श्रीसंप्रदायांत नसतां तर वर उल्लेखिलेलीं बाह्यचिन्हें—कुबडी, मेखला, हुर्मुजी वस्त्रें, दाढी जटा इ. श्रीसंप्रदायांत आलीं कशीं? संन्यास संप्रदायाची आवश्यकता भासली नाहीं म्हणून ना? ही आवश्यकता भासली असती तर इतर संप्रदायांप्रमाणें, श्रीसमर्थांनीं आपणांस संन्यासी सांप्रदायाच्या चार संप्रदायांपैकीं कोणत्या तरी एखाद्या संप्रदायाचें म्हणवून घेतलें असतें. श्री ज्ञानेश्वर आपणांस 'प्रकाश' संप्रदायी म्हणवीत, श्री तुकाराम आपणांस 'चैतन्य' संप्रदायी म्हणवीत इ. माहिती; श्री. दुर्गारामांनीं ज्या लेखांतून (सां. वि. वि. भा. १ ला, ले. ३७) 'काषायांबर नग्न तें श्रुति मतें' इ. श्लोक उद्धृत केला आहे त्यांत राजवाड्यांनीं सविस्तर प्रतिपादिलेलें त्यांनीं पाहिलें आहे. त्या लेखांतून ध्वन्यर्थ काय निघतो? श्री संप्रदायांत संन्यासाश्रमाचा निषेध आहे किंवा स्वीकार आहे; हें श्री. दुर्गारामांनींच आपल्याशीं ठरवावें. श्रीसमर्थांचें यांत त्यांना आचार व विचारस्वातंत्र्य दिसत नाहीं काय?

आपल्या पहिल्या लेखांत एके ठिकाणीं श्री. दुर्गारामांनीं 'श्रीसमर्थ-संप्रदायांत संन्यासाचा निषेध आहे' या आमच्या विधानास 'नाहीं' असें उत्तर देतांना "संन्यासी म्हणजे शडन्यासी। विचारवंत सर्व सन्यासी। दा. १५. १०" असें जें वचन दिलें आहे, तें चाललेल्या प्रकरणास धरून आहे काय? वाद चालला आहे बाह्य चिन्हांबद्दल—कुबडी, मेखला इ. बद्दल व हें उत्तर देत आहेत मानसशास्त्राच्या दृष्टीनें शास्त्रीय वादाची ही पद्धति नव्हे.

त्याग व निःस्पृहता हे कोणत्याहि संत संप्रदायाचे मुख्य गुण असलेच पाहिजेत. पण याच दोन गुणांत श्रीसंप्रदायाचें वैशिष्ट्य नाहीं. श्रीसंप्रदाय इतर संप्रदायापेक्षां विशेष उठून दिसतो ( हल्लीं नव्हे हो ! हल्लीं सर्वच संप्रदाय एकाच पातळीवर आले आहेत. ) तो त्याच्या सावधानता– प्रपंच व परमार्थ या दोनहि बाबतींत– या गुणामुळें. पारमार्थिक गोष्टींस अवश्य असलेली सावधानता एकजात सर्वच महाराष्ट्रीय संतांनीं कंठरवाने सांगितली आहे. पण प्रापंचिक देशकालवर्तमान-सावधानतेबद्दल श्री समर्थांनीं जसें खडखडून सांगितलें आहे, तसें इतरांनीं सांगितलेलें नाहीं व सांगितलें आहे तें अगदीं अल्प व वळणावळणांनीं. हेंच आमच्या मतें श्रींचें वैशिष्ट्य. राजकारणाशिवाय केलेली इतर धडपड-प्रपंच, तो प्रपंचच नव्हे असें श्रीसमर्थांनीं अगदीं ठासून सांगितलें आहे.

( ८ ) **ब्राह्मणेतर संतांची महंती**:—जरी ज्ञान जालें जनीं नीच याती । तरी तो नव्हे वंद्य कांहीं महंती ॥ करुणाष्टकें १३४.८७, या श्रीसमर्थवचनाविरुद्ध म्हणून आम्ही 'दासविश्रामधाम'कारांस साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत आमच्या-वतीचे साक्षीदार म्हणून उभे केलें होतें व त्यांच्या तोंडून कृष्णाप्पा न्हाव्यांची गोष्ट वदविली होती, पण ती सत्यकथा नसून आख्यायिका असावी असा श्री. दुर्गारामांचा अभिप्राय पडला व त्यांनीं 'धाम'कारांस बिनभरंवशाचा अतएव अविश्वसनीय साक्षीदार ठरविला व "श्रीसमर्थांच्या मताविरुद्ध इतरांचीं म्हणजे त्यांच्या अनुयायांचींच का होईनात मतें असल्यास तीं ग्राह्य नाहींत," असा शेरा हि पण त्यांनीं ठोकला आहे. 'दासविश्रामधाम'कारांस श्रीसंप्रदायांत श्रीसमर्थांचे अवतार मानण्यांत येतें. या गोष्टीवर आमचा विश्वास असो वा नसो त्यांचें महत्त्व किती समजण्यांत येतें येवढेंच दाखविण्याकरितां या आख्यायिकेचा येथें उल्लेख आम्ही केला आहे. दासविश्रामधामास पू. नानासाहेब 'एनसायक्लोपीडिआ रामदासिका' असें मोठ्या अभिमानानें व कौतुकानें संबोधितात.

( ९ ) **ब्राह्मणेतर सर्व शूद्र**:—'तया ब्राह्मण देहास पाहो । अधिकार वेदीं ॥ दा. १०.२.१७, या वाक्याधारें ब्राह्मणेतर सर्व शूद्र आहेत असें श्रीसमर्थांचें मत असावें अशी आमची शंका आपल्या लेखांत आम्ही मांडली होती. श्री. दुर्गारामांस तसें वाटत नाहीं. त्यांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, "ब्राह्मणांस वेदाधिकार आहे असें म्हटल्यानें इतर द्विजांस तो नाहीं असें म्हटल्याचें ठरत नाहीं." मराठी भाषेचें आमचें जें अल्प ज्ञान आहे, त्याप्रमाणें आम्ही वरील वाक्याचा अर्थ केला. श्रीसमर्थांच्या वरील वाक्याचा सरळ अर्थ काय होतो, तो आपल्याशीं ठरवून व ऐतिहासिक दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहून मगच दिशाभूल व शब्दच्छल कोणी केला आहे तें ठरवावें.

ऐतिहासिक दृष्टीनें या प्रश्नाकडे वाचकांनीं पहावें असें मुद्दामच आम्हीं वर म्हटलें आहे. पंडितवर्य गागाभट्टांकरवीं श्रीशिवछत्रपतींस वेदमन्त्रांनीं राज्याभिषेक

झाल्याचा आम्ही उल्लेख यापूर्वी ठिकठिकाणी लेखांत केला आहे. तो केवळ 'तया ब्राह्मण देहास पाहो । अधिकार वेदीं ॥' या वचनान्वयें आमच्या मतें श्री ब्राह्मणेतरांस शूद्र लेखतात, असें असून राज्याभिषेक प्रसंगीं गागांकरवीं वेदोक्त मंत्रांनीं तें कार्य करवितात या दोन कृतींत विसंवादित्व कां दिसतें ह्या आमच्या शंकेस्तव. आमचें हें शंकास्त्रच घेऊन तें आमच्यावर उलटविण्याचा प्रयत्न श्री. दुर्गाराम करीत आहेत. पण तो त्यांचा प्रयत्न साधत नाहीं. त्यांस म्हणावयाचें आहे कीं, ब्राह्मणेतर द्विजांस श्रींच्या मतें वेदाधिकार होता म्हणून आमचें मत– श्रीसमर्थ सर्व ब्राह्मणेतरांस शूद्र समजतात हें– चूक. पण हें ऐतिहासिक दृष्टीनें चूक आहे. 'भोंसल्यांचें क्षत्रियत्व' सां. विं. वि. ले. ३४ या लेखांत राजवाड्यांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. राजवाड्यांनींहि त्रैवर्णिकांस वेदाधिकार ( विशिष्ट बाबतींत तरी ) होता असें त्या लेखांत प्रतिपादलें आहे. श्री. दुर्गाराम हि आपल्या लेखांत द्विज असा शब्द वापरतात. ( पण राजवाडे व श्री. दुर्गाराम हें विसरतात कीं सनातनीमतें कलीमध्यें केवळ दोनच वर्ग शिल्लक आहेत :– ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्या शूद्रवर्णास्त्रयो द्विजाः । युगे युगे स्थिताः सर्वे, कलावाद्यंतयोः स्थितिः ॥ तेव्हां ब्राह्मणेतर द्विज यांनीं आणले कोठून ? इतिहास याची साक्ष देत नाहीं. राजवाड्यांनीं प्रतिपादिलेले ब्राह्मणेतर द्विजाचें विशिष्ट वेदाधिकार गेल्या साडेतीनशें वर्षांत रामदासी संप्रदायांतील ब्राह्मणेतर द्विजांत चालू असल्याचें दिसत नाहीं. राजवाडे ( ले. ३४ ) म्हणतात कीं रामदासी संप्रदायांत त्रैवर्णिकच असत, इतर नसत. येथें शंका अशी येते कीं, ब्राह्मणेतर द्विज ओळखण्याचें त्या कालीं कांहीं गमक होतें काय ? सध्यां जसें अमुक माणूस मराठा क्षत्रिय किंवा मराठा कुणबी असें निश्चित सांगणें कठीण आहे तोच प्रकार शिवकालीन होता, तेव्हां शिवकालीं रामदासी संप्रदायांत शास्त्रांच्या व्याख्येप्रमाणें असणारे द्विज होते व त्यांस मर्यादित का होईनात पण कांहीं वेदाधिकार होते व ते सांप्रदायिक शिष्य व इतरहि बाहेरचे उपयोगीत होते असें इतिहास सांगत नाहीं. बाळाजी आबाजी प्रभू श्रीसांप्रदायिक होते, तेव्हां राजवाड्यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांस त्यांनीं ठरविलेला वेदाधिकार असणारच. परंतु त्यांच्याच घराण्यांतील एका मुलाच्या मुंजीच्या बाबत केवढें रण माजलें होतें तें इतिहासज्ञांस माहीत आहेच. तेव्हां ब्राह्मणेतर द्विजांस कांहीं अधिकार होता हें राजवाड्यांचें म्हणणें बरोबर नाहीं व तो तसा कांहीं घराण्यांत चालत आलेला दिसून येत नाहीं. प्रत्यक्ष छत्रपतींच्या घराण्यांत तो चालत आलेला दिसत नाहीं. तसें असतें तर कोल्हापूरचें वेदोक्त प्रकरण माजलेंच नसतें. शिवछत्रपतींचा वेदोक्त मंत्रांनीं राज्याभिषेक ही केवळ अपवादात्मक घटना होती. तिच्या पाठीमागें प्रचंड राजकारण शिजत होतें. म्हणून श्रीसमर्थांनीं तें घडवून आणलें ही गोष्ट खरी. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, श्रीसमर्थमतें ब्राह्मणेतर ( शूद्र वगळून ) द्विज होते. तेव्हां 'तया ब्राह्मण देहास

पाहो । अधिकार वेदीं ' या श्रीवचनान्वयें सर्व ब्राह्मणेतर शूद्रच असावेत असें ठरतें.

राजवाड्यांनीं सां, वि. वि. भा. १ ले., ४४ यांत असें प्रतिपादन केलें आहे. कीं, श्रीसंप्रदायांत एकहि विधर्मी नाहीं. "समर्थांच्या रामोपासनेंत असल्या विधर्म्यांचा गंधहि नाहीं." पण हेंहि म्हणणें चूक आहे. सां. वि. वि. भाग १ ला, लेखांक ५० यांत श्री कल्याण स्वामींच्या महंतांची जी यादी प्रसिद्ध झालेली आहे तींत ४२ वे महंत वली महमद नांदणजकर यांचें नांव आहे. तेव्हां त्यांनीं जें प्रतिपादन केलें आहे कीं, श्रीसंप्रदायांत केवळ त्रैवर्णिकच असत व त्यांस वेदोक्त कांहीं अधिकार असत हें सर्व प्रतिपादन लंगडें पडतें. राजवाड्यांचें प्रतिपादन गृहीत धरल्यास कशी आपत्ति ओढवते हें वरील प्रतिपादनावरून वाचकांच्या ध्यानीं आलें असेंलच.

श्री. दुर्गारामांनीं "ब्राह्मणांस वेदाधिकार आहे असें म्हटल्यानें इतर द्विजांस तो नाहीं असें म्हटल्याचें ठरत नाहीं" या वाक्यानें आपणांवर केवढी जबाबदारी ओढवून घेतली आहे याची त्यांस जाणीव आहे काय? सनातनी म्हणवून घेणाऱ्या त्यांच्या इतर समानधर्मीयांस हें त्यांचें मत मान्य आहे काय? ब्राह्मणांप्रमाणेंच इतरांस निदान दोन वर्णांस (हल्लीं हे दोन वर्ण त्यांच्या मतें शिल्लक असल्यास) वेदाध्ययनाचा अधिकार आहे असें त्यांचें प्रामाणिक मत असल्यास व त्याप्रमाणें तें वागण्यास सिद्ध असल्यास मी माझी बहुतेक सर्व विधानें मागें घेण्यास सिद्ध आहे हें त्यांनीं ध्यानीं धरावें. वरीलप्रमाणें विधान केल्यानें वैदिककालाच्या पद्धतीचे अनुयायी ते ठरत आहेत. पण आमच्या समजुतीनें अशा करण्यानें ते ' दोष आपण होऊनच आपल्या माथीं घेत आहेत. कसें तें पहा. उपनिषदांकडे पाहिल्यास ब्रह्मविद्येचा उपदेश करण्यास पुष्कळ वेळां क्षत्रियच ब्राह्मणांचे गुरु झालेले आहेत असें त्यांस दिसून येईल. परंतु आपल्या दुसऱ्या लेखांत श्री. दुर्गाराम सर्व लोकांचे गुरु होण्यास ब्राह्मणच योग्य असें म्हणत आहेत, त्यांची वाट कशी लावावयाची? ब्राह्मणांनीं इतर वर्णांतील योग्य पुरुष पाहून त्यांस अनुग्रह द्यावा व त्यांच्याकडून तज्जातीयांस देववावा इत्यादि जें त्यांनीं लिहिलें आहे तें कशाला? आमच्या पहिल्या लेखांतील आमची शंका अशी कीं, ब्राह्मणेतर हा ब्राह्मणाचा गुरु—पारमार्थिक गुरु—होऊं शकतच नाहीं असें श्रीसमर्थमतहि दिसतें. तिचें उत्तर आपल्या दुसऱ्या लेखांत श्री. दुर्गाराम देतात कीं, ब्राह्मणांकडून उपदेश घेऊन ब्राह्मणेतरांनीं आपापल्या जातीमध्यें महंती करावी, यांस शास्त्राधार आहे व तो आधार आगम व तंत्र-ग्रंथ यांत आहे असें ते प्रतिपादित आहेत. याच्या उलट वेदाधिकार ब्राह्मणेतर द्विजास आहे असें ते म्हणत आहेत. सर्वांस, निदान त्रैवर्णिकांस वेदाधिकार होता त्या वेळीं, अमक्यानें अमक्याकडूनच ब्रह्मविद्येचा उपदेश घ्यावा असा कडक निर्बन्ध व उच्चनीच भाव आधुनिक किंवा ऐतिहासिक कालाप्रमाणें नव्हता.

ऐकिलीहि नसेल ! श्रेष्ठ म्हणतात कीं, क्वचित् एखाद्या जितेंद्रिय साधु पुरुषानें ' अनाथ व विरक्त विधवा स्त्रीला रामभजनाच्या मार्गाला लावलेंच तर श्रीराम क्षमा करतो ! रामभजनानें गतभर्तृका तरल्याचें पुराणांतरी आम्ही ऐकतों, पण सभर्तृका स्त्रिया आणि त्याहि पतिसेवेखेरीज अन्य मार्गानें तरल्या असें कोठेंच ऐकिलें नाहीं. तात्पर्य, परस्त्रीला उददेश करूं नये. ' यापुढें श्री. पांगारकरांनीं " सांडूनि पति ईश्वरु । आणिक महानुभाव करी गुरु । " तिला मुक्तेश्वरांनीं सौरी म्हटल्याचें वचन दिलें आहे. ( म. वा. इतिहास, भा. २. पा. २११ )

श्रीसमर्थ संप्रदायांत शेंकडों नव्हेत तर हजारों स्त्रिया होत्या असें वर्णन गिरिधरांनीं ' प्रतापां ' त केलें आहे. ' सहस्रावधि चालती वधुजनें । ' ( प्र. २०.२९ ) यांत सुवासिनी आहेत विधवाहि आहेत. वाचकांनीं तीं ( वधुजनें ) श्रीसमर्थचरित्रांत पहावीत.

( ११ ) **स्त्रियांची महंती**:—आतां स्त्रियांची महंती, म्हणजे स्त्री-पुरुषांस अध्यात्माचा उपदेश करून त्यांचे गुरु व्हावें किंवा नाहीं, याबद्दल लिहूं. इतरांस ज्ञानोपदेश करून गुरु होण्याचा अधिकार स्मृति ग्रंथांत दिसून येत नाहीं. श्रीसमर्थांनीं तसा अधिकार आपल्या स्त्रीमहंतांस कसा दिला ? हें शास्त्रविहित आहे काय ? ही आमची शंका. तंत्रागमग्रंथाधारें श्री. दुर्गाराम, तो देतां येतो असें " सद्गुरु हे त्या त्या जातींतील श्रेष्ठ अशांना पाहूनच त्यांवर अनुग्रह करितात, तसेंच, त्यांस अनुज्ञा देऊन त्यांकडून इतर तज्जातीयांना दीक्षा देववितात अथवा स्वतःहि देतात ", एका आगमोक्त श्लोकाधारें म्हणतात. पण या श्लोकांत एक गोष्ट स्पष्ट नाहीं, ती ही कीं, ' तत्तज्जातीय ' याचा अर्थ स्त्रियांनीं स्त्रियांनाच केवळ उपदेश द्यावा किंवा आपल्या जातींतील पुरुषांनासुद्धां, ही गोष्ट स्पष्टपणें कळत नाहीं. हें झालें श्री. दुर्गारामांचें मत. आतां मन्वादि अष्टादश स्मृतींचें अध्ययन झालेले श्रेष्ठ या-संबंधीं आपल्या सुगमोपायाच्या दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभीं पुढील ओवीनें " स्त्रिया आणि हीन वर्ण । तेथें गुरुत्व चि नाहीं ॥ " असा आपला स्पष्ट अभिप्राय देतात.

स्त्रियांना कोणाचेहि गुरु होतां येतें हें सिद्ध करण्यासाठी श्री. दुर्गारामांनीं अध्यात्मरामायणांतील ' रामहृदयां ' तील श्लोक उद्धृत केले आहेत व त्यांत श्रीसीतादेवींनीं श्रीमारुतिरायांस उपदेश केल्याचें ते सांगत आहेत. उपदेश श्रीसीतादेवींनीं केला असेल, आम्हीं नाहीं कोठें म्हणतों. पण तो पारमार्थिक गुरुशिष्य या नात्यानें केला आहे काय ? श्रीमारुतिरायांचे गुरु श्रीरामचन्द्र असें संप्रदायांत प्रसिद्ध आहे ना ? कां श्रीसीतादेवी ?

' स्त्रियांसुद्धां गुरु होऊं शकतात ' या श्री. दुर्गादासांच्या विधानाच्या पाठीराखीसाठीं उदाहरण धुंडण्यास त्यांस कलियुग सोडून पुराकल्पांत उड्डाण मारावें लागलें आहे. त्यांनीं कलियुगांतील ऐतिहासिक कालांतील एक तरी उदाहरण

( स्त्री ही गुरु असल्याचें ) सनातनी समजल्या गेलेल्या संप्रदायांतील यासंबंधींचें दाखवावें. 'आहुरप्युत्तमस्त्रीणामधिकारं तु वैदिके' या वचनानुसार स्त्रियांस वेदविद्येचा अधिकार दिला गेल्याचीं कितीशीं उदाहरणें त्यांस कलियुगांत आढळलीं बरें ? भगवान् श्रीकृष्णानंतर श्रीसमर्थांशिवाय स्त्रियांच्या उद्धाराचें हें असलें अचाट कृत्य दुसरें कोणी केलें ? श्रीसमर्थांनीं समाजांत ही अभूतपूर्व सुधारणा केली व ती समाजाच्या गळीं उतरविली. स्वामी विवेकानन्दांनीं हिन्दुस्थानांतील दोन अनिष्ट गोष्टींचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:—

In India, there are two great evils. Trampling on the women and grinding the poor through caste-restrictions.

स्त्रियांस पायांखालीं तुडविणें व गरीब जातिनिर्बंधाखालीं भरडलें जाणें अशीच स्थिति श्रीसमर्थकालीं भारतांत दिसत होती. त्यांनीं ती सुधारण्याचा विश्वप्रयत्न केला. म्हणूनच आम्ही म्हणतों कीं, श्रींनीं कलीचें कृतयुग केलें.

( १२ ) **स्त्रियांचें पापयोनित्व**:—शास्त्रकारांनीं स्त्रियांस 'पापयोनि' म्हटलें असें आम्हीं गीतेच्या व त्यावरील शांकर भाष्याच्या आधारें आमच्या लेखांत पूर्वी सिद्ध केलें आहे. श्री. दुर्गारामांचें मत असें कीं, स्त्रियांचें पापयोनित्व शास्त्रसंमत नाहीं. भाष्यकार श्रीशंकराचार्यांचा अर्थ श्रुतींस विरुद्ध जातो अतएव तो चूक आहे व आपण केलेला अर्थ बरोबर आहे. तसेंच आपल्या अर्थाप्रमाणेंच श्री ज्ञानेश्वर, श्री रमावल्लभदास, वामन पंडित, तसेंच आधुनिकांपैकीं लो. टिळक, पं. सातवळेकरप्रभृतींनींहि अर्थ केला आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. तेव्हां त्यांचा अर्थ व त्यांनीं केलेलीं विधानें शास्त्र, युक्ति व सत्य यांस कितपत धरून आहेत हें पहावयाचें आहे. ज्या श्लोकांत तो 'पापयोनि' शब्द आला आहे त्याचा श्री. दुर्गारामांचा अर्थ असा:— हे अर्जुना ! जे कोणी पापयोनि म्हणजे श्वान, सूकर, चांडाल वगैरे योनि असतील, तसेंच स्त्रिया, वैश्य व शूद्र तेहि माझ्या आश्रयानें उत्तम गतीतें पावतात.

श्रीमदाचार्यांनीं 'पापयोनयः' हें पद स्त्रियोवैश्याः इ. चें विशेषण घेतलें आहे, तर श्री. दुर्गाराम तें विशेष्य व स्वतन्त्र घेऊन कुत्रीं, डुक्कर व चाण्डाळ असा त्याचा अर्थ घेतात व त्यास 'तद्य इह रमणीयचरणा अभ्याशोह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन् ब्राह्मण योनिं वा, क्षत्रिय योनिं वा वैश्य योनि वा, अथ य इह कपूयचरणाः अभ्याशोह यत्ते कपूय योनिमापद्येरन् श्वयोनिं वा, चांडालयोनिं वा ॥' छां. ५.१०.७ ॥ या श्रुतीचा आधार आहे अशी कल्पना करतात. पुण्याचरणानें पुण्ययोनि पापाचरणानें पापयोनि प्राप्त होते असें सांगितलें आहे. तेव्हां उत्कृष्टत्व पुण्यमूलक असून निकृष्टत्व पापमूलक होय. अशा दृष्टीनें पाहिल्यास ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या अपेक्षेनें स्त्रियादिकांची गणना पापयोनींत केली जाणें यांत कांहींच

दोष नाहीं. (श्रीसमर्थांच्या 'जरी ज्ञान जालें जनीं नीच याती' या ओळींत हाच अर्थ अभिप्रेत आहे). प्राक्तनकर्म व उपनयनादींचा अभाव हींच स्त्रियादिकांच्या पापयोनित्वाचीं कारणें होत. म्हणूनच 'पापयोनयः' या पदाचा संबंध 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' या पदांकडे आचार्यांनीं लावून दाखविला आहे व तो तसाच असणें योग्य आहे. श्री. दुर्गाराम यांनीं 'पापयोनिः' पदाचा अर्थ श्वान-सूकरादि केला आहे. पण तो चुकीचा आहे. कारण 'पापयोनयः' ह्या पदाचा संबंध स्त्रियांदिकांकडे नसून चांडाळ अथवा पशु इत्यादिकडे असा असेल तर स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' हा चरणच व्यर्थ होऊं लागेल. कारण, पापयोनीमध्यें जन्मास आलेले पशुप्रभृति प्राणीहि जर माझ्या आश्रयानें उत्कृष्ट गतीला जातात तर पुण्ययोनीमध्यें जन्माला आलेल्या ब्राह्मणादिकांची गोष्ट कशाला पाहिजे इतकें म्हटल्यानेंच निर्वाह होत आहे. 'स्त्रियो वैश्यास्तथाशूद्राः' या चरणाची आवश्यकताच नाहीं. तेव्हां श्लोकपादवैय्यर्थ हा दोष या ठिकाणीं येत असल्यानें श्री. दुर्गारामांचा अर्थ ग्राह्य धरतां येत नाहीं. व्याकरणदृष्ट्याहि त्यांचा अर्थ दुष्ट आहे. कसा तो पहा. 'ये पापयोनयः तेऽपि परांगतिं यान्ति किं पुनः पुण्याः ब्राह्मणाः च भक्ताः राजर्षयः' म्हणजे जे पापयोनि ते परागतीला जातात. मग पुण्यवान् ब्राह्मण व भक्त क्षत्रिय याविषयीं काय सांगावें! इतका अर्थ स्पष्ट असल्यावर पापयोनि कोण हें उघड होतें, शिवाय यत् व तत् या सर्वनामांचा नित्य संबंध असतो. तेव्हां 'ये' पदाचें स्पष्टीकरण 'स्त्रियो वैश्यास्तथाशूद्राः' या शब्दांनीं केलें आहे. असा सरळ अर्थ असून अर्थास पोषक प्रमाण आश्वमेधिक पर्वांत आहे. त्यांत वरील श्लोक अगदीं थोड्या शब्द फरकानें आला आहे. त्यांत 'पापयोनिः' कोण हें स्पष्टच सांगितलें आहे.

आणखी एक अडचण अशी कीं, भगवद्भक्तीच्या प्रभावामुळें कुत्रीं, डुकरें इ. पशुहि उत्कृष्ट गतीला जातात या प्रतिपादितात उत्कृष्ट भक्तीचें ज्ञान श्वानशूकरादिकांना आहे असें श्री. दुर्गाराम गृहीत धरीत आहेत. आणि असें जर असेल तर नरजन्माचे इतके पोवाडे गाण्याचें कारण ब्रह्मवेत्त्यांना कां पडलें? श्री. दुर्गारामांच्या डोळ्यांपुढें ग्रंथराजाचा १.१० हा समास आहे ना? त्यांत श्रीसमर्थांनीं नरदेहाच्या अपूर्वतेस धन्यवाद देऊन 'वरकड देहे (पशुपक्ष्यादि) कावाड। नरदेहे मोठें घबाड।' असें म्हटलें आहे ना! भगवान् मनूंनाहि 'भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठाः' इ. लिहिण्याचें कारण तरी काय होतें? श्रीसमर्थांनीं तरी 'पशुदेहीं नाहीं गति। ऐसें सर्वत्र बोलती।' दा. १०.२१ हें तरी कशाला लिहिलें? याचा विचार श्री. दुर्गारामांनीं करावयास नको काय? पशुपक्ष्यांस विचार करून साधन-भक्ति करण्याचें सामर्थ्य असतें तर श्रीभगवंतांनीं 'मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये' या ऐवजीं 'प्राणिनां हि सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये' असें म्हटलें असतें.

सारासार विचार करण्याची शक्ति व पात्रता हाच नरदेहाचा विशेष. तें सामर्थ्य तिर्यग्योनीमध्यें नाहीं. म्हणून तर पुरुषार्थ साधून देणाऱ्या या नरदेहाला 'दुर्लभं मानुषं जन्म। किंवा दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभङ्गुरः।' अथवा श्री समर्थांनीं ग्रंथराजांत उद्धृत केलेलें नृदेहमाद्यं सुलभंसुदुर्लभम् इ. वचन तसेंच लब्ध्वा सुदुर्लभमिदंबहुसंभवान्ते। मानुष्यमर्थदमनित्यपीह धीरः॥ इ. वाक्यांनीं भागवतकारांनीं गौरविलें आहे, तें यथार्थच आहे. महाभारतकारांनीं तर भागवत-कारांच्या पुढें जाऊन ओव्हर बाउंडरीच मारली आहे. श्रुतीचा आधार देऊन 'पापयोनिः' म्हणून श्री. दुर्गारामांनीं ज्या चाण्डाल योनीचा उल्लेख केला आहे, त्या योनीमध्यें सुद्धां जन्म घेणें बरें, पण मानुष्य मिळालें पाहिजे, असा महाभारतकारांचा अभिप्राय आहेः—'चण्डालत्वेऽपि मानुष्यं सर्वथा तात शोभनम् १२.२७.३१' यावर कदाचित् श्री. दुर्गाराम श्री समर्थांचीं 'अहिल्या शिळा राघवें मुक्त केलीं।' अथवा 'नामें पाषाण तरले।' असलीं वाक्यें आमच्या वरील प्रतिपादनास विरुद्ध जातात म्हणून पुढें आणतील. पण ते असलें साहस करणार नाहींत असें वाटतें. ते जाडे संस्कृतज्ञ आहेत. तेव्हां शास्त्रीय प्रणालीप्रमाणें असल्या वाक्यांचा अर्थ काय करावयाचा हें ते जाणतातच अशी खात्री आहे.

वरील विवेचनावरून श्री. दुर्गारामांचा 'मा हि पार्थ' इ. श्लोकांचा अर्थ कसा चूक आहे व भाष्यकारच कसे बरोबर आहेत. तसेंच स्त्रियांचें 'पापयोनित्व' हें त्यांच्या प्राक्तनामुळें अनुपनीतत्वमूलक वेदाभ्यासाच्या अनधिकारत्वामुळें प्राप्त झालेलें आहे, हेंहि वाचकांच्या लक्षांत येईल.

यावर अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, स्त्रिया 'पापयोनि' आहेत हें मान्य. पण मग त्यांच्या जोडीला त्याच श्लोकांत वैश्य कां बसविले गेले! वैश्य त्रैवर्णिकांपैकीं असल्यानें ते ब्रह्मविद्येचे अधिकारी आहेत ना? अशी शंका प्रतिपक्षीयांकडून येणें अगदीं संभवनीय आहे. यास उत्तर श्री. दुर्गारामांनीं उद्धृत केलेल्या श्लोकार्धांतच आहे. 'आहुरप्युत्तमस्त्रीणामधिकारं तु वैदिके' हा तो श्लोकार्ध होय. याचा अर्थ 'श्रेष्ठ स्त्रियांस प्राचीन काळीं वेदाधिकार होता' असा आहे. पद्मपुराणांत हि हाच श्लोक आलेला आहे. वृद्ध मनूचें म्हणून एतत्संबंधीं पुढील वचन आढळतेंः—

पुरा कल्पे तु नारीणां मौञ्जीबंधनमिष्यते। म्हणजे 'पूर्वीच्या युगांत स्त्रियांचे मौञ्जीबंधनादि संस्कार असत.' यांत वरील वेदाधिकार स्त्रियांस सरास होता असें म्हटलें आहे. हारीतांचें मत स्त्रियांस सरसकट वेदाधिकार—मौञ्जीबंधन, होमहवन, वेदाध्ययन इत्यादि—होता असें आहेः—'द्विविधाः स्त्रियो ब्रह्मवादिन्यः सद्योवध्वश्च। तत्र ब्रह्मवादिनीनामुपनयनमग्नीन्धनं वेदाध्ययनं स्वगृहे भिक्षाचर्येति। सद्योवधूनां तूपस्थिते विवाहे कथंचिदुपनयनमात्रं कृत्वा विवाहः कार्यः।' या सर्व

वचनांचें तात्पर्य हें कीं, स्त्रियांससुद्धां त्रैवर्णिकांप्रमाणे वेदविद्यांचें अध्ययन करितां येत होतें. पण हा त्यांचा अधिकार गीताकाळीं किंवा तत्पूर्वीं हिरावून घेण्यांत आला असावा. तसा च तो गीताकाळीं वैश्यांचाहि काढून घेण्यांत आला असला पाहिजे, हें गीतेच्या 'मां हि पार्थ' इ. श्लोकांवरून स्पष्ट आहे. म्हणूनच स्त्रियांबरोबर त्यांनाहि ब्राह्मणक्षत्रियांच्या सापेक्षतेनें 'पापयोनि' गणलें गेलें असलें पाहिजे हें उघड सिद्ध होत आहे. आमच्या या मतासारखेंच कै. गीतावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे यांचेंहि मत आहे.

शूद्रांनाहि एके काळीं ब्रह्मविद्येचा अधिकार होता याबद्दलचीं वचनें श्रुतिस्मृतींत सांपडतात. 'चाण्डालयोनी' चा अर्थ, आमचे एका कालीं विश्वविद्यालयांतील संस्कृतचे अध्यापक पूज्य श्री महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांनीं आपल्या 'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ' या पुस्तकाच्या पांचव्या प्रकरणांत दिला आहे.

आतांपर्यंत 'पापयोनयः' हें पद विशेषण धरावें कीं विशेष्य धरल्यास तें कसें चूक आहे व त्याचा अर्थ श्वानशूकरादि केल्यास अर्थाचा अनर्थ कसा होतो याचें विवरण झालें. आतां श्री. दुर्गारामांनीं 'पापयोनयः' या पदाच्या आपल्या अर्थाच्या पुष्टीकरणासाठीं श्रीज्ञानेश्वरादि ऐतिहासिक कालांतील टीकाकार व लो. टिळकादि आधुनिक काळांतील टीकाकार, यांचा जो हवाला दिला आहे, त्याचा परामर्श घेऊं. 'पापयोनयः' या पदाचा अर्थ त्यांच्यासारखा सर्वस्वी मधुसूदन-सरस्वती, श्रीधरस्वामी यांनीं केला आहे. श्रीज्ञानेश्वर, रमावल्लभ हे 'पापयोनीं'त पशुपक्ष्यादिकांची तशीच स्त्रियादिकांची गणना करतात. लोकमान्य इ. 'पापयोनयः' हें स्वतन्त्र विशेष्य मानून अर्थ करतात हें जरी खरें आहे, तरी हे आधुनिक टीकाकार त्या पदाचा अर्थ पशुपक्ष्यादि असा कोणीहि करीत नाहींत. तेव्हां त्यांनीं केलेलें विधान, आमच्या अर्थाप्रमाणेंच श्रीज्ञानेश्वरादि व लोकमान्यादि टीकाकारांनीं अर्थ केला आहे हें सर्वस्वीं सत्यास धरून नाहीं. मस्करीय भाष्या-संबंधीच्या अध्ययनाध्यापनाच्या संबंधांत त्यांनीं जे आत्मविश्वासाचे शब्द काढले तेच शब्द आम्ही ज्ञानेश्वरांच्या ग्रंथासंबंधीं काढूं शकतों. महाराज या श्लोकावरील आपल्या भाष्यांत काय म्हणतात तें:—

'अगा नांवें घेतां वोखटीं । जे आघवे या आधमाचिये शेवटीं ।
तिये पाप योनीं हि किरिटी । जन्मले जे ॥ ९.४०२
ते पापयोनी मूढ । मूर्ख जैसे कां दगड ।
परि माझ्या ठायीं दृढ । सर्व भावें ॥
जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टीं भोगीं माझें विरूप ।
जयांचे मन संकल्प । माझा चि वाहे ॥
... ... ... ... ... ...

जैसे तंव चि वहाळ वोहळ । जंव न पवती गंगाजळ ।
मग होऊन ठाकती केवळ । गंगारूप ॥ ९.४५८

... ... ... ... ... ...

तैसे क्षत्रिय वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ।
जाति तंव चि वेगळिया । जंव न पविती मातें ॥ ९.४६०

वरील शेवटच्या ओवींत 'क्षत्रिय' शब्द आला आहे. त्याला महाराजांनीं वैश्य, स्त्रिया, शूद्र, अत्यंजादिकांच्या पंक्तीस बसविलें आहे, ब्राह्मणांचा उल्लेख या ओवींत नाहीं, 'मां हि पार्थ' इ. श्लोकावरील या ओव्या होत. या श्लोकांत 'क्षत्रिय' शब्द नाहीं. या श्लोकाच्या पुढील श्लोकांत पुण्यवान् ब्राह्मण व भक्त क्षत्रिय यांचा स्पष्ट निर्देश गीताकारांनीं केला असतांना सुद्धां व ज्ञानेश्वरांनीं आपल्या भाष्यांत त्यांचा गौरवपूर्व उल्लेख केला असतांना सुद्धां वरील ओवींत (९.४६०) क्षत्रियांचा मात्र तेवढा उल्लेख करून त्यांस स्त्रीशूद्रादिकांच्या पंक्तीस ओढलें आहे व ब्राह्मण मात्र अजिबात वगळले आहेत. यांतील रहस्य काय असावें? विचार करणारांस तें सहज कळून येईल इतकें तें 'प्रगट गुप्त' आहे. प्रथम स्त्रियांस ब्रह्मविद्येचे अनधिकारी ठरविलें गेलें, नंतर वैश्यांस ती बंदी झाली. त्यानंतर ज्ञानेश्वरकालापर्यंत क्षत्रियहि ब्रह्मविद्येचे अनधिकारी समजले गेले असले पाहिजेत असें ओवीं ९.४६० ही दाखविते. आपमतलबी अधिकारारूढ मंडळींनीं-- शास्त्रकारांनीं--पहिला जुलूम अन्त्यजांवर (शूद्रांवर) केला, नंतर त्यांची दृष्टि स्त्रियांकडे वळली, मग वैश्य त्यांच्या तडाख्यांत सांपडले, शेवटीं तर 'नन्दान्तं क्षत्रियकुलं' या वटहुकुमानें त्यांनीं क्षत्रियांची वाट लावली व शेवटीं भस्मासुराप्रमाणें आपली गत करून घेतली. असो. "पापयोनय:" या पदाचा अर्थ व परंपरा आपण ज्ञानेश्वरांच्या शब्दांत पाहिली व निष्कर्षहि बघितला.

'भावार्थ दीपिका' कारानंतर आतां आपण 'यथार्थ दीपिका' कारें वामन पंडित यांच्या पांडित्याकडे वळूं व ते श्री. दुर्गाराम यांस कितपत साहाय्य देतात तें पाहूं. "मां हि पार्थ" इ. श्लोकाच्या आधींच्या श्लोकांच्या भाष्याच्या शेवटीं पंडित म्हणतात,

"दुराचार सत्कुल प्रसूत । त्या भक्ताचे विषयीं ऐसें बोलला देवकीसुत ।
आतां कुळें करून नीच बहुत । तेहि स्वभक्तीनें तरती ह्मणतो या श्लोकीं ॥
य. दी. ९. १७७१

या श्लोकीं म्हणजे 'माहि पार्थ' इ. श्लोकीं. याच्यावरील पुढील ओंव्या पहा:--

अर्जुना जे असती पापयोनी । तेहि माझ्या आश्रयें करूनी ।
परम गतीनें पावती या वरूनी । पाहे वडिवार माझ्या भजनाचा ॥

चांडाळादि अधम जाती । जरी माझाच आश्रय धरिती ।
कीं तारक आम्हांस एक श्रीपती । तरी तेहि परमगती पावती अर्जुना ।।
तैशाच गा अर्जुना स्त्रिया । सत्कुलप्रसूता हि मूर्तिमंत माया ।
असत्य–साहस–अतिलोभादि धनंजया । दुर्गुण जयांचें माहेर ।।
दुर्गुण पुरुषांस हि असती । परि स्त्रिया खाणी च दुर्गुणाच्या दिसती ।।
पति पुत्र पिताहि वंचिती । सहज कृत्रिम स्वभाव स्त्रियांचा ।।
स्त्रिया ऐशा वाईट परी । इ. इ.

पंडितांच्या भाष्यांतील 'सत्कुलप्रसूता हि' या विशेषणाकडे पूर्ण ध्यान ठेवूनसुद्धां आम्हीं श्री. दुर्गारामांस विचारतों कीं, पंडित हे कोणाच्या मताचे ठरतात ?

'पापयोनिः' या पदाचा असाच विचार, श्री. दुर्गारामांनीं आपल्या बाजूचे म्हणून दिलेल्या प्रत्येक ग्रंथकाराच्या आधारें लिहूं लागलों तर, विस्तार अतिशय च होईल. 'स्थालीपुलाकन्याया' नें वाचकांनीं काय तें समजावें.

द्वैतमतवाद्यांनीं सुद्धां आपणां सारखा च 'पापयोनयः' या पदाचा अर्थ केल्याचें श्री. दुर्गाराम वाचकांस भासवीत आहेत, द्वैतमतप्रस्थापक श्रीमन्मध्वाचार्य आपल्या 'सारोद्धार' नामक गीतेच्या टीकेंत 'मां हि पार्थ' इ. श्लोकासंबंधीं आपल्या मताप्रमाणें प्रथम पुष्कळ उहापोह करून शेवटीं असें म्हणतात कीं, "ये पापादियोनयोऽस्वाभाविकाः स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रा ब्राह्मणा राजर्षयश्च तेऽपि यान्ति परां गतिम् इ. ।" या ठिकाणीं या आचार्यांनीं 'पापयोनयः' हें विशेषण च घेतलेलें आहे हे दिसून येईल.

आतां श्रीमध्वाचार्यांच्या खालोखाल या संप्रदायांत ज्यांस मान आहे त्या श्रीराघवेन्द्र यतींच्या 'गीता विवृतींतील' या श्लोकावरची टीका पहा:—

हे पार्थ ! पापयोनयः स्वयमुत्तमवर्णाः अपि पापहेतुका योनिर्जन्म येषां से पापयोनयः । ते क इत्यत उक्तं स्त्रिय इत्यादिना । या टीकेंतील 'स्वयमुत्तमवर्णाः' वाचकांनीं पहावें. यांतहि 'पापयोनयः' हें पद विशेषणच घेतलें गेलें आहे.

आतां या द्वैती सांप्रदायिकांनीं या श्लोकाचा जो अर्थ केला आहे तो पाहिल्यास श्री. दुर्गारामांस असें आढळून येईल कीं, त्यांच्यांत व आपल्या अर्थांत, थोडें थोडकें नव्हे, तर आकाशपाताळाचें अंतर आहे. त्यांस द्वैतमतवादी आपल्या बाजूचे आहेत असें वाचकांस भासविण्याची बुद्धि कां आठवली कोण जाणे !

प्रो. भानु, महाभारताचे भाषांतरकार ( चिपळूणकर प्रत ) सर्वस्वीं आमच्याच मताचे आहेत. श्री. पांगारकरांचें मत त्यांच्याच शब्दांत देतों. भगवद्भक्त कान्होपात्रा हिच्याबद्दल लिहितांना ते म्हणतात, " वेश्येची मुलगी म्हणून समाजानें तिची हेळणा केली नाहीं. तिच्या गुणांचा गौरव करून तिला मंदिरांत स्थान दिलें व भक्तमंडळांत तिची गणना केली. माझा आश्रय करणारे पापयोनि असले तरी ते परमगति पावतात, ह्या भगवंताच्या उक्तीची (गी. ९.३२) येथें सार्थकता झाली. ' आघवेया अधमांचे शेवटीं पापयोनी ' मूढ असले पण माझ्या ठायीं दृढ राहून ' सर्वभावें भरले ' म्हणजे तरतात, ' भक्ति गा येथ सरे । जाति अप्रमाण ' इ. ( म. वा. इ. भा. २ पा. ९२ )

( १३ ) **स्त्रियांना ब्रह्मविद्येचा अधिकार आहे किंवा नाहीं:—** या प्रश्नाचें उत्तर सनातनी शास्त्राधारें स्त्रियांस तो अधिकार नाहीं, श्रीसमर्थांनीं तो दिला होता. हें त्यांचें करणें शास्त्रास विरुद्ध जातें व श्रीसमर्थ तर सनातनीमतें कट्टर सनातनी, तेव्हां हें असें कां, ही आमची शंका. यावर आपल्या दुसऱ्या लेखांत श्री. दुर्गाराम उत्तर देतात कीं, " स्त्रियांना ब्रह्मज्ञानप्रीत्यर्थ शास्त्रांचा प्रतिबंध गार्गी, मैत्रेयी इ. ब्रह्मवादिनींच्या कालाप्रमाणें आजहि पण नाहीं. "

आमचा त्यांस प्रश्न असा कीं, गार्गी, मैत्रेयी, सुलभा इ. ब्रह्मवादिनी ज्या कालांत होत्या त्या कालाप्रमाणें आपण स्त्रियांचे उपनयनादि संस्कार करण्यास, त्यांस वेदाध्यापनादि करण्यास सिद्ध आहांत काय ? तसेंच त्या कालांत असल्या स्त्रिया झाल्यानंतर, शास्त्रकारांची स्त्रियांस ब्रह्मज्ञानप्राप्त्यर्थ अनुज्ञा असतांहि त्या तोडीच्या स्त्रिया श्रीसमर्थकालापर्यंत उत्पन्न कां झाल्या नाहींत ? असल्या तर त्यांचीं एक दोन नांवें तरी सांगा कीं, ज्यांनीं कांहीं कार्य करून दाखविलें आहे ? आपल्या सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं त्या स्त्रियांचीं नांवें न देतां कृतत्रेतांतील ब्रह्मवादिनींचा आश्रय कां करावा ? श्रीसमर्थकालींच गार्गीमैत्रेयीच्या तोडीच्या स्त्रिया कां उत्पन्न झाल्या ? आम्ही श्रीवेणुबाई, आक्का, बयाबाई या श्रीसमर्थांच्या पारमार्थिक कन्यकांस गार्गीमैत्रेयींपेक्षां तिळभरहि कमी लेखत नाहीं. श्री. दुर्गारामांनीं याचें उत्तर द्यावें. आम्ही स्वामी विवेकानन्दांचें एक वाक्य वर दिलें आहे त्यांत वर्णिल्याप्रमाणें मनुष्यत्वाचे साधे हक्क, बुद्धीच्या वाढीला योग्य असणारें स्वातंत्र्य, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बहुजन समाजाच्या वाढीचीं व त्याच्या सर्वांगीण उन्नतीचीं ऐहिक व पारमार्थिक साधनें यांची ' कलिवर्ज्य, शूद्रकमलाकर ' व तत्सदृश इतर दूरदृष्टिशून्य प्रकरणांनीं शास्त्राच्या गोड नांवांखालीं, वाढ खुंटविली गेली. ह्यामुळें हिंदु समाजाचीं शेंकडों वर्षें अवनतीच होत गेली. तेव्हां शास्त्रें त्रिकालाबाधित न समजतां श्रीसमर्थांनीं त्यांतलें चांगलें तेवढें उचललें, वाईट टाकून दिलें, तसेंच हितकर व समाजास पोषक असें नवें उत्पन्न केलें व प्रचंड आंदोलन

उत्पन्न करून तें यशस्वी करून दाखविलें. प्रचलित शास्त्रांतील कांहीं भाग त्याज्य वाटला तो त्यांनीं डावलला, असें आमचें स्पष्ट मत आहे. श्रीसमर्थ पूर्णपणें कट्टर सनातनी होते असें म्हणणें म्हणजे पक्षांधतेचें लक्षण होय.

The Smritis and the Puranas are produetions of men of imited intelligence and are full of fallacies, errors, the feelings of class and malice. Only parts of them breathing broadness of spirit and love, are acceptable, the rest to be rejected." म्हणजे "स्मृति व पुराणें हीं साधारण बुद्धीच्या माणसांनीं लिहिलीं आहेत. त्यांमध्यें परस्परविरोध, घोडचुका, उच्चनीचत्वाची भावना व असूया हीं भरलीं आहेत. त्यांतील अन्तःकरणाचा मोठेपणा व भूतमात्रावर दया दाखविणारे जेवढे भाग आहेत तेवढेच ग्राह्य होत व बाकीचे त्याज्य होत."

(१४) **श्रीसमर्थांचा आश्रमः**—श्रीसमर्थांच्या आश्रमासंबंधींचा आतां विचार कर्तव्य आहे. या प्रश्नाचा पूर्वपक्ष व उत्तर पक्ष थोडक्यांत पुढील-प्रमाणें आहे. आमचें मत असें कीं, श्री 'अनाश्रमी' आहेत. श्री. दुर्गाराम म्हणतात कीं, तें चूक आहे, श्री आश्रमी आहेत व त्यांचा आश्रम 'विद्यास्नातक ब्रह्मचारी' हा शब्दप्रयोग चुकीचा आहे व श्री. दुर्गारामांनीं या विद्यास्नातकाचें वर्णन श्रीसमर्थांचें म्हणून दिलें आहे तें गृहस्थाश्रम्याचें वर्णन आहे असें त्यांनीं दिलेल्या आधारांनींच आमच्या पूर्वींच्या लेखांत आम्हीं सिद्ध केलें आहे तें असें कीं, आपण 'विद्यास्नातक' या शब्दापुढें ब्रह्मचारी हा शब्द जोडला तो आम्हीं आपल्या पूर्वींच्या लेखांत उपयोजिला असल्यानें लाविला. वास्तविक रीतीनें आपणांस (दुर्गारामांस) केवळ 'विद्यास्नातक' शब्दच योजावयाचा होता. (आम्हीं आमच्या पहिल्या लेखांत श्रीसमर्थांस ब्रह्मचारी शब्द कोणत्या अर्थानें लाविला आहे, बाकी आपणांस (श्री. दुर्गारामांस) श्रीसमर्थ 'अविवाहित' आहेत येवढेंच 'विद्यास्नातक' या शब्दानें दर्शवावयाचें आहे व यासाठीं त्यांनीं आम्हांस गौतम-सूत्रांवरील हरदत्तांची टीका विशेषतः मस्करीय भाष्य वाचून, 'स्नातक' हा अविवाहित स्थितींत यावज्जीव असणें शास्त्रसंमत आहे, याबद्दल खात्री करून घेण्यास मोठ्या आग्रहानें सांगितलें आहे. त्यांच्यामतें गौतमसूत्राच्या ९ व्या अध्यायां-तील पहिल्या व दुसऱ्या सूत्रांवरील भाष्यांत हरदत्त व मस्करी यांनीं समावर्तनानंतर अविवाहित स्थितींत (स्नातक) आजन्म राहतां येतें व त्या अध्यायांत सांगितलेलीं व्रतें गृहस्थाश्रमी व स्नातक यांस सारखींच लागू आहेत. आतां याचा विचार करूं.

श्री. दुर्गारामांनीं आपल्या पहिल्या लेखांत (प. सु. हार, पुष्प ३३) यांत 'स्नातक' शब्दाचा काय अर्थ केला आहे तो त्यांच्याच शब्दांत पाहूं याः—

" त्रयः स्नातकः भवन्ति । विद्यास्नातको व्रतस्नातको विद्याव्रतस्नातकश्च " हारीत ॥ यांतील ' विद्यास्नातक ' याचा अर्थ ' विद्याध्ययन पूर्ण करून ब्रह्मचर्यव्रतानें राहणारा ' तो ' विद्यास्नातक ' हारीतांनीं ' विद्यास्नातक ' याचा अर्थ ' यः समाप्य वेदानसमाप्य व्रतानि समावर्तते स विद्यास्नातकः ' असा दिला आहे. बापटशास्त्र्यांनीं याचा अर्थ ' वेद संपवून व्रतें न संपवितां जो गुरुकुलांतून परत येतो तो विद्यास्नातक ' असा केला आहे. ' व्रतस्नातक ' याचा अर्थ श्री. दुर्गाराममतें ' अध्ययन पूर्ण होण्यापूर्वी गुरूची आज्ञा घेऊन विवाह करूनहि अध्ययन करणारा तो व्रतस्नातक. ' आतां हारीतांनीं या पदाचें विवरण कसें केलें आहे तें पहा. यः समाप्य व्रतान्यसमाप्य वेदान् समावर्तते स व्रतस्नातकः। बापट यांचें भाषांतर ' जो व्रतें संपवून विद्या न संपवितां परत येतो तो व्रतस्नातक ' असें करितात, ' विद्या व्रतस्नातक ' याचा अर्थ श्री. दुर्गाराम देतात तो असा कीं, ' विद्या पूर्ण करून ब्रह्मचर्यहि पूर्ण करून गुरुकुलांतून परत आलेला तो विद्याव्रत-स्नातक-उभयव्रत स्नातक. ' उभयं समाप्य यः समावर्तते स विद्याव्रतस्नातक ' या पदाचें विवरण आहे व याचा अर्थ ' जो व्रतें आणि वेद हीं दोन्ही संपवून परत येतो तो विद्याव्रतस्नातक ' असा बापटांनीं केला आहे. तिसऱ्या स्नातकास ' उभय स्नातक ' अशीहि संज्ञा आहे. ' समावर्तते ' हें पद तीनहि स्नातकांत कायम असतांना श्री. दुर्गाराम व हारीताच्या आधारें बापट यांच्या अर्थांत किती तरी अंतर पडत आहे.

या स्नातकत्रयींपैकीं पहिला व दुसरा हे सारख्या योग्यतेचे व शेवटचा श्रेष्ठ असें गोभिलांचें मत असल्याचें ' संस्कारमयूख ' कारांनीं म्हटलें आहे. ' तेषामन्त्यः श्रेष्ठः। उभौ तुल्यौ।' श्रीसमर्थ ' विद्यास्नातक ' होते असें श्री. दुर्गाराम म्हणतात.

या तीन स्नातकांचा श्री. दुर्गारामांनीं जो अर्थ केला आहे, त्यावरून पहिला तेवढा ब्रह्मचारी दिसतो व बाकीचे दोन गृहस्थाश्रमी आहेत असें स्पष्ट दिसतें. तेव्हां त्यांनीं आपल्या दुसऱ्या लेखांत मस्करीय भाष्याच्या आधारें सांगितलेला " समावर्तनानंतर अविवाहित स्थितींत ( स्नातक ) आजन्म राहतां येतें " असा त्यांचा ' विद्यास्नातक ' ठरतो व त्यांच्या मतें श्रीसमर्थांचा आश्रम ' विद्यास्नातक ! '

आतां ह्या गृहस्थांचें त्यांच्या पहिल्या लेखांतील ( प. सु. हार. पु. ३३ ) पुढील वाक्य पहा. " उभयस्नातकांचीं कर्तव्यें शास्त्रांत पुष्कळ वर्णिलीं आहेत. " असें म्हणून या आपल्या त्या लेखांत पान ३३२, ३३३, ३३४ व ३३५ यांत या ' उभयस्नातका 'चें वर्णन गौतमसूत्रें, आश्वलायन सूत्रें व स्मृति, मनुस्मृति व याज्ञवल्क्य स्मृति यांच्या आधारें त्यांनीं केलें आहे, व तें श्रीसमर्थांचें आहे म्हणून

तें सांगत आहेत. श्रीसमर्थ 'विद्यास्नातक' असल्याचें तेच सांगतात व वर्णन करतात. 'उभयस्नातकाचें'. तेव्हां ही काय लीला आहे कळत नाहीं! 'विद्यास्नातक' व 'उभयस्नातक' एकच समजावयाचें काय?

मस्करीय भाष्याच्या आधारें स्नातक आजन्म अविवाहित असूं शकतो असें ते सांगतात. मस्करींनीं तो, हारीतांनीं वर्णिलेल्या तीन स्नातकांपैकीं, नेमका कोणता ह्याचा निर्देश केला आहे काय?

उभयस्नातकाची त्यांनीं जी व्याख्या केली आहे त्यावरून तो गृहस्थाश्रमी दिसतो व त्याचेंच वर्णन त्यांनीं पुढें श्रीसमर्थांचें वर्णन म्हणून दिलें आहे. श्रीसमर्थ तर त्यांच्याच मतें 'विद्यास्नातक – म्हणजे विद्याध्ययन पूर्ण करून ब्रह्मचर्य व्रतानें राहणारा.' तेव्हां या परस्परविरोधी वर्णनाची एकवाक्यता कशी करावयाची? हें त्यांनीं सांगावें.

आपल्या दुसऱ्या लेखांत "अकृतविवाहेऽपि गृहस्थः शब्दः प्रयुक्तः" असें मस्करीय भाष्याच्या आधारें म्हणून, 'स्मृतिकारांनीं स्नातकास गृहस्थ कां म्हटलें आहे' या आमच्या दुसऱ्या लेखांतील शंकेस उत्तर देण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे. पण या मस्करीय भाष्याच्या विरुद्ध बोधायनांचें "आजायासङ्गामात्स्नातका भवन्त्यतऊर्ध्वं गृहस्थाः" हें सूत्र (बो. गृ. परिभाषा १५.१०) जात आहे, त्याची श्री. दुर्गाराम संगति कशी लावतात तें त्यांनीं सांगावें. तसेंच बोधायनांच्या मतें, श्री. दुर्गारामांनीं कल्पिलेली अविवाहित स्नातक ही स्थिति अस्तित्वांत नाहीं आणि त्यांचा विद्यास्नातक तर अविवाहित, या विरुद्ध गोष्टींचा मेळ ते कसा घालणार!

स्नातकत्रयींचा अर्थ श्री. दुर्गारामांनीं जो केला आहे तो स्वतंत्र रीतीनें आहे असें दिसतें. हारीतांनीं जें त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे त्यास आपला अर्थ विरुद्ध जातो किंवा नाहीं याचा त्यांनीं विचार करावा. वाचकांनींहि वरील गोष्टींचा विचार करावा.

आपल्या स्नातकत्रयींचें आपल्या पहिल्या लेखांत वर्णन करण्याचे वेळेस, त्यांनीं आपल्या दुसऱ्या लेखांत वर्णिलेला अविवाहित स्नातक, त्यांच्या मनश्चक्षूं-समोर नसावा, त्यांच्या या दुसऱ्या स्नातकाचा जन्म आमच्या दुसऱ्या लेखानंतर झाला असावा असें दिसतें.

त्याप्रमाणें त्यांच्या स्नातकत्रयींचा विचार केल्यावर या स्नातकत्रयींच्या खालीं (प. सु. द्वार, पृ. ३३) त्यांनीं दिलेल्या याज्ञवल्क्य स्मृतींतील ५१ व्या श्लोकाच्या उत्तरार्धाचा विचार करूं या. तो श्लोकार्ध 'वेदव्रतानि वा पारं नीत्वा

ह्युभयमेव वा ॥ ' असा आहे. हा श्लोक विवाहप्रकरणांतील आहे. स्नातक प्रकरणांतील नव्हे. तेव्हां हा श्लोक श्रीसमर्थांस लागू होत नाहीं. स्नातकत्रयींनें समावर्तनानंतर शक्य तों लवकर विवाह करावा असें म्हटलें आहे. या विधानास आणखी एक जास्त पुरावा ' स्मृतिचंद्रिका ' ग्रंथाचा. या ग्रंथांतील ' समावर्तनम् ' या प्रकरणांत पहावा. तेथें त्यांनीं दक्षाचें " स्वीकरोति यदा वेदं चरद्वेदव्रतानिच। ब्रह्मचारी भवेत्तादूवर्ध्वं स्नातो गृहीभवेत् ॥ " असें वचन दिलें आहे. यावरून वर सिद्ध केलेल्या अभिप्रायास पुष्टि मिळत नाहीं काय? तसेंच ' आश्रमविकल्पौ ' या त्यांच्या ' स्मृतिचंद्रिके ' च्या प्रकरणांत देवण भट्टांनीं स्नातकत्रयींनें (श्री. दुर्गारामांनीं स्पष्टीकरण केलेलीं नव्हे, ही हारीतांनीं केलेली) समावर्तनानंतर शक्य तों लवकर विवाह करावा, ' अनाश्रमी ' राहूं नये असेंच प्रतिपादन केलें आहे. श्री. दुर्गारामांचा ' अविवाहित स्नातक ' ही स्थिति ' स्मृतिचंद्रिका ' कारांस मान्य नाहीं हें त्यांनीं या प्रकरणांत उशनसांचें जें वचन दिलें आहे त्यावरून स्पष्ट होत आहे. " आचार्येण्यनुज्ञातश्चतुर्णामेकमाश्रमम्। आ विमोक्षाच्छरीरस्य सोऽनुतिष्ठेद्यथाविधि ॥ " यांतील ' आ विमोक्षात् ' या पदानें ' आश्रमिणाऽवस्थातव्यम् ' असें त्यांनीं म्हणून या विधानाच्या पुष्ट्यर्थ दक्षस्मृतीचीं तीं प्रसिद्ध वाक्यें, ' अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः। ' व ' जपे होमे तथा दाने स्वाध्याये वा रतः सदा। ' तसेंच हारीतस्मृतींतील " अनाश्रमीव्यपेतश्च आश्रमीच निरर्थकः " इ. वाक्यें दिलीं आहेत.

" अनाश्रमी न तिष्ठेत इ. दक्षवचनं विधुरविषयत्वं द्रष्टव्यम्। हें वचन ज्यांची बायको मेली आहे अशा विधुराकरितां आहे. " हें मस्करीय आधारानें दिलेलें श्री. दुर्गारामांचें विधान कितपत ग्राह्य समजावयाचें?

तात्पर्य, याज्ञवल्क्य स्मृति, तीवरील टीकाकार व उपटीकाकार म्हणजे मिताक्षरा, अपरार्क, बाळंभट्टी, स्मृतिचंद्रिका, बोधायन, गृह्य परिभाषा, संस्कार मयूखकार इत्यादींस तरी ' अविवाहित स्नातक ' ही स्थिति मान्य असल्याचें दिसून येत नाहीं.

' प्रयोग पारिजात ' नांवाच्या ग्रंथांतील हा उतारा आहेः--

अथ स्नातकधर्माः। तत्र नित्यविधिमाह कारिकाकारः।:- ' दास्यन्ति मधुपर्कं ये तत्रैतां रजनीं वसेत् '। इदमत्र गृह्यम् -- ' यत्रैनं पूजयिष्यन्तो भवन्ति तत्रैतां रात्रिं वसेदिती। अस्यार्थः- यत्रात्मानं मधुपर्केण पूजयिष्यन्ति तत्रैतां रात्रिं वसेत्। कुत एतत्। स्नातकायोपस्थितायेती वचनान्मधुपर्केण पूजनं लब्धमिति। अत्र भगवानः-- समावृत्तमिमं यस्मिन्पूजयिष्यन्ति मानवाः। मधुपर्कप्रदानाद्यैस्तद्गृहे तां निशां वसेदिति। अत्रस्मृतिरूपेण विशेषमाह आचार्यः--

स्नात्वैव विधिना काले । मासमात्रमपि द्विजः ।
अनाश्रमी न तिष्ठेत । सुस्वस्थः प्रयतात्मवान् ॥
निः स्वो रोगार्दितो भीतस्त्वापन्नोन्यैश्च कारणैः ।
नित्यदा ब्रह्मचारी स्याच्चतुर्यज्ञपरायणः ॥
जापीतीर्थरतो वा स्यात्स्नातको लौल्यवर्जितः ॥
श्राद्धे निमन्त्रितो गच्छेत्कुर्यात्षट्कर्मच द्विजः ।
येन केनाप्युपायेत व्रतचर्या न लोपयेत् ॥
टाकलाञ्जुहुयात्प्रातस्तन्मन्यैः कार्यमेव च ।
कुर्याद्यज्ञान् विधिप्रोक्तान् स्नातको ननु यज्ञभाक् ॥

... ... ... ... ... ...
... ... ... ... ... ...

तत्र स्नातकेन वैश्वदेवः कार्य इत्याह शौनकः—

वैश्वदेवं गृहस्थस्य प्रातराम्भणं भवेत् ।
स्नातकेनापि सत्कार्यं पृथक्पाको गृहे यदि ॥

पुनरन्ये धर्माः कूर्मपुराणे दर्शिताः—

यज्ञोपवीत द्वितयं सोदकं च कमण्डलुम् ।
छत्रं चोष्णीषममलं पादुके चाप्युपानहौ ॥
रौक्मे च कुण्डले वेणुं कृशकेशनखः शुचिः ।
स्वाध्याये नित्ययुक्तः स्याद् बहिर्माल्यंच धारयेत् ।
न जीर्णमलवद्वासा भवेत्तु विभवे सति ॥
न रक्तमुल्बणं चान्यधृतं वासो न कन्थिकाम् ॥

स्मृत्यन्तरे तु—

स्नातः समुद्वहेत्कन्यां प्रव्रजेद् वा तदिच्छतः ।
वनस्थो वा भवेद् विप्रः सुस्वस्थो विधिना शुचिः ॥
अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।
आश्रमेण विना तिष्ठन्प्रायाश्चित्तीयते हि सः ॥ ”

श्रीसमर्थांचा आश्रम कोणता, ते अनाश्रमी ठरतात किंवा कसें, समावर्तनोत्तर स्नातकास जास्तींत जास्त अविवाहित स्थितींत किती काल राहतां येतें

तसेंच यावज्जीव राहतां येतें किंवा नाहीं, 'अनाश्रमी न तिष्ठेत' हें वाक्य विधुरासच लागू आहे किंवा कसें, समावर्तनानंतर कोणता तरी आश्रम (गृहस्थ, वानप्रस्थ किंवा संन्यास) स्वीकारणें भाग आहे काय, स्नातकाचीं वस्त्रें हुर्मुजी का पांढरीं, तीं किती असावींत, मेखला हें वस्त्र शास्त्रांत विद्यमान आहे काय, स्नातकानें दाढीजटा ठेवाव्यात कीं न ठेवाव्यात इ. गोष्टींचा सविस्तर ऊहापोह आहे. श्री. दुर्गारामांनीं आमच्या विरुद्ध जे जे पुरावे आपल्या पहिल्या व दुसऱ्या लेखांत आणले आहेत त्या सर्वांचीं समर्पक उत्तरें यांत आहेत.

"स्नात्वैव विधिना काले" इ. श्लोक गृहस्थासंबंधींचे नसून ते विवाहेच्छूबद्दलचे तरी आहेत व ते म्हणतात त्याप्रमाणें त्यांच्या 'विद्यास्नातकाबद्दलचे (कीं 'उभयस्नातक') तरी नाहींत येवढें वरील 'प्रयोग पारिजातां' तील उताऱ्यावरून निर्विवाद सिद्ध झालें.

श्री. दुर्गारामांनीं उल्लेखिलेला (प सु. हा. पु. ३३) "स्वाध्यायेन व्रतै होमैस्त्रैविद्येने ज्यया सुतैः। महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः॥ मनु २.२८" हा श्लोक श्रीसमर्थांच्या वर्णनात्मक म्हणून ते देतात. त्यांतील 'सुतैः' या पदाकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. हा श्लोक विशिष्ट आश्रमदर्शक नाहीं. असें असतांना या श्लोकानें त्यांनीं श्रीसमर्थांचें वैशिष्ट्य काय दर्शविलें तें श्रीसमर्थांसच माहीत! "वैष्णवीं धारयेद्यष्टिं सोदकंच कमंडलुम्। यज्ञोपवीतं वेदं च शुभे रुक्मेच कुंडले" (मनु ४.३६) हा श्लोक स्नातक गृहस्थाश्रम्याच्या वर्णनपर आहे. स्नातक गृहस्थाश्रमी व साधा गृहस्थाश्रमी यांत अंतर आहे. स्नातकवृत्तीचा अवलम्ब केल्यानें गृहस्थाश्रमी पुरुषांत सत्त्वगुणांचा प्रकर्ष जास्त होतो असें मनूंनीं ४.२५९ यांत सांगितलें आहे.

स्नातक हा गृहमेधीच गृहस्थाश्रमीच असला पाहिजे हें "वेदविद्याव्रतस्नाताञ्श्रोत्रियान्गृहमेधिनः॥ मनु ४.३१" या श्लोकावरून स्पष्ट आहे. स्नातक हा शब्द फिरून अ. ३.११९ मध्यें येतो:— "राजर्त्विक्स्नातक गुरून्" त्याचा अर्थ 'स्नातको विद्याव्रताभ्याम्' असा कुल्लुकभट्टांनीं केला आहे आणि त्याचें स्पष्टीकरण "ब्रह्मचारी व्रताचा ज्यानें त्याग केला आहे असा स्नातक" असें श्री. बापटशास्त्र्यांनीं केलें आहे. या पुढील ३.१२० व्या श्लोकांत 'राजा च श्रोत्रियश्चैव' अशीं पदें आलीं आहेत, त्यांतील 'श्रोत्रियः' पदाचा अर्थ कुल्लुकांनीं 'स्नातक' असा केला आहे व 'श्रोत्रिय' पदाचा अर्थ 'गृहस्थाश्रमी' आहे असें वर मनु ४.३१ च्या आधारें लिहिलेंच आहे. मनु अ. १.११३ या श्लोकांतील 'स्नातकस्य व्रतानि' यांतील 'स्नातकस्य' याचा अर्थ 'गृहस्थस्य' असाच कुल्लुकांनीं केला आहे. "अकृतविवाहेऽपि गृहस्थः शब्दः प्रयुक्तः" हें मस्करीचें (श्री. दुर्गारामांच्या मतानें) प्रतिपादन बोधायनांस संमत नाहीं, हें

आम्ही वर "आजायासङ्गमात्स्नातका भवन्त्यत ऊर्ध्वं गृहस्थाः" या आधारें दाखविलेंच आहे. तात्पर्य मनुस्मृतींत श्री. दुर्गारामांचा 'स्नातक' कोठेंच दिसून येत नाहीं.

हरदत्तांचा स्नातकः—गौतमसूत्रांच्या ९ व्या अध्यायांतील पहिल्या व दुसऱ्या सूत्रांवरील हरदत्तांच्या टीकेंत दिलें आहे कीं, 'स्नातक' अविवाहितहि असूं शकतो. अगोदर आम्ही हरदत्तांस विचारतों कीं, 'स्नातकः' या सूत्रांतील स्नातक ते कोणता घेतात? विद्यास्नातक, व्रतस्नातक कीं उभयस्नातक? कारण येथें स्नातक हा शब्द मोघम आहे. सूत्रांतील 'स्नातक' या पदावरून 'स्नातकत्रय'हि घेतां येईल. व शास्त्रीय दृष्टीनें तसाच अर्थ घेणें इष्ट व योग्य ठरेल. पण यांत एक अडचण त्यांनीं केलेल्या स्नातकत्रयीच्या अर्थामुळें येत आहे. त्यांच्या 'स्नातकत्रयी' पैकीं त्यांस अभिप्रेत असलेला व जो त्यांनीं श्री समर्थांस लाविला आहे, तो त्यांचा 'विद्यास्नातक'–विद्याध्ययन पूर्ण करून ब्रह्मचर्यव्रतानें राहणारा–होय. बाकीचे दोन त्यांच्याच अर्थाप्रमाणें गृहस्थाश्रमी ठरतात म्हणून ही शंका.

सूत्रांवरील भाष्य "स विधिपूर्वकं स्नात्वा भार्यामधिगम्य यथोक्तान् गृहस्थधर्मान् प्रयुञ्जान इमानि व्रतान्यनुकर्षेत् ॥ १ ॥" गौतमसूत्रें, (अध्याय १ व २) असे असून या सूत्रावर त्यांनीं तेथे पुढीलप्रमाणें टीका केली आहे:– तच्छब्देन पूर्वाध्यायोक्त राजा ब्राह्मणश्च परामृश्यते। वैश्यस्य तु स्नातकविषये विशेषं वक्ष्यति। विधिपूर्वं विधिं पुरस्कृत्य स्नात्वा वेदव्रतानि पारं नीत्वा समावर्तनं कृत्वा भार्यामधिगम्य विवाहं कृत्वा तदनंतरं यथोक्तरानतिथि पूजादिगृहस्थधर्माननुतिष्ठन्निमान्यपि वक्ष्यमाणानि व्रतान्यनुकर्षेत्। आत्मानं प्रापयेदनुतिष्ठेदिति।

दुसरें सूत्रः–– स्नातकः ॥ यावरील टीकाः—च लोपो द्रष्टव्यः। स्नातकश्चैतानि गृहस्थव्रतान्यनुतिष्ठेत्। ब्रह्मचर्यान्निवृतत्त्वाद् गार्हस्थ्यव्यतिरिक्ताश्रमान्तराभावाच्च भार्यामधिगमादूर्ध्वमिति पूर्वसूत्रं प्रारब्धम्। स्नातकस्य तु भार्याधिगमासंभवे यावज्जीवं गृहस्थधर्मा एवानुष्ठेया इति सूत्रान्तरप्रारब्धम्। एतच्च राजब्राह्मणयोरेवानुष्ठानम्। तदतिक्रमे प्रायश्चित्तं च विधीयते।

यांतील 'स्नातकस्य तु भार्याधिगमासम्भवे यावज्जीवं गृहस्थधर्मा एवानुष्ठेयाः' या वाक्यावर काय ती श्री. दुर्गारामांची सारी भिस्त आहे. आतां 'भार्याधिगमासंभवे' या पदाचा अर्थ काय करावयाचा? आमच्या मतें भार्या मिळण्याचा असम्भव, अशक्यता' असा होतो आहे. असम्भवः याचा अर्थ कोशकार आपटे Improbability; Impossibility; Non-existance असा देतात. पैकीं आम्ही वर केलेला अर्थ कोशकारांनीं दिलेल्या शब्दार्थाप्रमाणें आहे. आतां 'भार्याधिगमासंभव' दोन प्रकारांनींच असूं शकेल. एक वरांत किंवा दुसरें वधूंत रूपकुलादींचें वैगुण्य असल्यास, कुलाचें श्रेष्ठत्व राखावयासाठीं उत्तमांचा उत्तमांशींच

शरीरसंबंध झाला पाहिजे. जिज्ञासूंनीं याबद्दल मनु, संस्कारमयूख इ. ग्रंथांत याचें विवरण पहावें. वधूवरांची परीक्षा परस्परांतील मंडळींनीं करावी हें योग्य व व्यवहारास धरूनच आहे. आतां प्रश्न-असा उपस्थित होतो कीं, श्रीसमर्थांच्या संबंधीं 'भार्याधिगमासंभवे' या पदान्वयें कोणतीहि अडचण उभी राहिली नव्हती. हें त्यांच्या होऊं घातलेल्या विवाहावरून सिद्ध आहे. तेव्हां 'यावज्जीव स्नातकानें अविवाहित रहावें' अशी जी परिस्थिति म्हणजे 'भार्या मिळण्याची अशक्यता' ती निदान श्रीसमर्थांच्या बाबतींत तरी नव्हती. तेव्हां हरदत्तांचें म्हणणें (स्नातकानें यावज्जीव अविवाहित रहावें पण तें भार्या मिळणें अशक्य असल्यास) मान्य करून सुद्धां श्री. दुर्गारामांस विचारावेंसें वाटतें कीं, श्रीसमर्थांची स्थिति हरदत्तांच्या भाष्यांत वर्णिल्याप्रमाणें होती काय ?

यावर प्रतिपक्ष म्हणेल कीं, मातोश्रींच्या अत्याग्रहामुळें श्रीस विवाहास उभे राहणें भाग पडलें. 'न मातुः पर दैवतम्' या पुढें त्यांस मान वांकवावी लागली. याचें उत्तर असें कीं, शास्त्र असल्या लंगड्या सबबी जाणत नाहीं. श्रुतिस्मृतींच्या प्रामाण्यापुढें मातापितरांच्या इच्छेचें स्तोम माजविणें म्हणजे वर आम्हीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें हायकोर्टाचा निवाडा स्मॉल कॉजेस कोर्टाच्या निवाड्यानें फिरविण्यासारखें हास्यास्पद होय.

आतां 'असम्भव' याचा Non-existance अस्तित्वांत नसणें असाहि अर्थ आहे. पण प्रस्तुत प्रकरणीं तो कांहींच उपयोगी पडत नाहीं.

आतां हरदत्तांच्या भाष्याप्रमाणें एखादें अपवादात्मक उदाहरण पुढील प्रकारचें असूं शकेल. समजा एकादा 'स्नातक' आहे. त्याची लग्नाची इच्छाहि आहे. तो वैगुण्यहीन आहे. पण त्याला भार्या मिळत नाहीं. तेव्हां त्यानें काय करावें ? अशासाठीं हरदत्तांनीं ही सोय करून ठेविली असल्यास मग आमचें कांहीं म्हणणें नाहीं. पण यावर मग अडचण येते ती ही कीं, स्नातक प्रकरणांत स्त्रीविषयक जीं सूत्रें आलीं आहेत त्यांची या स्नातकाच्याबाबत व्यवस्था कशी लावावयाची ?

तात्पर्य श्रीसमर्थांचे बाबत हरदत्तांची टीका उपयोगी पडत नाहीं. श्री. दुर्गारामांचें हें शस्त्र त्यांच्यावरच उलटत आहे.

'श्रीसमर्थांचा आश्रम कोणता' हें ठरविण्यासाठी प्रकरणीं आम्हीं मनु, याज्ञवल्क्य, बोधायन गृह्यपरिभाषा, आश्वलायन, विज्ञानेश्वर, अपरार्का, स्मृतिचंद्रिका, बाळंभट्टी, धर्मसिंधुकार, संस्कारमयूख, प्रयोगपारिजातादि ग्रंथांचा उपयोग केला आहे.

(१५) **भिक्षाः—** श्री दुर्गारामांनीं, (प. सु. हा. पु. ३३) "भिक्षा कोणती व्यावी याविषयीं शास्त्रांत पुष्कळ चिकित्सा केली आहे." असें म्हणून

पुढील श्लोक ' वेदयज्ञैरहीनानां प्रशस्तानां स्वकर्मसु । ब्रह्मचार्याहरेद् भैक्षं गृहेभ्यः प्रयतोन्वहम् ॥ मनु २.१८ ' व त्याचें भाषांतर " वेद, यज्ञ व स्वकर्मरत गृहस्थांचे घरीं च भिक्षा घ्यावी. जेथे तशी परिस्थिति नाहीं तेथें शास्त्राज्ञेनें कोरान्न भिक्षा ( श्रीसमर्थांनीं ) सुरू केली " असें म्हटलें आहे. वरील श्लोक ब्रह्मचाऱ्यानें कोठें भिक्षा मागावी, या प्रकरणांतील आहे. श्लोकांत ' ब्रह्मचारी ' शब्द स्पष्ट आहे. तो चिकटविला आहे त्यांनीं श्रीसमर्थांस—त्यांच्या ' विद्या स्नातकास ' —कीं जो त्यांच्या मतें " विद्याध्ययन पूर्ण करून ब्रह्मचर्य व्रतानें राहणारा व ज्याला त्यांनीं मस्करीय भाष्यमतें ' समावर्तनानंतर अविवाहित स्थितींत ( स्नातक ) आजन्म राहतां येतें ' असा असलेला पण म्हटलें आहे. आतां त्यांस विचारतों कीं, ' ब्रह्मचारी ' व समावर्तन झालेला पण अविवाहित स्थितींत राहणारा हे एक च आहेत काय ? कां जसें आपण गृहस्थाश्रम्याचीं व्रतें व आपण प्रतिपादिलेल्या स्नातकांचीं व्रतें एक च आहेत असें सांगत आहांत तोच प्रकार येथें सांगणार आहां कीं काय ? म्हणजे शास्त्रोक्त ब्रह्मचारी व अविवाहित स्नातक यांचेहि धर्म एक च आहेत ?

आमचें स्पष्ट मत असें कीं शास्त्राधारें श्री समर्थ अनाश्रमी ठरतात. तेव्हां त्यांनीं चालू केलेला कोरान्न भिक्षेच्या सांप्रदाय शास्त्रनिषिद्ध आहे.

कोरान्न भिक्षेच्या समर्थनार्थ ( प. सु. हा. पु. ३३ ) आमयेवाददतिास्मात् ' इ. जे श्लोक त्यांनीं दिलेले आहेत, ते आपत्कालीं ब्रह्मचाऱ्यानें, श्री. दुर्गारामांच्या स्नातकानें नव्हे, भिक्षा कोठें मागावी यासंबंधींचे आहेत, तेव्हां ते श्रीसमर्थांस लागू होत नाहींत. शास्त्रकारांनीं निदान आंगिरस स्मृतीनें तरी अविवाहित स्नातकांस ( ! ) ही कोरडी भिक्षा सांगितलेली नाहीं. वरीलप्रमाणें भिक्षेविषयीं त्यांनीं दिलेल्या आधारानें आतां सिद्ध केलें आहे व मागील लेखांतहि केलें होतें. आम्ही पुनः त्यांस विचारतों कीं, ' रामदासीयांचा भिक्षेसंबंधींचा आपत्काल गेलीं तीनशें वर्षें चालूंच आहे काय ? '

आपल्या या भिक्षेच्या समर्थनार्थ श्री. दुर्गारामांनीं " तीनशें वर्षांची परंपरा अशा तऱ्हेची आहे हें हा. काकांस ज्या संस्थेच्या कार्यदर्शित्वांत गौरव वाटतो, तिकडे पाहिलें असतां, समाधान होईल. " असें सांगितलें आहे. श्रीरामदासी संप्रदाय व हरिजन सेवक संघ यांत त्यांस काय साम्य दिसलें तें कोण जाणे. हरिजन हजारों वर्षे दारिद्र्यादि संकटांत आहेत. तसा रामदासी संप्रदाय आहे काय ? त्यांनीं रामदासी कोरान्न भिक्षेच्या वादग्रस्त प्रश्नाचा हरिजन सेवक संघ या संस्थेशीं काय संबंध लावला हें त्यांचें त्यांसच माहीत !

( १६ ) आतां किरकोळ दोन मुद्दे राहिले आहेत. पैकीं एक मनुस्मृति अ. ४.१६६ च्या टीकेंत " कुल्लूकभट्टांनीं देखील ' पापयोनिषु ' म्हणजे

'कुक्कुरादि योनिषु' असा श्रुतीला अनसरूनच अर्थ केला आहे." असें श्री. दुर्गारामांनीं म्हटलें आहे. आम्ही तें अमान्य करीत नाहीं. आमचें येवढेंच म्हणणें कीं, या श्लोकांतील 'कुक्कुरादि योनिषु' या पदांत चाण्डाल योनीचा समावेश कुल्लुकांनीं केला आहे काय ? शिवाय 'पापयोनिः' याचा अर्थ तिर्यक् प्राणि घेणें चुकीचें आहे हें आम्ही वर सांगितलेंच आहे.

( १७ ) श्री. दुर्गारामांनीं श्रेष्ठांसंबंधीं एक अनैतिहासिक असें विधान केलें आहे. "श्रीसमर्थांवर जो विवाहप्रसंग लादला गेला, त्याला श्रेष्ठांचेच प्रयत्न जास्त कारणभूत झाले" असें त्यांचें म्हणणें आहे. श्रीसमर्थ विवाहास आपल्या मातोश्रींच्याच आग्रहानें केवळ उभे राहिले होते. श्रेष्ठांचा त्यांत कांहींच संबंध नव्हता. श्रेष्ठांस या लोकोत्तर बाळाचे पाय पाळण्यांतच दिसले होते. त्यांचीं श्रींच्या विवाहसंबंधींची खटपट केवळ वरकरणी होती आणि तीहि मातोश्रींच्या भिडेखातर होती. तसेंच श्रीसमर्थांच्या चरित्रांबद्दल अत्यंत विश्वसनीय पुरावा म्हणून प्रसिद्ध वाकेनिशी टिपणांतील ८ वें कलम ( सां. वि. वि. भा. १ ले. ११. ) इतिहासज्ञ समजतात.

# श्रीसमर्थ व इतर संत : शिकवणींतील अंतर

महाभारत हें जसें पारमार्थिक विचारांची खाण आहे, तसेंच ती व्यावहारिक गोष्टींचीहि पण खाण आहे. त्यांत जसा अध्यात्मशास्त्राचा साकल्यानें विचार झालेला आहे, तसाच राजकारणशास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादि शास्त्रांचाहि झालेला आहे. किंबहुना असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं कीं, निःश्रेयसाइतकाच तुल्यबलानें व्यवहाराचाहि पण खल महाभारतांत केला गेलेला आहे. महर्षि व्यासांनीं ऐहिक व पारमार्थिक प्रश्नांस सारखेंच लेखिलेलें आहे. महाभारताचा हा विशेष संस्कृत वाङ्मयांतील इतर कोणत्याहि ग्रंथांत आढळून येत नाहीं. यालाच अनुलक्षून 'धर्माविषयीं, अर्थाविषयीं, कामाविषयीं व मोक्षाविषयीं महाभारतांत जें सांगितलें आहे, तेंच इतर ग्रन्थांत आहे. जें यांत नाहीं तें कोठेंच नाहीं' असें महाभारताचें यथार्थ वर्णन स्वतः महाभारतकारांनींच केलेलें आहे:—

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।
यदिहास्तितदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।।

महाभारताचें हें वर्णन श्रीसमर्थांच्या वाङ्मयास विशेषतः त्यांच्या दासबोधास तंतोतंत लागू पडतें असें आम्हांस वाटतें. श्रीसमर्थांचा दासबोध हा ग्रन्थ एका दृष्टीनें महाराष्ट्र वाङ्मयांत अपूर्व आहे. त्याच्या पूर्वीचे लोकमान्य ग्रन्थ म्हणजे 'ज्ञानेश्वरी' व 'एकनाथी भागवत' हे होत. यांच्या खालोखाल श्रीमुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' हा ग्रन्थ येतो या तीनहि ग्रन्थांचा व दासबोधाचा विषय एकच आहे. या चारहि ग्रन्थांत 'बहुधा अध्यात्मनिरोपणच निरोपिलें' आहे. परंतु दासबोधाच्या मांडणींत व विवेचनांत जो एक विशेष आहे तो उपरिनिर्दिष्ट तीनहि ग्रन्थांत आहे असें वाटत नाहीं. परमार्थ व व्यवहार यांची उत्कृष्ट सांगड जशी दासबोधांत घातलेली दिसून येते, तशी ती इतर तीनहि ग्रन्थांत आढळून येत नाहीं. भिन्न काल, भिन्न परिस्थिति, त्या त्या संतकवीची ( संत असे कवि ) भिन्न मनोरचना हींहि त्याचीं कारणें असूं शकतील, पण इतर संतकवींच्या व श्रीसमर्थांच्या शिकवणींत दृष्टींत भरण्याजोगें अंतर आहे. ही गोष्ट मात्र सत्य आहे.

महाराष्ट्राची संस्कृति दोन ग्रन्थांत सांठविली गेली आहे. एका बाजूस ज्ञानेश्वरी व दुसऱ्या बाजूस दासबोध. या दोन ग्रन्थांत महाराष्ट्राच्या अंःतकरणाची घडण व ठेवण दिसून येते, विचाराच्या डोळ्यांस गरगर फिरविणाऱ्या तत्त्व-

ज्ञानाच्या त्याच्या उत्तुंग भराऱ्या त्यांत दृष्टोत्पत्तीस येतात, त्याच्या भक्तिरसानें तुडुंब वाहत असलेल्या अन्तःकरणाचा ठाव लागतो, जगास दिपवून टाकणारे व तर्कशक्तीस अगम्य असलेले असे अध्यात्मशास्त्रांतील अनेकविध अनुभव त्यांत दिसून येतात, परमार्थ व व्यवहार यांचा इतरत्र कोठेंहि न आढळणारा उत्कृष्ट मिलाफ त्यांत पहावयास सांपडतो. त्यांतल्या त्यांत परमार्थास व्यवहाराची दिलेली जोड ग्रंथराज दासबोधांत जशी आढळते, तशी ती इतरत्र कोठेंहि आढळत नाहीं, हेंच दासबोधाचें वैशिष्ठ्य आहे.

या ठिकाणीं पण तो परमार्थ साधतांना जीं व्यावहारिक साधनें श्रीसमर्थांनीं उपयोगांत आणलीं त्यांचाहि या ठिकाणीं विचार कर्तव्य आहे. यामुळेंच त्यांच्यांत व इतर संतांत अंतर पडलें आहे. सर्वच संतांनीं अध्यात्माबरोबर व्यवहारहि जगास शिकविण्याचा प्रयत्न केला, पण श्रीसमर्थ जसे देशकालानुरूप व्यवहाराच्या अगदीं बारीकसारीक तपशिलांत शिरले तसे इतर संत दिसत नाहींत. नाहीं म्हणावयास श्री एकनाथ मात्र थोडेसे अपवाद ठरतील. त्यांनीं व्यावहारिक जगाची थोडीशी दखल घेतलेली दिसते. पण श्रीसमर्थांइतके जगाच्या व्यवहारांत अगदीं खोलांत श्रीनाथ शिरलेले दिसत नाहींत. त्याचमुळें श्रीसमर्थ व इतर संत यांच्या शिकवणींत अंतर पडलें.

परोपकार करावा हें सर्वच संतांनीं अगदीं कंठरवानें सांगितलें आहे. परमार्थप्राप्तीच्या साधनांपैकीं हें एक मोठें साधन आहे. 'परोपकारः पुण्याय' हें वचन प्रसिद्धच आहे. पण तो करण्याच्या बाबतींत जें तारतम्य, जी दूरदृष्टि राखावयास पाहिजे ती श्रीसमर्थांच्या ठायीं जशी काटेतोल राखलेली दिसते, तशी इतरांच्यांत दिसत नाहीं. श्रीसमर्थ व इतर संतांच्या मनाच्या ठेवणींतील भेद येथें स्पष्टपणें दिसून येतो. परोपकार करा हें इतरांप्रमाणें श्रीसमर्थहि पदोपदीं सांगतात. पण तो कोणावर ? तर

जाणत्यास करावा उपकार । १८.२.४

व्यवहारचातुर्यानें भरलेली वरवर साधी पण परिणामीं महत्त्वाची अशी ही शिकवण श्री समर्थांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणी जनतेस दिली आहे काय ? सर्वांवर सरसकट उपकार केल्यानें—सुष्टांवर तसाच दुष्टांवर, मित्रांवर तसाच शत्रूंवर,—भारताची काय दशा काय झाली व अजून होत आहे हें इतिहासांत व आजहि दिसून येत आहे. महंमद घोरीला अनेकदां खडे चारून त्याला प्राणदान देणाऱ्या पृथ्वीराज चौहानानें 'जाणत्यास करावा उपकार' हें श्री समर्थांचें व्यवहारास पूर्णपणें धरून असलेलें तत्त्व जर पूर्णपणें आचरणांत आणलें असतें, तर भारताची व सनातन धर्माची दुर्दशा होती ना ! पृथ्वीराजाप्रमाणेंच तदनंतरच्या अनेक

रजपूत वीरांनीं धर्मवेड, क्रौर्य व कत्तल यांत आनंद मानणाऱ्या मोहम्मदीयांबरोबर वागतांना हें तत्त्व अमलांत आणलें असतें, तर भारतीयांस पश्चात्तापानें पोळण्याची पाळी आली नसती, आज प्रत्यहीं दिसत असलेल्या राजकारणांतील कटकटी कधींच ऐकूं आल्या नसत्या, भारताच्या विभक्तीकरणांची भाषाच उत्पन्न झाली नसती व त्याचा इतिहास निराळाच लिहिला गेला असता. पण हिंदुस्थानच्या दुर्दैवानें श्रीसमर्थांचे अवतारापर्यंत हें व्यावहारिक तत्त्वज्ञान त्यांस कोणी शिकविणारा नेता मिळाला नाहीं, व त्यांच्यानंतर तें समजून घेऊन कोणी आचरणांत आणलें नाहीं म्हणून,

देखत देखत घरांत शिरला पहा फिरंगी बोका ।

अशी स्थिति झाली. या पांढऱ्या पायाच्या अवदसेशीं श्रीसमर्थशिष्य अमात्य रामचंद्रपंत* बावडेकर यांच्या सावधगिरीच्या सूचनेप्रमाणें जर त्या कालीं महाराष्ट्र वागला असता तर त्याला व त्याच्याबरोबर सर्व भारताला पश्चात्तापानें,

फारच बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच ।

अशी द्रौपदीप्रमाणें धाय मोकलीत रडण्याची पाळीच आली नसती. वरील मासल्याचें आणखी एक उदाहरण वाचकांपुढें ठेवितोंः--

अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोनि चालावें ।
हठ निग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ १८.६.७

लौंद, बेइमानी, कपटी, कदापि वचनी सत्य नसणाऱ्या राक्षसी वृत्तीच्या अफझुलखाच्या भेटीच्या पूर्वी श्रीसमर्थांनीं हा इशारा श्रीछत्रपतीस दिलेला आहे. श्रीछत्रपती या प्रसंगी जशास तसेच वागले म्हणून प्रसंग निभावला. श्रीछत्रपती 'शठं प्रति शाठ्यम्' न्यायाने न वागते तर प्रसंग काय ओढवला असता याची कल्पनाच करणें बरें ! श्रीछत्रपतींचा सरल स्वभाव जाणूनच श्रीसमर्थांनीं त्यांस अगोदर जाग्रत केलें होतें. यांतच त्यांचें व्यवहारचातुर्य दिसून येतें. दुसऱ्या कोणीहि ही नीति राष्ट्रास शिकवलेली नाहीं. परकीयांशीं सामना सर्व बाबतींत देतांना श्रीसमर्थांची ही अमोलिक शिकवण हिंदुस्थानानें सतत डोळ्यापुढून हलूं दिली नसती तर, तसेंच भोळसर धार्मिक भावनांचा अतिरेक होऊं दिला नसता तर काय बरें

* हे थोर मुत्सद्दी व वीराग्रणी श्रीसमर्थसांप्रदायिक होते. त्यांनीं करवीरकर संभाजी राजे यांस राजनीतिविषयक उपदेश केला आहे. वाचकांनीं तो सर्व वाचावा. प्रस्तुत प्रकरणीं त्यांतील ५० व्या प्रकरणाचा संबंध आहे. त्याचें सार "टोपीकार बरकड सावकारांसारखे नव्हेत" असें आहे. अशी धोक्याची सूचना अमात्यांनीं त्यांत दिली आहे.

मौज झाली असती ? युद्धांतसुद्धां नीति असावी. पण केव्हां ? सामनेवाला जर नीतीची चाड बाळगणारा असला तर ! पण तो जर नीति कोळून प्यालेला असेल तर त्याच्याशीं या धर्मभावनांचा व बंधनांचा काय उपयोग ? अक्षरशः हजार वर्षें अटीतटीचें युद्ध धर्मासाठीं व देशासाठीं करून भोळ्या रजपुतांस ही ' जशास तसें ' ही नीति कळली नाहीं. याचा परिणाम देशाच्या व धर्माच्या नाशांत झाला. पण श्रीसमर्थांसारखा

जैशास तैसा जेव्हां भेटे। तेव्हां मज्यालसी थाटे।

अशी नीति राष्ट्रास शिकविणारा नेता भेटल्याबरोबर पारडें कसें उलटलें हें सांगणें नकोच. पुढाऱ्यांचे असले पाठ जनतेस मिळूं लागल्याबरोबर राष्ट्रास कांहीं काळ तरी स्वातंत्र्याची गोड फळें चाखावयांस मिळालीं, व त्यामुळेंच पारमार्थिक कृत्यांसहि जोर आला. याचें स्पष्ट चित्र श्रीसमर्थांनीं गायिलेल्या ' आनंदवनभुवन ' प्रकरणांत पहावयांस मिळतें. श्रीशिवरायांच्या राज्याभिषेकानंतर महाराष्ट्रांत जें रामराज्याचें सुख लोकांनीं अनुभविलें त्याचें हें गोड वर्णन आहे. हें महाराष्ट्राचें राष्ट्रगीत आहे. राष्ट्रासाठीं अहोरात्र ५० वर्षें हाडाचीं काडें ज्यानें केलीं त्या महापुरुषाच्या— श्रीसमर्थांच्या— तोंडून महाराष्ट्रमहोदयाचे हे हर्षभरानें निघालेले उद्गार आहेत. त्यांतले कांहीं येथें दिल्याशिवाय राहवतच नाहीं म्हणून देतों:—

बुडाले सर्व हि पापी। हिंदुस्थान बळावलें।
अभक्तांचा क्षयो जाला। आनंदवनभूवनीं[१] ॥

बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छसंहार जाहला।
मोडलीं मांडलीं क्षेत्रें। आनंदवनभूवनीं ॥

बुडाले भेदवाही[२] ते। नष्ट चांडाळ पातकी।
गळाले पळाले मेले। जाले देशधडी पुढें।
निर्मळ जाहली पृथ्वी। आनंदवनभूवनीं ॥

उदंड जाहलें पाणी। स्नानसंध्या करावया।
जप तप अनुष्ठानें। आनंदवनभूवनीं ॥

रामवरदायिनी[३] माता। गर्द घेऊनि ऊठली।
मर्दिले पूर्वींचे पापी। आनंदवनभूवनीं ॥

---

१. श्री समर्थांनीं महाराष्टाला दिलेलें लाडकें नांव. याचा मूळचा अर्थ काशी. सबंध महाराष्टच काशीसारखा पवित्र आहे हा भावार्थ.

२. चंद्रराव मोऱ्यांसारखे फितुरी लोक, ३. तुळजापूरची भवानी,

प्रत्यक्ष चालली राया[1] । मूळमाया समागमें ।
नष्ट चांडाळ[2] ते खाया । आनंदवनभूवनीं ॥

असें कोठवर द्यावें हें स्तोत्र ?

श्रीसमर्थांनीं राष्ट्रास परमार्थ शिकवितांना आपल्या डोळ्यांपुढून राष्ट्रास क्षणभर देखील दूर केलेलें दिसून येत नाहीं. त्यांची प्रत्येक कृति व्यवहारास धरून जनतेस परमार्थाकडे नेण्याची होती. परमार्थास पोषक व राष्ट्रासहि पोषक अशीच त्यांची शिक्षा होती. याच दृष्टीनें त्यांनीं आपला नवा संप्रदाय काढला, व कार्यकर्ती माणसें तयार केलीं. तीं करण्यासाठीं जी शिकवण त्यांनीं दिली ती इतर संतांत दिसत नाहीं. असें म्हणावयास मन कचरत नाहीं कीं, महाभारतानंतर राष्ट्रास पारमार्थिक गोष्टींबरोबरच जगाचा व्यवहार तितक्याच आस्थेनें शिकविणारा दासबोधाशिवाय दुसरा एकहि ग्रन्थ या भरतखंडांत झाला नाहीं. निदान महाराष्ट्रवाङ्मयांत तरी झाला नाहीं. महंताचा—कार्यकर्त्याचा—दैनंदिन कार्यक्रम कसा असावा याबद्दल दासबोधांत दोन ठिकाणीं दोन व्याख्यानें श्रीसमर्थांनीं कार्यकर्त्यांपुढें दिलीं आहेत. २० व्या शतकांतील एखादा पुढारी दैनिक कार्यक्रमाबद्दल या कालांत देशभक्तीनें प्रेरित झालेल्या तरुण कार्यकर्त्यांस जसा उपदेश करील, त्याच थाटाचा दिनक्रम या दोन व्याख्यानांत – समासांत – आहे. श्रीसमर्थांना नुसताच परमार्थ हवा असता तर त्यांनीं या दोन समासांत दिलेल्या पुष्कळच गोष्टी गाळल्या असत्या. पण त्यांना केवळ परमार्थच नको होता; परमार्थाबरोबर इतरहि पुष्कळ गोष्टींनीं व गुणांनीं जनता संपन्न व कार्यक्षम व्हावी ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. तिला अनुसरून कार्यकर्त्याला त्यांनीं जो दैनिक कार्यक्रम आंखून दिला आहे त्याचें तपशीलवार वर्णन या दोन समासांत आहे. हे दोन समास म्हणजे ११ व्या दशकाचा ३ रा व १२ व्या दशकाचा ९ वा समास हे होत. राष्ट्राला शिकवावयाच्या अगदीं लहानसहान गोष्टींतहि श्रीसमर्थ कसे दक्षतेनें लक्ष घालीत, हें यांवरून अगदीं स्पष्ट दिसून येतें. या दोन समासांचीं नांवें 'शिकवण निरूपण' व 'येत्नसिकवण' अशीं अनुक्रमें आहेत. यांत केलेल्या सूचना कार्यकर्त्यानें स्वत: आचरून इतरांकडून करवून घ्यावयाच्या आहेत. श्रीसमर्थ त्यांत सांगतात कीं, (१) प्रातःकालीं उठा, (२) कांहीं पाठांतर करा, (३) यथाशक्ति प्रार्थना करा, (४) प्रातर्विधि आटोपून नित्यकर्म करा, (५) नंतर अल्पोपहार घ्या, (६) मग आपला उद्योगधंदा एकाग्रतेनें करा, (७) तो करीत असतांना लोकांशीं गोड बोला, (८) आलस्य टाकून द्या, (९) मग दोन प्रहरचें भोजन, (१०) त्यानंतर एकान्तात ग्रन्थवाचन व लोकान्तांत त्यांची चर्चा करा, (११) एक क्षणहि व्यर्थ दवडूं नका व पुन. आपला प्रपंचव्यवसाय पहा,

१. श्री शिवरायांबरोबर, २. श्रीसमर्थांचा हा एकीएक लाडका अपशब्द.

( १२ ) प्रत्यहीं कांहीं तरी कमाई केल्याशिवाय फुकटचें खाणें योग्य नाहीं, ( १३ ) संकटग्रस्तांची वास्तपुस्त करा. ( १४ ) दुसऱ्याच्या उपयोगी पडा इत्यादि शिकवण ११. ३ मध्यें आहे. १२. ९ मध्यें असाच उपदेश आहे. कांहीं बाबी त्यांत जास्त आहेत. ( १५ ) अक्षर सुंदर असावें, ( १६ ) वाचन अस्खलित असावें, ( १७ ) गायनकला सांग संपादावी, ( १८ ) हावभावासहित वक्तृत्वकला अभ्यासावी, ( १९ ) साहित्य संपादावें, ( २० ) लोक ( Masses ) आपल्याकडे आकृष्ट होतील असें बोलणें चालणें असावें, इत्यादि यांतील बहुतेकांचा परमार्थाशीं कांहीं एक संबंध नाहीं. तरी पण श्रीसमर्थांस त्या गोष्टी अगत्यानें हव्या आहेत. इतक्या कीं, यांतील पुष्कळांस त्यांनीं आपल्या संप्रदायाच्या लक्षणांत जागा दिली आहे. कारणें उघड आहेत. महंतकार्यकर्ता जर असेल गुणांनीं संपन्न, कलावान्, चारित्र्यवान्, स्वावलम्बी, कष्टाळू, शिस्तीचा, आळसास वाव न देणारा, कामसू व मिष्ठास वाणीचा असेल तरच तो जनतेस राष्ट्रकार्यप्रवण करण्यास क्षम होईल अशी केवळ व्यावहारिक दृष्टि हा दैनिक कार्यक्रम कार्यकर्त्यापुढें ठेवण्यांत श्री समर्थांची होती. या समासांतील एकच ओंवी चर्चेकरितां घेतों :-

गाणें वाजवणें नाचणें । हस्तन्यास दाखवणें ।<br>
सभारंजकें वचनें । आडकथा छंदबंद ॥ १२. ९. १९

नुसत्या परमार्थाचाच विचार करणें असल्यास त्याशीं या ओंवींतील कोणत्याच गोष्टीचा तसा तादृश प्रत्यक्ष संबंध नाहीं. पण श्रीसमर्थांनीं महंताच्या अंगीं या सर्व ललितकला अवश्य पाहिजेत असें आपल्या ग्रन्थांत अनेकदां प्रतिपादलें आहे. यांत त्यांची केवळ व्यावहारिक दृष्टि होती. या कलांचा जनतेला आपल्याकडे आकृष्ट करण्यांत कार्याच्या प्रारंभीं प्रारंभीं किती बाहुल्यानें उपयोग होतो, याची प्रचीति विद्यमान काळांतहि येते. श्रीसमर्थांनीं हें सर्व आधींच जाणून ठेविलें होतें, व त्या त्या ललितकला स्वतः अभ्यासून, आपल्या शिष्यांस व प्रशिष्यांस त्यांत शक्य तों प्रवीण होण्यास आज्ञापिलें होतें. सार्वजनिक कार्यांतील या कलांचा उपयोग व महत्त्व जाणून त्या आपणांस प्राप्त व्हाव्या म्हणून,

आळाप गोडी दे रे राम ।

अशी प्रार्थना व मागणें देवाजवळ एके ठिकाणीं मागितलें आहे. या त्यांच्या मागण्यांत व्यावहारिक दृष्टीच अधिक होती हें त्यांच्या यासंबंधीच्या अनेक उद्गारांवरून म्हणणें प्राप्त होतें. आपला स्वतःचा काळ 'सार्थक करावयाचा' हें तर खरेंच पण तो 'जनासहित करावयाचा' हा श्रीसमर्थांचा दंडक असे. हेंच त्यांच्यांत व इतरांच्यांत अंतर.

याच दृष्टीनें श्रीसमर्थांचे समकालीन संत श्रीतुकोबाराय यांचा या गायनादि ललितकलांबद्दल अभिप्राय पाहूं या. एके स्थळीं श्रीतुकाराम महाराज म्हणतातः—

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥
नाहीं तयाविणें भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल पांडुरंग ॥

परमार्थदृष्टीनें विचार केला तर श्रीतुकोबारायांचा हा अभिप्राय त्रिवार सत्य आहे. खरोखरच भक्ताच्या भावाव्यतिरिक्त इतर कोणत्याहि गोष्टीसाठीं देव हपापलेला नाहीं. तो केवळ भक्ताचें अन्तःकरण पहातो. तें आपल्याकडे पूर्णतया असलें म्हणजे देवाला तेवढें बस्स आहे. मग असला एकनिष्ठ भक्त आपलें भजन शास्त्रोक्त मधुर कंठानें गातो का भसाड्या आवाजानें गातो, याची देवाला पर्वा नाहीं अशी दृष्टि श्रीतुकोबारायांची आहे. पण श्रीसमर्थ मात्र तेवढ्यावर संतुष्ट नाहींत. त्यांना केवळ शुद्धान्तःकरणाचा प्रेमळ एकनिष्ठ भक्त नको आहे. तो तर तसा पाहिजेच, पण त्यांबरोबरच तो सुंदर गाणारा पाहिजे, आपल्या हावभावांनीं, आपल्या नृत्यादि कलांनीं सामान्य जनतेस आपल्याकडे वश करणारा पाहिजे, तो चांगला वक्ता पाहिजे, आडकथा छंदबंध जाणणारा असा बहुश्रुत पाहिजे, मोठा साहित्यिक पाहिजे व आणखीहि अनेक कलाकुसरींनीं संपन्न असा पाहिजे. कारण, श्रीसमर्थांस देवधर्माबरोबर देशाकडेहि पहावयाचें होतें. हें कार्य करण्यासाठीं चतुर अशीं कर्तृत्ववान् माणसें पाहिजे होतीं व त्यांच्या करवीं तमाम जनतेला देवभक्तीबरोबरच विशेषतः देशभक्तीचे धडे देण्याचें प्रचंड आंदोलन करावयाचें होतें.

जगदुद्धार हेंच सर्व संतांच्या आयुष्याचें एकमेव ध्येय असतें. त्यांचा अवतार त्याचसाठीं असतो. श्रीसमर्थांचेंहि हेंच ध्येय होतें हें सांगणें नको. ‘ हेळामात्रें जग उद्धरीन ’ ही त्यांची प्रतिज्ञा होती, ‘ रामकथा ब्रह्मांड भेदूनि पैलाड न्यावयाची ’ ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती, पण त्यासाठीं एक अभिनव संप्रदाय स्थापून श्रीसमर्थांनीं आपल्या शिष्यप्रशिष्यांस पारमार्थिक व विशेषतः व्यावहारिक गोष्टींत एक कडक शिस्त व पद्धत लाविली व त्यांच्या करवीं ती सर्व महाराष्ट्रांत प्रसृत केली. तसेंच ती करतांना देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं त्याच्या अगदीं लहानसहान गोष्टींकडे जागरूकतेनें पाहिलें. इतर संतांनीं तसें केलेलें दिसून येत नाहीं. आपल्या शिष्याकडे आणि परमार्थाला पोषक इतरहि क्षुद्र दिसणाऱ्या त्याच्या खासगी गोष्टींकडे ते अगदीं बारकाईनें साक्षेपपूर्वक पाहात. श्रीसमर्थांस सर्व कांहीं सुंदर पाहिजे असे. आजच्या सर्व पुढाऱ्यांनीं श्रीसमर्थांच्या पुढील उक्तीचें एकाग्र चित्तानें मनन करावें. कार्यकर्ता कसा पाहिजे तरः—

अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर ।
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ॥ ११.६.११

असा पाहिजे. याला म्हणतात खरी सौंदर्योपासना व कलादृष्टि ! श्रीसमर्थांची ही दृष्टि कोठें व आधुनिकांची दृष्टि कोठें !

श्रीसमर्थांचे हे व एतत्सदृश अनेक उद्गार वाचले म्हणजे त्यांच्या कालीं त्यांच्या तालमींत तयार झालेल्या असल्या कार्यकर्त्यांनीं केवढें सुंदर राष्ट्रकार्य केलें याची पूर्ण कल्पना त्यांच्या 'आनंदवनभुवन' प्रकरणांतील कांहीं उद्गारांत दिसते. सर्व बाजूंनीं राष्ट्रोन्नति व्हावी म्हणून अगदीं साध्या गोष्टींतदेखील श्रीसमर्थांसारखा अट्टाहास त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीं केला आहे काय ?

परमार्थमार्गांत इतर दुसरीं कोणतींहि पथ्यें साधकानें न पाळलीं तरी चालतील. पण 'परद्रव्य परनारीचें' पथ्य अवश्य पाळलेंच पाहिजे. या दोन पथ्यांच्या भरभक्कम पायावरच खऱ्या परमार्थाची इमारत उभारली जाते. जगांत होऊन गेलेल्या आतापर्यंतच्या सर्व साधुसंतांनीं एकमुखानें हेंच प्रतिपादिलें आहे. श्रीतुकोबारायांनीं म्हटलें आहे कीं,

परद्रव्य परनारी यांचा । धरी विटाळ ॥

श्रीसमर्थहि

परद्रव्य आणीक कांता परावी । येदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥

असेंच सांगतात. वारकरी संतांचा या दोनहि पथ्यांबाबत अगदीं सक्त कटाक्ष आहे, पण श्रीसमर्थांनीं द्रव्याबाबत थोडीशी सवलत कार्यकर्त्यांस ठेविली आहे. कथाकीर्तनें करून द्रव्य घेणारे व त्यांस तें त्यासाठीं देणारे असे उभयतांहि नरकास जातात, असें वारकरी संतांनीं निष्ठुरपणें बजाविलें आहे. तर स्वत:

दिल्या द्रव्य घेऊं नये । १४.१

असें 'निःस्पृहाला' सांगणारे श्रीसमर्थ; कीर्तनकारानें

काय देतिल तेंचि घ्यावें । कोणा कांहीं न मागावें ॥

तसेंच,

किंचित् दिलें दातयानें । तेंहि घेत आनंदानें ॥

असें सांगत आहेत. श्रीसमर्थांच्या या सांगण्यामुळें वारकऱ्यांचा त्यांच्यावर राग आहे. पण विचारान्तीं तो अनाठायीं आहे, असें विचारवन्तास पटेल. 'कोणास कांहींच न मागावें' व मग यदृच्छया येईल त्या अल्पस्वल्पाचा स्वीकार महंतानें—कार्यकर्त्यानें—करावा असें श्रीसमर्थांचें मत आहे. यांत श्रीसमर्थांनीं कार्याकडे लक्ष ठेवून, या व्यावहारिक दृष्टीचा स्वीकार केलेला दिसतो. परमार्थाला पोषक असें ऐहिक कार्य करून दाखवावयाचें आहे, त्याला द्रव्याची आवश्यकता लागणारच. कार्यकर्त्यांच्या व्यावहारिक योगक्षेमाची काळजी व व्यवस्था, ज्याच्यासाठीं तो

सर्व स्वावर तुळशीपत्र ठेवून हें कार्य करतो त्या समाजानें केली नाहीं, तर त्या कार्यकर्त्यांच्या हातून तें जनसेवेंचें कार्य तितक्या एकचित्तानें व उत्कटत्वानें होणें शक्य नाहीं, हें दूरदर्शित्वानें जाणून श्रीसमर्थांनीं ही थोडीशी सवलत त्याच्यासाठीं ठेविली आहे. उदरनिर्वाहापुरतेंच कार्यकर्त्यानें स्वीकारावयाचें आहे ही त्यांतील दृष्टि विसरतां कामा नये. आजच्या काळांत केवळ राष्ट्रकार्यास ज्यांनीं सर्वस्वीं वाहून घेतलेलें आहे त्यांच्यासाठीं त्या त्या संस्थांकडून जशी गौरव वेतनाची (Honourarium) व्यवस्था केली जाते, तशासारखाच हा प्रकार श्रीसमर्थांनीं त्या कालीं त्या वेळच्या परिस्थितीस अनुसरून चालू केला असला पाहिजे, हें उघड आहे.

अशा आणखी किती तरी साध्या पण परिणामीं महत्त्वाच्या गोष्टी दाखविता येतील. त्यांना परमार्थ–साधनाच्या दृष्टीनें वास्तविक मुळींच किंमत नाहीं, पण व्यवहाराच्या दृष्टीनें अतिशय महत्त्व आहे. श्रीसमर्थांनीं त्यांचा तसा उपयोग करून घेतला आहे. येवढेंच नव्हे तर त्या गोष्टींना आपल्या संप्रदायाच्या लक्षणांत गोविलें आहे. 'पाठांतराचेंच' लहानसें उदाहरण वाचकांपुढें ठेवितों. मोक्षसाधनांत त्याचा अल्पस्वल्प उपयोग आहे; नाहीं असें नाहीं. श्रीतुकाराम महाराजांनींसुद्धां म्हटलें आहे कीं,

कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें ।

पाठांतराच्या अभावीं मनुष्य खरा परमार्थी होणार नाहींच असें नाहीं. पण समाजाची नाडी अचूकपणें पारखणाऱ्या श्रीसमर्थांस हें मान्य नाहीं. प्रातःकालीं उठल्याबरोबर पहिलें काम श्रीसमर्थांनीं पाठांतराचें सांगितलें आहे. पण 'कांहीं पाठांतरानें' त्यांचें समाधान न झाल्यानें दुसऱ्या स्थळीं ते महंतास सांगतात कीं,

उदंड करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रन्थांतर ।

किंवा,

पाठ उदंड चि असावे । सर्व काळ उजळीत जावे । १८.३.१९

जनतेंत जागृति करण्यास वेंचक पाठांतराचा अतिशय उपयोग होतो हें जाणून श्रीसमर्थांनीं देशकार्यांत त्याचा भरपूर उपयोग करून घेतला. त्यांच्या संप्रदायांत एकापेक्षां एक जबरदस्त पाठांतरी होते.

उदंड जयाचें पाठांतर । श्लोकादि चौऱ्यांशी हजार ।

असें गिरिधरांनीं स्वतः शिवरामांचें 'प्रतापा'त वर्णनच केलें आहे. कार्यकर्त्याजवळ जर पाठांतराचा अमूप सांठा असेल तर त्यांच्या वाणीला अमोघ तेजस्विता

येते, त्यामुळें त्याची प्रबोधशक्ति वीर्यवती होते, व श्रोत्यांवर त्याची विलक्षण मोहिनी पडते. सारांश, समाजांत जागृति उत्पन्न करण्याच्या साधनांत पाठांतरास फार महत्त्वाचें स्थान आहे हें श्रीसमर्थांस अनुभवानें अवगत होतें.

सर्वच संतांनीं परमार्थ वाढविला होता; आपल्या मागें तो टिकावा म्हणून आपल्या थोड्या शिष्यांसहि आपणानंतर तो वाढविण्यास अनुज्ञा दिली होती असें भिन्न भिन्न संप्रदायांच्या इतिहासावरून दिसतें. श्रीसमर्थांनींहि पण तसें केलें. पण त्यांच्या करण्यांत व इतर संतांच्या करण्यांत महदंतर आहे. आपल्या स्वतःच्या राजवटींत, आपल्या देखत आपल्या शिष्यांना परमार्थ वाढविण्याची अनुज्ञा, अपवादात्मक उदाहरणें सोडून दिल्यास, कोणी फारशी दिल्याचें ऐतिहासिक वा विद्यमान कालांतहि दिसून येत नाहीं. याचें कारण असें असूं शकेल कीं, आध्यात्मिक पारंगतेंत गुरूच्या तोडीचे शिष्य फारच कमी असणार. श्रीसमर्थांसहि हें माहीत होतेंच. असें असतांना त्यानीं या पूर्वपरंपरेकडे दुर्लक्ष करून निराळाच मार्ग कां आंखला ? त्यांची शिष्यशाखा इतरांच्या प्रमाणें मोजकी नव्हती. ती हजारांनीं मोजण्यासारखी होती. या शिष्यांपैकीं बऱ्याच मंडळींना समुदाय वाढविण्यास श्रीसमर्थांची पूर्ण संमति होती व तो ते वाढवीत होते. येवढेंच नव्हे तर या शिष्यांच्या शिष्यांनींहि संप्रदाय वाढविण्याचें काम श्रीसमर्थांच्या देखत चालविलेलें होतें. तें हतकें कीं, श्रीसमर्थांनीं आपल्या आयुर्मानांत आपल्या ज्ञानवंशाची ११ वी पिढी पाहिली होती, असें 'प्रताप' कार गिरिधरांनींच लिहून ठेविलें आहे. स्वतः गिरिधर हे श्रीसमर्थांपासून ४ थे पुरुष. श्रीसमर्थ–वेणाबाई – बाइयाबाई – गिरिधर. तेव्हां गिरिधरांनीं केलेलें हें वर्णन अतिशयोक्तीचें वाटत नाहीं. 'प्रतापां'त वर्णन असें आहे कीं, कोणी एक ज्ञानवैराग्यसंपन्न असा भगवगीत महंत श्रीसमर्थदर्शनास सज्जनगडीं एकदां आला असतांना,

श्रीसमर्थें महंतासी पिढी पुसली ।

तेव्हां महंत उत्तरतो कीं,

अकरावी पिढी श्रीसमर्थदेवा ।

आतां हे सर्वच शिष्य प्रशिष्य व त्यांचें शिष्य श्रीसमर्थांइतके अध्यात्मज्ञानांत पारंगत होते असें मानणें समंजसपणाचें होणार नाहीं. मग प्रश्न असा उद्भवतो कीं, श्रीसमर्थांनीं असें कां केलें ?

उपाधीस देखोनि वाटे सरावें ।

असें म्हणणारे श्रीसमर्थ लौकिकासाठीं वा विनाउद्देश उपाधीच्या – म्हणजे संप्रदाय वाढविण्याच्या पाठीमागें लागले असतील असें म्हणणें म्हणजे 'विचारूनि बोले

विवंचूनि चाले ' या त्यांच्या बाण्यास बट्टा आणल्यासारखें होईल. तेव्हां या प्रश्नाचें उत्तर असें कीं, श्री समर्थांच्या पुढें केवळ धर्मकार्यच नव्हतें तर पारतंत्र्यामुळें नष्ट होण्याच्या मार्गास लागलेला तो धर्म जगविण्यासाठीं स्वातन्त्र्य पाहिजे होतें व तें कसें मिळवावयाचें असा दुसरा देशाचा प्रश्नहि त्यांच्यापुढें होता. त्या देशाच्या उद्धारासाठीं विशिष्ट पद्धतींत तयार झालेले कार्यकर्ते त्यांना पाहिजे होते. त्यासाठीं त्यांनीं प्रथम उद्धव, कल्याण, दत्तात्रय, दिवाकर, दिनकरादि कांहीं शिष्य केले. त्यांस परमार्थ तर दिलाच, पण त्याबरोबरच देशाचाहि विचार करण्यास शिकविलें, व त्यांकरवीं हजारोंना संप्रदायी बनविलें व राष्ट्रोद्धाराचें प्रचंड कार्य करून दाखविलें. यालाच उद्देशून त्यांनीं दासबोधांत

लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले । १५. २. २६

अथवा

किती लोक तें कळेना । किती समुदाय आकळेना । १९. १०. ११

इत्यादि उद्गार काढले आहेत. संप्रदाय एवढ्या मोठ्या प्रमाणांत वाढविण्यांत श्रीसमर्थांचा काय हेतु असावा हें सांगण्यास एवढें विवेचन पुरेसें आहे.

केवळ परमार्थ साधण्यास शारीरिक सामर्थ्याची विशेष आवश्यकता आहे असें नाहीं. युक्ताहारविहार असला म्हणजे साधकाचें काम भागतें. सर्व संतांनीं हेंच केलें व हेंच उपदेशिलें. पण श्रीसमर्थांनीं इतर गोष्टींप्रमाणें या बाबतहि अगदीं निराळाच मार्ग अवलंबिला. एकान्तांत बसून, सभोंवतालच्या परिस्थितीविषयीं पूर्णतया उदासीन राहून, साक्षात्कार करून घेणारा साधक त्यांना नको होता व हें करण्यास विशेष शारीरिक बलाची आवश्यकताहि लागत नाहीं. पण त्यांना हवा असणारा साधक निराळ्या प्रकारचा होता. नित्यनूतन हिंडणारा, भिक्षामिसें लहान थोरें परीक्षणारा, उदंड पर्यटन करणारा, नित्य नवे संप्रदायी करणारा, प्रत्यहीं कांहीं उपाधि—व्याप—समुदाय वाढविणारा, असा चळवळ्या कार्यकर्ता त्यांना पाहिजे होता. हें काम येरा गबाळाचें नव्हे हें सांगणें नकोच. प्रत्यहीं नित्य नूतन लोक शोधणारा माणूस शरीरानें व मनानें चांगलाच सणसणीत असला पाहिजे तरच त्याच्या हातून हें सर्व निभावेल. हें जाणूनच श्रीसमर्थ करुणाष्टकांत एका स्थळीं म्हणतात कीं,

हरिभजन कराया पाहिजे दृढ काया ।

शक्तीविना धड संसारहि होत नाहीं, मग राजकारणादि महत्त्वाच्या गोष्टी कशा होणार ? परमार्थाबरोबर याहि गोष्टी साधण्याकरितां श्रीसमर्थांनीं जशी शक्तीची उपासना — बलसंवर्धनाची चळवळ — केली तशी सबंध महाराष्ट्रांतच काय पण

उभ्या भारतवर्षांत त्या कालीं दुसऱ्या कोणी केलेली इतिहास सांगत नाहीं. कसल्या ओजस्वी शब्दांनीं त्यांनीं ' शक्ती ' चें महत्त्व वर्णिलें आहे तें पहाः—

शक्तीनें पावती सुखें । शक्ति नस्तां विटंबना ।
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥

सार संसार शक्तीनें । शक्तीने शक्ति भोगिजे ।
शक्ति तो सर्वहि भोगी । शक्तीवीण दरिद्रता ॥

शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें येत्न होतसे ।
शक्ति युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धांवती ॥

एके ठिकाणीं त्यांनीं महाराष्ट्रास सूचना दिली आहे कीं,

शक्तीविण कोण आहे । हें तों विचारून पाहे ।
शक्तीविरहित न राहे । येश कीर्ति प्रताप ॥

पण लक्षांत कोण घेतो ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
अनुक्रम ...... दि. ......
क्रमांक ......

श्रीसमर्थांनीं आपल्या संप्रदायाच्या लक्षणांच्या मुख्य चतुःसूत्रींत प्रामुख्यानें उल्लेख केलेली आहे अशी आणखी एक बाब आहे. श्रीसमर्थ ती बाब आपल्या कार्यक्षेत्रांतून वगळते तर त्यांच्यांत व इतरांच्या शिकवणींत मुळींच अंतर पडलें नसतें. याच एका विशिष्ट बाबीमुळें श्रीसमर्थ महाराष्ट्रांतीलच नव्हे, तर सबंध भारतवर्षाच्या ऐतिहासिक व आधुनिक काळांतील सर्व संतांपेक्षां अगदीं निराळे पडतात. जगाच्या हिताची अहर्निश काळजी वाहणाऱ्या श्रीसमर्थेतर सर्व संतांनीं ही एकच विशिष्ट बाब आपल्या शिकवणींतून नेमकी खड्यासारखी कां वगळावी ? वस्तुतः तिच्या अभावीं कोणाचाहि अभ्युदय वा कोणाचेंहि निःश्रेयस सुरक्षित नाहीं, हें त्यांस पूर्णपणें माहीत असलेंच पाहिजे. मग तो अभ्युदय वा तें निःश्रेयस व्यक्तीचें असो वा राष्ट्राचें असो. श्रीसमर्थांनीं तर ती धर्माच्याच जोडीला आणून आपल्या संप्रदायाच्या मुख्य चतुःसूत्रींत तिला दुसरें स्थान दिलें आहेः—

मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण । ११–५–४

परकीयांचा, आर्यसंस्कृतीहून सर्वस्वीं भिन्न अशी ज्यांची संस्कृति ( ? ) आहे अशा परधर्मीयांचा पाय भारतांत शिरल्यानंतर या ' राजकारणास ' भलतेंच महत्त्व प्राप्त झालें. तें इतकें कीं, त्याचा विचार केल्याशिवाय इतर गोष्टींचा विचार करणें अशक्य होऊन बसलें. ' स्वराज्यच नाहीं तर कोठला धर्म आणि कोठला मोक्ष ? परकीय अशा परधर्मीयांच्या जुलमी सत्तेखालीं कशाचीच वाढ होणें शक्य नाहीं. इतकें या ' राजकारणाचें ' महत्त्व राष्ट्राच्या प्रपंचांत असतें हें तत्कालीन

संतांपैकीं एकट्या श्रीसमर्थांनींच आकळिलें व त्याला संप्रदायाच्या मुख्य चार लक्षणांत हरिकथानिरूपणाच्या खालोखाल स्थान दिलें. व आपापल्या मगदुराप्रमाणें प्रत्येक सांप्रदायिकानें तें आचरणांत आणावयास पाहिजे असा आग्रहाचा संदेश दिला. स्वातंत्र्याच्या अभावीं, परकीयांच्या जुलमी जोखडाखालीं देवाधर्मांची व जनतेच्या संसाराची कसली भयंकर विटंबना झाली होती व होत होती हें श्रीसमर्थांनीं स्वानुभवानें पाहिलें होतें. त्यांतून सुटण्याचा एकमेव मार्ग त्यांनीं शोधून काढला व तो म्हणजे कोणीहि त्यांच्या वेळेपावेतों हातांत न धरलेलें असें जें 'राजकारण' त्याचा आपल्या संप्रदायांत अंतर्भाव करून तें उत्कटत्वानें करण्याचा व सांप्रदायिकां-कडून करविण्याचा. देशाचा व धर्माचा उद्धार व्हावा अशी जर प्रत्येकास इच्छा असेल तर त्या त्या लहानमोठ्या व्यक्तीनें यथाशक्ति राजकारणाकडे पाहिलेंच पाहिजे असा त्यांनीं राष्ट्रास दंडक घालून दिला:—

प्रपंचीं जाणें राजकारण।

या ठिकाणीं 'राजकारण' याचा अर्थ कांहीं विद्वान् करतात त्याप्रमाणें 'चातुर्य' असा आम्हांस अभिप्रेत नाहीं. तसा अर्थ श्रीसमर्थांच्या ग्रंथांत कांहीं स्थळीं नसेल असें नाहीं. परंतु जेव्हां आम्ही श्रीसमर्थांचें 'राजकारण' असा शब्दप्रयोग करतों, तेव्हां आम्ही 'राजकारण' म्हणजे ज्याला आंग्ल भाषेंत Politics म्हणतात तें, असाच करतों. नसतील श्रीसमर्थ हातांत तरवार घेऊन प्रत्यक्ष रणांगणावर गेले! त्यांत कांहीं बिघडलें नाहीं! पण त्यांच्या सांप्रदायिकांनीं रणांगणावर बहाद्दुरीचीं कामें केलीं ना? पंतअमात्य रामचंद्रपंत बावडेकर त्यांची जागा तेथें भरून काढीत होते ना? श्रीशिवरायांच्या दरबारीं श्रीसमर्थ जाऊन त्यांनीं श्रीछत्रपतींशीं राजकारणाचीं खलबतें केल्याचे कागदपत्र संशोधकांस अद्याप सांपडले नसतील. पण त्यांचे—समर्थांचें—शिष्य बाळाजी आवजी हे थोर मुत्सद्दी तेथें अहोरात्र जागरूकतेनें बसले होते ना? श्रीसमर्थांनीं स्वहस्तें नसेल एकाद्या खानाला मुक्ति दिली; पण 'समर्थें आकारपूर्वक यवनासि (अफजुल) खानासि मारविलें' हें 'प्रतापां' तील गिरिधरकृत वर्णन काय सांगतें? श्रीसमर्थ आम्ही म्हणतों त्या अर्थानें 'राजकारणी' नव्हते असा ज्यांचा अभिनिवेश असेल त्यांना

मुख्य सूत्र हातीं घ्यावें। करणें तें लोकां करवीं करवावें।
कित्येक खलक उगवावे। राजकारणामध्यें॥ १९.९.१८

या ओवींचें रहस्यच कळलें नाहीं. दासबोधादि श्रीसमर्थग्रन्थांत अशीं कित्येक प्रमाणें आहेत कीं, त्यांच्या साहाय्यानें ऐतिहासिक कागद-पत्रांच्या प्रत्यक्ष पुराव्याशिवायहि, श्रीसमर्थ राजकारणी पुरुष होते, हें पूर्णपणें सिद्ध करतां येईल.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक .................. वि: ..................
ग्रंथांक .................. प्रो. दि. ..................

# श्रीसमर्थांच्या तत्त्वज्ञानावरील माध्व छाया

सुवर्णमहोत्सव स्मृतिग्रन्थामध्यें, करवीरस्थ श्री. बाळाचार्य खुपेरकर या शास्त्रीबोवांनीं 'श्रीमध्वाचार्य व श्रीसमर्थ यांचा संप्रदाय' या नांवाचा एक लेख लिहिला आहे व शेवटीं " एकंदरींत तात्पर्य श्रीसमर्थसंप्रदायावर माध्व संप्रदायाची आचार व विचार या दोनहि दृष्टीनें पुष्कळशी छाया पडलेली दिसते " असा मथितार्थ काढून पुढें " स्थूलमानानें आम्ही हा विचार वाचकांपुढें मांडला आहे. समर्थवाङ्मयभक्तांनीं अधिक विचार करावा. " अशी त्यांनीं समर्थवाङ्मयभक्तांस सूचना दिली आहे.

श्री. खुपेरकर शास्त्रीबोवांनीं सुचविल्याप्रमाणें, त्यांनीं उपस्थित केलेल्या या प्रश्नाचा ऊहापोह यथाशक्ति करण्याचें या लेखांत आम्हीं योजिलें आहे. श्रीसमर्थांस माध्व संप्रदायी ठरवितांना आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ पुढील प्रमाणें त्यांनीं पुढें केलीं आहेत:—

( १ ) ठोसर हे कुलपरंपरेनें माध्व आहेत. श्रीसमर्थ त्याच घराण्यांतील; तेव्हां तेहि माध्व संप्रदायी,

( २ ) श्रीमध्वाचार्य हे वायूचे अवतार, तर श्रीसमर्थ हे वायुपुत्र हनुमानाचे अवतार,

( ३ ) श्रीमध्वाचार्यांचें उपास्य दैवत श्रीरामचंद्र; श्रीसमर्थांनींहि तीच उपासना केली व प्रचारांत आणली,

( ४ ) श्रीसमर्थसंप्रदायांतील मुद्रा-धारणाचा विधि हा माध्वांच्या अंकन भक्तीचाच अवशेष,

( ५ ) उभय संप्रदायांत मारुतीची उपासना प्रामुख्यानें आहे,

( ६ ) माध्वाप्रमाणेंच श्रीसमर्थ जगत्सत्यत्व मानतात,

( ७ ) " भेद ईश्वर करोनि गेला " इत्यादि वाक्याधारें श्रीसमर्थ माध्व मतानुयायी होते असें ठरतें,

( ८ ) प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय करणारे श्रीसमर्थ प्रपंचाला मायामय मिथ्या म्हणणें शक्य नाहीं.

याशिवाय आणखीहि कांहीं प्रमाणें त्यांनीं दिलीं आहेत. शास्त्रीबोवांच्या या ८ हि प्रमाणांचा, विशेषतः ६, ७ व ८ या प्रमाणांचा प्रथमतः परामर्श घेऊं व श्रीसमर्थ माध्वसंप्रदायी कितपत व कसे ठरतात तें पाहूं !

" निसर्गानें सिद्ध केलेला भेद हा ब्रह्मदेवाच्या बालाहि मोडतां येणार नाहीं " असें सडेतोड लिहिणारे श्रीसमर्थ हे माध्वसंप्रदायी नव्हेत असें कोण समर्थभक्त तरी म्हणेल ? " हा शास्त्रीबोवांनीं सर्व समर्थभक्तांस सवाल टाकला आहे. श्रीसमर्थांचा हा ' भेदवाद ' माध्वांच्या त्या प्रसिद्ध ' पंचभेदाचा ' च एक प्रकार आहे किंवा कसें हें आपण लवकरच पाहूं. तत्पूर्वीं श्रीसमर्थ आपल्या ग्रन्थांत आपणांस तत्त्वज्ञानापैकीं कोणती मतप्रणाली मान्य आहे यासंबंधीं काय म्हणतात त्याचें थोडें दिग्दर्शन करूं. श्रीसमर्थांचा कोणताहि ग्रंथ शास्त्रीबोवांनीं जर अभिनिवेशाधीन न होतां उघडला असता तर त्यांस प्रत्येक पानावर ' जीवो ब्रह्मैव नापरः ' हाच अद्वैती सिद्धांत आढळून आला असता. शास्त्रीबोवांच्या समाधानासाठीं येथें ग्रंथराजाच्या केवळ पूर्वार्धांतील कांहीं ठळक वाक्यें उद्धृत करीत आहोंतः—

( १ ) **आत्मा म्हणजे तो अद्वैत** । जेथें नाहीं द्वैताद्वैत । ४.९.१८

( २ ) श्रीसमर्थ अद्वैतज्ञानाशिवाय इतराला ज्ञान म्हणण्यास सिद्ध नाहींतः–

**ज्ञान म्हणजे अद्वैत** । ५.६.९

( ३ ) आपल्या शिष्यांना कोणी तरी द्वैतवाद्यानें तूंच ब्रह्म आहेस असें सांगितल्याचें शास्त्रीबोवांनीं संप्रदायाच्या तत्त्वज्ञानामध्यें प्रतिपादन केलें आहे काय ? श्रीसमर्थांनीं मात्र तसें सांगितलें आहेः—

ऐक शिष्या येथीचें वर्म । **स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म** । ५.६.४५

( ४ ) साधक कोणाला म्हणावें हें सांगतांना श्रीसमर्थ म्हणतातः—

स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें ।<br>**ते चि वस्तु होय आंगें** । या नांव साधक ॥ ५.९.२१

तसेंच,

( ५ ) साध्यचि होय तात्काळ । या नांव साधक । ५.९.२३

( ६ ) शिष्याला श्रीसमर्थ एके ठिकाणीं बजावतात कीं,

आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।<br>अहमात्मा हें कधीं चि । विसरो नये ॥ ५.१०.३८

( ७ ) आपल्या तत्त्वज्ञानांत शास्त्रीबोवांनीं देवाभक्तांच्या ऐक्याची वार्ता तरी कधीं ऐकिली आहे काय ? पण श्रीसमर्थांच्या तत्त्वज्ञानांत त्याची रेलचेल आहेः–

आत्मनिवेदन होतां । देवाभक्तांसी ऐक्यता ।<br>साचार भक्त विभक्तता । सांडूनि जाला ॥ ६.३.३२

( ८ ) किंबहुना 'साचार भक्त' तो कीं जो देवापासून वेगळा नाहीं. इतरांस भक्त म्हणवून घेण्याचा खराखुरा अधिकारच नाहीं,

विभक्तपणें नसावें । तरीच भक्त म्हणवावें ।

( ९ ) याचेंच स्पष्टीकरण पुढील दोन वाक्यांत श्रीसमर्थ करतातः—

नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणे परीं ।
लोहो सोनें होतां माघारीं । काळिमा नये ॥

तैसा भगवंतीं मिळाला । तो न वचे वेगळा केला ।
**देव भक्त आपण जाला** । विभक्त नव्हे ॥

( १० ) देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता ।
**देव भक्त विभक्तता** । मुळींच नाहीं ॥

( ११ ) आठव्या दशकांत तर श्रीसमर्थांनीं अत्यंत धीटपणें असा सिद्धान्त एके ठिकाणीं मांडला आहे कीं, ज्याला देव व भक्त एक आहेत हें ज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत त्याला गुरु ( मोक्ष गुरु ) म्हणवून घेतां येणारच नाहींः—

**देव भक्त दोनी येक** । ज्यासी कळला विवेक ।
साधु जनीं मोक्षदायेक । तोचि जाणावा ॥ ८.८.२३

( १२ ) खरें ज्ञान तेंच कीं,

**आपण वस्तु मुळीं येक** । ऐसा ज्ञानाचा विवेक । ८.१०.८१

किंवा,

( १३ ) वस्तु लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं ॥ ८.१०.७२

( १४ ) द्वैतभावानें परमात्म्याचें दर्शन घेण्यास गेलें असतां पदरांत काय पडतें तें सांगतातः—

**वस्तु आपणाचि होणें । ऐसे वस्तूचें पाहणें** ।
निश्चयेसी भिन्नपणें । सुन्यत्व लाभे ॥ ८.१०.७३

( १५ ) संसारांतील येरझाऱ्या केव्हां संपतील याचें उत्तर श्रीसमर्थ देतात,

संसारीं पुंडावे चुकलें । **देवा भक्ता ऐक्य जालें** । ९.२.४५

( १६ ) 'आपणांस आपण पहावें' अशी परिभाषा माध्वसंप्रदायांत प्रचलित असल्याचें शास्त्रीबोवा सांगतील काय बरें ? उलट श्रीसमर्थ म्हणतात की, ज्ञान म्हणजे दुसरेंतिसरें आपण कांहीं जाणत नाहीं तर,

पहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान । ५.६.१

किंवा,

( १७ ) ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण । ५.६.१५

( १८ ) 'ईश्वरोऽहमहं भोगी' या श्लोकांच्या आधारें माध्वसंप्रदायी आपल्या मताप्रमाणें त्या श्लोकाचा अर्थ करून अद्वैत्यांस कोणत्या कोटींत ढकलतात हें शास्त्रीबोवांच्या चिरपरिचयाचें आहेच. त्यांच्या अवलोकनासाठीं श्रीसमर्थांचीं कांहीं वाक्यें पुढें देत आहें.

आत्मनिवेदना उपरी । निखिळ वस्तु निरंतरी ।
**आपण आत्मा** अंतरीं । बोध जाला ॥ ६.२.२१

( १९ ) जालिया तत्त्वाचें निर्शन । **निर्गुण आत्मा तोचि आपण** ॥
६.३.३०

( २० ) तत्त्वज्ञाता निःशेष होतां । तेथें निमाली देह अहंता ।
**निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता** । विवेकें जाली ॥ ६.३.२१

( २१ ) मीपण गेलिया **निर्गुण** । **आत्मा स्वयें** ॥ ६.३.२९

( २२ ) **निर्गुणीं तें अनन्य** । **निर्गुणचि होइजे** ॥ ६.७.३४

( २३ ) निर्गुणाचें कैसें भजन । **निर्गुणीं असावें अनन्य** ।
अनन्य होतां होईजे धन्य । निश्चयेंसी ॥ २.१०.१२

( २४ ) **विवेकें अभिन्न । देव भक्त** ॥ स्फु. ओ. ७.३३

( २५ ) **सदोदित वस्तु तेचि ते आपण** ।
रामदास खुण सांगतसे ॥ स्फु. ओ. ७.४०

( २६ ) **वस्तुसी पाहतां वस्तुरूप** ॥ ६.३६

वरील वाक्यांत कांहीं ठिकाणीं 'निर्गुण' असा शब्दप्रयोग आला आहे व त्याचा जो अर्थ श्रीसमर्थांनीं केला आहे, तो आपल्या मार्गाच्या तत्त्वज्ञानांत शास्त्रीजींनीं कधीं पाहिला आहे काय ? खालीं दिलेल्या दोन ओव्यांतील विचारसरणी त्यांच्या संप्रदायाच्या कोणत्या आचार्यांच्या ग्रन्थांत आहे हें ते सांगू शकतील काय ? या दोन ओव्या द्वैती तत्त्वज्ञानाच्या चौकटींत कशा व कोठें बसतात हें त्या ओव्यांचा पूर्वापार संदर्भ व अर्थ पाहून आचार्यांनीं ठरवावें.

( २७ ) वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक ।
तरि अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ॥ ६.१०.३४

( २८ ) फळ येक आपण येक । ऐसा नाहीं हा विवेक ।
फळाचें फळ कोणी येक । स्वयेंचि होईजे ॥ ९.१०.२८

येथवर श्रीसमर्थ ' भेद वादी ' कीं ' अभेदवादी ', द्वैती की अद्वैती याचा त्यांच्याच शब्दांत विचार झाला. ' स्वयें तूंचि आहेस ब्रह्म ' या अर्थाचीं शेंकडों वाक्यें त्यांच्या ग्रंथांतून आणखी देतां येतील.

आपल्या शिष्यांना, साधकांना, परमार्थ्यांना श्रीसमर्थांनीं कोणते ग्रन्थ वाचण्याचा आग्रह केला आहे, कोणत्या ग्रन्थांची त्यांनीं प्रशस्ति गायिली आहे, खरे ज्ञानी लोक कोणते ग्रन्थ वाचतात हें आतां त्यांच्याच शब्दांत शास्त्रीबोवांस आम्ही सादर करतों:–

( २९ ) अद्वैत ग्रन्थ परमार्थीं । श्रवण करावे ॥ ७.९.५

( ३० ) जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थ पंथ वरी ।
प्रीति लागली अंतरीं । अद्वैत ग्रंथाची ॥ ७.९.६

( ३१ ) जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक ।
तेणें पहावा विवेक । अद्वैत ग्रंथीं ॥ ७.९.७

( ३२ ) तैसी ज्ञानियासी चाड । **अद्वैत ग्रंथाची** ॥ ७.९.८

( ३३ ) आतां असो हें बोलणें । जयास स्वहित करणें ।
तेणें सदा विवरणें । **अद्वैत ग्रंथीं** ॥ ७.९.६

( ३४ ) आत्मज्ञानी एक चित्त । **तेणें पाहाणें अद्वैत** ।

( ३५ ) बहुत प्रकारें पाहतां । **ग्रंथ नाहीं अद्वैता परता** । ७.९.२८

( ३६ ) होंचि साधकासी निरवणें । **अद्वैत पांजळ निरूपणें** ।
७.१०.३४

( ३७ ) निरूपण सार । **अद्वैत करावें** ।
तेणें उद्धरावें निश्चयेसीं ॥ स्फु. ओ. १७६.१

( ३८ ) जेथें नाहीं पाखांड । **अद्वैत चर्चा अखंड** ॥ पं. स. ४.८

( ३९ ) नवमी ते **अद्वैत जाण** । करावें आत्मनिवेदन ।
प. स. ४.१८

( ४० ) आतां तुटली आशंका । मती फुटली विवेका ।
**अद्वैतबोधें रंका** । राज्यपद ॥ अंतर्भाव ५.२४

आपणांस काय पाहिजे आहे हें सांगितल्यानंतर काय नको आहे हें सांगण्याची खरोखर आवश्यकता नसते. श्रीसमर्थांनीं तसें फारसें केलेलेंहि दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. अद्वैत अभिप्रेत आहे याचा अर्थ इतर मतें आपणांस इष्ट नाहींत असाच होतो. तरी पण काय नको हेंहि श्रीसमर्थांनीं स्फुट ओव्यांत एके ठिकाणीं सांगितलें आहे.

(४१) विश्रांतीचें स्थळ स्वरूप केवळ ।
**द्वैततळमळ** जेथें नाहीं ॥ ९३.१

वर उल्लेखिलेल्या व आणखीहि त्यांच्या ग्रन्थांत सर्वत्र विखुरलेल्या अद्वैतपर उद्गारांनीं एखाद्या वेळीं मनांत असा विचार उद्भवतो कीं, श्रीसमर्थांचें घराणें मूळचें माध्व संप्रदायाचें असावें; पण या मताबद्दल त्यांना, ते बुद्धीनें अत्यंत प्रखर असल्यानें, अगदीं बालपणापासूनच शंका आली असावी. तेव्हां गतानुगतिकत्वाचा आंधळेपणाचा मार्ग न स्वीकारतां, आपल्या होऊं घातलेल्या विवाहाचें निमित्त करून, जगास सत्य मार्ग कोणता हें दाखविण्यासाठीं व प्रथमतः तें शोधण्यासाठीं व खऱ्या देवाचा शोध घेण्यासाठीं श्रीसमर्थांनीं आपल्या घरादाराचा त्याग केला व राजवाड्यांच्या शब्दप्रयोगाप्रमाणें "कोणत्याहि द्विपादलंडीला" गुरु न करितां साक्षात् श्रीरामचंद्रापासूनच गुरूपदेश व ज्ञान मिळविलें. तें ज्ञान कोणतें हें वाचकांसाठीं जरी नव्हे तरी, त्यांस माध्वसंप्रदायी ठरविणाऱ्या आमच्या या विद्वान् माध्वसंप्रदायी शास्त्रीबोवांसाठीं देतों. सद्गुरूंच्या ज्या या गहन वाक्यानें श्रीसमर्थांचें अत्यंत समाधान झालें व जें त्यांनीं आपल्या सहस्रावधि शिष्यांस उपदेशून 'गुरुशिष्या एकचि पद' हा अनुभव आणून दिला तें वाक्य किंवा वचन येणेंप्रमाणें:—

(४२) **अहं ब्रह्मास्मि** महावाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य ।
तोहि सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथें ॥ ५-६-४४
ऐक शिष्या येथींचें वर्म । **स्वयें तूंचि आहेस ब्रह्म** ।
येविषयीं संदेह भ्रम । धरूंचि नको ॥ ४५
नवविधाप्रकारें भजन । त्यांत मुख्य तें आत्मनिवेदन ।
तें समग्र प्रकारें कथन । कीजेल आतां ॥ ४६
निर्माण पंचभूतें यीयें । कल्पांतीं नासतीं येथान्वयें ।
प्रकृति पुरुष जीयें । तेही ब्रह्म होती ॥ ४७
दृश्य पदार्थ आटतां । **आपणहि नुरे तत्त्वतां** ।
**ऐक्यरूपें ऐक्यता । मुळींच आहे** ॥ ४८

सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता ।
पिंडब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ॥ ४९

ज्ञानवन्ही प्रगटे । नेणें दृश्य केर आटे ।
**तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें** ॥ ५०
**मिथ्यत्वें वृत्ति फिरे** । तों दृश्य असतांच वोसरे ।
सहजचि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ॥ ५१

असो गुरूचे ठायीं अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता ।
**वेगळेपणें अभक्ता** । उरों चि नको ॥ ५२

आतां हेंचि दृढीकर्ण । व्हावया करीं सद्‌गुरुभजन ।
सद्‌गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ५३

या नांव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । ५४

वरील ओव्यांतील उपदेशिलेलें तत्त्वज्ञान माध्वमताशीं जुळतें आहे काय ?

श्रीसमर्थांचा संप्रदाय अमका होता, तमका होता असा आधुनिकांनीं अट्टाहास करण्यांत स्वारस्य काय आहे हेंच कळत नाहीं. कारण आपला संप्रदाय कोणता, आपला मठ कोणता, आपले गुरु कोण हें त्यांनीं आपल्या त्या सर्व विश्रुत षट्पदींत अगदीं स्वच्छ सांगितलें आहे:—

(४३) श्रीगुरु श्रीरामसमर्थ । काय उणें दासासी ॥ ३ ॥

* * *

**स्वरूप संप्रदाय अयोध्यामठ** । जानकीदेवी श्रीरघुनाथ दैवत ।
मारुती उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ॥ ६ ॥

श्रीसमर्थ माध्वसंप्रदायी असते तर त्यांनीं आपल्या 'स्वरूप संप्रदाय' च्या ऐवजीं माध्वसंप्रदाय असें घातलें असतें, 'अयोध्यामठा' बद्दल आपण उत्तरादिमठाचे किंवा रायर मठाचे किंवा व्यासरायर मठाचे असें म्हटलें असतें, तसेंच 'वाढविला परमार्थ रामदासी' च्या जागीं 'वाढविला परमार्थ मध्वांचा' असेंच म्हटलें असतें.

घटकाभर गृहीत धरतों कीं, असतील श्रीसमर्थ जन्मानें माध्व संप्रदायाचे होते. पण पुढें ते स्वानुभवानें आपल्या तपश्चर्येच्या बळावर कोणत्या मताचे झाले ही महत्त्वाची बाब नव्हे काय ? हा अद्वैत मताचा जय नव्हे काय ? आधुनिक माध्व-संप्रदायी म्हणविणाऱ्यांनीं यापासून बोध घ्यावयास नको काय ?

तरी पण तुला हें जगत् कसें उत्पन्न झालें तें सांगतों म्हणून श्रीसमर्थांनीं ह्या समासांत ( ८–३ ) त्याचें सविस्तर वर्णन केलें आहे व मायेमुळें हें सर्व भासत आहे असें प्रतिपादिलें आहे:—

तैसें स्वरूप हें संचलें । असतां, वाटे गुणा आलें ।
ऐसें कल्पनेसि गमलें । परी तें मिथ्या ॥ ८.३.४७

ऐसी वस्तु निरावेव । माया दाखवी अवेव ।
ईचा ऐसा स्वभाव । नाथिली च हे ॥ ४९

श्रीसमर्थ मायावादाचा स्वीकार करितात हें सिद्ध करण्यास येवढीं प्रमाणें पुरेशीं आहेत. येवढ्यानें शास्त्रीबावांचा भ्रम–" प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय करणारे श्रीसमर्थ प्रपंचाला मायामय मिथ्या म्हणणें शक्य नाहीं " हा भ्रम– दूर होण्यास अडचण पडूं नये असें वाटतें.

श्री. खुपेरकर शास्त्रीबोवांनीं अशी समजूत उगीचच करून घेतलेली दिसते कीं, मायावादाचा अंगीकार केल्यानें मनुष्य व्यवहाराला अयोग्य होतो. प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय जगत्सत्यत्व मानलें तर तो करतां येतो, जगन्मिथ्यात्वानें तो करतां येत नाहीं, असें थोडेंच आहे ? मायावादाचा प्रथम पुरस्कार करणारे श्रीमच्छंकराचार्य यांच्याइतकें दांडगें प्रचारकार्य दुसऱ्या कोणीं केलेलें भारतवर्षाच्या उभ्या इतिहासांत दाखवून देण्यास शास्त्रीबोवा सिद्ध आहेत काय ? आधुनिक काळांत श्रीमदाचार्यांसारखें प्रचंड कार्य स्वामी विवेकानन्द, स्वामी दयानंद सरस्वती, लोकमान्य रहस्यकार आणि म. गांधी यांनींच केलेलें आहे. श्रीमदाचार्यांनंतर श्रीसमर्थ वगळले तर या चारहि महापुरुषांच्या प्रचारकार्यांची सर हिंदुस्थानच्या संबंध इतिहासांत कोणासहि यावयाची नाहीं हें कोणीहि निःपक्षपाती सुज्ञ मान्य करील. या चौघांत स्वामी विवेकानन्द व लोकमान्य हे कट्टर मायावादी व म्हणून जगन्मिथ्यात्व मानणारेच होते ना ? त्यांच्या कार्यांत त्यांचा मायावाद येऊं शकला नाहीं. खरोखरीनें पाहतां तो येऊं शकतच नाहीं. अज्ञानान्धकारांत लोळत पडलेलें जग संतांना पाहवत नाहीं. त्याचा उद्धार करणें हा त्यांचा स्वभाव असतो. तो ते करीत असतात. मग जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण मायावादाचा असो अथवा जगत्सत्यत्वाचा असो.

लेखारंभीं दिलेल्या ८ प्रमाणांपैकीं ६, ७ व ८ या तीन मुख्य प्रमाणांचा विचार आतांपर्यंत झाला. आतां राहिलीं ५ च. त्यांचा आतां थोडा थोडा विचार करूं व शास्त्रीबोवांस उत्तर देण्याचा प्रयत्न करूं.

शास्त्रीबोवा म्हणतात कीं ठोसर हे कुलपरंपरेनें माध्व आहेत. ते किती पिढ्यांपासूनचे तसे आहेत हें त्यांनीं सांगावें. विशेषतः श्रीसमर्थांचें घराणें किती

पिढ्यांपासून माध्वसंप्रदायी आहे? हें विचारण्याचें कारण असें कीं, कर्नाटकांत अशीं कित्येक घराणीं आज विद्यमान आहेत कीं जीं पूर्वीं स्मार्त असून आज वैष्णव ( माध्व ) आहेत.

( २ ) श्रीसमर्थ हनुमानजींचे अवतार असें वर्णन त्यांच्या चारित्रकारांनीं व इतरांनींहि दिलें आहे, पण श्रीसमर्थ आपणांस तसें म्हणवीत असल्याचें त्यांच्या ग्रन्थांत कोठें दिसून येत नाहीं. कारण त्यांची अवताराची कल्पनाच इतरांपासून अगदीं निराळी आहे.

विवेकें बहुत पैसावले । ह्मणून अवतारी बोलिले ।
मनु चक्रवर्ती जाले । येणेंचि न्यायें ॥ १५.३.५

ही तर्कशुद्ध व अद्वैतमताला अगदीं धरून असलेली व्याख्या कोणीकडे व जनांत रूढ असलेली वेडगळ व्याख्या कोणीकडे? असली व्याख्या करणारा पुरुष अद्वैत्याशिवाय दुसरा कोणी असणें शक्यच नाहीं. अद्वैत मताप्रमाणें ‘ आब्रह्मस्तम्ब-पर्यंत ’ प्रत्येक वस्तु परब्रह्माचा अवतार नव्हे, परब्रह्मच होय. मध्यें आलेलें अज्ञानाचें पटल जसें जसें दूर होत जाईल तसा तसा तो परब्रह्माजवळ जातो. ह्या कल्पनेला धरूनच श्रीसमर्थांची अवताराची वर दिलेली व्याख्या आहे. त्यांच्या मतें अवतारी तो कीं ज्याच्या ठिकाणीं ज्ञान अधिक असतें. त्यालाच अवतारी म्हणावें. तेव्हां श्रीमध्वाचार्य वायूचे अवतार व श्रीसमर्थ वायुपुत्र हनुमानाचे अवतार म्हणून श्रीसमर्थ माध्वसंप्रदायी होत असें जें शास्त्रीबोवांनीं तर्कशास्त्र लढविलें आहे तें श्रीसमर्थांच्या ‘ अवतार ’ शब्दाच्या व्याख्येला धरून नाहीं; अतएव त्याज्य होय.

श्रीमध्वाचार्यांचें उपास्य दैवत श्रीरामचंद्र, तर श्रीसमर्थांनींहि रामोपासना करून ती प्रचारांत आणली म्हणून ते माध्वसंप्रदायी असले पाहिजेत असें जें शास्त्रीबोवा लिहितात तेंसुद्धा इतिहासास धरून नाहीं. श्रीसमर्थांच्या कुलपरंपरेंत रामोपासना श्रीमध्वाचार्यांच्या जन्माच्या अगोदरपासूनची आहे म्हणजे ती माध्वसंप्रदाय अस्तित्वांत येण्याच्या पूर्वींची आहे. श्रीसमर्थांच्या पूर्वीं २२ पिढ्यांपासून ती त्यांच्या घराण्यांत चालत आलेली होती. म्हणून त्यांनीं ती घेतली व अनुभवानें ती पटली म्हणूनच पुढें चालू केली व तिचा प्रसार एका विशिष्ट कार्यार्थ केला. यावरून माध्वसंप्रदायांतून ती त्यांनीं घेतली असें चुकून सुद्धां म्हणतां येणें शक्य नाहीं व त्यावरून श्रीसमर्थ माध्व होते हें ठरविणें सुतराम् शक्य नाहीं.

“ श्रीसमर्थ संप्रदायामध्यें रामनामांकित मुद्रेच्या धारणाचा जो विधि आज सर्वत्र प्रचारांत आलेला दिसून येत आहे हा माध्व संप्रदायांतील अंकन भक्तीचाच अवशेष आहे असें म्हणणें प्राप्त आहे. ” म्हणून श्रीसमर्थहि माध्वसंप्रदायी आहेत

असा शास्त्रीबोवांनीं सिद्धान्त काढला आहे. हा त्यांचा उपसिद्धान्त आहे. श्रीसमर्थ-कालीं महाराष्ट्रांत वारकरी संप्रदाय जारीनें चालू होता. त्याची पकड महाराष्ट्रीय बहुजन समाजावर श्रीज्ञानेश्वरांच्या काळच्या आधींपासूनच कायम ठशाची बसलेली होती. पंढरपूरच्या श्रीपांडुरंगाची उपासना व वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रांत किती प्राचीन कालापासून चालू आहे तें,

प्रमाणं भवाब्धेरिदंमामकानाम्
नितम्बः कराभ्यां धृतो येन तस्मात् ।

हा श्लोक ज्या श्रीशंकराचार्यकृत पांडुरंगस्तोत्रांत आला आहे त्यावरून व ज्या पुंडलिकानें ज्या पांडुरंगास

युगें अठ्ठावीस विटेवरी ऊभा ।

केला, त्या प्रमाणांवरून सिद्ध आहे. या वारकरी संप्रदायांतील मुद्राविधि माध्व-संप्रदायांत तो प्रचलित होण्याच्या अगोदरपासूनचा आहे. तेव्हां हा विधि माध्व संप्रदायांतून घेतला नसून बहुजन समाजाची बाह्यांगानुकरणप्रियता लक्षांत घेऊन एकदेशिकत्वानें व मतानें अगदीं जवळचा असा जो अद्वैती संप्रदाय, त्याच्याकडूनच श्रीसमर्थांनीं घेतला असला पाहिजे असें म्हणणें युक्तीस धरून होईल.

श्रीसमर्थांनीं हा मुद्राविधि माध्वसंप्रदायांतून घेतला नसला पाहिजे याला सबळ असें प्रमाण दासबोधांतच ( द. १०.१०.६१ ) सांपडतें. संप्रदायाच्या बाह्यांगावर अत्यंत कमी भर जर कोण देत असेल तर तो अद्वैती संप्रदायच. माध्व तप्तमुद्रेला किती महत्त्व देतात, हें आजहि कर्नाटकांत प्रत्यहीं दिसून येतें. तेव्हां श्रीसमर्थ, शास्त्रीबोबा त्यांना समजतात तसे ते माध्व असते तर, त्यांनीं तप्तमुद्रांबद्दल पुढील उद्गार काढणें शक्यच नव्हतें:—

नाना मृत्तिकेनें घासिलें । **अथवा तप्तमुद्रेनें लासिलें** ।
जरी हें ( शरीर ) वरीवरी तासिलें । तरी शुद्ध नव्हे ॥

"मारुतीची उपासना ही या उभय संप्रदायांमध्यें प्रामुख्यानें केली जात आहे." ह्या गोष्टीवरून श्रीसमर्थ माध्वसंप्रदायाचे अनुयायी आहेत, असें शास्त्रीबोवा ठरवितात. त्यांचें हेंहि प्रमाण वर दिलेल्या इतर प्रमाणांप्रमाणेंच अगदीं हीनबल आहे. याचें कारण, मारुत्युपासना श्रीसमर्थांनीं एका विशिष्ट हेतूनें महाराष्ट्रांत विशेष जारीनें प्रचारांत आणली. राष्ट्रांत बलसंवर्धन व्हावें हा तो ऐहिक हेतु पार-मार्थिक हेतुबरोबर प्रामुख्यानें होता. हें आमचें विधान ऐतिहासिक सत्य आहे. श्रीसमर्थांच्या ग्रन्थांत त्याला भरपूर पुरावे आहेत. हा दुसरा हेतु—राष्ट्रबलसंवर्धनाचा

हेतु– माध्वसंप्रदायाच्या इतिहासांत आहे असें दिसून येत नाहीं. तेव्हां यांत माध्वाचें अनुकरण नव्हतें.

शास्त्रीबोवांनीं श्रीसमर्थ संप्रदायांतील पूजा नैवेद्यादि प्रकारांवरून व आणखीहि कांहीं गोष्टींवरून श्रीसमर्थांस माध्व ठरविण्याचा यत्न केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें असतील कांहीं गोष्टी तशा; पण ह्या झाल्या बाह्य गोष्टी; म्हणून मुख्य गोष्टीच्या मानानें अगदीं क्षुद्र. अद्वैत्याला कोणतेंहि साधन अमान्य नाहीं, कोणत्याहि देवतांचें इतर संप्रदायाप्रमाणें वावडें नाहीं. त्यांचें लक्ष सर्व गोष्टींचा, सर्व साधनांचा समन्वय कसा होईल याकडे असतें. तो आग्रही नसतोच मुळीं. आधुनिक काळांतील याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे भगवान् श्रीरामकृष्णाचें. तेव्हां श्रीसमर्थसंप्रदायांतील बाह्यांगें माध्वसंप्रदायाप्रमाणें आहेत म्हणून ते माध्व, हें म्हणणें सबळ प्रमाण नव्हे. पण या बाह्य साधनांनीं ते कोणत्या सिद्धान्ताला पोहोंचले हा मुख्य मुद्दा आहे. तो सिद्धान्त म्हणजे अद्वैत सिद्धान्त होय. अद्वैताला जाण्याचा आरंभ द्वैतातूनच होय असें श्रीसमर्थांनीं एके ठिकाणीं सांगितलें आहे.

द्वैतेंविण अद्वैत । बोलतांच नये ।। ८.३.८

तात्पर्य द्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि गोष्टीचा तिरस्कार अद्वैती तर करीतच नाहीं, उलट तो त्यांना आपल्या मार्गातील साधनें समजतो. तेव्हां बाह्यांगें व कांहीं ठिकाणचीं द्वैतपर दिसणारीं वाक्यें यावरून श्रीसमर्थ द्वैती होते असें सिद्ध करणें जरा धाडसाचें वाटतें. श्रीसमर्थ हे पूर्णपणें अद्वैती व मायावादी होते हें त्यांच्या ग्रन्थांवरून दोन प्रहरच्या सूर्यप्रकाशापेक्षांहि स्पष्ट आहे. व शास्त्रीबोवा समजतात त्याप्रमाणें त्यांच्या आचारांवर माध्व संप्रदायाची छाया थोडीदेखील पडलेली नाहीं, विचारावर तर तिचा मागमूसहि नाहीं, असें आमचें स्पष्ट मत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९३०७२
मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक ... वि: ...
... नों. दि: ...

# श्रीसमर्थांवरील कांहीं आक्षेपांचा परामर्श

आजवर समर्थांच्या तत्त्वज्ञानावर, संप्रदायावर अनेकांनीं आक्षेप घेतले आहेत. अगदी अलीकडे पंढरपूरच्या श्री. भा. पं. बहिरट, यांनी संतवाणीचा 'अमृत-कलश' ह्या आपल्या पुस्तकांत 'भागवत धर्म व रामदासी पंथ' हा लेख लिहिलेला आहे. त्याला उत्तर म्हणून प्रा. श्री. म. माटे यांनीं आपल्या 'संत पंत आणि तंत' ग्रंथांत 'रामदास हे भक्तिमार्गी संत होतेच होते' असा लेख लिहिला आहे. प्रा. माट्यांनीं त्यांचा समाचार आपल्या लेखांत घेतलाच आहे. पण कांहीं आक्षेपांचा विचार या लेखांत करण्याचें आम्ही योजिलें आहे.

श्रीसमर्थांच्या 'ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा' या सांप्रदायिक एका अंगावर श्री. बहिरटांचा कटाक्ष आहे. ते म्हणतात कीं– 'भिक्षापात्र अवलंबणें जळो जिणें लाजिरवाणें । ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ।' श्री. बहिरटांस प्रथम विचारावेंसें वाटतें कीं, श्री तुकाराममहाराज भिक्षा मागत होते किंवा नाहीं ? त्यांनीं उद्धृत केलेल्या भिक्षा-पात्र इत्यादि अभंगावरून श्री. तुकाराममहाराज भिक्षेस सर्वथैव प्रतिकूल होते असें त्यांचें मत दिसतें. पण हें त्यांचें मत वस्तुस्थितीस धरून नाहीं हें श्री महाराजांच्याच वचनांवरून सिद्ध करणें सोपें आहे. चरितार्थासाठीं श्रीमहाराज भिक्षा मागत होते हें –

आतां काय खावें कोणीकडे जावें । गावांत रहावें कोण्या बळे ॥
कोपला पाटील गांवींचे हे लोक । आता मज भीक कोण घाले ॥ ३८८१ ॥
इहलोकीं आम्हां भूषण अवकळा । भोपळा वांकळा अन्न भिक्षा ॥
( १३३-११ )

या उद्गारांवरून स्पष्ट दिसत आहे.

वरीलपैकीं शेवटच्या चरणाचा अर्थ "लोकांमध्यें आम्ही भिक्षेचें अन्न खावें. पाणी पिण्यास भोपळा व पांघरायास गोधडी अशा फजितीनें राहावें. हेंच आम्हांला भूषण आहे," असा श्रीजोगमहाराज करतात.

परमेश्वरप्राप्तीसाठीं सर्वसंगपरित्याग करून उदरनिर्वाहासाठीं स्वतः मधुकरी मागावी असा उपदेश श्रीतुकाराममहाराजांनीं एके ठिकाणीं केला आहेः—

वैभव तें राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी माधोकरी ॥ ४१७३ ॥

श्रीसमर्थ तरी दुसरें काय सांगतात ?

भिक्षा ही लाजिरवाणी गोष्ट आहे; पण केव्हां? ती केवळ पोटासाठींच मागण्यासाठीं असेल तेव्हां! समाजास भारभूत होणाऱ्या व्यक्तींवर श्रीतुकोबारायांचा 'भिक्षा पात्र अवलंबणें' इ. अभंगांत कटाक्ष आहे. पण ज्यांचें जिणें केवळ समाजासाठींच आहे त्यांनीं केवळ जीवनार्थ भिक्षा मागितली तर ती भिक्षा भूषणावह आहे. वारकरी पंथांत व रामदासी पंथांत भिक्षेसंबंधीं पूर्णतया ऐकमत्य आहे हें बहिरटांनीं ध्यानांत ठेवावें.

श्रीतुकाराम महाराजांचा एक अभंग आहे. आपण कसें वैभवसंपन्न आहोंत असें त्या अभंगांत श्रीमहाराज सांगत आहेत—

आम्ही सदैव सुडके। जवळी येतां चोर धाके
जाऊं पुढी भिके। कुतरीं घर राखती॥
धन कण घरोघरीं। पोट भरे भिकेवरी
तुका ह्मणे देवा। अवघा निरविला हेवा।॥ ६०॥

आपण चरितार्थासाठीं भिक्षा मागत असतों असें निस्संदिग्धपणाचें विधान श्रीमहाराजांनीं यांत केलें आहे.

श्रीएकनाथ महाराजांनीं आपल्या "चिरंजीवपदांत" ज्या महात्म्याच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण जनताजनार्दनाच्या सेवेंत जात आहे. त्यांस भिक्षा मागण्यास पूर्णपणें मुभा दिली आहे; मग तो गृहस्थाश्रमी असो वा अपरिग्रही असो:—

कुटुंबआहारा कारणें। अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणें।
ऐसे स्थिति जें वर्तणें। तें जाणणें शुद्ध वैराग्य॥ ३७॥

"संसार विन्मुखतेला अनुसरूनच रामदासी दीक्षेंत भिक्षेचें महत्त्व वर्णिलें आहे" असें श्री. बहिरट म्हणतात. मग वरील श्रीनाथांच्या वचनावरून ते श्रीनाथास कोणत्या कोटींत ढकलणार?

श्रीसमर्थांनीं एका अभंगांत भिक्षा ही कशी, केव्हां व किती वेळ मागावी हें सांगितलें आहे:—

आरंभ भिक्षेचा प्रहराचे वरी। मागावी घटिकाचारी ग्रामामाजी॥
आणोनि तें अन्न भार्येसी अर्पावें।॥ २४२॥

(अनंतदास गाथा)

वरील श्रीनाथांचें वचन व श्रीसमर्थांच्या त्या अभंगांतील "आणोनि तें अन्न भार्येसी अर्पावें" हा चरण श्री. बहिरटांच्या श्रीसमर्थांच्या त्या "संसार विन्मुखते" चा दर्शक आहे काय?

दासबोधांत श्रीसमर्थांनीं एके स्थळीं,

कांहीं मेळवी मग जेवीं ।

असा उपदेश केलेला आहे. आधुनिक काळांतील कोणत्याहि इझमूवाल्याच्या तोंडीं असलेली ही भाषा श्रीसमर्थांनीं तीनशें वर्षांपूर्वी लिहून ठेविली आहे. गर्भश्रीमंत असलेल्या माणसासहि ते खडसावीत आहेत कीं—

आसुंदे अन्न सेवूं नये । वडिलांचेंहि ॥ दा. २. २. २६

श्री. बहिरटांनीं असें एक निःशंकपणें धाडसाचें विधान केलें आहे कीं, "वारकरी संप्रदायाचे अध्वर्यु संत व देवता याविषयीं रामदासी वाङ्मयांत पूर्ण अभाव आहे." पक्षाभिनिविष्ट श्री. बहिरट यांनीं आजवर प्रसिद्ध झालेलें रामदासी वाङ्मय पूर्णपणें न पाहिल्यानें त्यांच्या हातून ही चूक झाली व त्यामुळें ते

पूर्ण ग्रन्थ पाहिल्याविण ।
उगाच ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरें करी ॥ दा. १. १. २२

या सदरांत दुर्दैवानें पडले. वारकरी संप्रदायाचें मुख्य दैवत श्रीपांडुरंग, त्यासंबंधींचें भक्तीनें ओथंबलेले कांहीं अभंग प्रा. मास्यांनीं आपल्या लेखांत श्री. अनन्तदास रामादासींच्या गाथेच्या आधारें उद्धृत केले आहेत. दासबोधांत व करुणाष्टकांतहि श्रीसमर्थांनीं प्रेमपूर्वक उल्लेख केला आहे तो असा :

रंग रंग तो सुरंग पांडुरंग पाहतां ।
धींग धींग थोर धींग कीर्तनांत राहतां ।
घोष घोष तो विशेष नामघोष वाहतां ।
तेथें जाईजें आगत्य सुखदुःख साहतां ॥ करुणाष्टकें १६०

सुखदुःख साहावें पण पंढरींत पांडुरंगाच्या दर्शनास जावें. श्रीपांडुरंगावरील श्रीसमर्थांची ही निष्ठा, तिची प्रचीति चांगली येते. श्रीसमर्थशिष्य श्री. अनन्तदास मेथवडेकर मेथवडे गांव पंढरीपासून १०–१५ मैलांवर आहे. श्रीसमर्थाज्ञेवरून हे शिष्यवर पंढरीची वारी प्रतिमासी करीत. त्यांचे वंशज मेथवडेकर रामदासीहि हें व्रत अद्याप त्याच निष्ठेनें चालवीत आहेत.

श्रीसमर्थांच्या श्रीविठ्ठलभक्तिपर पदाकडे बहिरटांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

विठाई सांवळे डोळसे रंगा येई हा ॥ धृ. ॥ जो कां नित्य निर्विकार, ज्याचा वेदां न कळे पार, तोचि जाहलासे साकार, स्थान पंढरीचें ज्याचें ॥ ३ ॥

म्हणे रामीं रामदास, त्याचा धरितां निजध्यास ।
तोडी जन्ममृत्युपाश, स्वपदालागीं पाववी ॥ ३ ॥

१११६ ॥ अं. रा. गा.

ज्या पंढरीशांस पाहून श्रीज्ञानेश्वर तुकारामादि संतांचे डोळे निवाले, त्याला पाहून श्रीसमर्थांनीं 'येथें कां उभा श्रीरामा' असे उद्गार काढले. श्रीसमर्थ हे श्रीविठ्ठल व श्रीराम या देवतांत भेद मानीत नव्हते.

राम अयोध्येचा वासी । तोचि नांदे द्वारकेसी ॥
कृष्ण नामानें धरिलें । बहु दैत्य संहारिले ॥ २ ॥
सखया मारुती लागुनी । रूप दावी चक्रपाणी ॥
राम तोचि विठ्ठल झाला । रामदासासी भेटला ॥

समर्थांचे श्रीविठ्ठलभक्तिपर असे कितीतरी उतारे देतां येतील.

वारकरी देवतेसंबंधीं श्रीसमर्थ पूर्ण उदासीन होते हें श्री. बहिरटांचें विधान न पटणारें आहे. आतां राहतां राहिलें त्यांचें विधान वारकरी संतासंबंधींचें. याकरितां आम्ही श्री. बहिरटांस व तत्सदृशांस नम्रपणें सूचना करितों कीं, त्यांनीं श्री रामदास आणि रामदासी मालेचा भाग १५ वा, म्हणजे श्री सांप्रदायिक विविध विषय, भाग १ ला, यांतील लेखांक ४१ वा वाचावा. यांत श्रीसमर्थकृत भक्तांची आरती दिलेली आहे. ही आरती श्री. अनन्तदासांच्या गाथेंतहि आहे. यांत श्रीसमर्थांनीं जी संतनामावली दिली आहे ती ऐतिहासिक व भाविक दृष्टीनें महत्त्वाची आहे, तशीच ती श्री. बहिरटांसारख्यांना उपयुक्त आहे. या आरतींत श्रीसमर्थांनीं सनकादि ३५ पौराणिक संतांचा उल्लेख केला असून ६१ ऐतिहासिक संतसंतिणींचा नामनिर्देश केला आहे. त्यांत २५ तरी केवळ वारकरी संत आहेत. त्यांत ब्राह्मणांशिवाय ब्राह्मणेतर व अस्पृश्यहि आहेत. त्यांचें नामोच्चरण करण्यांत श्रीसमर्थ स्वतःस धन्य मानीत. त्यांत कांहीं अस्पृश्य संतांचीं नांवें मुद्दाम येथें देत आहे:– पुंडरीक, निवृत्ति, सोपान, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव, सेना न्हावी, नामदेव, नीरा, विठा, नरहरि सोनार, विसोबा खेचर, कान्होपात्रा, गोरा कुंभार, परसा भागवत, सांवतां माळी, एका जनार्दन, चोखा महार, बंका (राका कुंभाराची मुलगी).

या यादींत श्रीतुकाराम महाराजांचें नांव नाहीं. ही नामावलि श्रीसमर्थ कृष्णातीरास येण्यापूर्वीं झाली असावी. कारण श्रीसमर्थ शके १५४२ ते १५५६ पर्यंत जवळ जवळ महाराष्ट्रांतच नव्हते. श्रीसमर्थांच्या पदकमलांनीं महाराष्ट्र शके १५६६ त पुनीत झाला. श्रीतुकाराम महाराज शके १५७१ त वैकुंठवासी झाले. शके १५६६ ते

१५७१ या पांच वर्षांत या उभयतां महापुरुषांची भेट एकदांच नव्हे तर अनेकदां झाली असली पाहिजे. श्रीसमर्थांविषयीं श्रीतुकाराम महाराजांनीं जे अभंग लिहिले आहेत, ते प्रक्षिप्त मानण्याचा प्रघात वारकरी मंडळांत आहे ते तसे कां मानावेत यास सबळ प्रमाणें मात्र ते देऊं शकत नाहींत, पण तसली कांहीं प्रक्षिप्ता-प्रक्षिप्ताची दृष्टि श्रीसमर्थांच्या गाथ्यासंबंधीं (श्री. अनंत रामदासीकृत) नाहीं. त्यांत श्रीतुकाराम महाराजासंबंधीं असा उल्लेख आहे:—

अनन्याचे पाळी लळे । पायीं ब्रीदावळी रुळे ॥
महामुद्गलाचें प्रेमें । रण छोडीं आला राम ॥
तारी तुकयाचें पुस्तक । देव ब्रह्मांडनायक ॥
कृष्णातीरीं हाका मारी दासा भेटी द्या अंतरीं ॥ ४६३ ॥

श्रीसमर्थांचे पट्टशिष्य श्रीकल्याण यांनीहि एक ‘ संतमाळा ’ रचिली आहे. त्यांत कोदंडधारी श्रीरामाच्या मूर्तीचे ठायीं अनेक सत्पुषांची कल्पना करून एक सुंदर रूपक बनविलें आहे. ( सां. वि. वि. भाग १ ला लेखांक ५१ वा पहावा, ) या रूपकांत स्वतः कल्याण व त्यांचे बंधू दत्तात्रय यांस वगळून एकंदर तेहतीस संत-संतिणींचा उल्लेख आहे. त्यांत नऊ वारकरी संत आहेत. श्रीरामप्रभूंच्या मूर्तींत कोणत्या स्थळीं हे कोणते वारकरी संत आहेत ते पहा:—

निवृत्ति सुरेख टिळा नीट ।
मुक्ताक्षता मुक्ताई ॥ १ ॥
नामया ज्ञानी कर्ण प्रसिद्ध ॥ ३ ॥
आजानु बाहो लंबायमान ।
सालया एका जनार्दन ॥ ६ ॥
अमोघ तुणीर तुकावा ॥ ७ ॥
कटिसूत्र तो सोनार ॥ ८ ॥
भानुकूर्म अवलोकन ॥ ९ ॥

याचा अर्थ असा आहे कीं, श्री विठ्ठलाच्या भाळींचा
तिलक म्हणजे — निवृत्ति,

नयनद्वय — भानुदास व कूर्मदास;
कर्णद्वय — नामदेव, ज्ञानदेव;
बाहू — ( सालया ) व एकनाथ;
तूणीर — तुकाराम;
कटिसूत्र — नरहरि सोनार.

याप्रमाणें श्रीसमर्थ संप्रदायांत वारकरी संत व देवता यासंबंधीं आदराचा पूर्ण अभाव आहे हें बहिरटांचें विधान कसें भरमसाट आहे हें स्पष्ट होतें.

आतां श्रीसमर्थांवरील दुसऱ्या एका आक्षेपाकडे वळूं. श्री. बहिरट म्हणतात कीं, " गुरु करावयाचा असेल, तर स्वयातीचाच पाहिजे, असा रामदासांचा दंडक आहे. "......" स्वयातीचा याचा अर्थ ब्राह्मण जातीचा " यासंबंधीं वारकरी संप्रदायाच्या श्री. बहिरटांस प्रश्न विचारावासा वाटतो कीं, ( म्हणजे श्रीज्ञानेश्वर श्री नामदेव, श्री एकनाथ व श्री तुकाराम ) या संत चतुष्टयाचे गुरु ब्राह्मणच होते ना ? शिवाय श्रीसमर्थांप्रमाणेंच श्रीतुकाराम महाराजांचेंहि हेंच मत होतें तो अभंग जशाच्या तसा तेथें देतों :—

डिवेना डसेना बुजेनां निर्मळ । परि अमंगळ स्वीकारीना ॥
परंतु गंधर्व अपवित्र जाणा । पर्वकाळीं दाणा देऊं नये ॥
डिवी लात्री बुजे बहुनेदी दुध । मुखीं नाहीं शुद्ध विष्टा खास ॥
परंतु ते गाय पवित्र हो जाणा । पर्वकाळीं दाना देऊं जे ते ॥
ब्राह्मणे ब्राह्मणा सद्‌गुरु करावा । परि न करावा शूद्रादिक ॥
तुका म्हणे देवें सांगितली सोय । म्हणोनि त्याणें पाय धरिले जीवें ॥ ४३४२ ॥

हा अभंग आधुनिक वारकरी मतानें प्रक्षिप्त आहे. परंतु हा गाथा शुद्ध असल्याचें वै. वा. भाऊराव काटकरांनीं त्याचें शेवटीं स्वाक्षरीनें लिहिलें आहे. वारकरी मंडळींत श्री. काटकरांची योग्यता अनन्यसाधारण व असामान्य होती असें सर्व वारकरी मानतात. महाराष्ट्र शब्दकोशकारांनीं हा अभंग प्रक्षिप्त मानलेला नसून या अभंगाचा पहिला चरण, आपल्या कोशांत ' डिवेना ' या शब्दाचा अर्थ देण्यासाठीं उद्‌धृत केला आहे.

जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्‌वंद्य ॥ दा. ५–१–१३

असें श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे. व श्रीसमर्थांच्या या ब्राह्मणांच्या पक्षपातित्वाबद्दल श्री. बहिरट हे नांवें ठेवीत आहेत. पण त्यांचें लक्ष श्रीतुकाराममहाराजांच्या थेट याच प्रकारच्या विधानाकडे गेलेलें दिसत नाहीं.

दुधाळ गाढवी जरी जाली पाहे । पावेल ते काय धेनुसरी ॥
कागाचिया गळां पुष्पाचिया माळा । हंसाची ती कळा काय जाणे ॥
मर्कटें अंघोळी लावियेले टिळे । ब्राह्मणाचे लीळे वर्तू नेणें ॥
जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तिन्हीं लोकीं ॥

वारकरी मंडळींनीं हा अभंग प्रक्षिप्त ठरविलेला नाहीं.

श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगांत ब्राह्मण्याची छाया मोठ्या प्रमाणत दिसते. ब्राह्मण्याबद्दल महाराजांस फार आदर वाटतो, वेदप्रामाण्य त्यास हवेंसें वाटतें, चातुर्वर्ण्य व चतुराश्रम समाजाच्या धारण-पोषणास अत्यावश्यक आहेत असें त्यांचें मत आहे. वर्णसंकर त्यांस नको होता, एवढेंच नव्हे तर ते सहभोजनाच्या विरुद्ध होते. वेदप्रामाण्याला महाराज किती मानीत याचें प्रत्यंतर पुढील उताऱ्यांवरून दिसून येईल:—

(१) वेदां निंदितो चांडाळ । भ्रष्ट सुतक्रिया खळ ॥ [ १३४५ ]

(२) वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे ।
बोलती ती वर्मे संतापुढें ॥ १४७२ ॥

(३) तारावया आर्धी शोधा वेदवाणी ।

(४) वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका ॥
२१८६ ॥

श्रीतुकाराम महाराज वर्णाश्रमासंबंधीं म्हणतातः—

(१) ब्रह्मचारी धर्म घोकावें अक्षर । आश्रमीं विचार षटकर्मे ॥
वानप्रस्थ तरी संयोगी वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ॥
परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें याती धर्म कुळ नाहीं ॥
१४८४ ॥

(२) वर्णाश्रम करिसी चोख तरि । तूं पावसी उत्तम लोक ॥ ७८२ ॥

(३) विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग ।
वाटिले विभाग । वर्ण धर्म हा खेळ तयाचा ॥ ३५५ ॥

आतां त्यांच्या ब्राह्मणासंबंधींच्या भावनासंबंधीं थोडेसें पाहूं या. श्रीमहाराजांनीं ब्राह्मणांची हजेरी जागोजागीं घेतली आहे ती ध्यानांत घेऊनसुद्धां त्यांनीं ठिकठिकाणीं ब्राह्मणासंबंधीं उदारपणें उद्‌गार काढले आहेत ते असे:—

(१) वैष्णव मुनि विप्रांचा सन्मान । करावा, आपण घेऊं नये ॥
तुका म्हणे हे आशीर्वादे बळी । जाईल तो छळी नरकायासी ॥

(२) आपमानिले वेदपाठक । सात्त्विक शास्त्रज्ञ संपन्न ॥ ३०.३.५८

(३) पाळी वेद आज्ञा ब्राह्मणांचा मान ॥ ४६० ॥

अशा प्रकारची ब्राह्मणांसंबंधींचीं प्रेमादराचीं वचनें आणखी कितीतरी देतां येतील.

श्री. बहिरट म्हणतात कीं, " वारकरी धर्मांत पाहिल्यास अगोदर गुरुत्वाची कल्पनाच भिन्न आहे. त्यांत गुरु हा शब्द संत या अर्थी वापरला आहे." ......" वारकरी धर्माचे गुरु अगर संत हे वरीलप्रमाणें गुरुशिष्य संबंध न राखतां मेघवृष्टीप्रमाणें सर्वांवर सारखी प्रेमवृष्टि करणारे आहेत." इ. इ. वारकरी-पंथ असें न म्हणतां ' वारकरी धर्म ' असा शब्दप्रयोग श्री. बहिरट कां करतात ? श्री. बहिरट यांचें वरील विधान वारकरी संप्रदायांतील श्रीज्ञानेश्वर, श्रीनामदेव, श्रीएकनाथ, श्रीतुकाराम व श्रीनिळोबाराय यांच्या बाबतींत सत्य आहे काय ? या पांच संतश्रेष्ठांमध्यें गुरुपरंपरा आढळून येत नाहीं काय ? श्रीज्ञानेश्वरांची गुरु-परंपरा सर्वविश्रुतच आहे. सगुण मूर्तीशीं प्रत्यक्ष व्यवहार करणारे श्री नामदेवराय त्या सगुण मूर्तीच्याच आदेशानुरूप श्रीविसोबा खेचरांकडे जाऊन जुन्या गुरु-परंपरेप्रमाणेंच त्यांस त्यांनीं आपले गुरु केलें. ' नारायण—विधि—अत्रिनाथ। दत्त जनार्दन-एकनाथ ही गुरुपरम्परा प्रेमदृष्टीनें उपदेश करणाऱ्या गुरुपरम्परेंत (?) मोडते कीं काय ? आपल्या गुरुमालिकेची खूण तर श्रीतुकोबारायांनीं स्वतःच सांगितलेली आहे:—

राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण मालिकेची ॥
बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मन्त्र दिला रामकृष्ण हरि ॥

या चारहि संतांत गुरुपरंपरा (श्री. बहिरट म्हणतात त्या अर्थाप्रमाणें संत-परंपरा नव्हे) अव्याहत चालत आलेली दिसून येत आहे. श्रीतुकाराम महाराजांस ' रामकृष्णहरी ' हा त्यांचा आवडता मन्त्र त्यांच्या श्रीगुरुकडून स्वप्नांत मिळालेला आहे. हा मन्त्र श्रीतुकोबारायांस तर अगोदरपासून माहीत होता. तरी पण तो श्रीगुरूंचें मुखांतून ऐकण्यास ते उत्सुक होते हें—

सद्गुरुरायें कृपा मज केली ॥ ३६८ ॥

यांतील ' कृपा ' शब्दावरून स्पष्ट होत आहे. श्री बाबाजी चैतन्यांनीं या ठिकाणीं मेघवृष्टीनें उपदेश केलेला नाहीं हें ध्यानांत ठेवावें. ह्याच अर्थानें श्रीमहाराज दुसऱ्या एका अभंगांत पुढीलप्रमाणें म्हणतात :—

माझिये मनींचा जाणोनिया भाव । तो करी उपाव गुरुराजा
॥ ३६९ ॥

हाच भाव पुढील अभंगचरणांत प्रकट होत आहे.

मानियला स्वप्नीं गुरूचा उपदेश ॥ १३३३ ॥

वर उद्धृत केलेल्या श्रीतुकोक्तींत गुरु म्हणजे संत असा अर्थ श्री. बहिरट म्हणतात त्याप्रमाणें होत आहे काय ? तसेंच—

(१) सद्‌गुरुरायें कृपा मज केली ॥ ३६८ ॥

(२) आहा रे भाई । प्रथम नमूं तो विनायक ।
ठेवुनि गुरुचरणीं मस्तक ॥ ४६० ॥

(३) नमो तया संत वचनीं विश्वास ।
नमो भावें दास्य गुरुचे त्या ॥ ४ ते २ ॥

(४) नव्हे गुरुदास्य संसारीया ॥ १२२१ ॥

यांतील गुरु शब्दाचा अर्थ श्री. बहिरट सांगतात त्याप्रमाणें संत असा आहे काय ? याचा विचार त्यांनीं आपल्या मनाशींच करावा.

गुरुसंबंधींची वरील सर्व अवतरणें वारकरी मंडळीस मान्य आहेत. आतां कांहींच्या मत क्षेपक मानल्या गेलेल्या पण वै. वा. भाऊराव काटकर यांनीं प्रमाण मानलेल्या गाथेच्या आधारें गुरुविषयींच्या वचनांचा थोडा विचार करूं. पुढें चार अभंग देण्यांत येत आहेत. त्यांतील 'गुरु' या शब्दांचा अर्थ 'संत' असा श्री. बहिरट म्हणतात त्याप्रमाणें आहे काय हें त्यांनीं आपल्या स्वतःलाच विचारावें.

(१) सद्‌गुरूचे चरणीं ठेविला मस्तक । देऊनियां हस्तक उठविलें ॥
नमस्कारीं त्याला सद्‌गुरू रायाला । तुका म्हणे बोला नाम वाचे ॥
४३३५ ॥

(२) सद्‌गुरूनें मज आशीर्वाद दिला । हरुष भरला हृदयीं माझे ॥
हृदयींचा भाव कळला गुरुसी । आनंद उल्हासीं बोले मज ॥
बोल मज गुरु कृपा तो करुनि । तुका म्हणे मनीं आनंदलों ॥
४३३६ ॥

(३) तुका म्हणे रक्षा झाली आपोआप । उजळला दीप गुरुकृपा ॥
२६६८ ॥

(४) सद्‌गुरुसेवन तें चि अमृतपान । करुनि प्राशन बैसावें गा ॥
४२१४ ॥

(५) तुका म्हणे गुरु कृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥
१७९१ ॥

वरील अभंग श्री. जोग महाराजांच्या सार्थ गाथेंत क्षेपक म्हणून दिले गेले आहेत. यासंबंधीं लक्षांत गेलेल्या ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं क्षेपक समजल्या

गेलेल्या अभंगांविषयीं वारकऱ्यांत एकमत नाहीं. वै. वा. पांगारकरांस हे अभंग क्षेपक वाटत नाहींत हें त्यांच्या श्रीतुकाराम चरित्रावरून स्पष्ट दिसतें. ४ व ५ वें अवतरण सर्व वारकऱ्यांस मान्य आहे.

परमार्थांत गुरु करणें अवश्य आहे किंवा नाहीं याचा विचार बाजूस ठेवून प्रश्न असा विचारावासा वाटतो कीं श्रीतुकाराम महाराजांस त्यांचा आवडता मंत्र 'रामकृष्णहरि' हा त्यांस गुरूपदेशापूर्वी माहीत असतांना व त्याचा ते अहर्निश जप करीत असतांना त्यांस तो श्रीगुरूकडून मिळावा अशी अपेक्षा कां वाटावी ?

केवळ श्रीतुकाराममहाराजांच्या वचनांचा आधार घेऊन वारकरी मंडळी असें मानतात कीं आपणास जुन्या (का सनातन ?) परंपरेप्रमाणें वैयक्तिक गुरु करावयाची आवश्यकता नाहीं, आपला मंत्र उघडा आहे ('उघडा मंत्र जाणा रामकृष्ण म्हणा') श्री. बहिरट हे त्यांचेच समाजधर्मी आहेत. त्यांना वा इतरांना आमच्या वरील शंकेचे म्हणजे मेघवृष्टीनें उपदेश करा, गुरुशिष्य पण नको असें सांगणाऱ्या श्रीतुकोबारायास वैयक्तिक गुरूची आवश्यकता कां भासावी ?

गुरुशिष्य पण । हें तो अधमलक्षण । तसेंच मेघवृष्टीनें करावा उपदेश ही व अशा प्रकारची गुरुपरंपराच्या विरुद्ध वचनें श्रीतुकाराम महाराजांच्या अभंगांत आहेत. पण गुरुपरम्परेला अनुकूल अशीं वचनें थोडीं कां होईनात पण त्यांच्या अभंगांत आढळतात. उदाहरणार्थ दोन तीन वचनें पुढें देतों—

(१) निजबीजी येथें तुका अधिकारी
पाहिजे तें पेरी तये वेळे ! ॥ २७४ ॥

(२) एकंदर शिका । पाठविला इहलोका ।
आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥ इ. ५१९

(३) आम्ही वेकुंठवासी । आलों याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥ इ. ५२०

पुढील अभंगांत श्री महाराज आपणांस देवानें कसा शिष्य द्यावा याचें मागणें देवाजवळ मागत आहेत:—

(४) देवा ऐसा शिष्य देई । ब्रह्मज्ञानीं निपुण पाहीं ॥
जो कां भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा ॥
ऐशा युक्ति ज्याला बाणे । तेथें वैराग्याचें गाणें ॥
ऐसा जाला हो शरीरीं । तुका लिंबलोण करी ॥

श्रीजोग महाराजांच्या गाथेंत हा अभंग क्षेपक म्हणून दिलेला आहे. या अभंगावरून स्पष्ट दिसतें की, श्री तुकाराम महाराजांस गुरुशिष्यसंबंध पूर्णतया मान्य होता व ते योग्य व्यक्ति पाहून त्यास अनुग्रह देत.

श्रीमहाराजांचे १३ । १४ जण टाळकरी होते असें सर्व चरित्रकार सांगतात. या टाळकऱ्यांस सुद्धां श्री महाराजांनीं स्वतः उपदेश दिलेला नसेल हें बुद्धीस पटत नाहीं. कोणासहि उपदेश द्यावयाचा नाहीं असें जर महाराजांचें व्रत असतें तर तें वैकुंठवासी झाल्यानंतर सुद्धां पाळावयास पाहिजे होतें. परंतु श्रीनिळोबाराय यांच्या बाबतींत तसें घडून आलेलें दिसत नाहीं. त्यास उपदेश व तोहि ते वैकुंठवासी झाल्यानंतर २५ । ३० वर्षांनंतर स्वप्नांत त्यांनीं केलेला आहे. यावरून निश्चित अनुमान असें निघतें कीं श्रीमहाराज निवडक मंडळीसच स्वतः उपदेश देत असत व जनसमाजाच्या बाबतींत त्यांचें मेघवृष्टीनें उपदेश करण्याचें धोरण असावें. मग त्यांचीं कारणें कांहींहि असोत.

वारकरी मंडळींतही जुनी गुरुशिष्य परंपरा केव्हांपासून लुप्त झाली हें कळण्यास मार्ग नाहीं, श्रीज्ञानेश्वर महाराजांची परंपरा ही गुरुशिष्य-परंपरा आजहि ग्वालेरच्या मठांत दृष्टोत्पत्तीस येते. इतर संतश्रेष्ठांच्यासंबंधीं आम्हांस कांहीं माहीत नाहीं, व आधुनिक प्रकारचा 'उघडा मंत्र जाणा । रामकृष्ण म्हणा परंपरा' केव्हां चालू झाली हें समजत नाहीं. श्री. बहिरटांच्या मतें ही उघड्या मंत्राची परंपरा श्री समर्थांच्या संप्रदायांत नाहीं पण हेंहि त्यांचें भ्रामक मत आहे. श्री समर्थांचाहि मंत्र उघडाच आहे–

( २ ) तुला सांगतों गुज हा बीज मंत्रु ।
जेणें निरसे थोर संसार शत्रु ।
नव्हे मिथ्य हें बोलणें सत्य वाचा ।
जपा अंतरीं मन्त्र तेराक्षरांचा ।। करुणाष्टकें ७४.२०

आतां एकवीस समासींत श्रीसमर्थ काय सांगतात तें पहा. वरील श्लोकांतील तेरा अक्षरें कोणतीं तीं पहाः–

( २ ) आतांहि जयास वाटे भेटावें ।
रामें मज सांभाळीत जावें ।
ऐसें दृढ घेतलें जीवें । तरी ऐका मी सांगेन ।। ३७ ।।
श्रीराम जयराम जयजयराम ।
ऐसा कांहीं येक धरुनि नेम ।
जप कीजे तेणें आत्माराम । जोडेल नेमें ।। ३८ ।।

वरी कोण्हासी कळों नेदावा । जप अंतरींच करावा ।
जैसा कृपणासी धनठेवा । सांपडला येकांती ॥ ३९ ॥
(जु. दा. बो. समास १५)

वरील ३८ व्या ओवींत सांगितलेला मन्त्र व त्याचें फल

श्रीतुकाराम महाराजांचा पुढील अभंग

उघडा मन्त्र जाणा रामकृष्ण म्हणा । तुटती यातना गर्भवास ॥
सार तुका जपे बीज मंत्र एक । भवसिंधुतारक रामकृष्ण ॥ ३०५९ ॥

या दोहोंचें फल एकच आहे ना ?

श्रीसमर्थ आपल्या मंत्रास 'बीजमंत्रु' असें म्हणत आहेत व श्रीतुकाराम 'बीजमंत्र' असेंच म्हणत आहेत.

सारांश, श्रीसमर्थसंप्रदायाप्रमाणेंच वारकरी संप्रदायांत गुरुशिष्य परंपरा ही निदान श्रीनिळोबा बहिणाबाईपर्यंत तरी चालू होती हें वर श्री महाराजांच्याच वचनाधारें सिद्ध करण्यांत आलेलें आहे. असें असतांना श्री. बहिरटांनीं श्रीसमर्थांचा त्यांच्या गुरुशिष्य संबंधासमयीं अधिक्षेप करावा याचें आश्चर्य वाटतें.

येथें श्री. बहिरटांनीं श्रीसमर्थांवर घेतलेल्या आक्षेपांपैकीं चार पांचच आक्षेपांचा परामर्श घेण्यांत आला आहे. अजून कितीतरी आक्षेप तसेच राहिले आहेत. समर्थांस बहिरट हे संत मानण्यासच तयार नाहींत. श्रीसमर्थ संत नाहींत यांचीं कारणें (आक्षेप) दाखवितांना त्यांनीं पुढें केलेलीं सर्व कारणें बाह्य आहेत. अंतरंग दाखविणारें एकहि संतचिन्ह त्यांनीं दर्शविलेलें नाहीं. श्रीसमर्थ वाङ्मयाचा साकल्यानें त्यांनीं विचार केला असता, काळजीपूर्वक वाचलें असतें तर त्यांना सांप्रदायिक अभिनिवेश–पिशाच्चिकेनें असें ग्रासलें नसतें.

० ० ०

# श्रीसमर्थ व नाना उपासना

श्री. बहिरटांनीं आपल्या अमृतकलशामध्यें (?) श्रीसमर्थांविरुद्ध लेखांत पान ७० वर " संत हे प्रेमोपासक म्हणून प्रेममूर्ति श्रीविठ्ठलांच्या भजनाशिवाय अन्य क्षुद्र देवतांच्या पूजनाचा त्यांनीं वेळोवेळीं निषेध केला आहे......श्रीतुकोबा-रायांनींहि क्षुद्र देवतांचा उपहास करून सकल जीवनमात्रांना प्रेमसुख पाजण्यास्तव उभ्या असणाऱ्या श्रीपंढरीरायाशिवाय दुसऱ्या कोणास " देव " हें नांवसुद्धां देतां येणार नाहीं असें म्हटलें आहे......तप, तीर्थाटन, ग्रंथाध्ययनाचाहि निषेध संतांनीं केला आहे...... " इत्यादि पांडित्य-प्रदर्शन केलें आहे. मौज अशी आहे कीं, ज्यांचा निषेध श्रीज्ञानेश्वरादि संतांनीं केला असें श्री. बहिरट समजतात त्या सर्व गोष्टी त्या त्या संतांनीं स्वतःच केलेल्या आहेत, इकडे त्यांचें लक्ष गेलेलें नाहीं. क्षुद्र देवतांची पूजा, तीर्थाटनादि या गोष्टींच्या रोखांत श्रीसमर्थांवर त्यांचा कटाक्ष आहे हें सांगणें नकोच. ग्रंथराजाच्या ४ थ्या दशकाच्या ५ व्या समासांत ' आर्चन ' भक्तांचें निरूपण श्रीसमर्थांनी केलें आहे या समासाचें सार असें आहे कीं:—

कायावाचा आणी मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवंत आर्चनें । या नांव आर्चनभक्ती ॥ ४.५.२९

या आर्चन भक्तींत श्रीसमर्थांनीं नाना देव-देवतांची पूजा करण्यास सागितलें आहे, तसेंच

याहि वेगळे कुलधर्म । सोडूं नये अनुक्रमें ।
उत्तम अथवा मध्यम । करीत जावे ॥ ४.५.१५

ते कोणते कुलधर्म तर—

जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी ।
पूजा मागिणी जोगिणी । कुळधर्म करण्या ॥ ४.५.१६

ही ओवी आमच्या या कट्टर वारकरी बुवांस खटकली. व ते श्रीसमर्थांवर घसरले, पण त्यांनीं थोडा धीर धरून जर पुढचा समास पाहिला असता तर बरें झालें असतें. त्यांना, क्षुद्र देवतांची उपासना करण्यास सांगणारे श्रीसमर्थ खरे संतच नव्हेत हें सिद्ध करण्याची फार त्वरा लागली होती. म्हणून पुढील ' वंदन

भक्तीच्या ' समासाकडे ( दा. ४.६ ). पहावयास त्यांना फावलें नाहीं. अर्चन-भक्ति काय किंवा वंदनभक्ति काय कोणाची केली तरी त्याचें पर्यवसान शेवटीं:—

सर्व देवांस नमस्कारिलें । तें येका भगवंतास पावलें । ४.६.११

याप्रमाणें होतें असें श्रीसमर्थांस सांगावयाचें आहे हें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. समर्थ एके ठिकाणीं म्हणतात कीः—

नव्हे ऐसा माझा राम । सकळ जीवांचा विश्राम ॥
नव्हे गणेश गणपाळु । लाडू मोदकाचा काळू ॥
नव्हे चंडीमुंडी शक्ती । मद्य मांसातें मागती ॥
नव्हे भैरव खंडेराव । रोटी भरिता साठीं देव ॥
नव्हे जाखाई जोखाई । पीडिताती ठायीं ठायीं ॥
नव्हे भूत नव्हे खत । निंब-नारळ मागत ॥
रामदासीं सर्वकाम । सर्वांभूतीं सर्वोत्तम ॥ १५ ॥ अ. स. गाथा

हाच अभिप्राय श्री. बहिरटांनीं उद्‌धृत केलेल्या श्रीतुकाराम महाराजांच्या अभंगांत दिसून येत आहेः—

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥
बळिया माझा पंढरिराव । जो या देवांचाहि देव ॥
रंडीचंडी शक्ति । मद्य मांसातें भक्षिती ॥
बहिरव खंडेराव । रोटी सुटीसाठीं देव ॥
गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ॥
मुंजा म्हैसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ॥
वेताळे फेताळे । जळो त्याचें तोंड काळें ॥
तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥ २३।४

वरील श्रीसमर्थकृत अभंग व श्रीतुकारामकृत अभंग या दोहोंत किती चमत्कृतिजन्य शब्दसाम्य व अर्थसाम्य यांकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. दोघांचाहि अभिप्राय एकच आहे हें श्री. बहिरट सुद्धां मान्य करतील. त्यांच्या समाधानासाठीं श्रीसमर्थांचा आणखी एक अभंग देतों:—

मुख्य पूजा परंपार । एकाहूनी एक थोर ॥
आतां कोठें ठेऊं भाव । बहुसाल जाले देव ॥

माझे कुळींचीं दैवतें । पाहों जातां असंख्यातें ॥
रामकृष्ण महादेव । बनशंकरी खंडेराव ॥
माता सटवाई आपण । स्वामी लक्ष्मीरमण ॥
वीर बैसविला देव्हारां । माझी माता एकवीरा ॥
मायराणी पांडुरंग । मुंज्या नृसिंह झोटिंग ॥
महालक्ष्मी खळ्या । कुळदैवत मोरया ।

* * *

तुळजापुरची तुकाई । घाटमाथांची नवलाई ।

* * *

पूजा जोगिणी मांगिणी । बहुसाल मानविणी ॥

* * *

अग्निसारखें दैवत । आणि मुख्य प्राणनाथ ॥

* * *

रामदासीं देव एक । थेर सर्वही मायिक ॥ २५ ॥

॥ ४९४ ॥ अ. स. गाथा.

शेवटच्या चरणाकडे श्री. बहिरटांनीं लक्ष द्यावें, व मगच श्रीसमर्थांना नानादेवतांची पूजा मान्य होती का एका देवाची मान्य होती तें ठरवावें. श्रीसमर्थकृत एकटा 'मनोबोध' जर त्यांनीं मननपूर्वक वाचला असता तर ते श्रीसमर्थांविरुद्ध लिहिण्यास प्रवृत्त होते ना ! 'अनेकीं सदा एक देवास पाहे ॥' (मनोबोध ४९) या एकाच चरणावरून समर्थांचा दृष्टिकोण काय आहे हें त्यांच्या ध्यानांत यावयास पाहिजे होतें.

श्री. बहिरटांस विचारावेंसें वाटतें कीं क्षुद्रदेवतांची उपासना ही काय श्रीसमर्थांनीं चालू केली ? गीतेच्या कालापासून किंबहुना तत्पूर्वीपासूनहि ती समाजांत चालू नव्हती काय ? गीतेंतील:—

कांक्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ।
क्षिप्रंहि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ ४–१२

हा श्लोक, किंवा

यान्ति देवव्रता देवान्पितॄन्यान्ति पितृव्रताः ।
भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपिमाम् ॥ गी ९–२५.

हा श्लोक काय दर्शवितो ? श्रीसमर्थांपूर्वी शेंकडों वर्षे ही उपासना चालू होती ही गोष्ट स्पष्ट आहे. ती ज्याच्या त्याच्या कुळधर्माप्रमाणें ज्यानें त्यानें पाळावी एवढेंच श्रीसमर्थांनीं सांगितलें आहे. ती मुख्य उपासना म्हणून पाळा असें त्यांनीं कोठेंहि सांगितलेलें नाहीं. वर जो श्रीसमर्थांचा अभंग देण्यांत आला आहे, त्यावरून हें स्पष्ट होत आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायांत थेट असेंच सांगितलें आहे:——

कुळधर्म चाळी । विधिनिषेध पाळी । १२–११६

तात्पर्य, आत्मारामाची उपासना करीत असतांना कुळधर्म टाकून दिले पाहिजेत असें श्रीज्ञानेश्वरहि सांगत नाहींत किंवा श्रीसमर्थहि सांगत नाहींत. असें असतांना श्री. बहिरटांचा श्रीसमर्थांवर निष्कारण कटाक्ष कां व श्रीपांडुरंगोपासनेचा आग्रह कां ? त्यांस

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानां ह्यनियम एतद् धर्मस्य लक्षणम् ॥

हा लोकमान्यकृत श्लोक माहीत आहे ना ? वारकरी संतांची उपासना एकच नव्हती हें इतिहासप्रसिद्ध आहे. श्रीएकाजनार्दनाची उपासना ‘ दत्त ’, श्रीनरहरी सोनाराची ‘ शिव ’ हीं यांचीं ठळक उदाहरणें म्हणून देतां येतील. सारांश श्रीसमर्थांवर श्री. बहिरट या क्षुद्रदेवतोपासना प्रकरणीं विनाकारण घसरले आहेत.

क्षुद्रदेवतोपासनेच्या निषेधाच्या ओघांत श्री. बहिरटांनीं तप, तीर्थाटन, ग्रंथाध्ययन इत्यादिकांचा श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, निळोबादिकांच्या वचनांनीं निषेध केला आहे. त्यांच्या या विवेचनावरून असें वाटतें कीं, याचाहि रोख श्रीसमर्थांवरच आहे. त्यांचें असें म्हणणें दिसतें कीं, श्रीसमर्थांनीं हें सर्व केलें आहे व आपल्या ग्रंथांत, हें सर्व करणें परमार्थास आवश्यक आहे व आपल्या अनुयायांनीं तें सर्व आचरणें अवश्य आहे असें सांगितलें आहे व वारकरी संतांस हें सर्व कांहीं नको आहे. त्यांचा आशय तसा नसता तर त्यांनीं वरील प्रकारें संतप्रमाणें देण्याचें कांहींच प्रयोजन नव्हतें.

श्रीज्ञानेश्वर-नामदेवांनीं तीर्थाटन केलेलें नाहीं काय ? श्रीनाथांनींहि तें केलेलें आहे ना ? या संतत्रयींच्या मानानें श्रीतुकाराम महाराजांनीं तीर्थयात्रा फार कमी केलेल्या दिसतात. पण थोड्या फार केलेल्या असाव्यात हें त्यांच्या:——

वाराणसी गया पाहिली द्वारका ।
परि न ये तुका पंढरीच्या ॥

या चरणांवरून स्पष्ट आहे. त्याचप्रमाणें या तिघांचेंहि (श्रीज्ञानेश्वर, एकनाथ व श्रीतुकाराम महाराजसुद्धां) ग्रंथाध्ययन केवढें जबरदस्त होतें याची स्पष्ट कल्पना त्यांच्या ग्रंथावरून होतें. तपाची व्याख्या श्री. बहिरट काय करतात हें आम्हांस माहीत नाहीं. अखंड गुरुचरणसेवा, सतत नामस्मरण हीं तपांत मोडत नाहींत काय ? या सर्व गोष्टी न करतां संतपदवी प्राप्त होणें शक्य आहे काय ? श्रीज्ञानेश्वरादि संतांना या साधनांनींच परतत्त्व साक्षात्कार झालेला आहे. असें असतांना तप, तीर्थयात्रा, ग्रंथाध्ययनादि गोष्टींचा निषेध या संतांनी केला आहे असें श्री. बहिरटांनीं विपर्यस्त विधान कां करावें ? आतां ही गोष्ट खरी आहे कीं, एकजात सर्व संतांनी (श्रीसमर्थांनीसुद्धां) नामस्मरणास परमार्थप्राप्तीच्या सर्व साधनांत अग्रगण्य दिलें आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांनीं तप, यात्रा, ग्रंथाध्ययनादिकांचा सरांस निषेध केला आहे. निष्कारण शारीरिक कष्ट ज्यांत अतिशय पडतात अशा तपादिकांचा निषेध केलेला आहे हें त्यांच्या ग्रंथावरून दिसून येतें. श्रीसमर्थांच्या तीर्थयात्रेचेंच उदाहरण घेऊं या. त्यांच्याइतक्या तीर्थयात्रा महाराष्ट्रीय साधुसंतांत तरी कोणी केल्याचें दिसत नाहीं. पण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की, श्रीसमर्थांचें हें तीर्थाटन टाकळीस त्यांना परमेश्वरी साक्षात्कार झाल्यानंतर झालेलें आहे. याचा अर्थ देवप्राप्तीकरितां हें तीर्थाटन नव्हतें. या तीर्थाटनाचा हेतु निराळा होता, पण असें मात्र नव्हे कीं तीर्थाटनावर श्रीसमर्थांची पारमार्थिक दृष्टीनें मुळींच श्रद्धा नव्हती. ते दासबोधांत एके ठिकाणीं म्हणतात कीं:—

जयंत्यादिकें नाना पर्वें । तीर्थें क्षेत्रें जें अपूर्वें ।
तेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ॥

तया तीर्थातें जे न मानिति । शब्दज्ञानें मिथ्या म्हणती ।
तयां पामरां श्रीपती । जोडेल कैंचा ॥ १४.५.७.८ ॥

त्यांचा तीर्थादिकांवर भाव होता. पण देवाच्या प्राप्तीकरितां सत्संगावर त्यांची जास्त श्रद्धा होती हें त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून स्पष्ट होत आहे:—

आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर ।
जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ॥

तो अन्तर्देव चुकती । धांवा घेऊनी तीर्था जाती ।
प्राणी बापुडे कष्टी होती । देवास नेणतां ॥

मग विचारिती अन्तःकरणीं । जेथें तेथें धोंडा पाणी ।
उगेंचि वणवण हिंडोनि । काय होतें ॥

ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें संत सत्संग धरिला ।
सत्संगें देव सांपडला । बहुत जनासी ॥ १८.८.१० । १३

हाच तीर्थादिकांसंबंधींचा श्रीसमर्थांचा अभिप्राय श्रीतुकोबारायांच्या पुढील अभंगांत दिसून येत आहे:—

( अ ) तीर्थीं धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥
मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ॥
तीर्थीं भाव फळे । येथें आनाड तें वळे ॥
तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥ ११४ ॥

( आ ) ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी ।
तरि कां हिंपुटी वेदशास्त्रें ॥
शास्त्रांचें भांडण जप तीर्थाटण ।
ऊर्वीचें भ्रमण याचसाठीं ॥
याचसाठीं जप याचसाठीं तप ।
व्यासें ही अमूप ग्रन्थ केले ॥
याचसाठीं संतपाय हे सेवावे ।
तरिच तरावें तुका म्हणे ॥ ३०६४ ॥

तीर्थाटनाचा निषेध श्रीसमर्थांनीं तर्कशुद्ध पद्धतीनें केला आहे:—

तीर्थी जाती देखोवेखी । तेथें कैसी होते पाखी ॥
पाप गेलें पुण्य जालें । कैसे प्रत्ययासी आलें ॥
दोषापासूनि सूटला । प्राणी मुक्त कैसा जाला ॥
ह्मणती जाऊं वैकुंठासी । कैसें येतें प्रत्ययासी ॥
देवदास म्हणे हित । कैसें जाहालें स्वहित ॥ १७६ ॥ अ. स. गाथा

असाच निषेध श्रीतुकोबारायांनीं—

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें ।
चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥
अंतरींचें शुद्ध कासयानें जालें ।
भूषण त्वां केलें आपण या ॥ १७३२ ॥

या अभंगांत केला आहे.

वाराणसी ( काशी ) अखिल हिंदुमात्रांचें पूज्यतम क्षेत्र. त्याचा समाचार श्रीसमर्थांनीं कसा घेतला आहे हें आमच्या कट्टर वारकरी बंधूंनीं– पाहिलें असतें तर त्यांचीं लेखणी श्रीसमर्थांविरुद्ध लिहिण्यास सरसावली नसती.

वाराणसी क्षेत्र थोर । तेथें लोक जाती फार ॥
परी तेथें अधिक काय । ऐसें विचारोनि पाहे ॥
येथें लोक तेथें लोक । अवघें एकाचि उदक ॥
जेथें तेथें देव धोंडा । तो कां आपुलें गांवीं सांडा ॥
देवदास म्हणे वेडें । तीर्थां धांवे अवघ्यांपुढें ॥ १७६ ॥ अ. स. गा.

खरा त्रिवेणीसंगम कोणता तें पुढील अभंगांत श्रीसमर्थ सांगतातः–

मनकर्णिके माझारीं । स्नानसंकल्प निवारी ॥
स्नान केलें अंतरंगा । तेणें पावन झाली गंगा ॥

गुरुपायीं शरण प्रेमें । तोचि त्रिवेणी संगम
रामकृपेचें वाहे जळ । रामदासीं कैचा मळ ॥

आतां श्री. बहिरटांनीं निर्दिष्ट केलेल्या ग्रंथाध्ययनाच्या संतकृत तथाकथित निषेधाच्या प्रश्नाचा थोडा ऊहापोह करूं. श्रीज्ञानेश्वर महाराज व श्रीनाथमहाराज हे उभयतां तर जाडे व्युत्पन्न होते हें सांगणें नकोच. सर्वसाधारणतः असें मानण्याचा प्रघात आहे कीं, श्रीतुकाराम महाराज हे फारसे व्युत्पन्न नसावेत. ( असा एक अपसमज आहे. ) या अपसमजाचीं कारणें स्वतः श्रीतुकोबारायांनीं निरक्षरतेसंबंधीं काढलेले उद्‌गार, त्यांचा शूद्र वंशांतील जन्म व आधुनिक विद्वानांनीं त्यांच्याविषयींचीं या संदर्भात केलेलीं भ्रामक विधानें. आमचें मत असें कीं, श्रीज्ञानेश्वर, एकनाथांच्या मानानें विद्वत्तेच्या बाबतींत श्रीतुकोबाराय, कमी असतील, पण त्यांचें वाचन त्या काळाच्या मानानें चांगलेंच दांडगें होतें. गीता, भागवत, पुराणें इत्यादींशीं त्यांचा दाट परिचय होता. श्री. बहिरटांस हें सर्व माहीत असतांना ग्रंथाध्ययनाचा निषेध श्रीतुकोबारायांनीं व इतर संतांनींहि केला आहे असें त्यांनीं कां लिहावें ?

श्रीसमर्थांचें ग्रंथावलोकन किती दांडगें होतें हें ग्रंथराजाच्या १ ल्या दशकाच्या १ ल्या समासावरून, तसेंच ४ थ्या दशकाच्या १ ल्या समासावरूनहि दिसतें.

या समासांत श्रवणभक्ति सांगितली आहे. श्रवण काय किंवा वाचन काय एकच होय. या समासावरून श्रीसमर्थांच्या अफाट श्रवणाची कल्पना येते. या त्यांच्या श्रवणभक्तींतून जगांतील कोणतीहि गोष्ट सुटलेली नाहीं. संगीतशास्त्र,

वद्यकशास्त्र, मंत्रविद्या, गारुडविद्या, किमया इत्यादिसुद्धा त्यांच्या या श्रवणभक्तींतून सुटलेल्या नाहींत मग वेदादि वाङ्मय सुटलें नसेल हें सांगणें नकोच:-

वेदशास्त्रें आणि पुराणें । महावाक्याचीं विवरणें ।
तनुच तुष्टप निर्शनें । कैसी तें ऐकावी ॥ दा. ४.१.२८

पण एकाच सूचक ओवींत या सर्वांचा एकप्रकारें निषेधहि त्यांनीं केलेला आहे तो असा:-

ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ॥
असार जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ती ॥ दा. ४.१.२९

आतां ‘ सार शोधून घ्यावें ’ म्हणजे काय तें सांगतात:-

परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचार सार ॥
दा. १३.६.२१

थेट हाच श्रीसमर्थांचा अभिप्राय श्रीतुकोबारायांच्या:—

फळकट तो संसार । येथ सार भगवंत ॥२७३३

या उक्तींत दृष्टोत्पत्तीस येतो किंवा नाहीं हें श्री. बहिरटांनीं प्रांजळपणें सांगावें. याच एका दृष्टीनें प्रेरित होऊन सर्व संतांनीं ग्रंथाध्ययनादि गोष्टींचा निषेध केला आहे, श्रीसमर्थांनींहि तो तसा केला आहे.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ................ विः ................
क्रमांक ................ नों. दि ................

# श्रीसमर्थ व त्यांचें ब्राम्हणपक्षपातित्व

कै. पूज्य नानासाहेब देवांच्या श्रीसमर्थांच्या चरित्रांतून ( खं. ३ पृ. १४३ व १४९ ) श्री. बहिरटांनीं पुढील वाक्यें उद्‌धृत केलीं आहेत. " श्रीसमर्थांचें बहुतेक वाङ्मय ब्राह्मणांना उद्देशून आहे. ब्राह्मणवर्ग मनांत आणून त्याला त्यांनीं उपदेश केला आहे. कांहीं विशिष्ट प्रसंग सोडून त्यांची सारी कविता ब्राह्मणापुरती आहे. " याचें कारणहि सदर लेखक देतात कीं, " ब्राह्मणस्य रक्षणे ।रक्षितः स्याद्वैदिको धर्मः । तदधीनत्वाद् वर्णाश्रमभेदानाम् । चारी वर्ण आणि चारी आश्रम ब्राह्मणाधीन असल्यामुळें एका ब्राह्मणाचें रक्षण झालें म्हणजे वैदिक धर्माचेंच रक्षण झालें असें समजावें असें श्रीशंकराचार्यांप्रमाणें समर्थांचें मत होतें. रामदास हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे अत्यंत अभिमानी व पुरस्कर्ते होते ही गोष्ट देवांनींच मांडली आहे. "

आपल्या मतास आधार म्हणून श्री. बहिरटांनीं वरील देवांचें मत दिलें आहे. स्वतः ब्राह्मण असून श्रीसमर्थांच्या ब्राह्मणपक्षपाताविषयीं श्री. बहिरटांस इतकी चीड यावी या त्यांच्या सामाजिक समतेच्या मताबद्दल व त्यांनीं ते निर्भीडपणें पुढें मांडल्याबद्दल त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. वाईट एवढेंच वाटतें कीं, कै. देवांनीं तें कोणत्या अर्थानें म्हटलें असावें याचा त्यांनीं फारसा विचार केलेला दिसत नाहीं. देवांचा हवाला देण्याऐवजीं त्यांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ श्रीसमर्थांचीं वाक्यें उद्‌धृत केलीं असतीं तर बरें झालें असतें. देवांचें मत कांहींहि असू द्या. त्याचा विचार नंतर करूं.

प्रथम, स्वतः श्रीसमर्थांनीं आपले ग्रंथ बहुंशानें का होईनात पण ब्राह्मणाकरतांच लिहिले आहेत, असें कोठें लिहिलें आहे तें श्री. बहिरटांनीं दाखवावें, एतद्‌विषयक चारदोन विधानें तरी त्यांनीं श्रीसमर्थ वाङ्मयांतून काढून दाखवावींत. अप्रत्यक्ष रीतीनें का होईना, श्रीसमर्थांच्या शब्दांत असलेला उल्लेख त्यांनीं वाचकांपुढें मांडावा. यासंबंधींचीं जीं प्रमाणें त्यांनीं दिलीं आहेत, त्यांचा परामर्श आम्ही यापूर्वीं घेऊन तीं कशीं पोकळ, भ्रामक आहेत हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. घटकाभर गृहीत धरतों कीं श्री. बहिरट मानतात त्याप्रमाणें श्रीसमर्थ कट्टर ब्राह्मणपक्षपाती आहेत व त्यांचे ग्रंथहि केवळ ब्राह्मणासाठींच लिहिलेले आहेत, पण आम्ही त्यांस उलट विचारतों कीं, कोणत्या संताचे ग्रंथ चातुर्वर्ण्य व चतुराश्रम यांस पूर्णपणें अनुकूल नाहींत ? जितक्या प्रमाणांत श्रीज्ञानेश्वर, श्रीनामदेव, श्रीएकनाथ व श्रीतुकाराम हे चातुर्वर्ण्य व चार आश्रम यांचे अभिमानी आहेत, तितक्या प्रमाणांतच श्रीसमर्थ हेहि आहेत. या चारांपैकीं

कोणत्या संतानें वर्णाश्रमांचा निषेध केला आहे, कोणत्या संताने ब्राह्मणेतरांस धार्मिक वा सामाजिक बाबतींत श्रीसमर्थांपेक्षां जास्त सवलती दिल्या आहेत व त्यांस जास्त जवळ येऊं दिलें आहे, तें श्री. बहिरटांनीं सप्रमाण दाखवावें. वर जो त्यांनीं देवांचा हवाला दिला आहे तसा न देतां त्या त्या संतांचीं प्रमाणें देऊन हे संत श्रीसमर्थांप्रमाणें कट्टर सनातनी नसून ते त्यांच्यापेक्षां जास्त प्रागतिक किंवा सुधारक होते हें त्यांनीं दाखवावें.

आतां श्रीज्ञानेश्वर, श्रीनामदेवादि ब्राह्मणेतर संत व श्रीनाथांच्या चातुर्वर्ण्य व चतुराश्रम यांच्या मतासंबंधीं थोडेसें दिग्दर्शन करून, श्रीतुकाराममहाराजांच्या तत्संबंधींच्या मताचा पुनश्च निर्देश करून श्रीसमर्थांच्या सामाजिक मतांसंबंधीं ऊहापोह करण्यांत येईल.

विरोधी व अनुकूल पक्षाचें म्हणणें थोडक्यांत पुढें देत आहोंतः—

( १ ) श्रीसमर्थांचें सर्व वाङ्मय ( विशेषतः दासबोध ) सामान्यतः ब्राह्मण वाचक वर्ग गृहीत धरूनच लिहिलें गेलें आहे.

( २ ) महाराष्ट्र धर्माच्या द्वारें वैदिक परंपरेचें पुनरुज्जीवन करण्याची त्यांची ( श्रीसमर्थांची ) मनीषा होती, व त्यांतील ब्राह्मणवर्चस्व त्यांना टिकवून धरावयाचें होतें.

( ३ ) भागवत धर्मीयांनीं धार्मिक समतेचा सतत पाठपुरावा केला पण रामदासांनी मात्र सर्वत्र ब्राह्मणांच्या श्रेष्ठतेचा पाढा वाचला आहे.

प्राध्यापक प्रा. गंगाधर बाळकृष्ण सरदार यांनीं आपल्या ' संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति ' या निबंधवजा पुस्तिकेंत हेंच मत प्रकट केलें आहे. त्यांचे शब्द जरी निराळे आहेत, तरी त्याचा मथितार्थ एकच आहे. तेव्हां श्री. बहिरटांचा जो परामर्श आम्ही घेत आहोंत, त्यांतच प्रा. सरदार व इतरहि कांहीं विद्वान् त्यांत येतातच. पण विशेषत: हे दोघेजण येतात. पण या उभयतां विद्वानांत एक मोठा फरक आहे. श्री. बहिरट यांच्या अंत:करणांत ( निदान या त्यांच्या लेखापुरता तरी ) श्रीसमर्थांविषयीं काडीइतकाहि आदरभाव नाहीं. आपल्या सबंध लेखांत श्रीसमर्थांसंबंधीं चुकूनहि एक अक्षरसुद्धां त्यांनीं चांगलें काढलेलें नाहीं. याच्या उलट प्रा. सरदारांची स्थिति आहे. उभयतांचें श्रीसमर्थांच्या बद्दल जवळजवळ एकच मत आहे. पण मतभेद प्रकट करतांना प्रा. सरदारांनीं एका शब्दानेंसुद्धां श्रीसमर्थांचा अधिक्षेप केलेला नाहीं. त्यांच्याबद्दल योग्य तो आदर व मर्यादा ठेवली आहे. या उभयतांसारखेंच आणखीहि कांहीं विद्वानांचें मत आहे. त्या सर्वांचा आतां साकल्यानें परामर्श घ्यावयाचा आहे.

श्रीसमर्थेतर संतांचें वाङ्मय जितक्या प्रमाणांत बहुजन समाजाकरितां आहे, असें विरोधी पक्ष मानतो तितक्याच प्रमाणांत श्रीसमर्थांचें वाङ्मयहि पण बहुजन समाजाकरितां ( ब्राह्मणेतरांकरितां ) आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे. मोक्षाची सोपी वाट आपापल्या ग्रंथांत सर्व संतांनीं परमेश्वराच्या नामाच्या द्वारें जशी सर्वांस सरसहा मोकळी करून दिलेली आहे, तशीच ती श्रीसमर्थांनींहि दिली आहे:—

चहूं वर्णांनामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ।
जडमूढ पैलपार । पावती नामें ॥ दा. ४. ३. २४ ॥

सबंध दासबोधांत ५. ३ रा समास हा सर्वांत मोठा आहे. त्याच्या १०४ ओव्या असून त्यांत शिष्यलक्षणें सांगितलीं आहेत. या १०४ ओव्यांमध्यें शिष्य असा पाहिजे, तसा पाहिजे, असा नको, तसा नको इत्यादि चिकित्सा श्रीसमर्थांनीं फार कांटेतोलपणानें केलेली आहे. पण त्यांत कोठेंहि ब्राह्मणाचा चुकूनसुद्धां उल्लेख नाहीं. ‘ स्वयातीचा पाहिजे गुरु ’ असें श्रीसमर्थ म्हणत असतील ( ते तसें कां म्हणतात हें पुढें सांगूंच ) पण स्वयातीचाच शिष्य पाहिजे असें श्रीसमर्थ चुकूनसुद्धां कोठेंहि म्हणत नाहींत. दासबोधाच्या आरतींत श्रीकल्याण म्हणतात कीं:—

अज्ञान जडजीवां मार्ग सुगम जाला ।

किंवा

बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी ।

हीं विधानें काय दर्शवितात ? श्रीसमर्थांचें वाङ्मय बहुंशीं ब्राह्मणाकरितां होतें कीं ब्राह्मणेतराकरितां होतें हें यावरून सिद्ध होत नाहीं काय ? तसेंच

( १ ) काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ ११. १०. १७
( २ ) उदंड समुदाये करावे ११. १०. १८
( ३ ) लोक बहुत शोधावे ११. १०. २१
( ४ ) किती लोक तें कळेना । किती समुदाय आकळेना ।
सकळ लोक श्रवणमनना । मध्यें घाली ॥ १९.१०.११
( ५ ) जितुकें आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।
शहाणें करून सोडावे । बहुतजन ॥ १९.१० १४

हीं श्रीसमर्थांचीं वचनें काय केवळ श्रीसमर्थांचे ब्राह्मण शिष्यच दर्शवितात ? यांत ब्राह्मणेतर शिष्य सगळेच निरक्षर असणें संभवनीय नाहीं. त्यांतील थोडेतरी साक्षर आणि प्रत्यहीं श्रीसमर्थवाङ्मय वाचीत असलेच पाहिजेत. यावरून श्रीसमर्थांचें

वाङ्मय, निदान ग्रंथराज तरी, केवळ ब्राह्मणांसाठींच लिहिला गेला नसून तो बहुजन समाजासाठींच निर्माण झाला असला पाहिजे हें उघड आहे.

जगाच्या कल्याणासाठीच केवळ संतांचा अवतार असतो हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्यांची प्रत्येक कृति जनहितासाठींच असते. त्याची सहज लीला-सुद्धां जगाला नीतीचे पाठ सदैव देत असते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—

जयाचियेे लीलेमाजी नीति । जियाली दिसे ।

त्याचे श्वासोच्छ्वासहि समाजाच्या उद्धारार्थ असतात. याच कोटींतील श्रीसमर्थ आहेत. असें असतांना त्यांचे ग्रंथ मात्र केवळ एका विशिष्ट वर्णासाठीं लिहिले गेले आहेत असें म्हणणें म्हणजे असल्या संतास सामान्य जनांच्या कोटींत आणून बसविण्यासारखें होत आहे. श्रीसमर्थ कांहींजणांस एकांगी दिसतात किंवा वाटतात हा दोष श्रीसमर्थांचा नसून त्यांच्याकडे पाहणाऱ्यांचा आहे. जो तो आपापल्या शक्तीप्रमाणें त्याच्याकडे पाहतो; त्यांच्या शक्तीप्रमाणेंच श्रीसमर्थ किंवा इतर संत त्याला दिसतात. 'संत होऊनियां संतांसी पहावें' असें वाक्य आहे तें याच अर्थानें. श्रीसमर्थांच्या पुढील वचनावरून काय निष्पन्न होतें तें पहावें: —

( १ ) दास म्हणे जन पावन व्हावें ।
तेंचि निरूपण गावें ॥ ५९७ ॥ श्रीसमर्थ गाथा ( अनंतदास )

आपलें निरूपण, प्रवचन इत्यादि सर्व अखिल जनतेसाठीं आहे असा याचा अर्थ नाहीं काय ? श्रीरामप्रभूंचा मी दास झालों तो स्वतःचा उद्धार करून जगाचा उद्धार करण्यासाठींच झालों आहें असें मोठ्या आत्मविश्वासानें श्रीसमर्थ पुढील अभंगांत सांगत आहेतः—

( २ ) राघवाचीं पदें मानसीं धरीन । विश्व उद्धरीन हेळा मात्रें ॥
हेळा मात्रें मुक्त करीन या जनां । तरीच पावन राघवाचा ॥
राघवाचा दास मी जालों पावन । पतित तो कोण उरों शके ॥
पावनाचें ब्रीद आम्हां प्राप्त जालें । प्रचीतीस आलें किती एक ॥
किती एक जन ज्ञानें उद्धरीले । कृतकृत्य जाले तत्काळ चि ॥
येणें काळें मोक्ष जरी मीं देईना । दास ह्मणवीना राघवाचा ॥
राघवाचा वरें पावलों सत्वर । जनाचा उद्धार करावया ॥ ५०१ ॥
( स. गा. )

समाजाशीं वागण्यांत कोठेंतरी उजवेंडावें असें श्रीसमर्थ करीत आहेत असें वरील वचनांवरून दिसतें काय ?

जनतेशीं वागण्यांत– मग तें वागणें वाङ्मयरूपानें असो, निरूपण प्रवचनद्वारा असो वा प्रत्यक्ष व्यवहारामध्यें असो– जो उच्चनीच, श्रेष्ठकनिष्ठ इत्यादि भाव ठेवील त्याला संत म्हणतां येईल काय याचा विचार श्रीसमर्थांविषयीं अनुकूल वा प्रतिकूल लिहिणारांनीं करावयास पाहिजे व तो अगदीं निर्विकारपणें करावयास पाहिजे. त्यांच्याकडे आपल्या दृष्टीनें पाहूं नये, त्यांच्याशीं थोडेंतरी समरस होऊन पहावें तरच त्यांचें हृद्गत कळणें शक्य होईल. पुढें देण्यांत येणाऱ्या श्रीसमर्थांच्या वचनांत कोणता भाव दृग्गोचर होतो तो वाचकांनीं सांगावा:—

(१) लोकामध्यें तरे आणि जना तारी ।
धन्य तो संसारी दास ह्मणे ॥ ५७१ ॥ स. गा.

(२) उपासना भक्त होऊनी करीन ।
ज्ञानें उद्धरीन अज्ञानाशी ॥ ८२८.९९ ॥ स. गा.

(३) जयाचेनि ज्ञानें तरतीं अज्ञानें । हरिभक्त करी जन तरावया ।
स्वधर्म विलया जावो नेदी ॥ स. गा.

(४) दास ह्मणे रे कोणासी सांगावें ।
हित आपुलेंचि आपण करावें ।
सुख शाश्वत पाहोनियां धरावें ॥ जनां सहित आपणां
उद्धरावें ॥ १४७२ ॥ स. गा.

(५) पतित हे जन करावें पावन । येथें अनुमान करूं नये ॥
करूं नये गुणदोष उठाठेवी । विवेकें लावावी बुद्धि जना ॥
बुद्धि सांगे जना त्या नांव सज्जन । पतितपावन दास ह्मणे ॥

बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं विशेषतः पारमार्थिक उन्नतीसाठी श्रीसमर्थांच्या पोटांत कशी तळमळ होती हें श्रीसमर्थांच्या वरील उद्‌गारांत स्पष्टपणें दिसून येतें. दासबोधांतहि हीच तळमळ व कळकळ दिसून येते. याची साक्ष पुढील वचनांवरून दिसून येईल. विचार करील तर सर्व जग मुक्त आहे, कोणीहि बद्ध नाहीं–ब्राह्मणापासून तों तहत समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत–असें श्रीसमर्थ सांगत आहेत.

कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतीस्तव भुलले जन ।

असा आम जनतेस धैर्याचा संदेश देणारे श्रीसमर्थ ब्राह्मणपक्षपाती होते, त्यांचें वाङ्मय केवळ ब्राह्मणासाठींच आहे असें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे केवळ सत्यापलाप होय. तसेंचः—

पतित पावनाचे दास । तेहि पावन करिती जगास ।
ऐसी हे प्रचित मनास । बहुताच्या आली ॥

असें छातीठोकपणानें सांगणाऱ्या श्रीसमर्थांवर पक्षपातित्वाचा आरोप करणें म्हणजे स्वतःच्या मनाच्या संकुचितत्वाचें प्रदर्शन करणें होय. श्रीसमर्थांचा शिष्य-परिवार केवढा होता हें दासबोधांतील,

नभामाजी तारागणें । तैसे लोक ॥ १२.७.२०

आपणास 'समर्थ' पदवी कशी प्राप्त झाली, ती मिळविण्यासाठीं काय केलें, हें सांगतांना श्रीसमर्थ म्हणतात कीं:—

बहुत जनास चालवी । नाना मंडळें हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥ १८.१०.४६

यांत श्रीसमर्थांची ब्राह्मणाची तरफदारी दिसून येत आहे काय? तसेंच 'चालवी' 'हालवी' या पदाच्या अर्थाकडे पुन्हा नीट लक्ष द्यावें असें आम्ही विनवितों. 'चालवी' व 'हालवी' म्हणजे स्वतः किंवा आपल्या ग्रंथद्वारें असा अर्थ येथें अभिप्रेत आहे.

वरील विवेचनावरून चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईल कीं, श्रीसमर्थांवर ब्राह्मणपक्षपातित्वाचा आरोप करणाऱ्या अनकूल व प्रतिकूल टीकाकाराची विचार-सरणी तर्कदुष्ट, सदोष अतएव त्याज्य आहे.

या सदर्भात श्रीसमर्थवाङ्मयांतील आणखी एक विशिष्टयाचा भाग उल्लेख करणें अवश्य आहे, तो श्रीसमर्थकृत भारुडें हा होय. बहुतेक महाराष्ट्रीय प्रमुख साधुसंतांनीं भारुडें लिहिलेलीं आहेत. त्यांतल्या त्यांत श्रीएकनाथ महाराजांचीं भारुडें फार प्रसिद्ध आहेत. हीं भारुडें लिहिण्यांत श्रीनाथांचा हेतु परमार्थाचें लोण समाजाच्या अगदीं शेवटच्या थरांत नेऊन पोहोचविणें हाच होता. बहुजन समाजांत त्याकाळीं या भारुडाद्वारें चांगलेंच पारमार्थिक चैतन्य उत्पन्न झालेलें असणार यांत शंकाच नाहीं. आधुनिक कालांत अजूनहि ही भारुडें अल्पप्रमाणांत का होईना पण जनता-जागृतीचें कार्य त्या त्या समाजाच्या द्वारें करीत असतात. श्रीनाथांच्या या काम-गिरीबद्दल आधुनिक सामाजिक कार्यकर्तें त्यांस धन्यवाद देत असतात. पण ते

देतांना श्रीसमर्थांच्या तसल्याच कामगिरीकडे मात्र ते दुर्लक्ष करतात. एवढेंच नव्हे तर श्रीसमर्थांचें कार्य सामाजिक दृष्ट्या प्रतिगामी स्वरूपाचें आहे असें प्रतिपादण्याचा अट्टाहास ते करतात. श्रीनाथांच्या भारुडांच्या मानानें श्रीसमर्थांचीं भारुडें कमी आहेत ही गोष्ट खरी, पण तीं श्रीनामदेव व श्रीतुकाराम महाराजांच्यापेक्षां जास्त असावींत असें वाटतें.

हीं श्रीसमर्थकृत भारुडें ४८ असून त्यांतील कांहीं अभंगांत आहेत, कांहीं पद्यांत आहेत, व थोडीं हिंदीतहि आहेस. त्यांपैकीं कांहींची नांवें कानफाट्या, कापडी, कुळवाडी, खेळिया, गोंधळ, चौक, जागल्या, जोगी, डवरी, डाका, दिवटा, पांगुळ, पिंगळा, बहुरूपी, बाळसंतोष, बैरागी, रजक, वाघ्या, वासुदेव, शिलंगण, हंडीबाग, होळी अशीं आहेत. या नांवाच्या टिपणावरून श्रीसमर्थ समाजांत आपल्या कार्याचा प्रचार त्या त्या वर्गातील लोकांच्याद्वारें अगदीं शेवटच्या थरापर्यंत करीत होते हें सिद्ध होतें.

आतां दुसऱ्या मुद्द्याचा विचार करूं, टीकाकारांस आम्ही असें विचारतों कीं, महाराष्ट्रीय संतांपैकीं कोणास वैदिक परंपरा नको होती ? श्रीज्ञानेश्वर व श्रीएकनाथ हे तर ब्राह्मणच होते. तेव्हां त्यांस वैदिक परंपरेचा अभिमान असणें अगदीं स्वाभाविक होतें. पण ब्राह्मणेतर संतांपैकीं एकानेंहि श्रीचोखोबारायांनींहिसुद्धां, वैदिक परंपरेच्या विरुद्ध एकहि अक्षर काढलेलें नाहीं. येवढेंच नव्हे तर आपलें शिर तिच्यापुढें भाविकपणें विनम्र केलें आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटल्याप्रमाणेंः—

पैं अहितापासूनि काढिती । हित देऊनि वाढविती ।
नाहीं श्रुती परौती । माऊली जगा ॥ १६.४६२

असेंच सर्वांचें मत आहे. या ब्राह्मणेतर संतांपैकीं प्रत्येकास वेदप्रामाण्य मान्य आहे; म्हणूनच चातुर्वर्ण्य व चतुराश्रम, त्याचप्रमाणें स्मृति, इतिहास, पुराणें हीं सर्व पूज्य आहेत. त्या त्या संतांचीं प्रमाणें देऊन हें सिद्ध करणें फार सोपें आहे.

यासंबंधीं प्रथम ज्ञानियांचे राजे श्रीज्ञानेश्वर महाराज चातुर्वर्ण्य व चतुराश्रम यासंबंधीं काय म्हणतात तें पाहिलें म्हणजे श्री. बहिरटप्रभृति विद्वानांस विचारावेंसें वाटतें कीं, श्रीज्ञानेश्वरहि श्रीसमर्थांच्याच कोटींत पडत नाहींत काय ? श्रीज्ञानेश्वर महाराजांस चातुर्वर्ण्यव्यवस्था पूर्णपणें मान्य होती हें ज्ञानेश्वरीवरून व श्रीनिवृत्तिनाथांशीं झालेल्या त्यांच्या संवादांवरून अगदीं स्पष्ट आहे. संन्याशाचीं मुलें म्हणून त्यांच्यावर आळंदीकर ब्रह्मवृंदानें बहिष्कार घातला होता. आपले मौंजीबंधनादि संस्कार व्हावेत म्हणून त्यांनीं ब्रह्मवृंदाची प्रार्थना केली असतां, तुम्ही पैठणकर ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र आणा म्हणजे पुढें काय करावयाचें तें पाहूं असें आळंदीकर

ब्राह्मणांनीं सांगितलें. त्या वेळीं श्रीनिवृत्तिनाथ व श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्यामध्यें या तथाकथित शुद्धीसंबंधीं चर्चा झाली. श्रीनिवृत्तिनाथांचें मत आपणास बाह्यशुद्धीशीं कांहींहि कर्तव्य नाहीं, आपण नित्य शुद्धच आहोंत असें होतें:—

नाहीं यातिकुळ वर्ण अधिकार । क्षेत्री वैश्य शूद्र द्विज नव्हे ॥
ते आम्ही अविनाश अव्यक्त जुनाट । निजबोधें इष्ट स्वरूप माझें ॥
नव्हे आप तेज वायु व्योम मही । महत्तत्त्व तेंहि विराट नव्हे ॥
नव्हे मी सगुण नव्हे मी निर्गुण । अनुभूनीं भजन होऊनी नव्हे ॥
निवृत्ति म्हणती ऐक ज्ञानेश्वरा । माझी परंपरा ऐसी आहे ॥

यावर श्रीज्ञानेश्वर उत्तर देतात कीं आपलें म्हणणें,

नाहीं भेदाभेद स्वस्वरूपीं ।

या दृष्टीनें सर्वथैव खरें आहे. पण सामान्य जगाला हें कळण्याची पात्रता नाहीं. आपलें सर्वच 'अलौकिक' आहे पण ज्ञात्यानें

मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिका नोहावें । लोकांप्रति ॥ ज्ञा. ३.१७१

कारण—

अविधि आचरण परम दूषण । वेदो नारायण बोलियेला ॥
स्वधर्म अधिकार जातीपरत्वभेद ।-उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥
म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें । जना दाखवावें वर्तोनियां ॥
प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चालता । पावन अवस्था जरी झाली ॥
ज्ञानेश्वर म्हणे ऐका जी निवृत्ति । बोलिली पद्धती धर्मशास्त्रीं ॥
॥ ६९० ॥

श्रीज्ञानेश्वर महाराजांची आदि म्हणून जे नामदेव गाथ्यांतील अभंग आहेत, त्यांतील हा अभंग आहे. श्रीनामदेवांनीं तो ज्ञानेश्वरांच्या तोंडून वदविला आहे. या अभंगावरून श्रीज्ञानेश्वर-नामदेवांचें वेद, चातुर्वर्ण्य यासंबंधींचें मत स्पष्ट दिसून येत आहे. ज्ञानेश्वरींतहि श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं हेंच अनेकवार सांगितलें आहे:—

तुम्हां वर्ण विशेष वशें । आम्ही स्वधर्मुचि विहिला असे । ३.८८

येथें चातुर्वर्ण्याची स्पष्ट तरफदारी श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं केल्याचें स्पष्ट दिसून येत आहे.

महाराष्ट्रीय संतांनीं वेदप्रामाण्य एकजात मानलें आहे. मग ते संत ब्राह्मण असोत वा ब्राह्मणेतर असोत. सर्वांसच वेद पूज्य आहेत. याचाच अर्थ सर्वांस चातुर्वर्ण्य, चतुराश्रम हे मान्य आहेत. वेदप्रामाण्य मानणें या सिद्धान्तानेंच उपसिद्धान्त म्हणजे चातुर्वर्ण्य व चतुराश्रम मानणें हें होय. या सिद्धान्ता-प्रमाणें पहातां आमचे सर्व महाराष्ट्रीय संत, मग ते वारकरी असोत वा रामदासी असोत, हे कट्टर वैदिक परंपरानुयायी आहेत हें त्यांच्या त्यांच्या वाङ्मयावरून सिद्ध करणें फार सुलभ आहे. आतां वेदप्रामाण्यासंबंधीं श्रीनामदेवरायाचें मत काय तें पाहूं या. वेषधारी संतांची त्यांनीं आपल्या अभंगांत पुष्कळ झडती घेतली आहे. त्यांत एके ठिकाणीं:—

वेदमर्यादा सांडूनि चालती । हुंबतें घेती वाऱ्यासवें ।। १८७१.४।।

अशी नामदेवांनीं या ढोंगी संतांवर टीका केली आहे. त्याच्या उलट जगांत धन्य कोण याबद्दल ते सांगतात कीं:—

वेद मर्यादा वेगळी । कार्यें न करी सर्वथा ।। १९७३.२।।

वरील दोन्हीहि वचनांत श्रीनामदेवरायांची वेदाबद्दलची म्हणजे चातुर्वर्ण्य व चतुराश्रम या वैदिक परंपरेसंबंधींची पूज्य बुद्धीच दिसून येत आहे. हाच भाव त्यांच्या खालीं दिलेल्या दोन वचनांत दिसून येत आहे:—

( १ ) वेदशास्त्रभय आम्हांसी लाविलें ।। ४५२.१०।।

( २ ) वेदशास्त्रवचन चुकल्या अवचिता ।
गोसावीजी होता दंडावया ।। ४५२.११।।

वेदप्रामाण्याविषयींचा आपला अभिप्राय श्रीसंत जनाबाई आपल्या एका अभंगांत पुढीलप्रमाणें प्रगट करतात:—

वेदांतीं हें बोलिलें । सिद्धान्तीं हें नेमियलें ।
लागा लागा भक्ति वाटा । धरा हेंचि नेमनिष्ठा ।।
वेद बाह्य तें कर्म । सांडी, न करी अधर्म ।
तोचि एक होय ज्ञानी । देव निष्ठा म्हणे जनी ।।

श्रीनामदेवांचे एक पुत्र विठा याचें वेदशास्त्रें व पुराणें यांच्यासंबंधींचें मत पुढील दोन वचनांवरून दिसून येईल:—

( १ ) दोहोणार चवघेजण । धार सुटेना अजून ।। ५४.२।।

( २ ) चहूंचें बोलणें सहाचें नेणिव । अठराची जाणीव कैंचि तेथें ६५.३।।

आतां इतर ब्राह्मणेतर संतांचें याच वेदप्रामाण्याविषयींचें मत पाहूं या. देवाचें—श्रीपांडुरंगाचें रूप देवादिकांस व वेदादिकांसहि अगोचर आहे हें सांगतांना श्रासित कान्होपात्रा म्हणतात कीं:—

हरिहर ब्रह्मादिक । जयालागीं करिती तप ॥
तो हा पंढरीचा राणा । नये अनुमाना श्रुतीसी ॥
शास्त्रें पुराणें भांबाविलीं । चारी मौन्यचि राहिली ॥
पुण्डलिक वरदायिणी । कान्होपात्रेचा जो धनी ॥ १८ ॥

श्रीज्ञानेश्वरकालीन संतांमध्यें ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध असलेल्या श्रीगोरोबा-काकांचा आतां श्रुतीसंबंधीं अभिप्राय पाहू या. पुढें दिलेल्या अभंगांवरून त्यांचा आध्यात्मसाक्षात्कारांतील अधिकार स्पष्ट दिसून येत आहे.

अंतरीचें गूज बोलूं ऐसें कांहीं । वर्णव्यक्त नाहीं शब्द शून्य ॥
जयजय झनकूट जयजय झनकूट । अनुहात जंगट नाद गर्जे ॥
परतल्या श्रुति म्हणती नेती नेती । त्याःहीं नादा अंतीं स्थिर राहे ॥
म्हणे गोरा कुंभार समाधिचें नीर । सेवी निरंतर नामदेवा ॥

श्रुतीलाहि ज्याचा रस चाखावयास मिळालेला नाहीं त्या रसाचेंहि नित्य सेवन करणारे श्री गोरोबा श्रीनामदेवास तो रस व नाद याचें सेवन करण्यास या अभंगाच्या द्वारें सांगत आहेत. असे ते महान् साक्षात्कारी होते. म्हणून श्रीनामदेवांचें गाडगें पक्कें कीं कच्चें याची परीक्षा करण्यास श्रीमुक्ताबाई इत्यादींनीं त्यांना सांगितलें तें योग्यच होतें.

चिंतन चित्ताला । लावी मनाच्या मनाला ॥
उन्मनी सुखांत । पांडुरंग भेटी देत ॥

या आपल्या अनुभवाला साक्ष कोण याचें उत्तर देतांना संत श्रीसेना न्हाव्यांनीं आपल्या बाजूनें वेदशास्त्रांनाच आपल्या वतीनें साक्षीदार म्हणून संत-सभेपुढें उभें करून वेदशास्त्राबद्दलची आपली पूज्य बुद्धि प्रकट केली आहे:—

ऐसा आहे श्रेष्ठाचार । वेद शास्त्रांचा निर्धार ॥ ९६ ॥

नामाचें श्रेष्ठत्व दाखविण्यासाठीं त्यांनीं वेदांचाच आधार घेतलेला आहे:—

अंतरीचे पुरे काम । घेतां नाम विठोबाचें ॥
नाम साराचें हि सार । शरणागत यम किंकर ॥

पाहिलें वेदांत । निश्चय केला निगमांत ॥
सेना म्हणे न वेंचा कांहीं । लाभ नाहीं या ऐसा ॥ ५० ॥

हाच अभिप्राय पण जरा निराळ्या वळणानें त्यांच्या पुढील अभंगांत दिसून येत आहे :—

शरण जाऊं कोणासी । तुजवीण ऋषीकेशी ॥
पाहतां नाहीं त्रिभुवनीं । दुजा तुज ऐसा कोणी ।
पाहिला शोधुनी । वेदशास्त्रपुराणीं ॥
सेना म्हणे पंढरीराया । शरण सांभाळी सखया ॥

आपणास वेदशास्त्रादि शिरसावंद्य आहेत हें संत सेनांनीं सांगितलें आहे.

श्रीसंत चोखोबाराय हे तर बोलून चालून अस्पृश्य. ब्राह्मणांनींच नव्हे तर अस्पृश्येतर जनतेनें आपणांस कसें तुच्छ लेखलें आहे याबद्दलची पोटतिडिकेनें जर खरोखर कोण तक्रार करीत असेल तर ते श्रीचोखोबाराय व त्यांचें सर्व कुटुंब. असें असतांनासुद्धां हें सर्व संत कुटुंब वेद शास्त्रादिकांबद्दल जो आदर दाखवितें तो खरोखर कौतुकास्पद आहे. परमार्थाच्या सर्व साधनांत नामसाधन हेंच सर्वांत श्रेष्ठ साधन होय असें वेदांनींच सांगितलें आहे. असें श्रीचोखोबा सांगतात :—

( १ ) नामाचें सामर्थ्य न कळे ब्रह्मादिकां । वेडावलीं देखा वेदशास्त्रें ॥
( २ ) वेदाचा अनुभव शास्त्राचा अनुवाद । नामाचि गोविंद एक पुरें ॥

श्रीनामदेवापासून श्रीचोखोबांपर्यंत सर्व स्पृश्य व अस्पृश्य अशा ब्राह्मणेतर संतांना वेद पूज्य आहेत. वेदांबद्दल पूज्यभाव असणें याचा अर्थ वेदप्रतिपादन चातुर्वर्ण्य व चतुराश्रमव्यवस्था यांच्यापुढें मान तुकविणें हें ओघानेंच आलें. अर्थातच चातुर्वर्ण्याची व्यवस्था ह्या सर्वांस शिरोधार्य आहे व तिचे ते पुरस्कर्ते आहेत.

आतां श्रीएकनाथ महाराजांचें चातुर्वर्ण्यासंबंधीं मत व श्रीनाथ वैदिक परंपरेचे कट्टर अभिमानी कसे होते हें ओघानें पुढें यावयाचेंच आहे. ते जरी इतर संतांच्या मानानें समाजसुधारणेच्या बाबतींत प्रागतिक होते तरी पण त्यांचा मूळ पिंड सनातनीच, हें लक्षांत ठेवावें.

श्रीएकनाथ महाराजांनंतर श्रीतुकाराम महाराजांच्याकडे आतां वळूं या. ते वैदिक परंपरेचे भक्त होते हें आम्हीं आमच्या 'श्रीसमर्थांवरील कांहीं आक्षेपांचा

परामर्श ' या लेखांत सप्रमाण सिद्ध केलेंच आहे. तरी पण याच संदर्भात श्रीतुकोबारायांचा एक अभंग मुद्दाम उद्धृत करीत आहोंत. नामाचें महत्त्व वेदशास्त्र पुराणें यांनीं कसें मान्य केलें आहे तें या अभंगांत सांगतात व ते आपली त्याविषयींची पूज्यबुद्धि व्यक्त करतातः—

वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ॥
विठोबासी शरण जावें । निज निष्ठा नाम गावें ॥
सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतकाचि निर्धार ॥
अठरा पुराणीं सिद्धान्त । तुका म्हणे हाचि हेत ॥

श्रीतुकोबाराय सनातनी परंपरा मान्य करतात हें या अभंगांत स्पष्ट तर होतच आहे. ' वेद अनंत बोलिला ' याचा अर्थ ' अनंता वै वेदाः ' हें तर मान्यच आहे. आम्ही याचा अर्थ ' एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ' असा करतों. या श्रुतिवाक्याचा अर्थ आमच्या मतें ' परब्रह्मवस्तु एकमेवाद्वितियम् ' असा आहे. ज्ञात्यांस ती अनेक रूपांनीं, अनेक प्रकारांनीं दिसली व अनुभवास आली. येथें ' विप्राः ' या पदाचा अर्थ ' ज्ञानी ' असा आहे. आमचा प्रश्न असा कीं कीं, ' विठोबा ' हें नाम वेदांत कोठें तरी आलें आहे काय ? ते तसें आलेलें नसावें असें आम्हांस वाटतें. असें असतांनासुद्धां श्रीतुकोबाराय म्हणतात कीं ' विठोबासी शरण जावें, ' याचा अर्थ असा कीं, परब्रह्म वस्तु भक्तांस त्या त्या भक्ताच्या भावनेप्रमाणें निरनिराळ्या काळांत, निरनिराळ्या देशांत परिस्थित्यनुरूप दर्शन देत असते. हा खरा वैदिक सिद्धान्त आहे. उपासनेंत एकाच रूपाचा विग्रहाचा आग्रह नसतो व नसला पाहिजे. हीच वैदिक परंपरा श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगांत दिसतेः—

योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी ।
पाहतां पाहतां मना न पुरे धणी ॥
देखिला देखिला गे माये देवाचा देव ।
फिटला संदेह निमालें दुजेपण ॥
अनंतरूपें अनंतवेषें देखिलें म्यां त्यासी ।
बापरखुमादेवीवरू खूण बाणली कैसी ॥

अशा प्रकारें साक्षात्कारी संतांचा अनुभव असतां ' येथें उभा कां श्रीरामा ' इत्यादि पदांबद्दल श्री. बहिरटांनीं श्रीसमर्थांसंबंधीं प्रलाप कां काढावेत ? ते स्वतःस वारकरी म्हणवितात. त्यांनीं वारकरी संतांचें वाङ्मय तरी काळजीपूर्वक वाचलें असणार असें गृहीत धरून चालावयास हरकत नाहीं. श्रीसमर्थांनीं ' येथें उभा का

श्रीरामा ' या पदांत जो भाव व्यक्त केला आहे थेट तोच भाव श्रीनामदेवांच्या एका अभंगांत प्रकट झालेला आहे :–

द्वापारींची टेव संपूर्ण पाहून । विनवी जोडोन करां लागीं ॥
रामरूप धरून मज बोलवावें ॥ तें रूप राहावें हृदयामाजीं ॥
मनोरथ त्याचा ऐकोनि श्रवणीं । झाला चापपाणि तात्काळिक ॥
पाहोनियां ध्यान करुनि नमन । निघाला तेथून वायुसूत ॥
घेवोनियां आज्ञा सेतुबंधा गेला । ध्यानस्थ बैसला नामा म्हणे ॥

ज्या पदासंबंधीं त्यांनीं श्रीसमर्थांवर आग पाखडली आहे तोच प्रकार श्रीमारुतिराय व श्रीनामदेवराय यांच्यासंबंधीं श्री. बहिरट करणार आहेत काय ?

श्रीनामदेवरायांच्या वरील अभंगाशीं श्रीसमर्थांच्या पुढील अभंगाची वाचकांनी तुलना करावी अशी आमची त्यांस विनंति आहे:–

राम अयोध्येचा वासी । तोचि नांदे द्वारकेसी ॥
कृष्ण नामातें धरिलें । बहु दैत्य संहारिले ॥
सखया मारुति लागुनी । रूप दावी चक्रपाणी ॥
राम तोचि विठ्ठल झाला । राम दासासी भेटला ॥

आत्मसाक्षात्कारी संतांचा अनुभव व भाषा एकच असते. परंतु पक्षांध व अपूर्ण शब्दज्ञात्यास त्यांचें महत्त्व कसें कळणार ?

असाच प्रकार श्री. बहिरटांनीं श्रीसमर्थांनीं ' गोब्राह्मण ' हा शब्द ज्या संदर्भांत वापरला आहे, त्यासंबंधीं केला आहे. ' गोब्राह्मण = महाराष्ट्रधर्म ' असें समीकरण त्यांनीं मांडलें आहे, व त्यावरून " वारकरी धर्म (?) हा रामदासी धर्मा (?) प्रमाणें संकुचित व कोत्या दृष्टीचा नसून विशाल व करुणादृष्टीनें ओथंबलेला या ब्रीदाचा आहे. " हें हरि ॐ तत्सदिति सूत्राचें सार इ. अभंगाच्या शेवटच्या चरणाच्या:–

गोब्राह्मण हिताहुनी निराळें । वेदीचें ते मूळ तुका म्हणे ॥

याच्या आधारें म्हटलें आहे. याचा अर्थ ते " कृपासागर पांडुरंग हा गोब्राह्मण हिताच्या धर्माहून निराळा धर्म जगविणारा आहे असें स्पष्ट म्हटलें आहे ", असा करीत आहेत. ' गोब्राह्मण ' या शब्दाचा प्रयोग श्रीसमर्थांपूर्वी श्रीनामदेव, श्रीएकनाथ यांनीं ज्या संदर्भांत केला आहे त्याचा अर्थ प्रथम पाहूं.

दैत्याच्या अत्याचारानें लोक त्रासले व त्यांनीं या जाचांतून सोडविण्यासाठीं नारायणाची प्रार्थना केली. त्यावेळीं त्यांस धीर देण्यासाठीं आकाशवाणी झाली कीं:–

देवकीच्या गर्भी येईल भगवान।
रक्षील ब्राह्मण गाईभक्त ॥ श्रीनाम. गा. १४९४. २ ॥

असें वर्णन श्रीनामदेवांनीं 'श्रीकृष्ण माहात्म्यां 'त केलें आहे. आणखी एका स्थळीं हाच शब्दप्रयोग त्यांनीं आपल्या अभंगांत केला आहे. तो प्रसंग शुक–रंभा संवादांतील आहे, श्रीशुकदेवांची परीक्षा पाहण्यासाठीं इंद्रानें आपलें सुकुमार अस्त्र रंभा म्हणजे अप्सरा हिला त्यांच्याकडे पाठविलें आहे. रंभा शुकदेवांस नाना विलोभनें दाखवून त्यांस व्रतच्युत करण्याचा प्रयत्न करीत आहे. ती त्यांस सांगते कीं ही वैराग्यानें शरीरास त्रास देण्याची अवदसा तुम्हांस कोठून प्राप्त झाली? हें सर्व सोडून द्या व मी सांगतें तें सर्व करा, तुम्हांस राज्य पाहिजे असेल तर तेंसुद्धां देण्यास मी समर्थ आहे. तुम्ही राजे झालांत तर तुमच्या हातून परोपकाराचें केवढें तरी महत्कार्य होईल. कोणतें तें पहा :–

गाई ब्राह्मणांचें पाळण। लोकांचें सांभाळण। २१०७. २८९ ॥

अवताराचें व त्याचा प्रतिनिधि जो 'ना विष्णुः पृथिवीपतिः' यांचें जगांतील आद्य कर्तव्य काय हें वरील दोनहि अवतरणांवरून स्पष्टपणें कळून येत आहे.

चातुर्वर्ण्याचीं स्वाभाविक कर्में कोणतीं याचें वर्णन भागवताच्या १७ व्या अध्यायांत आलेलें आहे. त्यांत क्षत्रियांचीं दहा लक्षणें सांगितलीं आहेत. पैकीं ७ वें लक्षण 'उद्यम' व ८ वें लक्षण 'स्थैर्य' आहे. 'उद्यम' म्हणजे काय हें श्रीनाथ पुढील शब्दांनीं सांगतातः –

वेंचूनिया निजप्राण। गोब्राह्मणांचें संरक्षण।
स्वधर्में प्रजापालन। पृथ्वीरक्षण निरुपद्रवें ॥ ए. भा. १७·१६०

तसें 'स्थैर्य' म्हणजे काय हें सांगतातः–

गोब्राह्मण संरक्षणता। स्वधर्में प्रजापाळकता।
ये ठायीं उबगूं नये चित्ता। या नांव स्थैर्यता क्षत्रियांची ॥
ए. भा. १७·१६२

प्रस्तुत प्रकरणीं श्री. बहिरटांनीं उल्लेख केला तो 'गोब्राह्मण' शब्द श्रीसमर्थांनीं श्रीशिवछत्रपतींस श. १६७१ मध्यें लिहिलेल्या एका पत्रांत आहे. त्याचा अर्थ श्री. बहिरटांनीं फार संकुचित केला आहे. 'महाराष्ट्रधर्म' म्हणजे 'गोब्राह्मण रक्षणाचा धर्म' असा अर्थ त्यांनीं केला आहे तो स्वकपोलकल्पित आहे. गोब्राह्मणसंरक्षण हें 'महाराष्ट्रधर्माचें' एक अंग आहे. तो त्यांनीं श्रीसमर्थांचे अंगीं हेतुपूर्वक चिकटविला आहे. व तो हेतु सत्यावर अधिष्ठिलेला

नाहीं. त्यांनीं श्रीसमर्थांविरुद्ध निरनिराळ्या प्रकारचीं आणि आधारहीन विधानें केलीं आहेत. ' गोब्राह्मण याचा अर्थ श्रीनामदेव व श्रीएकनाथ महाराजांनीं केला आहे व तोच श्रीसमर्थांस अभिप्रेत आहे. अवतारांचें व राजांचें मुख्य कर्तव्य कोणतें हें या त्रिवर्गसंतांनीं ' गोब्राह्मणसंरक्षण ' या शब्दप्रयोगानें सूचित केलें आहे. श्रीसमर्थ श्रीशिवप्रभूंस एक साधा राजा मानीत नव्हते, तर ईश्वरावतार समजत होते हें दा. १८–६ यांतील ओवी,

धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
मागें जाले पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥

यावरून स्पष्ट होत आहे. अफझलखानाच्या भेटीस जाण्यापूर्वीं हा समास श्रीसमर्थांनीं श्रीशिवप्रभूंस सांगितला व त्यांत त्यांच्या म्हणजे छत्रपतींच्या स्वतःच्या खऱ्या स्वरूपाची – ते अवतार असल्याची – व त्या अवताराच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

' महाराष्ट्रधर्म ' याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. तो विषय फार मोठा आहे. श्रीसमर्थांच्या पूर्वींच्या संतांनीं ज्याची फारशी दखलगिरी घेतली नाहीं त्याची श्रीसमर्थांनीं ' गोब्राह्मण संरक्षण ' याची भर पूर्वींच्या संतांनीं सांगितलेल्याच मार्गांत घालून केलेली आहे व त्यास त्यांनीं ' महाराष्ट्रधर्म ' हें नांव दिलेलें आहे. श्रीनाथांना ' गोब्राह्मण ' संरक्षण याची आठवण चांगली होती हें भावार्थ-रामायणामध्यें पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येतें. पण त्यांनीं या कार्यास प्रत्यक्ष हात घालून संघटना केल्याचें त्यांच्या अवतारचरित्रावरून दिसून येत नाहीं. श्रीसमर्थांनी हें प्रत्यक्ष केलें व तें पूर्वींच्या संतांनीं घालून दिलेल्या मार्गानेंच केलें; पण त्यास ' गोब्राह्मणसंरक्षण ' या त्यांस अभिप्रेत असलेल्या कार्याची जोड देऊन केलें व त्यास ' महाराष्ट्र-धर्म ' हें नांव दिलें, हाच श्रीसमर्थपूर्व संत व श्रीसमर्थ ह्यांच्यांत असलेला फरक होय.

' गोब्राह्मण ' हा शब्दप्रयोग आद्य कवि महर्षि वाल्मीकींनीं रामायणांत शेंकडों वर्षें अगोदरच करून ठेविला आहे, व त्याचा अर्थहि पण श्रीसमर्थांच्या आर्यांसारखाच आहे हें पुढील श्लोकावरून वाचकांच्या लक्षांत येण्यास वेळ लागणार नाहीं–

' स्वस्ति गोब्राह्मणानांच लोकानां चेति संस्थिताः '

अ. का. २४.२१

हरिः ॐ तत्सदिति ' इत्यादि अभंगांतील–

" गोब्राह्मण हिताहूनी निराळें । वेदांचें तें मूळ तुका ह्मणे ॥ "

या पदाचा अर्थ श्री. बहिरटांनीं जो केला आहे तो मात्र दिशाभूल करणारा आहे. तो आपला मतलब साधण्याकरितां आपणांस हवा तसा केलेला आहे. प्रा. सोनोपंत दाण्डेकरांनीं 'गोब्राह्मण हिताकरतां (मूळ स्वरूपाहून) वेगळें झालेलें (अवतार घेऊन वेगळें झाल्यासारखें दिसलेलें) जें वेदाचें मूळ तेंहि पांडुरंगच.' असा अर्थ केला आहे. श्री. बहिरटांनीं स्वीकारलेला हा पाठ निर्णयसागरप्रत व मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेली प्रत यांस अनुसरून आहे. पण चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेल्या गाथेंत पुढीलप्रमाणें पाठ आहे:—

सर्वस्व व्यापिलें सर्वां होऊन निराळें ।
वेदांचें जें मूळ तुका म्हणे ॥

हाच पाठ देवडीकरांच्या व श्री. जोग महाराजांच्या सार्थ गाथेंत दिला आहे. त्याचा अर्थ "हरीचें स्वरूप यच्चयावत् पदार्थांतून व्यापलेलें असून सर्वांहून असंग व अलिप्त आहे; व तेंच वेदांचें मूळ आहे." कोणताहि अर्थ घेतला तरी पण श्री. बहिरटांचा अर्थ प्रामाणिकपणाचा नसून तो केवळ श्रीसमर्थांस 'येनकेन प्रकारेण' नांवें ठेवण्यासाठींच करण्यांत आला आहे हें उघड आहे. जातां जातां आम्ही श्री. बहिरटांचें लक्ष पुढील श्लोकाकडे वेधूं इच्छितों.

नमो ब्रह्मण्य देवाय गोब्राह्मण हिताय च ।
जगद्धृताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः ॥

आमच्या प्रतिपक्षीय विद्वानांस आमची विनंती अशी कीं त्यांनीं श्रीसमर्थांवर केलेल्या एका तरी आरोपांतून श्रीसमर्थेतर महाराष्ट्रीय साधुसंतांपैकीं, एखादा संत सुटला आहे काय हें सागावें. "ज्ञानेश्वरादि संतांनींदेखील सामाजिक व्यवहारांत वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार केला. परंतु भक्तीच्या प्रान्तांत 'म्हणोनि कुळजातिवर्ण । हें आघवें चि गा अप्रमाण'। असें म्हणून त्यांतील भेदभावाची तीव्रता पुष्कळच कमी केली" असें विरोधी पक्षाचें म्हणणें आहे. यावर आमचा त्यास सवाल आहे कीं श्रीसमर्थांनीं सुद्धां हेंच केलें नाहीं काय? तसेंच त्यांनीं सामाजिक भेदभावाची (भक्ति प्रांतांतील) तीव्रता कमी केली कीं जास्त वाढविली हें त्यांनीं विस्तृतपणें सिद्ध करावयास नको काय? कोणत्या संतानें वर्णाश्रमाच्या बाबतींत ब्राह्मणेतर समाजास जास्त सवलती मिळवून दिल्या व श्रीसमर्थांनीं मात्र त्या त्यांस मिळवून देण्याच्या कामीं विरोध केला हें त्यांनीं दाखवावें. "केवढाहि मोठा विचारवंत झाला तरी त्याला गतकालाचें दडपण आजिबात झुगारून देतां येत नाहीं" हें विरोधी पक्षाचें विधान आम्हास सर्वथैव मान्य आहे. आमची त्यांस येवढीच विनंती आहे कीं श्रीसमर्थांच्या सामाजिक विचारसरणीचें मूल्यमापन करतांना, इतर संतांच्या याच कार्याचा विचार करतांना ते जसें वरील विधान

त्यांना लागू करतात, तसेंच त्यांनीं वरील विधानास श्रीसमर्थ अपवाद मानूं नयेत. इतर संतांच्या बाबतींत त्यांचें धोरण मवाळपणाचें असतें, पण श्रीसमर्थांसंबंधीं तें कांटेतोल असतें असें त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट दिसतें. तें कसें हें ज्ञानेश्वरमहाराज व श्रीएकनाथ महाराज यांच्या कांहीं उद्‌गारांवरून दाखविण्याचा प्रयत्न करतों:—

( १ ) प्रथमत: 'भक्ति गा एक सरे । जाति अप्रमाण ।' असा सिद्धान्त सांगून परमेश्वराचा दरबार जातिकुलगोत्र निरपेक्ष सर्वांस सरसहा खुला आहे असा तेजस्वी व समाजांत नवचैतन्य उत्पन्न करणारा संदेश महाराष्ट्रीय जनतेसच नव्हे तर अखिल भारतीय जनतेस भारत वर्षाच्या धार्मिक व आध्यात्मिक इतिहासांत पहिल्या प्रथम हाकारोनि सांगणारे ज्ञानियांचे राजे श्रीज्ञानेश्वर महाराज हे काय म्हणतात तें पाहूं. परधर्म कितीहि सुलभ वा चांगला असला तरी ज्यानें त्यानें, आपला स्वधर्म जरी बिकट असला तरी, सोडतां कामा नये हें तत्त्व अर्जुनाच्या मनावर ठसविण्याकरितां श्रीमहाराज म्हणतात:—

सांगें शूद्रघरीं आघवीं । पक्वान्नें आहाती बरवीं ।
ती द्विजें केवीं सेवावीं । दुर्बळु जरी जाहला ।।

(ज्ञा. ३—२२१)

अन्नोदक व्यवहारादि संबंधीं समाजाचीं बंधनें सैल करणें त्यांस मान्य नव्हतें हें वरील ओवीवरून दिसून येत नाहीं काय? "केवढाहि मोठा विचारवंत झाला तरी त्याला गतकालाचें दडपण अजिबात झुगारून देता नाहीं." हा प्रतिपक्षीय मुद्दा येथें टिकूं शकत नाहीं. कारण परस्परांत अन्नोदक व्यवहार करण्यास शास्त्रानें अनुज्ञा दिलेली आहे, हें पुढील स्मार्तवचनावरून दिसून येत आहे:—

शूद्रेषु दासगोपाल कुलमित्रार्ध सीरिणः ।
भोज्यान्ना नापिताश्चैव यश्चात्मानं निवेदयेत ।।

याज्ञवल्क्य स्मृ. १.१६६

असें असूनसुद्धां,

शास्त्र म्हणेल सांडावें । तें राज्यहि तृण मानावें ।
जें घेववी तें न म्हणावें । विष हि विरुद्ध ।।

ज्ञा. १६.४६०

शास्त्रांविषयीं आदर बाळगणारे श्रीमहाराज केवळ रूढीस बळी पडून शास्त्रास डावलत आहेत तें कां? स्मृतिकारांनीं सांगितल्याप्रमाणें निदान वरील श्लोकांतील भोज्यान्नशूद्रांस वगळून त्यांना 'सांगें शूद्रघरीं आघवीं' इ. ओवी

लिहितां आली नसती काय ? व तसें करून तात्कालीन सामाजिक बंधनाची शिथिलता थोडी तरी कमी करतां आली नसती काय याचें उत्तर त्यांनीं द्यावें व मगच 'श्री समर्थांची विचारसरणी प्रतिगामी आहे' असें प्रतिपादन करण्याचें धाष्टर्य त्यांनीं करावें.

भोज्यान्नशूद्रांसंबंधीं वर जो याज्ञवल्क्य स्मृतींतील श्लोक उध्दृत केला आहे त्यासारखेच श्लोक थोड्या शब्दभेदानें मनुस्मृति व पाराशर स्मृति यामध्यें आलेले आहेत. स्मृतींचें इतकें पाठबळ असतांनाहि तिकडे लक्ष न देतां श्रीज्ञाने-श्वरांनीं रूढीप्रामाण्यच प्रमाण मानलें एवढें दिग्दर्शित करण्यासाठींच ते ते श्लोक पुढें देत आहे:—

अर्धिकः कुलमित्रंच गोपालो दासनापिती ।
एतेशूद्रेषु भोज्यान्ना यश्चात्मानं निवेदयेत् ॥

मनु ४.२५३ ।

दासनापित गोपाल कुलमित्रार्ध सीरिणः ।
एते शूद्रेषु भोज्यान्ना यश्चात्मानं निवेदयेत ॥

पराशर स्मृति अ. ११

वेदाध्ययनाच्या अधिकारासंबंधांतहि श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं रूढीचाच अवलंब केला आहे. शूद्रांना वेदाध्ययनाचा निषेध आहे या सनातनी मतालाच त्यांनीं प्रमाण मानलेलें दिसतें. शूद्रांना निदान सच्छूद्रांना तरी ब्रह्मविद्येचा अधिकार होता असें प्रतिपादन करणाऱ्या स्मार्त वचनांना त्यांनीं मानलेलें दिसत नाहीं. तसें त्यांनीं त्यांस मानलें असतें तर ज्ञानेश्वरींत पुढील वाक्यें आढळतील ना:—

( १ ) तें द्विजांसीच ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र का नाममंत्र ।

ज्ञा. १६. १०४

( २ ) चौथा शूद्र जो धनंजया । वेदीं लागु नाहीं कीर तया ॥

१४५८

( ३ ) वेदीं अन्त्यजु वाळिला । १८.१४८७

हीं वाक्यें सामाजिक पुरोगामित्वाचीं दर्शक काय समजावयाचीं ?

या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचीं ब्राह्मणेतरांस नामाच्याद्वारें मुक्तीचा मार्ग खुला ठेविला आहे हें त्यांच्या 'येरां स्तोत्र का नाममंत्र' या वचनावरून उघड होत आहेच. श्रीसमर्थहि याहून निराळें असें काय सांगत आहेत बरें:—

भावचि दृढ जाला । हरि सन्निध त्याला ॥
वर्णावर्ण स्त्रीशूद्रादिक । धरितां नामरतीला ॥ अ. स. गा. १३.३१

शूद्रांना-सच्छूद्रांना ब्रह्मविद्येचा म्हणजे वेदाध्ययनाचा अधिकार आहे असें वर म्हटलें आहे. तीं स्मार्तवचनें पुढीलप्रमाणें आहेत—

(१) शूद्राणामदुष्टकर्मणामुपनयनम् । पाराशर २.५
(२) ब्राह्मणः क्षत्रियो वैश्य शूद्रो वा चरितव्रतः ।
गायत्रीं मम वा देवीं सावित्रीं वा जपेत्ततः ।
वृद्धगौतमस्मृतिः अ. ६

स्मृतिकारांचा असा आधार असतांनासुद्धां शूद्रांस वेदविद्येचा अधिकार मळवून देण्याच्या कामीं केवळ 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' असें मानूनच श्रीज्ञानेश्वर-महाराज असमर्थ ठरले आहेत.

"स्त्री-शूद्रांचा कैवार घेणारे" व "आपल्या आयुष्यांत जन्मसिद्ध भेद-भावाला केव्हांहि थारा न देणारे" म्हणून श्री एकनाथ या विरोधी पक्षास सर्वस्वीं मान्य आहेत. आतां त्याचेंच उदाहरण घेऊं या.

ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वासंबंधीं, नुसत्या भागवतावरील आपल्या टीकाग्रंथांत, श्रीनाथांनीं जितके गौरवास्पद उद्‌गार काढले आहेत. त्याच्या दशांशानेंहि श्री-समर्थांनीं ब्राह्मणांची तळी उचलून धरलेली नाहीं. एकनाथांच्या भागवतांत ब्राह्मण गौरव पदोपदीं दृष्टोत्पतीस येतें. विशेषतः या ११ व्या अध्यायाच्या १३५१ ते १३८४ ओव्याकडे त्यांनीं लक्ष द्यावें. तसेंच "गुरु तो सकळांसी ब्राह्मण" या त्यांच्या मताप्रमाणें श्रीसमर्थांच्या आग्रह मताशीं,

परमार्थ प्राप्तीचें कारण ।
क्षत्रियासी मुख्यत्वें गुरु ब्राह्मण । ना. भा. अ १७,१६४

या वचनाची, किंवा

क्षत्रिय वैश्यद्विजन्म्यांसी । ।
गुरुत्व बोलिलें नाहीं यांसी ॥ ना. भा. १७.४०७

विरोधकांनीं या ओव्यर्थाची तुलना करावी आणि मगच श्रीसमर्थांच्या तथाकथित ब्राह्मण कैपक्षास नावें ठेवावींत.

वरील विवेचनावरून वाचक व प्रतिपक्ष यांच्या ध्यानांत येईल कीं वैदिक परंपरेविरुद्ध जाण्यास महाराष्ट्रीय साधुसंतांपैकीं एकहि जण तयार नव्हता. मग तो

ब्राह्मण असो, ब्राह्मणेतर असो वा अस्पृश्य असो. तेव्हां ब्राह्मणेतर संतास जर वैदिक परंपरा मान्य तर ती श्रीसमर्थांस मान्य असणें साहजिकच नव्हे काय ? चातुर्वर्ण्याच्या चाकोरीबाहेर जाण्यास एकहि ब्राह्मणेतर संत तयार नाहीं. येवढेंच नव्हे तर दान ब्राह्मणांस द्यावें, भोजनादि त्यांनाच घालावें, सर्व वर्गांस ब्राह्मणच श्रेष्ठ व पूज्य असें एक एकजात हे ब्राह्मणेतर संत मानीत, मौज अशी कीं देव या संतांच्या स्वप्नांत येऊन दान मागून घेतो तो ब्राह्मणरूपानेंच, ब्राह्मणेतर संत वैदिक परंपरा, यज्ञयागादि, ब्राह्मण्याबद्दल आदर दाखवितात तेव्हां हे प्रतिकूल टीकाकार मनुष्य केवढाहि मोठा झाला तरी तो विद्यमान परिस्थितीचा दास असतो असें म्हणून त्या संतांचें ते समर्थन करतात. पण ही सवलत ते श्रीसमर्थांस देण्यास मात्र तयार नाहींत.

पण टीकाकारांच्या मतानें वैश्यशूद्रांचे प्रतिनिधि असलेले श्रीतुकाराम महाराजहि, हेंच सांगत आहेत त्याची वाट कशी लावावयाची ?

वारकरी मंडळींत हा अभंग कांहींसा प्रक्षिप्त वाटतो, आम्हांस तो श्रीतुकाराममहाराजांचाच वाटतो. या अभंगाकडे अद्यापपर्यंत कोणाचें फारसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. ब्राह्मणांची तळी श्रीतुकाराममहाराजांनींच उचलून धरलेली आहे, श्रीतुकाराममहाराजांचा वेदांबद्दल पूज्यभाव असा आहे: --

वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकीया खळ ॥ १३४५ ॥

वेदांची निंदा करणारांवर त्यांचा राग आहे. वैदिक परंपरेबद्दल श्रीतुकोबारायांचा जाज्ज्वल्य अभिमान खालील अभंगांत दिसून येतो.

राहिले वर्णाश्रम धर्म । अन्योन्य विचरती कर्म ।
अपमानिले वेदपाठक । सात्त्विक शास्त्रज्ञ संपन्न ।
होम हरपलीं हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें ।
वेदाध्ययन संहिता रुचि । भकाया करिती तयांची ।
याती अठरा चाऱ्ही वर्ण । कर्दम करूनि विटाळले ॥ २०३५ ॥

तीस चरणांचा असा हा भला मोठा लांबलचक अभंग आहे. कलियुगाचा प्रताप पाहून श्रीतुकोबास आलेल्या सात्त्विक संतापाचें यांत वर्णन आहे. कोणत्याहि सनातनी ब्राह्मणाच्या तोंडी हा अभंग शोभण्यासारखा असा आहे. वैदिक परंपरेच्या अभिमानासंबंधीं तसेंच ब्राह्मणाच्या पक्षपातासंबंधीं, टीकाकार समर्थांवर ज्याच्यासाठीं घसरतात, तेंच श्रीमहाराजांनीं सांगितलें आहे ना ? यांत श्रीतुकोबारायांनीं केवळ तत्कालीन परिस्थितीपुढें निरुपायानें मान वाकवून असे उद्गार काढले आहेत असें या टीकाकारांस वाटतें काय ?

वैदिक परंपरा टिकवून धरणें व त्यासाठीं ब्राह्मणांचें वर्चस्व राखणें असें श्रीसमर्थांचें ध्येय होतें असें टीकाकार म्हणतात, त्यांस विचारावेंसें वाटतें कीं हें वर्चस्व श्रीसमर्थांनीं साधून कोणत्या प्रकारें त्यांनीं ब्राह्मणांना लाभ करून दिला आहे ? आपल्या ब्राह्मण शिष्यांना कांहीं ऐहिक लाभ त्यांनीं करून दिल्याचें इतिहास सांगत नाहीं. स्वतः शहाणे होऊन जगास शहाणे करून सोडावयाचें हाच संदेश त्यांनीं आपल्या ब्राह्मण शिष्यांस दिला, आपल्या पोटाचाहि भार जनतेवर फारसा पडूं नये म्हणून त्यांच्या गळ्यांत त्यांनीं झोळीच बांधली. त्यांनीं सुखास अंग न देतां एके ठिकाणीं सतत राहूं नये असें बजावलें व मिळविलेलें हरएक प्रकारचें ज्ञान समाजास देण्यासाठीं ब्राह्मणांस त्यांनीं कायमचें परिव्राजक बनविलें. संग्रह न करण्याचा आदेश दिला, यदृच्छालाभसंतुष्ट व्हावयास सांगितलें व सर्वस्वीं ऐहिक त्यागातून जगाचें मार्गदर्शक होण्यास सांगितलें, यांत त्यांनीं वावगें काय केलें हें टीकाकारांनीं सांगावें. जगाच्या कल्याणासाठीं, सर्वांगीण उन्नतीसाठीं— आजच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास ' सर्वोदया 'साठीं स्वतःचें रक्तदान करावयाचें हें जाणत्याचें म्हणजे सुशिक्षितांचें म्हणजे ब्राह्मणांचें आद्य कर्तव्य असल्याचें सनातन कालापासून ठरलेलें आहे. तेंच आपल्याकाळीं श्रीसमर्थांनीं त्या कालच्या जाणत्यांस म्हणजे ब्राह्मणांस देशकाल वर्तमानानुरूप सांगितलें व त्यांच्या करवी यथाशक्ति करवून घेऊन तत्कालीन धर्मकार्य व देशकार्य केलें यांत टीकाकारांस श्रीसमर्थांचें प्रतिगामित्व दिसावें यापरीस दुर्दैवाची गोष्ट कोणती ?

श्री समर्थांवर प्रतिकूल टीकाकारांनीं श्रीसमर्थांच्या ब्राह्मणपक्षपातित्व-निदर्शक वचनांकडे केवळ वाच्यार्थाकडे पाहिलें म्हणून हें असें झालें असावेंसें वाटतें.

श्रीसमर्थांच्या एकंदर वाङ्मयावरून पाहतां श्रीसमर्थ गुणकर्मालाच जास्त प्राधान्य देत आहेत, असें वाटतें. देव, दानव, दैत्य, ब्राह्मण, मांग, महार, अन्त्यज, चाण्डाल इत्यादिकांच्या श्रीसमर्थकृत व्याख्या विचारपूर्वक पाहिल्या असतां श्रीसमर्थांच्या जातीविषयक धोरणावरून अनुकूल वा प्रतिकूल टीकाकारांस वाचकांस आमच्यावरील विधानाची सत्यता पटेल असें वाटतें. आत्मस्वरूपाचें सतत स्मरण करणारास श्रीसमर्थ ' देव ' असें म्हणतात—

स्मरण म्हणजे देव । १५.७.३५ ॥

यत्न करणारा, अचूक प्रयत्नवादी श्रीसमर्थमतें ' देव ' होय:—

यत्न तो देव जाणावा ।

किंवा,

अचुक यत्न तो देवो ।

तसेंच न्यायानें वागणारा, म्हणजे शाश्वत असें जें ब्रह्म त्याचें चिंतन करणारा तो श्रीसमर्थांस ' देव ' च वाटतोः--

न्याय तो देव जाणावा ।

आतां ' न्याय ' म्हणजे काय तें पहाः--

न्याय म्हणजे तो शाश्वत । दा.

देशकाल वर्तमानाबद्दल जो अखंड जागरूक आहे तो माणूस देवच होय असें श्रीसमर्थांस वाटतें:--

सावधु देव जाणावा ।

कष्ट करून आपलें ध्येय गांठणारीं माणसें देवांचे अंश होत:--

साक्षपी अंश देवाचे ।

आपण कोण, कोठून आलों, आपणांस कोठें जावयाचें, आपण काय होतों व आतां कसे जाहलों आहोंत हें ज्ञान असणारा माणूस देवांश:--

जाणता देवाचा अंश ।

जगास सौख्य देण्यासाठीं धडपडणारा प्राणि श्रीसमर्थमतें देवच:--

देव तो सौख्यदायकु ।

' देव ' शब्दाची ती पौराणिक व्याख्या कोठें व ही श्रीसमर्थकृत व्याख्या कोठें ? बरोबर याच्या उलट दैत्य, दानव, राक्षस व दुरात्मा यांच्या व्याख्या आहेत. आत्मस्वरूपाचें विस्मरण ज्यास पडतें, तो दानव:--

विस्मरण म्हणजे दानव ।

आळसांत व्यर्थ कालापव्यय करणारी व्यक्ति वा समाज दानव कोटींतीलच होय :--

आळसी वंश राक्षसी ।

प्रत्येक कामांत चुका करणारा, उन्मत्त, हट्टी, अन्यायानें वागणारा ही सर्व मंडळी दैत्यवंशज होय:--

( १ ) चुकणें दैत्य बोलिजे ।
( १ ) होरट्या दैत्य जाणावा ।
( ३ ) अन्यायें दैत्य जाहला ।

अन्यायानें चालणारा, स्वरूपासंबंधीं अज्ञानी हे सर्व श्रीसमर्थांच्या मतानें राक्षस होतः—

(अ) अन्याय राक्षसी क्रिया ।

(आ) नेणता म्हणजे तो राक्षेस ।

आत्मा ज्याला दुरावला तो दुरात्मा अशी दुरात्म्याची व्याख्या श्रीसमर्थांनी केली आहे:—

दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा । अंतरला जया ॥

वरील विवेचनांवरून टीकाकारांच्या लक्षांत येईल कीं श्रीसमर्थमतें 'देवत्व' किंवा 'दानवत्व' हें जन्मावर अवलंबून नसून गुणकर्मांवरच निर्भर आहे.

ब्राह्मणत्व हें सुद्धां गुणकर्मांवरच अवलंबून आहे असें दासबोधांतच त्यांनीं म्हटलें आहे.

करिती ब्रह्म निरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ ६.४.२४

याचेंच दृढीकरण पुढील पदांत करतात—

सोंवळें कोणते रे । ब्राह्मणा ओंवळें कोणतें रे ॥ ध्रु० ॥
विटाळें उपजला विटाळें वाढला ।
विटाळें चि मेला सावकाश ॥
हाडामासाच्या सगट मोळ्या ।
पाणिये सोंवळ्या होती कैशा ॥
देवाकडे मन लागतां उन्मन ।
सोंवळा ब्राह्मण तोचि एक ॥

या संदर्भात टीकाकारांनीं श्रीतुकोबारायांच्या पुढील एका अभंग चरणाकडे लक्ष द्यावें:—

सोंवळा तो झाला । अंगीकार देवें केला ॥ ४२४८

या व याच्यासारख्या विधानांबद्दल ते श्रीतुकोबांस प्रागतिक ठरवितात पण श्रीसमर्थांच्या माथीं मात्र प्रतिगामित्वाचा शिक्का मारतात यास काय म्हणावें ?

ज्याला ब्रह्मज्ञान झालें तो ब्राह्मण. कोणत्याहि जातीच्या माणसाला तें होणें शक्य आहे. असा ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला आहे, त्याच्या चरणाची माती मी शिरसावंद्य मानीन असें श्रीसमर्थांनीं एके ठिकाणीं सांगितलें आहे:—

रामीं मीनले ते असो नीच जाति ।
त्याच्या चरणाची वंदीन माती ॥

येवढेंच नव्हे तर आपल्या त्या सुप्रसिद्ध भक्तांच्या आरतींत पुढील अस्पृश्य संतांचा त्यांनीं जयजयकार केला आहे.

रोहिदास चोखा बंका जनका सेवेस ।
जय जय जय आरति भक्तसुखमूर्ति । इ. ॥ १२० ॥

स. गा. अनंतदास

भगवान् गोपालकृष्ण संत चोखामेळ्यासवें जेवले याचा उल्लेख, एका प्रेमळ पदांत श्रीसमर्थांनीं केला आहे.

अनाथाचा नाथ गे । त्याला कैसी जात गे ।
चोखा मेळ्यासंगे जेवी । दहीं दूध भात गे ॥ १३५० ॥

स. गा. अनंतदास ॥

हीच देवानें चोखोबांचे घरीं दहीभात खाल्ल्याची कथा श्रीचोखोबांच्या कुटुंबांतील संत बंका व संत कूर्म मेळा प्रभृतींनीं थेट अशीच वर्णिली आहे. अशा-प्रकारें ब्राह्मणेतरच नव्हे तर अनामिक अशा संतांच्या चरणीं लीन होणारे व त्यामुळें स्वतःस धन्य समजणारे श्रीसमर्थ जन्माला प्राधान्य देत नसून गुणकर्मालाच प्राधान्य देत आहेत याच्याबद्दल आणखी थोडें विवरण करतों. सत्य बोलणारा तोच ब्राह्मण असें:—

सत्य ब्राह्मण मारिला । दोषी ढीवर पाळिला ॥

या वचनांत ते सांगत आहेत. उपनिषदांतील सत्यकाम जाबालाच्या कथेंत हेंच तत्त्व प्रतिपादिलें आहे. मांग कोणाला म्हणावें ? समर्थ सांगतात कीं, ज्याच्या अन्तःकरणांत दयेचा लवलेश नाहीं व जो दुसऱ्याची सारखी निंदा करीत असतो तोः—

दया बहिण संहारिली । निंदा मातंगी पाळिली ॥

याच धर्तीवर श्रीसमर्थांनीं चाण्डाल, अंत्यज इत्यादींच्या व्याख्या केल्या आहेत. या बाबतींत ते इतर संतांच्या ( ब्राह्मण वा ब्राह्मणेतर ) मागें तर नाहींतच पण कांहीं अंशीं त्यांच्यापुढेंच आहेत असें म्हणणें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं.

‘ राखावें पराचें अंतर ’ ।
लोक राजी राखोनि कीजे । ‘ सकळ कांहीं ’ ॥

'परान्तरास न लावावा ढका' अशा प्रकारची शिकवणूक श्रीसमर्थांनीं आपल्या शिष्यांस दासबोधादि आपल्या वाङ्मयांत पावलोपावलीं दिलेली आढळते. समाजांत एखादें प्रचंड कार्य घडवून आणावयाचें असल्यास समाज एकजिनसी असावयास पाहिजे. नेत्यानें समाजांत एकजूट घडवून आणली तरच त्याच्या हातून प्रचंड कार्य होऊं शकेल. यासाठीं समाजाचें अंतःकरण राखण्यावर श्रीसमर्थांचा फार भर होता. समाजरूपी तंबोऱ्याच्या तारा त्यास विसंवादी नको होत्या, त्या त्यांना एकसुरांत लागलेल्या हव्या होत्या. यासाठीं समाज़ाच्या सर्व थरांतील अन्तःकरणें त्यांनीं आपल्याकडे ओढून घेण्याचा भगीरथ प्रयत्न केला. त्यासाठीं त्यांनीं जनता जनार्दनाचें जें आराधन केलें तें त्यांच्या शब्दांतच पुढें देतों:—

भेटो कोणी एक नर। धेड माहार चांभार।
त्याचें राखावें अन्तर। या नांव भजन॥ करुणाष्टकें

अशी समर्थांची भजनाची व्याख्या आहे. श्रीसमर्थांची समाजांतील शेवटच्या थराकडेसुद्धां पाहण्याची दृष्टी समान होती हें यावरून उघड होत आहे.

संतांस सर्व जाती समान होत्या, त्यांनीं सर्वांस एकच शिकवण व प्रामुख्यें-करून ती परमार्थाची दिली, त्यांनीं कोणास उच्च वा नीच मानलें नाहीं.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या वागण्यांत उजवेंडावें होतें हें टीकाकारांचें विधान चुकीचें व आधारहीन आहे. श्रीसमर्थांचें वागणें तसें असतें तर त्यांच्या मठपतींच्या मालिकेंत ब्राह्मणेतर मठपति दिसता ना. पण श्रीसमर्थ-संप्रदायाचा इतिहास तसें सांगत नाहीं. शिरवळ म्हणून एक गांव पुण्याजवळ आहे. तेथें श्रीसमर्थसंप्रदायाचा एक मठ अद्याप विद्यमान आहे. या मठाचें संस्थापक श्रीबाजी गोसावी हे मराठे होते व ते श्रीसमर्थांचे प्रत्यक्ष शिष्य होते. तसेंच कोल्हापूरजवळ पारगांव म्हणून एक गांव आहे. या गांवी श्रीसमर्थशिष्य श्रीशंकराजी गोसावी म्हणून रहात असत. हे मराठेच होते. तिसरें उदाहरण येक्केहळ्ळीकर श्रीआत्माराम महाराजांचे ( दासविश्रामधामकर्ते ) शिष्य श्रीनरसोबा आत्माराम यांचें आहे. यांना श्रीआत्माराम महाराजांनीं मठपति केलें होतें. हेहि पण मराठेच आहेत व यांचा मठ भालकी, प्रांत लातूर येथें आहे.

ब्राह्मणेतर मठपतींचीं हीं नांवें सहज सुचलीं, आठवलीं तीं दिलीं. आतां श्रीसमर्थांच्या ब्राह्मणेतर शिष्यांचीं ( प्रमुख प्रमुख ) नांवें पुढें देतों. यांतील पहिलें नांव श्रीशिवछत्रपतींचें आहे. सातारचे शेवटचे छत्रपति श्रीप्रतापसिंह महाराज येथपर्यंत तरी हें घराणें श्रीसांप्रदायिक होतें हे ऐतिहासिक कागदपत्रावरून सिद्ध आहे. याचा अर्थ असा कीं, श्रीसमर्थ व श्रीछत्रपति या उभयतांच्या घराण्यांचा

गुरुशिष्यसंबंध निदान सव्वा दोनशें वर्षेपर्यंत अव्याहतपणें चालत आलेला आहे. अद्यापहि हा संबंध चालू असावा असें वाटतें.

ऐतिहासिक घराण्यापैकीं श्रीसांप्रदायिक असलेलें दुसरें प्रसिद्ध घराणें म्हणजे इतिहासप्रसिद्ध बाळाजी आवजी चिटणीस यांचें होय. हें घराणें चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचें होय. स्वराज्याप्रीत्यर्थ या घराण्यानें अपूर्व त्याग केला आहे. किंबहुना असें म्हणणें जास्त शोभेल कीं, या ज्ञातीनें जो त्याग केला आहे, त्याला मराठ्यांच्या तरी इतिहासांत दुसरी जोड मिळणें शक्य नाहीं.

हंबीरराव मोहिते, प्रतापराव गुजर यांचींहि घराणीं श्री सांप्रदायिकांपैकींच असावींत असें वाटतें. श्रीसमर्थांची स्वारी शके १५६६ मध्यें कृष्णातीरास आल्यावर थोड्या वर्षांच्या आंतच सातारा, कोल्हापूर, विजापूर इ. प्रांतांतील बरीच ब्राह्मण व ब्राह्मणेतर वतनदार व अधिकारी मंडळी श्रीसमर्थांच्या संप्रदायांत प्रविष्ट झालीं असावींत असें तत्कालीन कागदपत्रांवरून दिसतें.

समर्थांच्या ब्राह्मणेतर शिष्यपरंपरेंतील महानुभावांपैकीं एकदोघांचाच उल्लेख या ठिकाणीं करतों. त्यांपैकीं उपरिनिर्दिष्ट शिरवळकर श्री बाजी गोसावी हे एक होत. श्री बाजी गोसावी शके १६२८ चे सुमारास समाधिस्थ झाले. शके १६४४ मध्यें या मठाचे अधिकारी श्रीरामाजीबुवा यांस भोरच्या सचिवांनीं कांहीं इनाम करून दिलें. त्या इनामपत्रांत शके १६४३ मध्यें बाजी गोसाव्यांचें समाधीचें वृंदावन डोलूं लागलें असें समक्ष पाहिल्याचें अनेक लोकांनीं व राजपुरुषांनीं लिहिलें आहे. यावरून या शिष्यवराचा पारमार्थिक अधिकार कळतो.

दुसरें उदाहरण पारनेरचे श्रीहरिबुवा शिंपी—रामदासी परंपरेंतील संताचें आहे. हे टाकळी मठाच्या परंपरेपैकीं शिवरामस्वामी यांचे शिष्य होत. हे श्रीसमर्थांपासून पांचवे किंवा सहावे पुरुष होत. यांनीं शके १६९९ मध्यें जिवंत समाधि घेतली. समाधीनंतर सहा महिन्यांनीं यांनीं पारनेर येथील एका भाविक न्हाव्यास दर्शन दिलें. या न्हाव्यानें पुढें या हरिबुवांच्या केसावर पारनेरास समाधि बांधली आळंदीचे नरसिंह सरस्वती हे यांच्या समाधीपाशीं नारायणगांवीं जाऊन राहात असत. या ब्राह्मणेतर संताची ग्रन्थसंपत्ति अफाट आहे. नुसती अभंगांची संख्याच ६८००० आहे. यांचा एक अभंग पुढें देत आहें :—

ज्ञानदृष्टी उजळली । ज्योति लागोनिया गेली ॥
दिवसा पडलें चांदणें । रात्रीं उगवला दिन ॥
चंद्रसूर्य मावळला । परि तो प्रकाश नाहीं गेला ॥
हरि म्हणे हेचि खूण । पाहे आपणाशीं आपण ॥

श्रीआत्माराम महाराज येक्केहळ्ळीकर यांचे शिष्य नरसोबा यांचा वर उल्लेख येऊन गेला आहे. यांच्या पारमार्थिक अधिकारासंबंधीं थोडेंसें विवरण करतों. श्रीसमर्थांपासून हे सहावे पुरुष. जातीनें मराठा, बालब्रह्मचारी. श्रीआत्माराम महाराजांचा घोडा संभाळणें हें यांचें काम. हुमणाबादच्या श्रीमाणिकप्रभूंचे हे समकालीन, या उभयतांचा सहवास वरचेवर होत असे. या नरसोबांचे शिष्य महादेवबुवा म्हणून होते. हेहि मराठेच. ह्या महादेवबुवांचे शिष्य बापू रामदासी म्हणून होते. हे बापू रामदासीहि मराठेच. यांची समाधि सज्जनगडावर आहे. शके १८३८ मध्यें समाधिस्थ झाले. यावेळीं त्यांचें वय शंभर वर्षांजवळ होतें. कित्येक वर्षें हे सज्जनगडावर होते. जडभरताच्या स्थितीप्रमाणें यांची स्थिति होती असें यांना सज्जनगडावर पाहिलेले लोक सांगतात. यांच्याच तोंडून 'दास विश्रामधाम' ग्रंथाचें नांव संशोधकांस कळलें व तो पुढें सत्कार्योत्तेजक सभेनें तो प्रसिद्ध केला.

श्रीसमर्थांच्याजवळ 'दत्तोबा' म्हणून एक शिष्य होते. ते जातीनें न्हावी होते. श्रीसमर्थांच्या सेवेंत हे चोवीस तास असत.

श्रीकल्याणस्वामींच्या महंतांच्या नांवाची यादी सांप्रदायिक विविध विषय भाग १ ला यांतील लेखांक ५० मध्यें प्रसिद्ध झालेली आहे. त्यांत ४३ महंतांचीं नांवें आहेत. नांवावरून पहातां ४–५ नांवें तरी ब्राह्मणेतर शिष्यांचीं आहेत. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं या टिपणांपैकीं ४२ वें नांव एका मुसलमान शिष्याचें आहे व ते वलिमहंमद नांदणजकर असें आहे.

शके १५९६ संवत्सरीं ज्येष्ठ शु. १३ स श्रीशिवछत्रपतींचा रायगडावर राज्याभिषेक झाला तन्निमित्त गडावर ब्राह्मण भोजन झालें. याच सुमारास शिंगणवाडीस शूद्रांनाहि भोजन झालें. श्रीसमर्थांच्या वतीनेंच हें भोजन घालण्यांत आलें होतें. राज्यारोहणाशीं याचा कांहीं संबंध होता कीं काय हें कळण्याचें नक्की साधन उपलब्ध नाहीं. पण श्रीसमर्थ केवळ,

आषाढी कार्तिकी आवळींचीं वनें । घालावीं भोजनें ब्राह्मणांचीं ॥

असलीं भोजनेंच घालीत नसत तर ब्राह्मणेतरांचींहि भोजनें ते घालीत असत.

श्रीसमर्थ किंवा त्यांचे संप्रदायी यांचें धोरण ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर यांच्यासंबंधीं अगदीं समानतेचें होतें व आहे. 'खरें म्हटलें तर एकनाथांचा भागवतधर्म व समर्थांचा महाराष्ट्रधर्म यांत अजिबात विरोध नाहीं. किंबहुना ते एकमेकांस पूरकच आहेत.' असें जें प्रा. सरदारांनीं म्हटलें आहे तें आम्हांस सर्वथैव मान्य आहे. त्यांचें असें मत असतांनासुद्धां त्यांनीं श्रीसमर्थांविरुद्ध कांहीं आक्षेप काढावेत याचें आश्चर्य वाटतें.

खरोखर पाहतां वारकरी व रामदासी संप्रदाय यांमध्यें कांहीं तपशीलाच्या बाबतींत फरक आहे, पण मुख्य गोष्टींबाबत उभयतां पंथांत पूर्ण ऐक्य आहे. "दोन्ही संप्रदायांनी उपनिषदें, गीता व भागवत यांतील ज्ञानभक्तीचा उपदेश लोकांस केला असल्यामुळे त्यांत पूर्ण एकात्मता आहे. दोन्ही संप्रदाय पूर्ण वैदिक आहेत. दोघांनाहि वेदशास्त्र–पुराणें मान्य आहेत. दोघांनाहि देव निर्गुण आहे, सगुण आहे व सगुणोपासनेच्या द्वारेंच निर्गुणपद हातीं येतें हें पूर्ण संमत आहे. दोन्हीहि संप्रदाय अद्वैत सिद्धान्त पूर्ण संमत असलेले पण तत्प्रीत्यर्थ उपासनेवर भर देणारे आहेत. दोघांनाहि वर्णाश्रमधर्माचरण हें वैदिक धर्माचें प्रधान अंग आहे हें मान्य आहे. देवमूर्तींची पूजा करणारे दोघेहि आहेत. धर्माच्या नांवावर खपणाऱ्या ढोंगधत्तुऱ्यांच्या दांभिकपणाचा, पाखांड मताचा, धर्महीनतेचा दोन्ही संप्रदायांनीं तिखट शब्दांनीं निषेध केला आहे. लोकसंग्रहार्थ झटण्याचा दोन्ही संप्रदायांचा बाणा आहे. प्रपंच साधून परमार्थ साधा अशी दोघांची शिकवण आहे. ईश्वरप्राप्तीच्या साधनांत नामसंकीर्तन हें परमश्रेष्ठ साधन आहे असा दोन्ही संप्रदायांचा आचार व उपदेश आहे. हरिहरांची एकरूपता आणि एकादशी व महाशिवरात्र या व्रतांचें परिपालन दोन्ही संप्रदायांत आहे. ह्याप्रमाणें दोन्ही संप्रदायांची मानस्वी एकरूपता आहे," असें ह. भ. प. पांगारकर म्हणतात. तें सारें सत्य असतांना तपशिलांतील किरकोळ भेदांकडे काकदृष्टीनें लक्ष देऊन, त्यावर रणें माजवून धार्मिक, प्रांतिक, जातीय, भाषिक, पंथीय इत्यादि मतामतांच्या गलबल्यानें आधींच फुटीर बनलेल्या समाजांत व देशांत मतभेदांनीं आणखी भर घालून विद्वानांनीं समाज अधिक दुबळा बनवूं नये.

प्रा. सरदारांचीं मतप्रणाली चुकीची असली तरी प्रामाणिक आहे. असल्या मतभेदांनीं समाजाचा फारसा बुद्धिभेद होणार नाहीं. पण पंथांधतेनें केलेला बुद्धिभेद परिणामीं भयंकर होतो. याचीं ढळढळीत उदाहरणें म्हणजे सत्यशोधक चळवळीनें ३० ते ४० वर्षांपूर्वी व गांधी वधानंतर उडविलेला कल्लोळ हा होय. कर्नाटक व विशेषतः महाराष्ट्र या प्रांतांत अजूनहि या चळवळीचें विष बहुजनसमाजांत भिनलेलें आहे. बहुजन समाज अद्याप अज्ञानांत आहे. शेंकडा एकदोघांचा तरी या उभयविध संप्रदायांच्या ग्रंथाशीं परिचय आहे किंवा नाहीं याची शंका आहे. अशा स्थितींत कपोलकल्पित आधारहीन प्रमाणांनीं जनतेंत आणखी मतभेद वाढवून हे विद्वान् काय साधणार आहेत हें त्यांचें त्यांस माहीत !

कांहींनीं जातीय द्वेषामुळें, कांहींनीं पक्षांधतामूलक, कांहींनीं पंथाभिनिवेशानें, व कांहींनीं राजकीय पक्षद्वेषानें व अपवादात्मक लेखकांनीं प्रामाणिक मतभेदानें असें तें लिखाण केलेलें आहे. पण या सर्वांचा परिणाम मात्र अज्ञ जनतेचा श्रीसमर्थांच्या एकंदर कार्याविषयी बुद्धिभेदच उत्पन्न करण्यांत झालेला आहे, हें गेल्या ३० / ४० वर्षांच्या महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक घडामोडींवरून स्पष्ट दिसून येत आहे; व त्यांचीं फळें तो चाखीतच आहे.

संतांमध्यें स्वजातीसंबंधीं हीनगंड असता तर त्यांनीं श्रेष्ठ जातींच्या· संबंधीं निराळेच उद्‌गार काढले असते पण त्यांनीं तसें केलेलें दिसून येत नाहीं. तसेंच व्यवहारांत आपल्यापेक्षां कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातींच्या संताबद्दल तिरस्काराचा एक शब्दहि त्यांनीं काढलेला दिसून येत नाहीं. याचें कारण एकीएकच असें आहे कीं संत परमेश्वराच्या दरबारांत जात गोत इत्यादि खुळें मुळींच आणीत नाहींत. परमेश्वराची तहान त्यांना लागलेली होती. ती ज्यांना ज्यांना लागली होती व जे जे तिनें तृप्त झाले होते अशांची त्यांनी एक जात मानली होती. जें साधन ज्याच्या ज्याच्या सामाजिक परिस्थितीनें ज्याला त्याला प्राप्त झालें होतें. त्या सहजप्राप्त साधनानें आपापला कार्यभाग साधून घेतला. ‘नाहीं अधिकार घोकाया अक्षर’ असें म्हणून श्रीतुकोबाराय रुसून बसलेले नाहीत. उलट ‘आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥’ या वचनावरून ते पूर्ण समाधानी होते हेंच दिसून येतें. ज्याला आपलें ध्येय गांठावयाचें आहे तो अवघड साधनाच्या उठाठेवी कशाला करील ? वेदाध्ययनासारख्या द्राविडी प्राणायामाच्या भानगडींत हे ब्राह्मणेतर संत पडले नाहींत याचें कारण नामस्मरणासारखा सुलभ उपाय त्यांना माहीत होता. वेदाध्ययन करणारे ब्राह्मणांतहि फार थोडे होते, त्यातहि वेदार्थ समजून व अर्थरूप होऊन जाणारे फारच विरळा होते हें ते प्रत्यक्ष पहात होते. वेदाध्ययन न करतां केवळ नामस्मरणानेंच जर सर्व कार्यभाग साधत आहे तर वेदाध्ययनासारख्या त्या अवघड खटपटींत संत कशाला पडतील व वेदांचा अधिकार आपणांस नाहीं म्हणून ते व्यर्थ झुरत कां बसतील ? पूर्वेतिहास त्यांना माहीत होता. सनातन धर्मांतून फुटून सवतासुभा काढणाऱ्या जैन, बौद्ध मानभावादि संप्रदायांची काय गत झाली हें आमच्या ब्राह्मणेतर-संतांस पूर्णपणें माहीत होतें. तेव्हां हे आमचे संत प्राप्त स्थितीविषयीं मुळींच असंतुष्ट नव्हते म्हणून ते ब्राह्मणांच्या तथाकथित श्रेष्ठत्वाचा मुळींच हेवादावा करीत नव्हते हें आमच्या, श्रीतुकाराम महाराजांस शूद्राचे प्रतिनिधि व श्रीसमर्थांस ब्राह्मणाचे कैवारी ठरविणाऱ्या, विद्वानांनीं लक्षांत ठेवावें.

आपण मूळचे कोण होतों व आपणांस अनामिक–अस्पृश्य जातींत कां जन्मावें लागलें याचें कारण श्रीचोखोबाराय पुढीलप्रमाणें देतातः–

> शुद्ध चोखा मेळा । करी नामाचा सोहळा ॥
> मी यातीहीन महार । पूर्वीं निळाचा अवतार ॥
> कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनि महार जन्मजाति ॥
> चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वींचें हें फळ ॥ १२५ ॥

साखरे सकलसंतगाथा

अशा रीतीनें जरी मी अस्पृश्य असलों तरी माझें वास्तविक स्वरूप काय आहे तें पाहा:-

ऊंस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥
कमान डोंगी परी तीर नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगें । काय भुललासी वरिलिया रंगा ॥
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥

पारमार्थिक दृष्टीनें वरील प्रकारचें स्वरूप असतांना जगाचा आमच्याकडे पहाण्याचा दृष्टिकोण कसा आहे तो पहा:--

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटी कवण्या रीती ॥
माझा लागताचि कर । सिंतोडा घेताती करार ॥
माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ॥

श्रीचोखोबा म्हणतात आम्हांस कोणीहि जवळ करीत नाहीं, ब्राह्मणापासून तों तहत ब्राह्मणेतरापर्यंत सर्वांचा एकच प्रकार आहे:—

यातिहीन आम्हां कोण अधिकार । अवघे दूर दूर करिताती
॥ १३७. ३

श्रीचोखोबारायांच्या चिरंजीवांचे—कर्ममेळ्याचे स्वतःच्या हीन जिण्यासंबंधींचे उद्गार असेच असून कर्ममेळा देवास पुढील अभंगांत विचारीत आहे:—

तुमच्या संगतीचें काय सुख आम्हा । तुम्हां मेघश्यामा न कळे कांहीं ॥
हीनत्व आम्हांसी हीनत्व आम्हांसी । हीनत्व आम्हासी देवराया ॥
गोड कधीं न मिळेचि अन्न । सदा लाजिरवाणें जगामध्ये ॥
तुम्हांसी आनंद सुखाचा सोहळा । आमुचे कपाळा वोखट पण ॥
चोखियाचा म्हणे कर्ममेळा देवा । हाचि आमचा ठेवा भागा भाग
॥ ४ ॥

गेल्या ६०० ते ६५० ह्या वर्षांत कोणाहि संतानें अस्पृश्यांच्या दुःस्थितीकडे पाहिलेलें नाहीं असें संतांच्याच वाङ्मयावरून स्पष्ट दृष्टीस पडतें. श्रीचोखोबा श्रीनामदेवरायांचे शिष्य. त्यांच्या गाथेंत श्रीचोखोबांच्या या स्थितीबद्दल एक अवाक्षरहि नाहीं. महाराष्ट्र संतमंडळीमध्यें श्रीएकनाथ महाराज सर्वांत

श्रेष्ठ असे सामाजिक कार्यकर्ते समजले जातात. अस्पृश्याच्या घरीं ते एकदां जेवले होते असें त्यांचे चरित्रकार लिहितात. पण ही स्थिति सुधारण्यासंबंधीं, त्यांना पंढरपूरच्या देवालयांत व इतरत्र प्रवेश मिळवून देण्यासंबंधीं, त्यांच्या ग्रंथांत कोठेंहि उल्लेख नाही. तोच प्रकार श्रीतुकाराम महाराजांचा. श्रीमहाराजांच्या ४–५ हजार अभंगांमध्यें एकहि सवलत, देवालय प्रवेशाची कीं ज्याबद्दल श्रीचोखोबांची मागणी होती ती, देवविण्यासंबंधीं एक चरणहि नाहीं. पण ते वैश्य शूद्रांचे प्रतिनिधी असे आमचे विद्वान् समजतात. पण त्याच अस्पृश्यासंबंधीं:—

भेटो कोणी एक नर । धेड महार चांभार ।
त्याचें राखावें अंतर । या नांव भजन ॥

असें जनतेस अट्टाहासानें सांगणारे श्रीसमर्थ मात्र ब्राह्मणांची तळी उचलून धरणारे असें या विद्वानांस वाटतें, या दैवदुर्विपाकास काय म्हणावें हें समजत नाहीं.

श्रीचोखोबारायांनीं व त्यांच्या कुटुंबांतील मंडळींनीं वर्णन केलेली ही अस्पृश्यांची केविलवाणी स्थिति आजतागायत जवळजवळ जशीच्या तशीच कायम आहे असें तीस पस्तीस वर्षांच्या स्वानुभवानें आम्ही निश्चयपूर्वक म्हणूं शकतों. त्यांची स्थिति पालटण्याचा प्रयत्न आधुनिक कालांत समाज सुधारणावादी म्हणवून घेणारांनीं कांहींसा केला. पण तो यांतील बऱ्याच जणांनीं वैदिक धर्मास डावलून केला म्हणून त्यांना त्यांच्या या कार्यांत फारसें यश आलें नाहीं. महर्षि दयानंद सरस्वती सारख्यांनीं अस्पृश्यांच्या प्रश्नाला चांगली चालना दिली. वेदप्रामाण्य जरी आर्यसमाजी मानतात तरी पण सनातन धर्मांतील सगुणोपासनादींकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण भिन्न असल्यामुळें या कामीं त्यांनाहि यावें तसें यश आलें नाहीं. अस्पृश्यतेच्या या प्रश्नाला चांगला जाणवेल असा धक्का जर प्रथम कोणी दिला असेल तर तो स्वामी विवेकानंदानीं. स्वामीजी कट्टर वैदिक परंपरेचे अभिमानी; महान साक्षात्कारी संत. असें असूनहि त्यांनीं स्त्रीशूद्रअंत्यजादि पद-दलितांचा तितक्या हिरीरीनें कैवार घेतला आहे तितका कोणत्याहि संतानें आतांपर्यंत घेतला आहे असें दिसून येत नाहीं. तरीहि पण अस्पृश्यांचा प्रश्न अजून पूर्ववत् कायम आहे. यानंतर एकंदर मागासलेल्यांच्या विशेषतः अस्पृश्यांच्या प्रश्नासाठीं कोणी जर प्राणपणानें आसेतुहिमाचल प्रचंड आंदोलन केलें असेल तर तें महात्मा गांधीनीं.

महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाल्यामुळें अनेकांनीं हरिजनांचा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न व्यक्तिशः केला. महाराष्ट्रांतील याचें ठळक उदाहरण स्व. पू. साने गुरुजींचें होय. आपणांस श्रीपांडुरंगाच्या देवालयांत प्रवेश मिळावा म्हणून श्रीचोखोबारायांनी सहाशें वर्षांपूर्वी जो एकप्रकारचा सत्याग्रह केला, त्याचीच

पुनरावृत्ति देशकालवर्तमानाप्रमाणें सानेगुरुजींनी अस्पृश्यांस देवालयांत प्रवेश मिळवून देण्यासाठीं आमरणान्त प्रायोपवेशन करून केली. हा रोमांचकारी इतिहासहि पुष्कळांच्या स्मरणांत आहे. हरिजनांस देवालयांत प्रवेश मिळावा व सानेगुरुजींचे प्राण वाचावेत म्हणून त्यावेळीं प्रचंड आंदोलन झालें. त्यावेळीं एका परिपत्रकावर पुढाऱ्यानीं सह्या देऊन जनतेस देवालय अस्पृश्यासाठीं खुलें करून मोठ्या कळकळीनें व प्रेमानें आवाहन केलें होतें. ज्या पुढाऱ्यांच्या या परिपत्रकावर सह्या होत्या, त्यांत कांहीं वारकरी पुढारीहि होते. पण आयत्यावेळीं यापैकीं प्रेमूमर्ति पांडुरंगाच्या भक्तांनीं आपलीं नांवें आपल्या अनुयायांच्या भिडेस बळी पडून या परिपत्रकांतून काढून घेतलीं हेंहि महाराष्ट्र जनतेस माहीत आहे.

आतां श्रीसमर्थ ब्राह्मणपक्षपाती कां वाटतात याचा विचार करूं. ब्राह्मणांवरच त्यांनीं भिस्त कां ठेविली असावी याचें कारण आमच्या मतें त्या कालीं संस्कारानें व विद्येनें ते समाजांत सर्वांच्या पुढें होते. इतर समाज त्या मानानें फारच मागें होता. नाहीं म्हणावयास ब्राह्मणांच्या जोडीनें कायस्थ व अल्प प्रमाणांत मराठा समाज असावा असें दिसतें. आधुनिक कालांत विशेषतः गेल्या १०० / १२५ वर्षांत विद्येचा प्रचार फार होऊनसुद्धां साक्षरतेचें प्रमाण शेंकडा २५ / ३० टक्के तरी झालें आहे किंवा नाहीं याची शंका आहे. यांतून ब्राह्मणवर्ग बगळला तर हें प्रमाण आणखी किती तरी खालीं येईल. ही स्थिति आजची तर ३००/३५० वर्षांपूर्वी समाजाची, विशेषेंकरून ब्राह्मणेतर समाजाची शैक्षणिक पातळी काय असेल याची कल्पना करणें सुलभ आहे. या असल्या समाजास जागृत करण्याचें बिकट व प्रचण्ड कार्य त्या काळच्या संत मंडळीस करावयाचें होतें. तें प्रथम श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं चालू केलें व लोकांच्या अज्ञाननिद्रेस पहिला धक्का दिला व तो खडबडून जागृत झाला. येवढ्यांत महाराष्ट्रावर यावनी सत्ता आली व तिनें फारच धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला व सनातन धर्म नाहींसा होतो कीं काय अशी परिस्थिति निर्माण झाली. पुढें श्री एकनाथांच्या अवतारकार्यानें या मोहम्मदीय आक्रमणास चांगलीच थप्पड दिली व हिंदू समाजाचें धार्मिक स्थिरीकरण बरेंच केलें. राष्ट्राच्या सुदैवानें श्रीनाथांच्या अवतारानंतर लवकरच श्रीसमर्थ आणि श्रीशिवछत्रपति या उभयतांचा अवतार झाला. आपल्या अगदीं बाल्यावस्थेपासूनच या उभयतांस देशाच्या धार्मिक व राजकीय परिस्थितीची जाणीव झाली होती व त्यांनीं आपापल्या परीनें स्वतंत्रपणें ती सुधारण्याच्या प्रयत्नास हात घातला होता. उभयतांच्या प्रयत्नांचे ओघ लवकर एकत्र आले व त्यांच्या प्रचण्ड प्रवाहानें महाराष्ट्र जनतेंतील एकंदर जाड्य निघून जाऊन ती स्वधर्म व स्वराज्योन्मुख अशी झाली व लवकरच हें साध्य त्यांनीं हस्तगत केलें.

या स्वधर्म व स्वराज्य यांच्या कार्यास प्रचंड संघटनेची आवश्यकता होती. कोणतीहि संघटना बनविण्यास आणि तिच्या द्वारें आन्दोलन करण्यास जाणत्या

माणसांची आवश्यकता असते. संघटनेचें कार्य योग्य मार्गदर्शकांच्या द्वारें चाललें तरच ती संघटना कार्यक्षम व फलद्रूप होते. या दृष्टीनें पाहिल्यास महाराष्ट्रांत त्यावेळीं ब्राह्मणवर्गच या कामाची धुरा वाहण्यास बव्हंशीं योग्य होता. साक्षरवर्ग असा ब्राह्मणांचाच होता. समाजांतील नेता जेव्हा एकाद्या कार्याची रूपरेषा आपल्या मनःचक्षूपुढे आंखतो, तेव्हां तो आपल्या कार्यास जास्तीत जास्त उपयोगी कोणता वर्ग पडेल याचा आडाखा प्रथम बांधतो. नंतरच आपल्या ध्येयसिद्धीच्या कार्यास तो हात घालतो. या दृष्टीनें पाहिल्यास श्रीसमर्थांनीं ब्राह्मणवर्गास प्रथम जवळ केलें हें त्यांच्या नेमकेपणास धरूनच झालें असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें. या आपल्या धोरणास अनुसरूनच—

अधिकार जाणून धरावे । जवळी दुरी ॥

असें ग्रंथराजांत शिष्यांस समर्थांनीं सांगितलें आहे. ही ब्राह्मण शिष्यमंडळी शिक्षणांत, व क्षत्रिय सत्तेंत पुढें होती. तेव्हां श्रीसमर्थांनीं बहुजन समाजांत क्रांतीच्या आंदोलनांतील शिक्षणकार्य मुख्यतः ब्राह्मणवर्गावर सोपविलें व जनतेस मार्गदर्शन केलें व क्षत्रिय-वर्गास या शिक्षण कार्याच्या पुढील कार्यास पोषक असें आंदोलन करण्यास सांगितलें. याची तयारी श्रीशिवछत्रपतींनीं अगोदर चालू केली होती, तिला श्रीसमर्थांच्या कार्यानें पुष्टीच मिळाली. या ब्रह्मक्षत्रांच्या जोडीनेंच पुढें स्वराज्याची स्थापना झाली. यालाच उद्देशून श्रीसमर्थांनीं—

शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ।
शक्तीयुक्ती जये ठायीं । तेथें श्रीमंत धावती ॥

असें म्हटलें आहे व तें अगदीं पूर्वपरंपरेस अनुसरूनच आहे. महाभारतकारांनीं हेंच तत्त्व सांगितलें आहे:—

ब्रह्मक्षत्रेण सहितं क्षत्रंच ब्रह्मणासह ।
संयुक्तौ दहतः शत्रून्वनानीवाग्निमारुतौ ॥ ३.१८५.२५

टीकाकारांनीं, श्रीसमर्थांनीं ब्राह्मण व क्षत्रियांस जवळ केलें; विशेषतः ब्राह्मणांस, हा त्यांचा दोष होता असें म्हटलें आहे. पण तो दोष नसून उलट तो त्यांचा गुण होता असें आमचें मत आहे. श्रीसमर्थांच्या अशा करणीनें टीका-कारांनीं म्हटल्याप्रमाणें प्रतिगामी परिणाम झाला नसून त्या योगें समाजाची, महाराष्ट्राची व एकंदर देशाची सर्वांगीण प्रगतीच झाली हें इतिहासावरून सिद्ध झालें आहे.

० ० ०

# श्रीसमर्थांचें राजकारण

श्रीसमर्थांच्या राजकारणासंबंधीं श्री. बहिरटांनीं जें लिहिलें आहे, तें त्यांच्याच शब्दांत पुढें उद्धृत करीत आहें:—“ रामदासांची राजकीय कामगिरी श्रेष्ठ आहे, असें म्हटलें जातें. त्यांनीं ती थोडी बहुत केली आहे, हें नाकारतां येत नाहीं. परंतु तिला शिवाजी राजाच्या राजसत्तेचा पाठिंबा मिळाला म्हणून, ही गोष्ट विसरतां कामा नये. राजसत्ता अनुकूल नसती तर रामदासांना कांहीं करतां आलें असतें, असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें रामदासी राजकारण मर्यादित स्वरूपाचें होतें. ” प्रि. दांडेकर हे पूर्वीं उल्लेखिलेल्या लेखांत म्हणतात, “ पण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, श्रीसमर्थांनीं राजकारणांत भाग घेतला म्हणजे काय केलें ? दासबोधांत कांहीं स्थळें सोडून ‘ राजकारण ’ म्हणजे ‘ उत्तम व्यवहार ’ च सांगितला आहे. शीख गुरु ज्याप्रमाणें स्वतः किर्पाण घेऊन लढले तसे समर्थ लढायांवर गेले नाहींत. ” रामदासी राजकारण हें गाजावाजा करण्या-जोगें सक्रिय नव्हतें. याप्रमाणें रामदासी पंथाची धार्मिक व राजकीय अशा दोन्ही कामगिऱ्या सामान्य प्रतीच्या आहेत. ”

इंग्रजींत ज्याला Politics म्हणतात तें श्रीसमर्थांनीं केलें आहे किंवा नाहीं, केलें असल्यास कितपत केलें आहे, केव्हांपासून त्यांनीं तें करण्यास प्रारंभ केला इत्यादि प्रश्नांचा ऊहापोह तो व वाद गेलें अर्धशतकभर महाराष्ट्रीय विद्वानांत अजून तरी संपलेला नाहीं. ‘ राजकारण ’ या शब्दाचा अर्थ दासबोध वा श्रीसमर्थांच्या इतर ग्रंथांत कांहीं विद्वान् समजतात त्याप्रमाणें ‘ चातुर्य ’ किंवा ‘ उत्तम व्यवहार ’ असा कांहीं स्थळें सोडून आहे किंवा काय, याचा प्रथम विचार करूं या. ‘ राजकारण ’ हा शब्द श्रीसमर्थांच्या ग्रंथांत पुढील प्रत्येक ठिकाणीं आला आहे—

( १ ) मृत्य न म्हणे राजकारणी । दा. ३.९.१३

( २ ) नेणता कांहीं राजकारण। अपमान करून घेती प्राण। दा. ९.४३५

( ३ ) मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ।। दा. ११.५.४

( ४ ) राजकारण बहुत करावें। परंतु कळोंच नेदावें दा. ११.५.१९

( ५ ) लोक पारखून सोडावे । राजकारणें अभिमान झाडावे ।
दा. १५.५.५०

(६) ऐसें असो राजकारण । सांगता तें असाधारण ।
सुचित असतां अंतःकरण ।राजकारण जाणे ॥ दा. ११.५.२२
(७) हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण । दा. ११.६.४
(८) हरिकथा निरूपण ।बरें पणें राजकारण । दा. १२.२.२९
(९) महाराष्ट्रदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला ।
दा. १५.२.४
(१०) कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ॥ दा. १५.२.२५
(११) नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण । दा. १५.३.१४
(१२) अनंत राजकारणें धरणें । दा. १६.८.२०
(१३) जाणत्याचें राजकारण । दा. १८.२.१४
(१४) विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंघारिजे ॥ दा. १८.६.१
(१५) राजकारण संवादा । मिळोंच नेणें ॥ दा. १८.६.४
(१६) नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ दा. १८.६.६
(१७) प्रपंची जाणें राजकारण ॥ १९.४.१७
(१८) तीक्ष्णबुद्धी राजकारणी बरी । दा. १९.६.१७
(१९) मोठीं राजकारणें चुकती । राजकारणीं वेढा लागती १९.८.११
(२०) राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ दा. १९.९.१०
(२१) कित्येक खलक उगवावे । राजकारणामध्यें ॥ दा. १९.९.१०
(२२) दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ दा. १९.९.१९
(२३) खळ दुर्जनास भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें । दा. १९.९.२१
(२४) हीं धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें । दा. १९.९.२७
(२५) जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती । दा. १९.१०.१

या शिवाय द. १५. १; द. १८. ६; द. १९. ७; द. १९. ८; द. १९. ९; व द. १९. १० हे समास पूर्णपणें राजकारणपर आहेत.

आतां उपरिनिर्दिष्ट स्थळांतील ‘ राजकारण ’ ह्या शब्दाचा अर्थ ‘ चातुर्य ’ किंवा ‘ उत्तम व्यवहार ’ असा आहे किंवा काय हें पाहूं या:—

१. या समासांत अनेक ठिकाणीं ‘ मूर्ख न म्हणे हा सर्वज्ञ, ’ ‘ मूर्ख न म्हणे करामती । कैवाड जाणे ’, ‘ मूर्ख न म्हणे हा धूर्त, ’ ‘ मूर्ख न म्हणे हा सावध ’, ‘ मूर्ख न म्हणे वेवसाई ’, असे शब्दप्रयोग केले आहेत. त्यांत प्रतिपक्षास इष्ट असलेला अर्थ अनेक वेळां येऊन गेला आहे. तेव्हां या ओवींतील ‘ राजकारणी ’ म्हणजे आजचा ( Politician ) च होय. दुसरा कोणताहि अर्थ होऊं शकत नाहीं.

२. ही ओवी जाणपण निरूपण समासांतील आहे. आत्मस्वरूप व व्यवहार न जाणल्यानें तसेंच व्यवहार न समजल्यानें काय परिणाम होतो याचें विवरण यांत फार सुंदर केलें आहे. व्यवहार आला कीं, त्यांत राजकारण आलेंच. तें राजकारण न समजल्यानें प्राणावर बेततें त्या वेळचा प्रत्यहींचा अनुभव श्रीसमर्थांनीं या ओवींत सांगितला आहे.

३. ' राजकारण ' हा शब्द दा. ११. ५ मध्यें चारदां आलेला आहे. या समासाचें नांवच मुळीं ' राजकारण निरूपण ' असून पूर्णतया राजकारणानें भरलेला आहे. टीकाकारांनीं ' राजकारण ' या शब्दाच्या केलेल्या अर्थाचा यांत मागमूसहि नाहीं.

४. ' हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ॥ ' ११. ६. ४ ह्या सर्व समासांत केवळ राजकारणच आलें. यांतील ' राजकारण ' शब्दाचा अर्थ आपण करतों तसाच आहे किंवा काय हें आक्षेपकांनीं तो समास संपूर्ण वाचूनच आपल्या मनाशीं ठरवावें.

५. ' राजकारण ' हा शब्द. हरिकथा निरूपण । बरेंपणें राजकारण ॥ दा. १२. २. २९ या ओवींत येतो. हा ' प्रत्यय निरूपण ' समास तत्कालीन प्रचलित राजकारणी घडामोडींसंबंधींचा आहे.

६. दासबोधाच्या १५ । २ वा समास निःस्पृह ' व्याप लक्षण निरूपण ' आहे. श्रीसमर्थांचे ' निःस्पृह ' म्हणजे आधुनिक कालांतील खरेखुरे कार्यकर्ते. या समासांत ' राजकारण ' हा शब्द दोनदां आलेला आहे, त्या ओव्या पुढें देतोः--

महाराष्ट्र देश थोडा उरला । राजकारणें लोक रूधिला दा. १५.२.४ व
कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ॥ १५.२.२५

७. नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण दा. १५.३.१४ या ओवीच्या मागील ओवी मोठीसूचक आहे. ती ओवी,

धाकुटा भाग्यास चढला । तरी तुच्छ करिती तयाला ।

या कारणें सलगीच्या लोकांला । दुरी धरावें ॥ दा. १५. ३. १३ या ओवी वरून व समासाच्या एकंदर ओघावरून येथील ' राजकारण ' शब्दाचा अर्थ ' राजकारण ' हाच आहे.

८. ' जाणत्याचें राजकारण ' । दा. १८.२.१४ जाणत्यांनीं आडरान घेण्याचें न ठरविल्यास शब्दाचा अर्थ Pure and simple politics असाच आहे हें त्यांच्या सहज ध्यानांत येईल.

९. ग्रंथराजाचा द. १८.६ वा हा एकच समास अभिनिवेशरहित व निर्विकारयुक्त अंतःकरणानें वाचल्यास श्रीसमर्थांनीं 'राजकारण' केलें किंवा नाहीं या प्रश्नावर रण माजून महाराष्ट्र सारस्वतांत विनाकारण चिखल उडविण्याचें कारण राहात नाहीं.

विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंघारिजे ॥ १८.६.१

यांतील 'विवेकें' 'विचरें' या दोन शब्दांत विरोधकांच्या मनांतील 'राजकारण' याचा अर्थ येऊन गेला. मग पुनः 'राजकारणें' हा शब्दप्रयोग श्रीसमर्थांनीं कां केला हें सिद्ध करण्याचें उत्तरदायित्व विरोधकारांवर येऊन पडतें. 'राजकारण' हा शब्द तीन वेळां या समासांत एकाच अर्थानें आलेला आहे.

( १० ) 'सदेव लक्षण निरूपण' नांवाचा ग्रंथराजांतील १९.४ चा समास आहे. त्याची १४ वी ओवी,

प्रपंचीं जाणे राजकारण ।

अशी आहे. महंताच्या — कार्यकर्त्यांच्या अंगीं कोणते गुण श्रीसमर्थ अपेक्षित होते याचें वर्णन या समासातील प्रत्येक ओवींत भरलेलें आहे. 'राजकारण' म्हणजे 'चातुर्य' किंवा 'उत्तम व्यवहार' असें मानणाऱ्यास असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं हा त्यांचा अर्थ,

चौदा विद्या चौसष्टी कळा । १९.४.१२

इत्यादि ओवींत, किंवा

सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चाळणें १९.४.१३

या व एतत्सदश या समासांतील कांहीं ओव्यांत आलेला नाहीं काय ? असें असतांना सुद्धां, 'प्रपंची जाणें राजकारण ।' असे श्रीसमर्थ म्हणत आहेत. तेव्हां या शब्दाचा अर्थ आम्ही जो करीत आहोंत तोच आहे. या ओवींत श्रीसमर्थ महंतास बजावीत आहेत कीं, राजकारणास वगळून खरा प्रपंच होऊं शकत नाहीं हें श्रीसमर्थांचें निश्चित मत असल्यानें त्यांनीं राजकारणास परमार्थाच्या—हरिभजनाच्या खालोखाल महत्त्वाचें स्थान दिलें. हा समास निव्वळ राजकारणपर आहे.

( ११ ) 'तीक्ष्णबुधी राजकारणी बरी ।' १९.६ असें श्रीसमर्थ महंतांच्या मेळाव्यापुढें 'बुद्धिवाद निरूपण' नांवाच्या व्याख्यानांत सांगत आहेत. श्रीसमर्थांनीं तरी आपल्या कालीं आपल्या संप्रदायांत भोळसट, बावळट व केवळ पायानें चालणाऱ्या अशा माणसास आपल्या संप्रदायांत प्रविष्ट करून घेतलेलें दिसून

येत नाहीं. आपल्या महंतांसहि त्यांनीं तसाच आदेश दिलेला आहे. परमार्थांत काय किंवा व्यवहारांत काय त्यांना बुद्धिमान कार्यकर्ते पाहिजे होते. ‘राजकारण’ तर केवळ बुद्धिवानांचेंच क्षेत्र. तेव्हां या ओवींतील ‘राजकारण’ या शब्दाचा अर्थ प्रतिपक्षी समजतात तसा नाहीं. तो अर्थ,

उत्कट चातुर्य, उत्कट भजन। १९.६.२२

या चरणांत आलाच आहे. परमार्थाच्या जोडीला राजकारणहि या समासांत आलें आहे.

(१२) ‘मोठीं राजकारणें चुकतीं। राजकारणीं वेढा लागती।

१९.८.११ ‘उपाधिलक्षण निरूपण’ नांवाचा हा समास आहे. महंतांच्या— कार्यकर्त्यांच्या अंगीं उपाधि वाढविण्यासाठीं नेमकपणा पाहिजे हें सांगण्यासाठीं श्रीसमर्थांनी हा समास सांगितला आहे. सावधपणा राजकारणांत राखला नाहीं तर राजकारण अंगावर कसें येतें हें प्रस्तुत ओवींत सांगितलें आहे. तेव्हां येथेंहि ‘राजकारण’ शब्दाचा अर्थ प्रतिपक्षीयास इष्ट असलेला नाहीं हें सांगणें नकोच. १९।८ हा सर्वच समास राजकारणपर आहे.

(१३) द. १९.९ या समासांत ‘राजकारण’ हा शब्द ४ ठिकाणीं येतो. तो असाः—

(अ) राजकारणें मंडळ वेष्टी। चहूंकडे ॥ १९.९.१८
(आ) दुर्जनें राजकारण दाटे। ऐसें न करावें ॥ १९.९.१९
(इ) खळ दुर्जनासी भ्यालें। राजकारण नाहीं राखिलें। १९.९.२१
(ई) हे धूर्तपणाचीं कामें। राजकारण करावें नेमें। १९.९.२७

हा सर्वच समास राजकारण आहे. तेव्हां येथील ‘राजकारण’ शब्दाचा अर्थ ‘उत्तम व्यवहार’ असा होणें शक्य नाहीं हें सांगणें नकोच.

(१४) १९ व्या दशकाच्या १० व्या समासाचा प्रारंभच ‘जेथें अखंड गाना चाळणा। जेथे अखंड नाना धारणा। जेथें अखंड राजकारणा। मनासी आणिती ॥’ १९.१०.१ या ओवींनें होतो. ‘विवेकलक्षण निरूपण’ या समासाच्या प्रत्येक ओवींत ठेंचून राजकारण भरलेलें आहे. आपणांस इष्ट असलेला अर्थ या ‘राजकारण’ शब्दांतून काढण्याचें धाष्ट्र्य प्रतिपक्ष करील असें वाटत नाहीं.

१९ व्या दशकावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं श्रीसमर्थांस आपल्या शिष्यांस—महंतास—कार्यकर्त्यांस राजकारणाविषयीं जें कांहीं सांगावयाचें होतें

तें त्यांनीं स्पष्टपणें एकदांच या समासांत सांगून टाकलें आहे. दासबोधाच्या पूर्वार्धांत प्रामुख्यानें अध्यात्मनिरूपण व उत्तरार्धांत बव्हंशानें राजकारण व समाजनिरूपण याचे धडे त्यांनीं आपल्या शिष्यांच्या निमित्तानें तात्कालीन व भविष्यकालीन जनतेस दिले आहेत. हें त्यांचें करणें त्यांच्या नेटकेपणास धरूनच आहे अध्यात्माच्या भरभक्कम पायाव्यतिरिक्त त्यावरील राजकारणाची व समाजकारणाची वास्तु चिरंतन टिकावयाची नाहीं असा त्यांचा ठाम सिद्धान्त आहे. सद्यःस्थितीसहि तो पूर्णपणें लागूं पडणारा आहे. त्याला अनुसरून आपल्या ग्रंथाची मांडणी श्रीसमर्थांनीं केलेली आहे हें स्पष्ट दिसून येतें.

दासबोधांतर्गत राजकारण शब्दाचा अर्थ एके ठिकाणींसुद्धां प्रतिपक्षानें जो कल्पिला आहे म्हणजे त्याचा अर्थ ‘ चातुर्य ’ वा ‘ उत्तम व्यवहार ’ असा नसून त्याचा अर्थ निर्भेळ ‘ राजकारण ’ च ( Politics ) असा आहे. कमींत कमी २८ वेळां हा शब्द दासबोधांत आलेला आहे. प्रतिपक्षाचा दावा असा आहे कीं, “ दासबोधांत कांहीं स्थळें सोडून ‘ राजकारण ’ म्हणजे ‘ उत्तम व्यवहार ’च सांगितला आहे. ”

( १५ ) आतां श्रीसमर्थांच्या दासबोधेतर वाङ्मयांत राजकारण शब्द कोठे आला आहे व तेथें त्याचा काय अर्थ आहे, हें पहावयाचें. श्रीसमर्थांनीं आपल्या संप्रदायाचीं लक्षणें ज्यांत साकल्यानें दिलीं आहेत असा एक अभंग आहे. त्याचा आरंभ—

प्रथम लिहिणें दुसरें सांगणें ।

असा असून त्याचा शेवट,

मायाजाळ तुटे तरी देव भेटे ।<br>
दास म्हणे खोटें भक्तिहीण ॥

हा अभंग २० चरणांचा असून त्यांतील पहिल्या १० चरणांत संप्रदायाचीं वीस लक्षणें दिलीं आहेत. त्यांत—

पंध्रावें लक्षण तें राजकारण । सोळावें तें जाण अव्यग्रता ॥ ६ ॥<br>
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा सर्वांठायीं ॥ ७ ॥

असे दोन चरण आहेत. सातव्या चरणांत प्रतिपक्षास ईप्सित अर्थ आहे असें वाटतें. तेव्हां येथील ‘ राजकारण ’ शब्दाचा अर्थ दुसरातिसरा कोणताहि नसून आम्ही प्रतिपादितों तोच आहे हें उघड आहे.

(१६) उदंड राजकारण तटलें। तेणें चित्त विभागलें।
प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजे ॥

श्रीसमर्थांनी श्रीशिवप्रभूंस लिहिलेल्या त्या सुप्रसिद्ध ओवीबद्ध पत्राची ही शेवटची पंधरावी ओवी आहे. तें सबंध पत्र वाचल्यानंतर येथील 'राजकारण' शब्दाचा अर्थ 'राजकारणा'व्यतिरिक्त 'चातुर्य' वा 'उत्तम व्यवहार' करण्यास कोणी धजेल तर त्याच्या विचारशक्तीमध्यें कांहीं तरी दोष उत्पन्न झाला आहे, असें खुशाल समजावें. हें पत्र शके १५७० त लिहिलें आहे असें तज्ज्ञ समजतात.

(१७) 'राजधर्म' नांवाचें एक ओवीबद्ध पत्र शके १५७१ मध्यें श्रीसमर्थांनीं श्रीशिवछत्रपति व त्यांचे मंत्री यांस उद्देशून एका प्रसंगीं लिहिलेलें आहे. या पत्राच्या ओव्या २० आहेत. त्यांत, धुरेनें युद्धासी जाणें। ऐशी नव्हेत कीं राजकारणें। धुराच करोनि सोडणें। कित्येक लोक ॥ १४ ॥ अशी ओवी आहे. प्रतिपक्षीयांस पाहिजे असलेला अर्थ या समासांत पाहिजे तितका आहे, असें असूनसुद्धां ज्या संदर्भात 'राजकारण' हा शब्द आला आहे, त्याचा विचार करतां या शब्दाचा अर्थ केवळ 'राजकारण' च असा आहे.

(१८) 'क्षात्रधर्म' नांवाचें २० ओव्यांचें असेंच प्रकरण क्षात्रधर्माचा स्वीकार केलेल्या श्रीछत्रपतीस व जनतेस उद्देशून श्रीसमर्थांनीं केलेलें आहे. त्यांत 'राजकारण' हा शब्द प्रत्यक्ष आलेला नाहीं. पण तो सर्वच समास राजकारणपर कसा आहे हें त्यांतील एकाच ओवीवरून सिद्ध होत आहे:—

देवद्रोही तितुके कुत्ते। मारूनि घालावे परते।
देवदास पावती फत्ते। यदर्थीं संशय नाहीं ॥ १७ ॥

वर उल्लेखिलेल्या तीनहि प्रासंगिक समासांत राजकारणाव्यतिरिक्त श्रीशिवछत्रपतींचा गौरव आहे. राजधर्म, क्षात्रधर्म निरूपण आहे. व हें सर्व तत्कालीन राजकीय परिस्थितीस उद्देशून आहे हें त्यांचें वैशिष्ट्य आहे.

(१९) सेवकांनीं धन्याशीं कसें वागावें यासंबंधीं श्रीसमर्थांनीं दोन समास लिहिले आहेत. न जाणों, हे दोनहि समास श्रीछत्रपतींच्या निकटवर्ती सेवकवर्गास श्रीसमर्थांनी प्रसंगविशेषीं सांगितले असावेत, असें त्या दोनहि समासांचा आशय (Sense) पाहिला असतां वाटतें, त्या दोहोंपैकीं दुसऱ्या समासाची पहिली ओवी,

सुचित करूनि अंतःकरण। आतां करावें राजकारण।
प्रमाण आणि अप्रमाण। समजलें पाहिजे ॥

(२०) शके १५७७ त श्रीशिवप्रभूंनीं आपल्या राज्याच्या सनदा श्रीसमर्थांच्या झोळींत टाकल्या. त्यावेळीं श्रीसमर्थांनीं राजे यांस जो उपदेश केला आहे, तो 'सावधता' प्रकरण नांवाच्या १२ ओव्यांच्या प्रकरणांत ग्रथित केला आहे. त्यांतील ११ वी ओवी पुढीलप्रमाणें आहे :

पाहिलेंच पाहावें । केलेंचि करावें ।
शोधिलेंच शोधावें । राजकारण ॥

हें समग्र प्रकरण आमूलाग्र केवळ राजकारणाचें आहे.

(२१) स्फुट प्रकरणांतील ६७ व्या प्रकरणांत (श्रीसमर्थांची कविता भा. १ ला) श्रीभवानीदेवीची म्हणजे शक्तीची स्तुति आहे. त्यांतील ३६ व्या पद्यांत 'राजकारण' हा शब्द येतो.

(२२) स्फुट श्लोकांतील (श्रीरा. क. भा. १ ला) ५१ व्या प्रकरणांत देवीच्या स्तुतिपर ५ श्लोक आहेत. त्यांतील राजकारण पहावें.

(२३) श्रीसमर्थांच्या समग्र ग्रंथांत 'राजकारण' या शब्दाचा अर्थ 'राजकारण' असाच केवळ आहे व चुकूनसुद्धां कोठेंहि तो 'चातुर्य' वा 'उत्तम व्यवहार' या अर्थीं त्यांनी वापरलेला नाहीं. कारण 'चातुर्य' वा 'उत्तम व्यवहार' यांचें निरूपण श्रीसमर्थांनीं आपल्या ग्रंथांत अक्षरशः अगणित वेळां केलेलें आहे; तेव्हां त्यास 'राजकारण' या शब्दाचा प्रयोग त्या अर्थीं करण्याची मुळींच आवश्यकता नव्हती.

(२४) प्रत्यक्ष 'राजकारण' शब्दाचा येथवर विचार झाला. आतां प्रत्यक्षा-प्रत्यक्षरीतीनें श्रीसमर्थांनीं राजकारण भरीवपणें केलें याचे उल्लेख दासबोधादि ग्रंथांत पदोपदीं येतात. त्यांच्या विचाराकडे वळूं या. राजकारणी पुरुष भारतवर्षांत आजवर अनेक झाले. पण यांपैकीं बहुतेकांस जनता विसरली आहे. श्रीशिवछत्रपति, लोकमान्य वा महात्माजी अशांसारख्या हाताच्या बोटांवर मोजण्यासारख्या विभूति ह्यास अपवादात्मक आहेत. याचें कारण या तीनहि महापुरुषांच्या राजकारणाचा पाया शुद्ध अध्यात्माचा होता म्हणून ही त्रैमूर्ति अविस्मरणीय झाली. श्रीसमर्थ हे तर साक्षात्कारी असे महान् संत होते. आत्मस्वरूप जसें अक्षर, अविनाशी व चिरंतन तसेंच त्याच्याशीं ऐक्य झालेले संतहि पण अक्षर, अविनाशी व चिरंतन. यालाच उद्देशून श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे कीं:—

असो ऐसे सकळहि गेले । परंतु एकची राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ दा. ३.१०.५९

( २५ ) आतां श्रीसमर्थांच्या राजकारणासंबंधीं दासबोधांतच काय प्रमाणें सांपडतात याचा क्रमशः विचार करूं या. ग्रंथराजाच्या ६ व्या दशकाच्या ७ व्या ' सगुण भजन ' समासांत रोकडा चमत्कार वर्णिला आहे तो श्रीशिवछत्रपतींस अनुलक्षून आहे. दासबोधाच्या पूर्वार्धांत बहुधा अध्यात्मनिरूपण आहे. हा अध्यात्माचा विषय चालला असतांना त्यांत दुर्जनांचा संहार व म्हणून भक्तजनांचा आधार याचा उल्लेख कां यावा ? श्रीसमर्थांच्या चरित्रांत त्यांच्याशीं संबद्ध असलेल्या दुर्जनांच्या संहाराच्या चमत्काराचा उल्लेख निदान आम्हांस तरी माहीत नाहीं. तेव्हां हा उल्लेखिलेला प्रसंग श्रीशिवचरित्रपर आहे असें मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. अध्यात्माच्या ऐन प्रसंगींसुद्धां श्रीसमर्थ शिवप्रभूंस विसरलेले नाहीत. तसें होणेंच शक्य नव्हतें. श्रीसमर्थ जसे सद्‌गुरु तसेच श्रीशिवप्रभूहि पण सच्छिष्य, असला गुरुशिष्य संबंध जाणण्यास लेखक, इतिहासकार वा अन्य कोणीहि विद्वान् अध्यात्म-शास्त्र म्हणजे काय ह्याचा थोडा बहुत ज्ञाता असल्यास, त्यासच या ओव्यांचें महत्त्व कळेल. तें तसें थोडेसेंसुद्धां कोणास कळलेलें दिसत नाहीं, म्हणून श्रीसमर्थ-छत्रपतिसंबंध त्यांस कळूं शकला नाहीं. तो तसा कळला असतां तर श्रीसमर्थांच्या राजकारणाविषयीं तसेंच त्यांच्या श्रीशिवछत्रपतींच्या संबंधाविषयीं महाराष्ट्रीय विद्वानांत इतके मतभेद होते ना !

दासबोधाच्या ६–७ व्या समासांविषयीं आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. या दशकाचा ६-४ हा समास शके १५८१ मध्यें लिहिला गेल्याचा त्यांत स्पष्ट उल्लेख आहे. अफजलखानाचा वध शके १५८१ च्या मार्गशीर्षांत झालेला आहे. श्रीसमर्थ–छत्रपति भेट शके १५९४ पर्यंत झालेलीच नव्हती असें म्हणणाऱ्यांचें तोंड वरील प्रमाणावरून तरी बंद पडलेंच पाहिजे. त्यांना निदान १२–१३ वर्षें तरी त्या भेटीचा काल मागें ओढणें भाग आहे असें वरील प्रमाणावरून ठरत आहे. तूर्त विरोधी पक्षाच्या निदर्शनास येवढेंच आणावयाचें आहे कीं, अध्यात्मनिरूपणांतहि श्रीसमर्थ राजकारण (श्रीछत्रपतींना त्यांच्या कार्यांत देवाचें पाठबळ कसें आहे हें दाखविण्यास) विसरलेले नाहींत. तसेंच शके १५८१ पर्यंत श्रीसमर्थ ही व्यक्ति महाराष्ट्रांतील एक महत्त्वाची असामी गणली जात होती हेंहि या ओवींतील " रघुनाथभजनें महत्त्व वाढलें " या चरणावरून माध्यान्हींच्या सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट होत आहे व श्रीसमर्थ हा स्वतःचा अनुभव म्हणून सांगत आहेत. श्रीसमर्थ सावधानतेचे मूर्तिमंत पुतळे श्रीछत्रपतीहि तसेंच जागरूक. दोघेहि एकमेकांपासून फार दूर राहत नव्हते. असें असतांना या उभयतां महापुरुषांची भेट शके १५९४ पर्यंत झाली नव्हती असें म्हणणें व मानणें हें कशाचें लक्षण ?

( २५ ) ११ व्या दशकाच्या ५ व्या समासाचें नांवच मुळीं " राजकारण निरूपण " असें आहे. आपल्या संप्रदायाची मुख्य चतुःसूत्रीः—

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें ते राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ।।
चौथा अत्यंत साक्षेप । ११.५.४.५ ।।

श्रीसमर्थांनीं श्रोतृवृन्दास पहिल्या झटक्यांतच येथें सांगून टाकिली आहे.

यापुढील २३ ओव्यांत जें सांगण्यांत आलें आहे तें सर्व राजकारणास पोषक असेंच आहे. महंतांनीं जनतेला म्हणजे समाजाला आपल्या कार्याकडे कसें वळवून घ्यावयाचें यासंबंधीचें मुख्यत्वें करून हें व्याख्यान आहे. आजच्याहि कार्यकर्त्यांस तें पूर्णपणें मार्गदर्शक आहे.

उपाधीस विस्तारावें । उपाधींत न सांपडावें ।। ११.५.९

तसेंच पुढें सांगतात:—

बरें वाईट सोसावें । समुदायाचें ।। ११.५.१४ ।।

आतां या ठिकाणीं असा प्रश्न उत्पन्न होते कीं, ज्याला केवळ परमार्थ करणें असेल त्याला बहुजन समाजाच्या सुखदुःखांशीं काय कर्तव्य ? पण श्रीसमर्थांस असला एकांगीं परमार्थी नको आहे. ते म्हणतात:—

फड नासोंचि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा ।। ११.५.१२

अशा रीतीनें या समासाचें राजकारणी स्वरूप सांगावें तेवढें थोडेंच आहे यांत ' राजकारण ' शब्द पांच वेळा आलेला आहे.

( २६ ) श्रीसमर्थांचा महंत म्हणजे आजकालचा कार्यकर्ता. तो कोणकोणत्या गुणांनीं संपन्न असावा यासंबंधीचे आपले विचार ११।६ व्या समासांत श्रीसमर्थांनीं महंतांपुढें प्रकट केले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं, श्रीसमर्थांस आपले शिष्य भक्तिज्ञान वैराग्यादि गुणसंपन्न तर पाहिजेत.

' जाणतेपणाची महंती ' म्हणजे काय हें त्यांच्याच शब्दांत पुढें देतों—

आहे तरी सर्वाठायीं । पाहों जातां कोठेंचि नाहीं ।
जैसा अन्तरात्मा ठाईंच्या ठायीं । गुप्त झाला ।।
त्या वेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे ।
न दिसो न वर्तवीतसे । प्राणिमात्रांसी ।।
तैसाच हाहि नानापरी । बहुत जनास शाहाणे करी ।
नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्मा ।।

आपणाकरितां शाहाणे होती । ते सहजची सोये धरिती ।
जाणतेपणाची महंती । ऐसी असे ॥ ११.६१४.१७ ॥

श्रीसमर्थांस महंतांस परमार्थप्रवण तर करावयाचें होतेंच पण त्याबरोबरच दुसरेंहि कांहीं महत्त्वाचें शिकवावयाचें होतें व त्यांच्याकरवीं त्याचा जनतेंत प्रसार करवावयाचा होता. वरील ओव्यांवरून तें दुसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे ' दुसरें तें राजकारण ' होय असें सूचित होत नाहीं काय ?

( २७ ) द. १२।१० मध्यें ' उत्तम पुरुष निरूपण ' केलें आहे. ज्याला कार्लाइलनें ' Hero ' असें म्हटलें आहे, तो ' Hero ' म्हणजेच श्रीसमर्थांचा ' उत्तम पुरुष ' होय. तत्कालीन राजकीय परिस्थितीला अनुसरून हे गुण कार्यकर्त्यांत आवश्यक होते. ( आमचें तर असें मत आहे कीं, शक्यतर श्रीसमर्थांची एकंदर शिकवणूक जवळ जवळ जशीच्या तशी आधुनिक कालांतील कर्त्या माणसांनीं आपल्या अंगीं बाणवून घेतली पाहिजे. त्यांनीं तसें न केलें तर अंतीं त्याचे दुष्ट परिणाम राष्ट्रास भोगणें प्राप्त होईल. ) हे गुण अंगीं बाणलेल्या मनुष्यासच आपल्या संप्रदायांत दाखल करून घेण्यावर श्रीसमर्थांचा कटाक्ष होता. या समासांतील जवळ-जवळ प्रत्येक ओवींतून राजकारणाचा ओघ जणूं काय धो धो वहात आहे असें वाटतें. त्यांतील कांहीं महत्त्वाची शिकवण येथें उद्धृत करीत आहें.—

( अ ) बहुतांच्या कार्यास यावे ।
( आ ) बहुतांचे कार्यभाग करावे ।
( इ ) बहुतांचें सोसीत जावें । नाना प्रकारें ॥
( ई ) लोकांस परीक्षित जावें ।
( उ ) परांतरास न लावावा ढका ।
( ऊ ) आपलें अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें ।
प्रसंगीं कामास चुकवावें । तें विहित नव्हे ॥
( ऋ ) येत्न उदंड करावा ।
( ॠ ) बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥
( ऌ ) आडलें जाकसलें जाणावें । यथा न शक्ति कामास यावें ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रमांक ....... अनुक्रम ....... वि. .......

अशा गुणसंपन्न महंतानें शिष्य संप्रदाय वाढवावा असें श्रीसमर्थ कटाक्षानें सांगत आहेत.

इतरांस संप्रदायांत घेतांना कोणत्या गोष्टी महंतांनीं ध्यानांत धरावयाच्या याचेंहि दिग्दर्शन त्यांनीं याच आज्ञापत्रांत केलें आहे:—

त्यांचा संसार समाचार । पुसत जावा विस्तार ।
उदंड सांगतां तत्पर । होऊनि ऐकावें ॥

मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे पाठवावा ।
मग तयाचा सकळ गोवा । उगवूं आम्हीं ॥

श्रीसमर्थांच्या प्रचारामध्यें दुसरा हेतु तरुण पिढीला परमार्थाबरोबरच राजकारणाचे धडे देऊन कार्यक्षम करणें हा होय. त्यांचें विशेष लक्ष तरुण पिढींतील तीक्ष्ण व सखोल बुद्धीच्या मुलांकडे होतें. डोक्यांनीं चालणारे तरुण पट्टे त्यांस पाहिजे होते.

धर्म आणि राज्यास पोषक अशा राजकारणाचा प्रसार व प्रचार तरुण पिढीची संघटना करून तिच्याकरवीं तो करवावयाचा हा श्रीसमर्थांचा संप्रदाय वाढविण्याचा उद्देश होता.

( २८ ) यादृष्टीनें पाहतां ग्रंथराजाचा ११-१० वा हा समास फार महत्त्वाचा आहे. कै. नानासाहेब देवांनीं या समासास श्रीसमर्थांचें आत्मचरित्र असें जें म्हटलें आहे तें अगदीं योग्यच आहे. निःस्पृही महंताचें— कार्यकर्त्यांचें आदर्श वर्तन कसें असतें हें स्वानुभवानें श्रीसमर्थ या समासांत सांगत आहेत. कार्यकर्त्यांस त्यांच्या वर्तनाच्या बरोबरच पुढील गोष्टी श्रीसमर्थ त्यांस सांगत आहेत.

( १ ) अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां वेर्थ जातें ।
जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ॥

( २ ) अधिकार पाहोनि कार्य सांगणें । साक्षेप पाहोनि विश्वास धरणें ।
आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥

श्रीसमर्थांनीं राजकारण केलेलें नाहीं, केलें असलें तरी तें अगदीं मामुली स्वरूपाचें होतें व तेंहि अगदीं मर्यादित होतें असें अगदीं निरुपाय होऊन कष्टानें म्हणणाऱ्या विरोधी पक्षीयांस असें विचारावेंसें वाटतें कीं वर उद्धृत केलेल्या ओव्या काय सांगतात ?

( २९ ) 'प्रपंच' शब्दाचा श्रीसमर्थकृत अर्थ काय आहे हें पाहण्यासाठीं दा. १२.१ या समासाच्या १ ते १६ ओव्या त्यांचा प्रपंच शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. त्यांचा प्रपंच जगास गवसणी घालणारा आहे हें या समासाच्या पहिल्या सोळा ओव्यांवरून लक्षांत येतें. या समासाच्या शेवटच्या ४।५ ओव्यांवरून या समासाची फलश्रुति काय आहे तें तावडतोब लक्षांत येतें—

म्हणौन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पहावा विवेक ।
लोकांकरितां लोक । शाहाणे होती ॥
परी ते शाहाणे वोळखावे । गुणवंताचे गुण घ्यावे ।
अवगुण देखोनि सांडावे । जनामधें ॥
मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचें मन तोडीना ।
मनुष्य मात्र अनुमाना । आणून पाडे ॥
दिसे सकळांस सारिखा । पाहतां विवेकी नेटका ।
कामी निकामी लोकां । बरें पाहे ॥
जाणोनि पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व ।
ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणे ॥

वरील ओव्यांत सांगितलेली शिकवण ही राजकारणास पोषक आहे.

( ३० ) वर्तल्यावीण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ १२.१.३

हा तर श्रीसमर्थांचा दंडक. यावरच १२.२ हा समास आहे. या समासाचें नांवच ' प्रत्यय निरूपण ' असें आहे. जनीजनार्दनास जर संतुष्ट ठेवता आलें नाहीं तर तो महंत कसला ? खऱ्या अर्थानें त्याला कार्यकर्ता म्हणतां येणार नाहीं.

असें न वागल्यास समाजांत नसते कलह उत्पन्न होतात व त्यांत द्वैत उत्पन्न होतें. कार्यकर्ता आपले दोष न पाहाणारा व समाजाचे दोष पोटांत न घालणारा असेल तर त्याचा परिणाम—

लोकांस कळेना जंववरी । विवेकें क्षमा न करी ।
तेणें करितां बरावरी । होत जाते ॥

असा होतो; तेव्हां कार्यकर्त्यानें स्वत: सुधारावें व अंगीं उत्तम गुण धारण करावेत म्हणजे जग सुधारेल व आपल्यापाठीं लागेल. असें झालें म्हणजे—

जनीं जनार्दन वोळला । मग काय उणें तयाला ।

अशी स्थिति सर्वत्र उत्पन्न होईल. ती उत्पन्न करणें हें महन्ताच्याच हातीं आहे. जगाला समजत नाहीं म्हणून त्याला नावें ठेवण्यांत काय अर्थ आहे ? :—

( ३१ ) ग्रन्थराजाच्या ११ । ३ व १२ । ९ या दोन समासांत श्री समर्थांनीं आपल्या शिष्यांना त्यांची दिनचर्या कशी असावी यासंबंधीं कांहीं कार्यक्रम

आखून दिला आहे. आधुनिक काळांतील कॉलेजें, शाळा यांचीं वसतिगृहें चालविणाऱ्या सुपरिंटेंडेंटांनीं, अनेक तऱ्हेचे आश्रम चालविणाऱ्या संचालकांनीं श्रीसमर्थप्रणीत दिनचर्येपासून धडे घ्यावेत अशा त्या दोन दिनचर्या आहेत. सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंपेंपर्यंतचा कार्यक्रम कसा आखीव आहे. थोड्या फार फरकानें दोनहि दिनचर्यांचा विषय एकच आहे.

( १ ) सकाळीं उठा, ( २ ) पाठांतर करा, ( ३ ) प्रार्थना करा, ( ४ ) प्रातर्विधि आटोपा, ( ५ ) स्नानादि नित्यकर्म करा, ( ६ ) थोडा फराळ घ्या, ( ७ ) मग संसाराचा उद्योग बघा, ( ८ ) आपल्या मिष्ठास वाणीनें लोकांस आपल्याकडे ओढा, ( ९ ) उद्योगधंद्यांत सावध रहा, मग ( १० ) भोजन करा, भोजनोत्तर ( ११ ) वाचन, तज्ज्ञांशीं चर्चा करून एकान्तांत त्यांचें मनन करा.

अशी परमार्थाच्या पायावर उभारलेली प्रपंचाची, संसाराची नव्हे, शिकवण देण्यांत श्रीसमर्थांची दृष्टि व्यापक आहे. श्रीसमर्थांस समाजास कांहीं नवे पाठ देऊन त्याच्या करवीं त्यांच्या कालापर्यंत पूर्वकालीन समाजनेत्यांच्या हातून न घडलेली अशी अघटित घटना घडवून आणावयाची होती.

कसली जबरदस्त संघटना श्रीसमर्थांनीं आपल्या हयातींत उभारली व तिचा उपयोग स्वराज्यप्राप्तीच्या कामीं किती महत्त्वाचा झाला असेल याची कांहींशी कल्पना त्यांच्या लोकसंग्रहावरून येईल.

( ३२ ) श्रीसमर्थ खरें चातुर्य कशाला समजतात हें ग्रंथराजाच्या १५.१ या समासांत पहावयास मिळतें. या समासाचें नांवसुद्धां चातुर्यलक्षण असेंच आहे. समासाच्या प्रारंभींच्या भागांत महंतांस समाजवशीकरणाचा उपदेश आहे.

या कारणें मुख्यमुख्य । तयांसी करावें सख्य ।
येणें करितां असंख्य । बाजारी मिळती ।।

धूर्तासि धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें ।
परि हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्व ।।

समर्थांचें राखतां मन । तेथें येती उदंडजन ।
जन आणि सज्जन । आर्जव करिती ।।

वेष असावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ।।

येके ठायीं बैसोनि राहिला । तरी मग व्यापचि बुडाला ।
सावधपणें ज्याला त्याला । भेटी घ्यावी ।।

भेट भेटों उरी राखणें । हे चातुर्याचीं लक्षणें ।
मनुष्य मात्र उत्तम गुणें । समाधान पावे ॥

( ३३ ) महंताने चतुरस्त्रपणा आंगीं बाणवून कसा घ्यावा याची शिकवण श्रीसमर्थांनीं १५--६ मध्यें दिली आहे, या समासांत अत्यंत सूचक अशी एक ओवी आहे—

कुग्रामें अथवा नगरें । पहावीं घरांचीं घरें ।
भिक्षामिसें लहान थोरें । परीक्षूनि सोडावीं ॥

श्रीसमर्थांनीं आपल्या संप्रदायांत भिक्षेला फार मोठें महत्त्वाचें स्थान दिलें आहे. ते संसाराला विन्मुख होते म्हणजे ते विवाहबद्ध नव्हते हें खरें, पण त्यांच्या या संसारविन्मुखतेमुळें, प्रतिपक्षी समजतात तसें, त्यांच्या भिक्षेचा जन्म झालेला नाहीं, त्यांच्या भिक्षेंत केवढा भव्य उदात्त हेतु आहे ! भिक्षा मागावयाची ती कान, डोळे इत्यादि ज्ञानेंद्रियें उघडीं ठेवून मागावयाची आहे, कोठें काय चाललें आहे याची इत्थंभूत माहिती त्यावेळीं मिळवावयाची आहे. भिक्षेचा वेळसुद्धां राष्ट्रकार्यांतच खर्च करावयाचा आहे. भिक्षा मागण्यांतसुद्धां राजकारण कसें करतां येतें हें श्रीसमर्थ भिक्षेच्या द्वारें कार्यकर्त्यांस दाखवीत आहेत.

( ३४ ) 'उत्तम पुरुष निरूपण' नांवाचा १८ व्या दशकाचा ६ वा समास आहे. अफजुलखानाचा वध करून श्रीशिवप्रभू श्रीसमर्थांच्या भेटीस आल्यावेळीं हा समास त्यांस सांगण्यांत आला; असें श्रीहनुमंतस्वामी आपल्या बखरींत म्हणतात. हेंच मत श्री. अनंतदास रामदासी प्रमाणभूत धरतात, विद्यमान रामदासी यांत श्री. अनंतदासांची योग्यता फार मोठी आहे. त्यांनीं स्वतः प्रसिद्ध केलेल्या समर्थांनीं गाथ्याला जी प्रदीर्घ प्रस्तावना जोडली आहे तीवरून त्यांचा अधिकार कळून येतो. तरी पण या समासासंबंधीं त्यांच्याशीं आमचा मतभेद आहे हें नम्रपणें सुचवितों.

श्रीसमर्थांच्या अलौकिक दिव्य सामर्थ्याचा शिवाजीराजांस अनेकवार प्रत्यय आलेला असल्यानें त्यांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं निर्वाणीचा उपाय म्हणून श्रीसमर्थांकडे धांव घेतली हें त्यांच्या उभयतांच्या गुरुशिष्य-संबंधास धरून योग्य असेंच झालें.

श्रीसमर्थांच्या त्या दिव्य उपदेशाच्या योगानें श्रीशिवछत्रपतींस केवढें स्फुरण चढलें असेल, केवढा धीर आला असेल ! या उपदेशांत सर्व कांहीं आलें आहे. मुसलमानाचें बंड अनेक शतकांपासून माजलेलें आहे. ते मुळींच विश्वासार्ह नाहींत, न्यायनीति म्हणजे काय याची त्यांस स्वप्नांतहि कल्पना आलेली नाहीं, तेव्हां फार सावधगिरीनें पाऊल टाका, जशास तसें वागा असें सांगून ईश्वर तुमचा कैवारी

आहे, तो तुमच्या हातून अद्भुत् कार्य करवणार आहे. तुम्ही, ईश्वरी अवतार आहांत असा श्रीछत्रपतींचा गौरव करून त्यास आशीर्वाद दिला आहे.

स्वराज्यावर आलेल्या या भयंकर आपत्प्रसंगीं श्रीछत्रपतींसारखा धैर्याचा महामेरु श्रीसमर्थांच्याकडून आश्वासनाची व आशीर्वादाची अपेक्षा करीत आहे. यावरून या प्रसंगाचें गांभीर्य लक्षांत येतें.

शके १५८१ च्या मार्गशीर्षांत अफजुलखानाचा वध झाला त्याप्रसंगीं श्रीसमर्थांनीं श्रीशिवप्रभूस मार्गदर्शन केलें. याचा अर्थ असा कीं, श्रीशिवछत्रपतींच्या राजकारणविषयक हालचालींशीं श्रीसमर्थांचा निकट परिचय शके १५८१ च्या अगोदरपासूनचा असला पाहिजे. यावरून या उभयतांची भेट शके १५९४ पर्यंत झालीच नव्हती असें प्रतिपादन करणाऱ्यांच्या वादांचा कायमचा निकाल लागला हें निःसंदिग्धपणें सिद्ध झालें.

या अफजलप्रकरणीं श्रीसमर्थांचा हात प्रत्यक्षपणें होता याला श्रीगिरिधरांच्या श्रीसमर्थ प्रतापांत अत्यंत सबळ प्रमाण आहे. गिरिधर असें स्वच्छ म्हणतात कीं—

समर्थें अफजुलखानासी मारविलें । श्रीसमर्थप्रताप १८.३५

'मारविलें' या शब्दप्रयोगावरून काय अनुमानें निघतात याचा विरोधकांनीं विचार करावा व नंतर श्रीसमर्थांच्या राजकारणविषयक कामगिरीचें मूल्यमापन करण्याचें धाष्टर्य त्यांनीं करावें. "श्रीसमर्थांनीं राजकारण केलें म्हणजे काय केलें ?" या आक्षेपकांच्या शंकेचें उत्तर यांत आहे. 'शीख गुरू ज्याप्रमाणें स्वतः किर्पाण घेऊन लढले तसे श्रीसमर्थ लढायांवर गेले नाहींत.' विरोधी पक्षानें यापुढें केलेल्या विधानाचें हंसू येतें. हातांत तरवार घेऊन प्रत्यक्ष कापाकापी केली तरच तें राजकारण होय, नाहींतर नाहीं, असें आक्षेपकांचें मत दिसतें. हा पक्ष स्वीकारला तर मोठाच अनवस्था प्रसंग ओढवेल. भगवान् श्रीकृष्ण, चाणक्य, स्वामी विद्यारण्य ही त्रयी या आक्षेपकांच्या दृष्टीनें राजकारण न करणारी ठरेल. पण ती तशी होती काय ? तसेंच आधुनिक कालांतील स्वामी दयानंद सरस्वती, दादाभाई नवरोजी, लो. टिळक, बाबू अरविंद घोषप्रभृतींनींहि हातांत शस्त्र घेतल्याचें ऐकिवांत नाहीं. मातोश्री जिजाबाई, दादोजी कोंडदेव व बाळाजी आवजी यांनींहि कोठें तरवार गाजविल्याचें इतिहास फारसें सांगत नाहीं. पण यांच्या सल्ल्याशिवाय शिवाजीराजे कोणतेंहि राजकारण करीत नसत. हें सर्वविश्रुत आहे. श्रीसमर्थांनीं शीख गुरुंसारखे हातांत शस्त्र घेऊन लढाया मारल्या नाहींत; पण हातांत शस्त्र न घेतां उदंड राजकारण करतां येतें याची जगाच्या इतिहासांत किती तरी उदाहरणें आढळतील.

पण श्रीसमर्थांनीं हातांत शस्त्र धरून युद्ध केलें नाहीं हें प्रतिपक्षीयांचें मतहि सत्यास धरून नाहीं. गिरिधरांनीं 'प्रतापांत' श्रीसमर्थांनीं एके समयीं हातांत खड्ग घेऊन युद्ध केल्याचा एक प्रसंग वर्णिला आहे:—

समर्थ भविष्य न सांगोनि सांगती ।
दक्षणेसीं युद्धें दुर्धर दिसतीं ।
अकरा अकरीं तरवारा मागों धाडिती ।
शिवराजयासी सत्त्वर ॥
शिवराजें चिन्ह जाणितलें ।
दक्षिणेसी परचक्र सत्य आलें ।
समर्थे सर्व पराभविलें ।
स्वयें निजशस्त्रें घेवोनियां ॥ श्रीस. प्र. २०.६१–६२

यावर शंका येण्याचा संभव आहे कीं, "श्रीसमर्थ-प्रताप" हा कांहीं ऐतिहासिक पुरावा होऊं शकत नाहीं. कारण तो एक चरित्रपर ग्रंथ आहे. यावर उत्तर असें कीं, आजवर उपलब्ध झालेल्या श्रीसमर्थ चरित्रपर ऐतिहासिक प्रमाणांत जीं थोडीं अव्वल दर्जाचीं प्रमाणें म्हणून उपलब्ध झालीं आहेत, त्यांत 'श्रीसमर्थ-प्रताप' व 'वाकेनिशी टिपण' हीं दोन प्रमाणें मुख्य आहेत 'प्रताप'कार गिरिधर हे आपल्या ऐन तारुण्यांतच श्रीसमर्थांच्या सान्निध्यांत होते. श्रीसमर्थांच्या शेवटच्या ४।५ वर्षांत त्यांच्या जवळ सज्जनगडावर राहण्याचें भाग्य गिरिधरांस लाभलें होतें. आपला ग्रंथ कशाच्या आधारावर लिहिला आहे याविषयीं ते ग्रन्थारंभींच सांगतात कीं,

समर्थ स्वामींचीं चरित्रें ।
कांहीं देखिलीं ऐकिलीं पुण्यश्रोत्रें ।
परम पावनें परम पवित्रें ।
सृष्टीमध्यें विस्तारिलीं ॥ प्र. १।५

गिरिधर हे समर्थांपासून चौथे पुरुष. श्रीसमर्थ–वेणाबाई–बयाबाई–गिरिधर. त्यांच्या वेळीं कल्याण, दत्तात्रय, उद्धव, दिनकर, अक्का इत्यादि श्रीसमर्थ-शिष्यवर विद्यमान होते. त्यांच्यापासूनच श्रींचें चरित्र गिरिधरांनीं ऐकिलें असणार. तेव्हां 'प्रतापा' चें ऐतिहासिक प्रमाणांमध्यें प्रामाण्य अनन्यसाधारण आहे हें सांगणें नकोच. त्याअर्थीं श्रीसमर्थांनीं साक्षात् युद्ध केल्याचा जो प्रसंग वर दिला आहे तो संशयातीत आहे.

याच अफजलखान प्रकरणीं वाचकांच्या दृष्टीस आणखी एक गोष्ट आणावयाची आहे व ती ही कीं या निर्वाणीच्या प्रसंगीं श्रीछत्रपति त्यावेळच्या इतर विद्यमान संतांकडे ते गेलेले नाहींत. चिंचवडकर संत देव हे जवळच होते; पारगांवचे श्रीमौनीबाबा फारसे लांब नव्हते; तसेच बावा याकूतहि दूर नव्हते. असें असतांना श्रीशिवाजी राजे यांपैकीं कोणाकडेहि न जातां श्रीसमर्थांकडेच कां गेले? जात, गोत, धर्म इत्यादि विचारांत न घेतां सत्पुरुष पाहिला कीं, त्याचा आशीर्वाद घेणें हा श्रीशिवाजीराजे यांचा स्वभावधर्मच होता. क्षेत्रोपाध्यायास देखील ते मानीत. यांतच त्यांचें विभूतिमत्त्व दिसून येतें. पण फक्त श्रीसमर्थांस श्रीशिवरायांनीं सद्गुरु मानून त्यांनीं सर्वस्व अर्पण केलें होतें. ग्रंथराजाच्या ५ व्या दशकाच्या ३ ऱ्या समासांत एकंदर २२ गुरूंची यादी श्रीसमर्थांनीं दिली आहे. ती देऊन ते म्हणतात कीं :–

असो ऐसे उदंड गुरु। नाना मतांचा विचारू।

परी जो मोक्ष दाता सद्गुरु। तो वेगळाचि असे॥ ५.२.७२

श्रीसमर्थ हे श्रीशिवरायांचे सद्गुरु होते, इतर संत तसे नव्हते. हा फरक ध्यानांत न आल्यानें किंवा न समजल्यामुळें रियासतकार सरदेसाई यांनीं आपल्या व्याख्यानामध्यें अवास्तव उल्लेख केला व त्यांचा आधार श्री. बहिरटांनीं आपल्या भ्रामक विधानास घेतलेला आहे.

(३५) 'श्रोता अवलक्षण निरूपण' नांवाचा १८ व्या दशकाचा शेवटचा समास आहे. श्रीसमर्थांचें हें कार्यकर्त्यांसमोर दिलेलें व्याख्यान, आधुनिक भाषेंत ज्याला मार्गदर्शन म्हणतात, त्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. श्रीसमर्थांचें उद्दिष्ट,–हेतु,–ध्येय काय होतें व तें साधण्यास कार्यकर्ते कसे तयार पाहिजे होते हें या समासावरून चांगलें कळून येतें. सर्वच समास सतत मननार्ह असाच आहे. त्यांतील एक ओवी :–

बहुत जनास चालवी। नाना मंडळें हालवी।

ऐसी हे समर्थ पदवी। विवेकें होतें॥

'समर्थ' ही पदवी मिळविण्यास काय करावें लागतें, हें सांगत आहे.

(३६) १९ वा दशक हा प्राचुर्यानें राजकारणपरच आहे व आमच्या म्हणण्याची सत्यता खालील ओव्यांवरून पटेल. १९–१ मधील या ओव्या आहेत.

(अ) ठायीं ठायीं शोध घ्यावा। मग ग्रामीं प्रवेश करावा।

प्राणीमात्र बोलवावा। आप्तपणें॥

(ब) कथा होते तेथें जावें । दुरी दीनासारखें बसावें ।
तेथील सकळ हरद्र घ्यावें । अन्तर्यामीं ॥

(क) तेथें भले आडळती । व्यापकतेहि कळों येती ।
हळू हळू मंदगती । रीग करावा ॥

परकीयांचें राज्य असतांना ज्यांनीं राजकारणाच्या अनेक चळवळी केल्या व उदंड हाल, कष्ट सोसले त्यांसच या ओव्यांचें मर्म कळेल.

(३७) दासबोधांत वा श्रीसमर्थांच्या इतर वाङ्मयांत 'प्राणिमात्रांचा अंतरंग होऊन जावें,' 'राजी राखावें सकळांला । कठीण आहे,' 'लोक राजी राखून कीजे । सकळ कांहीं' या व अशा प्रकारची शिकवण श्रीसमर्थांनीं निदान ५० । ७५ ठिकाणीं तरी महंतांना दिली आहे.

चौदावा तो लोक राजी राखे ।

पुढे १९-३ समासाचें सार—

राखावीं बहुतांचीं अंतरें ।
भाग्य येतें तदनंतरें ।

जगास हवा असलेला मनुष्य कसा असतो हेंहि जातां जातां त्यांनीं थोडक्यांत दिलें आहे.

कांहीं नेमकपण आपुलें । बहुत जनांस कळों आलें ।
तेंचि मनुष्य मान्य जालें । भूमंडळीं ॥
झिजल्या वांचोनी कीर्ति कैचि । मान्यता नव्हे कीं फुकाची ।

(३८) श्रीसमर्थांनीं भाग्यवानाचीं लक्षणें १९.४ मध्यें दिलीं आहेत. या समासाचें नांव 'सदेव लक्षण' श्रीसमर्थमतें भाग्यवान् कोण तरः—

उपजत गुण शरीरीं । परोपकारी नाना परी ।

किंवा,

तो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।

असा तो असतो. तसेंच लोकांच्या संकटकालीं जो त्यांच्या सहाय्यार्थ धांवतो तोः—

बहुत जन वास पाहे । वेळेस तात्काळ उभा राहे ।

आणखी एकच लक्षण सांगून हें प्रकरण आवरतें घेतों. श्रीसमर्थ म्हणता की हा त्यांचा सदेवलक्षणी पुरुष,

प्रपंची जाणें राजकारण ।

प्रपंच म्हणजे राष्ट्राच्या जीवनाचा प्रश्न, हा प्रश्न परकीय सत्तेखालीं किती बिकट असतो, याचा अनुभव आमच्या या दुर्दैवी देशानें गेलीं कित्येक शतकें अनुभविला आहे. या परकीय राजवटीचा कांटा काढल्याशिवाय राष्ट्रास सुखाचे दिवस येणें शक्य नाहीं, हें राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीस शिकविणें हेंच नेत्यांचें काम. तेंच श्रीसमर्थ, वरील ओवींत सांगतात.

( ३९ ) आपल्या व्यापक कार्यासाठीं श्रीसमर्थ एकांगी परमार्थी महंतावर संतुष्ट नव्हते. इतर व्यवहारी गुणांची अपेक्षा महंतांच्या ठायीं त्यांनीं केली आहेः—

अक्षर बरें वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें ।
गाणें नाचणें अववेंचि बरें । पाठांतर ॥

दीक्षा बरी मीत्री बरी । तीक्ष्ण बुद्धि राजकारणी बरी ।
आपणांस राखे नाना परी । अलिप्तपणें ॥

कांहीं विशिष्ट कार्यसिद्धि दृष्टीसमोर ठेवून त्यांनीं हें केलें.

आक्षेपक श्रीसमर्थांवर ब्राह्मणपक्षपाती म्हणून आरोप करीत आहेत. पण,

ब्राह्मण मंडळ्या मेळवाव्या । भक्त मंडळ्या मानाव्या ।
संत मंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥

या ओवींत श्रीसमर्थ महंतांस सांगत आहेत कीं, ब्राह्मणांपासून तों थेट अगदीं समाजाच्या अखेरच्या थरापर्यंत परमार्थी मंडळींचा शोध घेऊन ठेवा. एवढेंच नव्हे तरः—

दुर्जनांसहि राखों जाणें ।

इतकें तुमच्या प्रचाराचें उत्कट तंत्र असलें पाहिजे. महंतांच्या अंगीं उत्कटता व निष्ठा असेल तरच त्याच्या हातून कांहीं तरी कार्य होईल. जर त्याचें अंतःकरण त्यांत नसेल तर त्याचें प्रचारकार्य निष्फळ ठरेल. आपल्या संगतीनें इतरांस सुधारण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नसेल तर तो खरा महंतच नव्हे.

( ४० ) समाजाला आपलासा केल्याशिवाय कार्यकर्त्यांच्या हातून कार्य होणें शक्य नाहीं. यासाठीं

( अ ) कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनीं भंगले ।
क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे कोण ॥

( आ ) लोक राजी राखोनि कीजे । सकळ कांहीं ॥ दास १९.७ ॥

या शिकवणीनंतर कार्यकर्त्यांस ते बजावीत आहेत कीं, समाजवशीकरणाचें कार्य आपल्यास झेपत नसेल तर,

तस्मात् लोकिकीं वर्ततां नये । त्यास महंती कामा नये ।
परत्र साधनाचा उपाये । श्रवण करून असावें ॥
आपणांस बरें पोहतां नये । लोक बुडवायाचें कोण कार्ये
गोडी आवडी वायां जाये । विकल्पची अवघा ॥

याप्रमाणें हितोपदेश करून श्रीसमर्थ महंतांस पुढे खडसावितात कीं,

अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झाकोन असावें ।
प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ॥

जगासाठीं राबला नाहींस, अंगीं त्याग नाहीं, तप म्हणजे काय, कष्ट म्हणजे हें तुझ्या गांवीं नाहीं, चारित्र्य तुझ्याजवळ नाहीं, ज्ञान नाहीं, बुद्धि नाहीं सारांश एकाहि गुणाचा तुझ्याजवळ उत्कटत्वानें वास नाहीं, असें असतांना कार्यकर्ता म्हणून तूं पुढें-यावयास धडपडतोस, पुढारी म्हणवून घ्यावयास तुला संकोच वाटत नाहीं याला काय म्हणावें ?

पौराणिककालापासूनच नव्हे तर अगदीं औपनिषदिक कालापासून ब्राह्मणांचें एकीएक कर्तव्य, शास्त्रानें व रूढीनें ठरवूनच टाकल्यासारखें आहे व तें म्हणजे ऐहिक व पारमार्थिक विद्यांचें सांगोपांग स्वतः अध्ययन करून नंतर जगांतील त्या त्या वर्णास व त्या त्या विद्यांचें दान, परिभ्रमण करीत द्यावयाचें व भिक्षेवर उदरनिर्वाह करावयाचा. असलें जगांतील अत्यंत महत्त्वाचें व कष्टाचें ब्राह्मणांच्या वांट्यास आल्यानें साहजिकच जगांत त्यांस महत्त्व प्राप्त झालें, या आपल्या कर्तव्यापासून ते च्युत होऊं लागल्यापासून त्यांची जी सारखी घसरगुंडी होऊं लागली ती अद्याप पावेतों थांबलेली नाहीं. इतर वर्णांच्या बाबतींतहि तोच प्रकार झालेला आहे. श्रीसमर्थकालींहि तोच प्रकार होता. त्याला आळा घालण्याचा कांहीं प्रयत्न त्यांनीं केला; व त्या काळच्या समाजांत त्यांतल्या त्यांत पुढारलेला जो ब्राह्मण वर्ग त्यास हातीं धरून आपल्या कर्तव्याची जाणीव प्रथम त्या समाजांत उत्पन्न करण्याचा श्रीसमर्थांनीं प्रयत्न केला त्यांत अनैसर्गिक असें कांहींच नाहीं. तसें करण्यांस ब्राह्मणांस कांहीं ऐहिक सुखाचा लाभ करून देण्याचा हेतु होता असें प्रतिपक्षीयांसुद्धां सिद्ध करतां यावयाचें नाहीं. श्रीसमर्थांनीं ब्राह्मणांच्या हातांत झोळी व भटकंती दिली असेंच त्यांस आढळून येईल. शांतिपर्वांत असें म्हटलें आहे कीं, युद्ध न करणारा राजा व प्रवास न करणारा

ब्राह्मण या दोघांना, बिळांत राहणाऱ्या प्राण्यांस सर्प खाऊन टाकतो त्याप्रमाणें भूमि गिळून टाकते.

भूमिरेतौ निगरति सर्पो बिलशयानिव ।
राजानं चाप्यरोद्धारं ब्राह्मणं चाप्रवासिनम् ॥

आर्यसंस्कृती रक्षणासाठीं बद्ध परिकर झालेले श्रीसमर्थ हेंच सांगत आहेतः—

घरींच बैसतां खोटें ब्राह्मणु हिंडता भला ।
आळशी घातघेणा तो कष्टला म्हणजे बरा ।

कशासाठीं हिंडावयाचें याचें उत्तर श्रीसमर्थांनीं द. १९.८ च्या पहिल्या ओवींतच दिलें आहेः—

सृष्टीमध्यें बहु लोक । परिभ्रमणें कळे कौतुक ।
नाना प्रकारीचे विवेक । आडळो लागती ॥

महंतांस श्रीसमर्थ आवर्जून सांगतात कीं एके ठिकाणीं बसाल तर आपले अवगुणच तुम्हांस गुण वाटतील आणि पदोपदीं तुमच्या हातून प्रमाद घडतीलः—

मोठीं राजकारणें चुकती । राजकारणीं वेढा लागती ।
नाना चुकीची फजीती । चहूंकडे ॥
आवघे फडचि नासती । लोकांचीं मनें भंगतीं ।
कोठें चुकते युक्ति । कांहीं कळेना ॥
व्यापेंविण आटोप केला । तो अवघा घसरतची गेला ।
अकलेचा बंद नाहीं घातला । दुरी दृष्टीनें ॥

( ४२ ) द. १९–९ यामध्यें राजकारण शब्द अनेकदां आलेला आहे. या समासाचें नांवहि ‘ राजकारणनिरुपण ’ आहे. एक ओंवी मोठी मजेशीर आहे :—

ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥

महंत ज्ञानी पाहिजे ही पहिली शर्थ. ऐहिक गोष्टींविषयीं उदास असल्याशिवाय तो ज्ञानी होऊं शकेल काय ? तरी श्रीसमर्थांनीं ‘ उदास ’ असें पद त्याच्या मागें चिकटविलेंच आहे. ‘ उदास ’ असूनहि तो ‘ समुदायाचा हव्यास ’ धरणारा पाहिजे. आतां ज्याला ‘ समुदाय ’ करावयाचा आहे, त्यानें जगाशीं संबंध ठेवावयास नको काय ? त्याचें उत्तर समर्थच देतातः—

तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥

समुदाय वाढविण्याचा विचार कशासाठीं करावयाचा ?

राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥

व हें सर्व करीत असतांना त्यानें—

( अ ) नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।

( आ ) काटीनें काटी झाडावी । झाडावी परी ते कळो नेदावी ।

हें करीत असतांना स्वतःची वृत्ति कशी असावी याचें उत्तर श्रीगुरु देतात कीं—

मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकां करवीं करवावें ।
कित्येक खलक उगवावे । राजकारणामध्यें ॥

या संदर्भात श्रीसमर्थांनीं एक मोठा महत्त्वाचा इशारा कार्यकर्त्यांस दिला आहेः—

दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥

पण हें सर्व अशा खुबीनें झालें पाहिजे कींः—

दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जना परीस आळवावे । महत्त्व देऊनी ॥
जनामधें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटपट ।
या कारणें ते वाट । बुझवूनि टाकावी ॥

बुझवूनि टाकावी म्हणजे काय करावें, तें सांगतातः—

हुंब्यास हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥
धटासी आणावा धट । उत्घटासी आणावा उत्घट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥

असें कां करावें तर—

जैशास जैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ॥

इतक्या सर्व उलाढाली करीत असतांना महंतानें कोठें व कसें असावें ! तरः—

इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥

अशा प्रकारची ही शिकवण आक्षेपक समजतात त्याप्रमाणें नुसत्या ‘ चातुर्याची ’ वा ‘ उत्तम व्यवहाराची ’ आहे काय हें त्यांनींच मनाशीं ठरवावें. ती चातुर्याची

व उत्तम व्यवहाराची आहे यांत शंका नाहीं. पण तें चातुर्य व ' उत्तम व्यवहार ' हा आम्ही ज्याला राजकारण म्हणतों त्याच्या संबंधींचाच आहे.

( ४३ ) महंतांचें सामाजिक स्थैर्याचा उद्देश असलेलें राजकारणी धार्मिक प्रचारकार्य करण्याला तो शरीरानें व मनानें कसा पाहिजे तर–

धकाधकीचा मामला[1]। कैसा घडे अशक्ताला ।
नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनि शिकवाव्या ॥

श्रीसमर्थांनीं समाजास कांहीं निराळें शिकविण्याचा प्रयत्न केला व त्याच्या योगानें बहुजन समाज जागृत होऊन तत्कालीन परकीय सत्तेशीं निकरानें झगडला.

श्रीसमर्थ व छत्रपति भेट ही शके १५९४ त प्रथमच झाली नसून तो काल कमींत कमी १२-१३ वर्षें तरी मागें ओढावा लागतो. हें अफजुलखान प्रकरणावरून सिद्ध झालें आहे. हें प्रकरण शके १५८१ मधील आहे. असल्या महत्त्वाच्या राजकारणप्रसंगीं श्रीसमर्थ शिवप्रभूस मार्गदर्शन करण्याइतके परिचित झालेले आहेत याचा अर्थ इतपत दाट परिचय होण्यास परस्परांची योग्यता, परस्परांविषयीं विश्वास व आपुलकी उत्पन्न होण्यास हा काल आणखी निदान ५-६ वर्षें तरी मागें न्यावा लागेल. म्हणजे या उभयतांचा संबंध शके १५७५ पासून तरी असला पाहिजे हें मानणें भाग पडतें. एवढ्यावरच हें भागत नाहीं. याच्याहि मागें आपणांस आणखी ४-५ वर्षें तरी जावें लागेल. याचीं कारणें आमच्या मतें दोन आहेत. त्यांपैकीं श्रीसमर्थ शके १५६६ त कृष्णातीरीं आले. श्रीशिवछत्रपतींच्या स्वराज्य प्राप्तीच्या खटपटी शके १५६५ पासून या भागांत–श्रीसमर्थांचें आगमन कृष्णातीरीं होण्याच्या पूर्वींपासून–चालू होत्या. दोघेहि मोठे पुरुष, दोघेहि अत्यंत जागरूक, उभयतांहि चळवळ्ये, उभयतांहि एकाच ध्येयानें प्रेरित झालेले, उभयतांहि एकाच प्रांतांत परस्परांपासून फारसे लांब न राहणारे, त्यांतल्या त्यांत श्रीछत्रपति अत्यंत धार्मिक वृत्तीचे व संतांचा परामर्श घेणारे. असें असतांना या दोघांना परस्परांची माहिती ५-६ वर्षेंपर्यंत नव्हती असें मानणें म्हणजे बावळटपणाची सीमा होय. याच कालचे दुसरे महापुरुष म्हणजे श्रीतुकाराम महाराज व चिंचवडचे देव हे होत. या दोघांच्या विशेषत: श्रीतुकारामांच्या दर्शनाचा लाभ श्रीशिवप्रभूंनीं २-४ वेळां तरी घेतलेला होता; व त्यांच्या कीर्तनासहि २-३ वेळां गेलेले होते. श्रीतुकाराम महाराजांचें महाप्रयाण शके १५७१ फा. ॥वद्य २ स झालें. म्हणजे श्रीसमर्थांस कृष्णातीरास येऊन ५ वर्षें झालीं होतीं. या पांच वर्षांत या तीनहि महापुरुषांची विशेषत: श्रीसमर्थ व श्रीशिवछत्रपति, यांची एकदाहि भेट झाली नव्हती, त्यांतल्या त्यांत या उभयतांच्या चळवळीचें ध्येय एकच असतां हे दोघेहि या पांच वर्षांत ( म्हणजे शके १५६६ ते १५७१ ) एकदांहि भेटत नाहींत, या गोष्टीवर विश्वास कसा बसावा ?

दुसरें कारण, त्या सुप्रसिद्ध वाकेनिशी टिपणांतील आधार होय. अत्यंत विश्वसनीय असें हें टिपण आहे. श्रीसमर्थ परंधामास गेल्यानंतर १०-१२ दिवसांच्या आंतच हें टिपण त्यांच्या शिष्यवृंदाच्या साहाय्यानें लिहिलें गेलें आहे. श्रीसमर्थांच्या प्रयाणानंतर श्रीवेणाबाई (कारण त्या आधींच श्रीचरणीं लीन झाल्या होत्या) व श्रीकल्याण यांच्याव्यतिरिक्त बहुतेक मुख्य मुख्य शिष्य उपस्थित होते. त्या सर्वांच्या संमतीनें व साहाय्यानें हें वाकेनिशी टिपण अस्तित्वांत आलेलें आहे. यावरून या टिपणाचें ऐतिहासिक दृष्ट्या प्रामाण्य फार मोठें आहे. त्यांत श्रीशिवप्रभूंस श्रीसमर्थानुग्रह दिल्याचा नक्की काल दिलेला आहे व तो दिवस शके १५७१ वैशाख शु॥ ९ मी गुरुवार हा होय. श्रीसमर्थछत्रपति यांच्या चरित्रावरून असें दिसतें कीं हा अनुग्रह श्रीछत्रपतीस प्रथम भेटींतच झालेला नाहीं. त्यापूर्वीं श्रीशिवप्रभूंचें दर्शन एक-दोनदां तरी झालें असावें.

(४५) श्रीसमर्थ कृष्णातीरास आल्यावर बहुतेक ४-५ वर्षांच्या आंत म्हणजे शके १५७१-७२ पर्यंतच्या कालावधींत ४-५ ओवीबद्ध पत्रें श्रीशिवछत्रपतींस त्यांनीं लिहिलीं आहेत. यासंबंधीचा स्पष्ट उल्लेख श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें, खंड ९ वा, लेखांक ४३ मध्यें आहे. त्यांपैकीं १ त्या पत्रांतील कांहीं ओव्या पुढें देतोः—

निश्चयाचा महामेरू । बहुत जनास आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥

* * *

तीर्थें क्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मण स्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥
देव धर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥

* * *

या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥

* * *

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥

* * *

सर्वत्र संडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हां प्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ॥

( ४६ ) आतां दुसऱ्या पत्रांतील उपदेश पहा. हें पत्र २० ओव्यांचें आहे. श्रीसमर्थांनीं हा उपदेश प्रत्यक्ष श्रीछत्रपतींस केला आहे महंतांस केलेला नाहीं.

( ४७ ) 'क्षात्रधर्म' नांवाचें २० ओव्याचें एक प्रकरण आहे. या समासांत स्वराज्यप्राप्तीसाठी करावयाच्या प्रचंड चळवळीचें स्वरूप स्पष्ट दिसतें.

कसली जाज्वल्य शिकवण श्रीसमर्थांनीं त्याकाळीं जनतेला दिली असली पाहिजे हें वरील ओव्यांवरून वाचकांच्या ध्यानांत येईलच. असली तेजस्वी शिकवण ते समाजास देत होते हें स्पष्ट दिसत होतें म्हणून राजसत्तेचा पाठिंबा त्यांना मिळाला. वारकरी पुढाऱ्यांना असली राजकारणपर शिकवण जनतेला तुम्ही देऊं नका अशी कोणी मनाई केली नव्हती. त्यांनीं तसें केलें असतें तर त्यांच्याहि पाठीमागें राजसत्ता उभी राहिली असती. पण त्यांनीं हें केलें नाहीं. मग त्याचीं कारणें कांहींहि असोत.

( ४८ ) 'सेवक धर्म' नांवाच्या दोन समासांच्या मिळून ७५ ओव्या आहेत. स्वामिनिष्ठ सेवक कसा असावा, याचा अतिशय सुंदर ऊहापोह यात आहे.

नीच सेवकांशीं त्यांच्या धन्यानें अशा प्रसंगीं कसें वागावें ? ते सांगतात—

या कारणें बदलीत जाणें । सेवक आज्ञेच्या गुणें ।
तरीच समर्थपण जाणें । समर्थासी ॥
काम नासलें तरी नासावें । परी सेवकाधीन न व्हावें ।
दास म्हणे स्वभावें । बोलिला न्याय ॥

( ४९ ) वाकेनिशी टिपणांत शिवरायांच्या कार्याविषयीं सावधपण दिसतें.

एकांती चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।
नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥

*　　　*　　　*

धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ।
कार्यकर्तें दुरी करावे । प्रसंगें सवेचि हातीं धरावें ।
परंतु शोधोनि पहावे । कपटाविषयीं ॥
इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।
लिहावयाचें सांगूं नये । जबाबीनें ॥

श्रीसमर्थांची श्रीशिवराजांच्या संबंधीं काय भावना होती हें:—

जेथें बहुविचार । तेथें ईश्वर अवतार ।

या चरणावरून दिसून येतें, अवताराची हीच व्याख्या दासबोधांत श्रीसमर्थांनीं केली असल्याचें वाचकांस स्मरण होईल—

विवेकें बहुत पैसावलें । म्हणून अवतारी बोलिले ।

( ५० ) श्रीसमर्थांनीं भरीव राजकारण आपला देह ठेवीपर्यंत केलें, याचें उत्कृष्ट प्रमाण त्यांनीं शके १६०३ च्या पौष मासांत श्रीशंभूछत्रपतींस लिहिलेल्या त्या ओवीबद्ध पत्रांत दिसून येतें. हें पत्र २१ ओव्यांचें आहे. प्रारंभीं शंभूछत्रपतींच्या उग्र प्रकृतीसंबंधीं लिहून त्यांस सौम्यवृत्ति धारण करण्यास उपदेशिलें आहे, व पुढें पराक्रम करून दाखविण्यास त्यांस सांगितलें आहे—

सकळ लोक एक करावे । गलीम निवटून काढावे ।
ऐसें करितां कीर्ति धांवे । दिगंतरी ।।
आधीं गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।
ऐसें न होतां धक्के । राज्यास होती ।।
बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावे ।
कष्ट करोनि घसरावें । म्लेंच्छांवरी ।।
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ।।
लोकीं हिम्मत धरावी । शर्तीची तरवार करावी ।
चळती वाढती पदवी । पावाल येणें ।।

याप्रमाणें पराक्रम करून दाखविण्याचा उपदेश करून आपल्या प्रिय शिष्याच्या आठवणीनें प्रेमानें उचंबळून येऊन त्यांचें म्हणजे शिवछत्रपतींचें सर्वतोपरी अनुकरण्याचा आदेश त्यांस दिला आहे—

शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें ।
इहलोकीं परलोकीं राहावें । कीर्तिरूपें ।।
सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधनाची लगबग । कैसी असे ।।
त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावे पुरूष ।
या उपरी आतां विशेष । काय लिहावें ।।

( ५१ ) श्रीसमर्थ-राजकारणाचा काल स्थूलमानानें श. १५७० ते श. १६०३ असा ठरतो. या नंतर याच संदर्भांत श्रीसमर्थांच्या इतर स्फुट प्रकरणीं वा अन्य कवितेंत आपणांस कांहीं राजकारण आढळतें काय याचा आपण आतां शोध घेण्याचा प्रयत्न करूं या.

( ५२ ) 'आनंदवनभुवन' नांवाचें एक अत्यंत महत्त्वाचें प्रकरण श्रीसमर्थांच्या या स्फुट प्रकरणांत आहे. या प्रकरणाची मौज अशी आहे कीं, पुढें

होणारें भविष्य श्रीसमर्थांनीं यांत आधींच वर्तवून ठेविलें आहे. अंतर्गत पुराव्यावरून या प्रकरणाचा काल अंदाजानें आपणांस ठरवितां येतो. श्रीसमर्थांनीं नाशिक ते कोल्हापूर या टापूचें 'आनंदवनभुवन' असें प्रेमानें नामाभिधान केलें आहे. 'आनंद-वन' याचा अर्थ 'काशी' असा आहे. श्रीसमर्थांस हा नासिक ते कोल्हापूर यांच्या दरम्यानचा प्रदेश 'काशी' सारखाच पवित्र वाटत आहे कीं काय न कळे ! तपश्चर्येनिमित्त श्रीसमर्थांचें वास्तव्य नाशिक जवळील पंचवटींत श. १५४२ ते श. १५५४ होतें. तपश्चर्येच्या नंतर श्रीसमर्थांनीं अखिल भरतखंडाची पदयात्रा बारा वर्षें म्हणजे श. १५५४ ते श. १५६६ पर्यंत केली. पदयात्रा संपवून श्रीसमर्थ पंचवटीस एकदांच आले होते असें त्यांच्या चारित्रावरून दिसतें. पण ते यावेळीं तेथें फार अल्प काल होते. नंतर ते जे कृष्णातटाकास गेले ते पुनः गोदातटाकास निदान पंचवटीच्या भागाकडे आलेले दिसत नाहींत. यावरून असें निश्चित अनुमान निघतें कीं या तपश्चर्येच्या कालांत सदैव विश्वाची चिंता करणाऱ्या श्रीसमर्थांस श्रीरामप्रभूंच्या (श्रीसमर्थांच्या श्रीगुरूच्या) कृपेनें केव्हां तरी या प्रकरणांत वर्तविलेल्या भविष्याचा साक्षात्कार झालेला असावा. तें त्यांना प्रत्यक्ष दिसलें असेल वा त्यांनीं तें ऐकिलें असेल किंवा त्यांना तें स्वप्नांत दिसलें असेल व नंतर त्यांनीं तें आपल्या तेजस्वी वाणीनें महाराष्ट्र सारस्वतांत अवतरविलें असावें. त्यांना या भविष्याचा साक्षात्कार झाला असला पाहिजे. श्रीरामरक्षास्तोत्रासंबंधीं असेंच घडलें आहे. या स्तोत्रांत असें म्हटलें आहे कीं स्वप्नामध्यें श्रीशंकरांनीं जसें सांगितलें तसें तें सकाळीं जागा झाल्यानंतर लिहून काढलें :-

आदिष्टवान्यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः ।
तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः ।।

आधुनिक कालांत श्रीरामकृष्ण विवेकानंद यांच्या चरित्रांत असल्या कितीतरी गोष्टी दिल्या गेल्या आहेत; व त्या लिहिणारे महान पदवीधर व पाश्चात्त्यसुद्धां आहेत. श्रीगुरुदेव रानडे यांच्या संगतींत आम्हींहि गेल्या ४०-५० वर्षांत या गोष्टींचा अनेकवार अनुभव घेतलेला आहे. श्रीसमर्थ छत्रपति या गुरुशिष्यांचा इतिहास यथातथ्यपणें समजण्याची पात्रता ज्याच्या अंतःकरणाची बैठक थोडीतरी शुद्ध अध्यात्माची आहे, गुरुशिष्यसंबंधाचा थोडातरी अनुभव आहे त्यास या उभयतांच्या इतिहासाचें आकलन होईल.

या प्रकरणावरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे कीं श्रीसमर्थांस स्वराज्याचा साक्षात्कार त्यांच्या साधना-कालांत म्हणजे १५४२ ते १५४४ दरम्यान केव्हां तरी झालेला असला पाहिजे.

आमच्या प्रतिपादनाचा आशय असा कीं, श. १५५४ च्या अगोदर श्रीसमर्थांच्या अंतःकरणांत स्वराज्य, स्वधर्म, म्लेंच्छसंहार इत्यादि अनेक गोष्टींची

तळमळ व खळबळ जाज्वल्यानें वास करीत होती. याचा अर्थ असा कीं श्रीशिवरायांच्या जन्माअगोदरच राजकीय परिस्थितीची जाणीव त्यांस झाली होती. याचेंच प्रतिबिंब 'आनंदवनभुवन' प्रकरणांत स्वच्छ पडलें आहे. ५९ श्लोकांचें हें प्रकरण आहे. यांत श्रीसमर्थ काय सांगतात तें त्यांच्याच तेजस्वी वाणीनें थोडक्यांत पुढें देण्याचा प्रयत्न करतों :–

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंचि होतसे ।
हिंडता फिरतां गेलों । आनंद वनभूवना ॥

विघ्नाच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरी लोटला ।
घर्डिलीं चिर्डिलीं रागें । रडविलीं बडविलीं बळें ॥

खौळते लोक देवाचे । मुख्य देवची उठीला ।
कळेना काय रे होतें । आनंदवनभुवनीं ॥

त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्यबंद विमोचनें ।
मोहीम मांडली मोठी । आनंदवनभुवनीं ॥

बुडाले सर्वहि पापी । हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभुवनीं ॥

बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ।
मोडलीं मांडलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनीं ॥

उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥

रामवरदायिनी माता । गर्द घेऊनी उठिली ।
मर्दिले पूर्वीचे पापी । आनंदवनभुवनीं ॥

प्रत्यक्ष चालिली राया । मूळ माया समागमें ।
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ॥

भक्तांसी रक्षिलें मागें । आतांहि रक्षिते पहा ।
भक्तांसी दीधलें सर्वें । आनंदवनभुवनीं ॥

आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिली सिमा ।
सार सर्वस्व देवाचें । आनंदवनभुवनीं ॥

(५३) शके १५९६ आनंदनाम संवत्सरीं ज्येष्ठ शु. १३ स रायगडावर श्रीछत्रपतींचा राज्याभिषेक समारंभ झाला. स्वराज्यप्राप्तीचें ध्येय साकार झालें. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. यानंतर देवीच्या स्तवनार्थ श्रीसमर्थांनीं स्तोत्र गायिलें. शेवटीं तिच्याजवळ एक मागणें मागितलें, देवीजवळ पसायदानाची याचना केली आहे–

येकचि मागणें आतां । द्यावें तें मज कारणें ।
तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ॥
दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकितों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥
देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहसी किती ।
भक्तासी वाढवी वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥

(५४) आतां आपल्या इतर स्फुट प्रकरणांत व इतर कवितेंत (श्रीरामदासांची कविता भा. १ ला, सत्कार्योत्तेजक सभा, धुळें, प्रकाशित) श्रीसमर्थांनीं आपल्या महंतास–कार्यकर्त्यास राजकारणपर धडे दिले आहेत. या इतर प्रकरणांत ते शिष्यास सांगतात कीं:—

प्रत्यहीं मागणें भिक्षा । मिळाली न मिळे तरी ।
नित्य नूतन हिंडावें । धुंडावे भक्त प्रेमळ ॥

कशासाठीं हिंडावे । पोटासाठीं नव्हे. तर:–

वोळखी कराव्या दाटा । एके ठायीं स्थिरों नये ॥

* * *

हिंडतां पारखी लोकां । कार्यकर्ता जिवीं धरी ॥

हें सर्व कार्य करीत असतांना महंतानें राहावें कोठें ?

राहावें दुर्बळाचेथें । देवाल्यें कां नदीतिरीं ।
किंवा, पर्वता उदकापासीं । सन्निधची येकीकडे ॥

दाट ओळखी कशासाठीं करावयाच्या याचें उत्तर देतात कीं बहुजन समाजांत आग भडकावून देण्यासाठीं:—

वन्ही तो चेतवावा रे । चेतविताच चेततो ।

हा प्रचार करीत असतांना महंतानें अत्यंत जागरूकतेनें कार्य करावें—

देश काल वर्तमान । सर्व ही अवेवधान ।
कोणतें विधि विधान । सावधान सावधान ॥

(५५) श्रीरामदासांची कविता भा. १ ला (धुळें प्रत) यांत श्रीभवानी देवीचीं स्तोत्रें आहेत. त्या स्फुट प्रकरणांतील हें ६७ वें प्रकरण आहे. श्रीभवानी

देवीला श्रीसमर्थांनीं शक्तीची अधिष्ठात्री देवता असें मानिलें आहे. या शक्तीच्या उपासनेच्या जोडीनें श्रीसमर्थांनीं युक्तीची महती वर्णिली आहे. शक्ति म्हणजे शारीरिक सामर्थ्य व युक्ती म्हणजे बौद्धिक सामर्थ्य. स्वराज्य प्राप्तीसाटीं ह्या दोन्ही शक्ति पाहिजेत हें काय सांगावयास पाहिजे ? म्हणून श्रीसमर्थांनीं उभयता शक्तीची उपासना करण्यास जनतेला आग्रहाचें आवाहन केलें आहे. त्यांतील कांहीं निवडक श्लोक खालीं देत आहें:--

(अ) शक्तीनें पावती सुखें । शक्ती नसता विटंबणा ॥
शक्तीनें नेटका प्राणि । वैभवें भोगतां दिसे ॥

(आ) कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी दिसे ।
कळा नाहीं कांति नाहीं । युक्ति बुधी दुरावली ॥

(इ) शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ।
शक्ति युक्ती जये ठायीं । तेथें श्रीमंत धांवती ॥

(ई) युक्ति ते जाड कळा । विशक्तीसी तुळणा नसे ॥

(उ) आचुक चुकेना कोठें । त्याची राज्यें समस्त ही ॥

(ऊ) युक्तीनें चालती सेना । युक्तीनें युक्ता वाढवी ।
संकटीं आपणां रक्षी । रक्षी सेना परोपरी ॥
फितव्यानें बुडतीं राज्यें । खबर्दारी असेचिना ॥
चोरटीं होरटीं तुंदें । नासकें लांच इच्छिती ।
लौंढीचे दूरी घालावे । मारावे राजकारणें ॥
सेवका आवरूं नेणे । तो राजा मूर्ख जाणिजे ।
मूर्खाचें राज्य राहे ना । कोणाचे कोण ऐकतो ॥
असो हें बोलणें जालें । युक्तीवीण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ति । तस्मात् शक्ती प्रमाण हे ॥

अशा प्रकारें द्विविध उपासनेचें महत्त्व लक्षांत घेऊन समर्थांनीं त्याचा प्रचार समाजांत केला. तें करण्यांत त्यांचा हेतु राजकारणपरच होता.

# संकीर्ण टिपणें

## श्रीसमर्थोल्लेखित एक पक्षी

श्रीमद्ग्रन्थराजाच्या १५ व्या दशकाचा ८ वा समास 'सूक्ष्मजीवनानिरूपण' आहे. त्यांतील पुढील ओवींत श्रीसमर्थांनीं एका पक्ष्याचा उल्लेख केला आहे. या ओवीचा अर्थ असा आहे कीं, 'कांहीं प्राणी आकाशांतच राहतात. त्यांनीं पृथ्वी कधींच पाहिलेली नसते. ते आकाशांतच जन्मतात व पंख फुटल्यावर वरच्यावरच उडून जातात ':—

येक प्राणि अंतरिक्ष असती । तेहीं नाहीं देखिली क्षिती ।
वरच्यावरी उडोन जाती । पक्ष फुटल्यानंतरें ॥ १५. ८. १९

भगवान् रामकृष्णांच्या चरित्रांत थेट अशाच एका पक्ष्याचें वर्णन आहे. त्यांनीं आपल्या विवेकानन्द ब्रह्मानन्दप्रभृति, त्यांच्या समजुतीप्रमाणें असलेल्या 'नित्यसिद्ध' कोटींतील, शिष्यांची तुलना या पक्ष्याशीं केलेली आहे. या पक्ष्याचें त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणें वर्णन असें:— "वेदांत होमा पक्ष्याची गोष्ट आहे. तो पक्षी आकाशांतच असतो. जमिनीवर कधींच येत नाहीं. तो आकाशांतच अंडें घालतों. अंडें पडत असतें. पक्षी इतक्या उंचावर असतो कीं पडतां पडतां अंडें फुटतें, त्यांतून पोर बाहेर पडतें. तें देखील खालीं पडत असतें. तरी देखील तें इतकें उंच असतें कीं, पडतां पडतां त्यास पंख व डोळे फुटतात. तेव्हां त्याच्या लक्ष्यांत येतें कीं, आपण जमिनीवर पडत आहोंत व जमिनीवर पडणें म्हणजे मृत्युच. जमीन दिसली कीं लगेच उलट्या दिशेस तोंड करून उडावयास सुरवात व आईकडे कसें जाऊन पोंचावें हा एक विचार" इ. इ. वेदांतील हा होमा पक्षी हाहि प्रत्यक्ष सृष्टींतील कीं कविसृष्टींतील ?

कांहींहि असो. उभयतां महापुरुषांच्या विचारांतील विलक्षण साम्याची मौज आहे खरी !

## दासबोधांतील एक पाठभेद

श्रीमत् दासबोधांतील भिक्षेच्या समासांत (१४—२) श्रीसमर्थांनीं

भिक्षाहारी निराहारी । भिक्षा नैव प्रतिग्रहः ।
असंतो वापि संतो वा । सोमपानं दिने दिने ॥ १ ॥

असा श्लोक उद्धृत केला आहे. श्री एकनाथमहाराजांची गाथा वाचीत असतांना "हिंदु — तुर्क — संवाद" नांवाच्या रूपकांत (साखरेकृत एकनाथ गाथा ३९६६) हाच श्लोक पाठभेदानें आढळला; तो असा —

भिक्षाहारी निराहारो भिक्षा नैव प्रतिग्रहः ।
असंतुष्टः सदापापी संतोषी सोमपः स्मृतः ॥

या दुसऱ्या श्लोकांतील दुसरा चरण वरील पहिल्या श्लोकांतील दुसऱ्या चरणाहून पुष्कळच भिन्न आहे. तेव्हां याचा विचार व्हावा.

## दासबोधांतील एक शंका

दासबोध दशक १० समास ४ मधील २९ वी ओवी पुढीलप्रमाणें आहे:—

अंतरींच स्त्रिया कल्पिल्या । तों त्या कल्पितां च निर्माण जाल्या ।
परि तया पासून प्रजा निर्मिल्या । नाहींत कदा ॥

या समासाचें नांव 'बीज लक्षण' असें आहे. यांत उत्पत्तीचा क्रम सांगितला व सिद्धान्त असा बांधला आहे कीं,

शरीरावांचून उत्पत्ती । होणार नाहीं ॥ ४ ॥

पुराणान्तरीं देव ऋषि मुनियोगी इत्यादिकांनीं प्रसंगविशेषीं आपापल्या योगसामर्थ्यानुसार स्त्रियादिक उत्पन्न केल्याचें ऐकितों. पण त्यांपासून पुढें प्रजोत्पत्ति निर्माण झाल्याचें श्रुत नाहीं. असा ह्या समासाचा भावार्थ आहे. वर उद्धृत केलेली ओंवीहि तेंच सांगत्ये.

पण श्रीसमर्थांच्या या सिद्धान्ताला विरुद्ध असें एक प्रमाण महाभारताच्या वनपर्वाच्या ४४ व्या (कुंभकोणम् प्रत) अध्यायांत आढळतें. वनवासांत असतांना, तपश्चर्या करून त्यायोगें भगवान् शंकरांस प्रसन्न करून त्यांच्याकडून व इतर लोकपालांकडून अनेक अस्त्रादिकांची प्राप्ति करून घेऊन, अर्जुन एकदां इंद्रास भेटण्यास त्याच्याच रथांतून स्वर्गास गेला होता. इंद्रानें त्याचा बहुत मान करून त्याच्या सन्मानार्थ आपली देवसभा बोलाविली होती. त्या सभेंत अप्सरादिकांचें नृत्य, गायन चालूं असतांना अर्जुनाची दृष्टि उर्वशीकडे लागून राहिली होती. इंद्रानें तें पाहिलें व चित्रसेन गंधर्वास सांगून त्याच्या करवीं तिला एका रात्रीं अर्जुनाकडे जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती गेली असतां अर्जुनानें तिला तिच्या आगमनाचें कारण विचारिलें. तिनें त्याला इंद्रानें चित्रसेन गंधर्वाहातीं आपणास आलेला निरोप सांगितला व आपली मनीषा त्याच्यापुढें व्यक्त केली. ती ऐकून इंद्राची आपणाबद्दल झालेली विपरीत भावना पाहून अर्जुनाला फार वाईट वाटलें व त्यानें उर्वशीस सभेंत आपण तिच्याकडेच विशेष निरखून कां पहात होतों तेंहि सांगितलें:—

इयं पौरववंशस्य जननी मुदतीति ह ।
त्वामहं दृष्टवांस्तत्र विस्मयोत्फुल्ललोचनः ॥ ५६
न मामर्हसि कल्याणि अन्यथा ध्यातुमप्सरः ।
गुरोर्गुरुतरा मे त्वं मम त्वं वंशवर्धिनी ॥ ५७

यथा कुन्तीच माद्रीच शची चैव समा इह ।
तथाच वंशजननी त्वं हि मेऽद्य गरीयसी ।। ६२

' ही आपल्या वंशाची जननी ' येवढ्याच भावनेनें मोठ्या आनंदानें मी तुझ्याकडे पाहात होतों, तूं मला मातेसमान आहेस. या श्लोकांवरून उर्वशीपासून भारतवंश निर्माण झाला असें स्पष्ट आहे. म्हणूनच ही कथा श्रीसमर्थांच्या वर उद्‌धृत केलेल्या ओवीला विरुद्ध जाते असें वाटतें. कारण उर्वशी ही '

अंतरींच स्त्रिया कल्पिल्या । तो त्या काल्पितांच निर्माण जाल्या ।

या कोटीपैकीं होती. नारायण ऋषींनीं कल्पनेनें ती निर्माण केली, असें भागवताच्या ११ व्या स्कंदामध्यें वर्णिलें आहे. या स्कंदाच्या ४ व्या अध्यायामध्यें ही कथा आहे. एकदां ' नरनारायण ' ऋषींची उग्र तपश्चर्या पाहून इंद्राला आपल्या पदाविषयीं शंका उत्पन्न झाली व त्यानें ' कामादिकांस त्या ऋषींना तपोभ्रष्ट करावयास पाठविलें. पण इंद्राच्या या नाजुक पण परिणामीं भयंकर अशा अस्त्राचा त्या ऋषींसमोर कांहीं पाड लागला नाहीं. उलट नारायणऋषींनीं आपल्या योगबलानें ज्या स्त्रिया निर्माण केल्या त्या योगानें कामादिकांचीच बंभेरी उडाली. मग ही सर्व मंडळी त्या ऋषीस शरण गेली. तेव्हां ऋषींनीं आपण उत्पन्न केलेल्या स्त्रियांपैकीं योग्य वाटेल ती इंद्रास आपला आहेर म्हणून घेऊन जाण्यास त्यांस सांगितलें, त्याप्रमाणें ते उर्वशीस घेऊन गेले. पुढील श्लोक पहाः—

इति प्रगृणतां तेषां स्त्रियोऽत्यद्‌भुतदर्शनाः ।
दर्शयामास शुश्रूषां स्वर्चिताः कुवतीर्विभुः ।
ते देवानुचरा दृष्ट्वा स्त्रियाः श्रीरिव रूपिणी ।
गंन्धेन मुमुहुस्तासां रूपौदार्यहतश्रियः ।। १३ ।।
तानाह देवदेवेशः प्रणतान्प्राहसन्निव ।
आसामेकतमां वृङ्ध्वं सवर्णां स्वर्गभूषणाम् ।।
ओमित्यादेशमादाय नत्वा तं सुरबन्दिनः ।। १४ ।।
उर्वशीमप्सरः श्रेष्ठां पुरस्कृत्य दिवं ययौ ।। १५ ।।

तेव्हां या महाभारतभागवतांतील कथेचा व वरील श्रीसमर्थांच्या एतद् विषयक विधानाचा मेळ कसा घालाववाचा ?

## श्रीसमर्थांचें एक अप्रसिद्ध पद

श्रीसमर्थांचें एक पद पुढें देत आहें. सभेनें प्रसिद्ध केलेल्या ' श्रीसमर्थांचीं पदपदान्तरें ' या ग्रंथांत तें नाहीं. श्रीअनन्तदास रामदासी याच्या ' गाथ्यांत ' हि तें नाहीं. ' काव्येतिहाससंग्रह ' कारांनीं महाराष्ट्रकवींच्या पदपदान्तरानें जे भाग प्रसिद्ध केले आहेत त्यांत हें पद आहे किंवा नाहीं हें सांगता येत नाहीं. म्हणून

त्यांस प्रसिद्धि मिळावी व संशोधकांनीं त्याची सर्व बाजूंनीं चिकित्सा करावी, या हेतुनें तें देण्यांत येत आहे.

हें पद आमच्या संप्रदायांत गेलीं निदान ७५ वर्षें तरी मान्यता पावलेलें आहे. प्रत्यहीं शेंकडों संप्रदायी मंडळींकडून तें गायिलें जातें, त्रिकाल भजनाच्या 'नित्य नेमावलि' नामक पुस्तकांत तें दोन प्रहरच्या भजनांत गोविलेलें आहे. पद अत्यन्त गोड आहे. श्रीगुरुकृपेनें आपणांस ईश्वराच्या सर्वगत ध्यानाचा साक्षात्कार कसा कसा झाला हें श्रीसमर्थ या पदांत सांगत आहेत. आत्मसाक्षात्काराच्या मार्गावर जे निरनिराळे अनुभव साधकांस येतात, त्याचें वर्णन स्वानुभवानें या पदाद्वारें इतर साधकांस ते करीत आहेत असें वाटतें. श्रीसमर्थवाङ्मयांत अशा प्रकारचीं स्थळें फार थोडीं आढळून येत असल्यानें या पदाचें महत्त्व फार आहे, असें आमचें मत आहे. तें पद पुढीलप्रमाणें:—

काय सांगूं समर्थांची थोरी ।
भजकासी आपणा ऐसा करी ॥ ध्रु० ॥

सद्‌गुरुराजा तन्मय छत्रपति ।
मज करुनी सेवे अधिपती ।
सोऽहं शब्द सनद देऊनि हातीं ।
शिरीं हात ठेविला मुद्रांकित ॥ १ ॥

अहंकाराचे दुर्ग आवरिले ।
तयांवरी मजला पाठवीलें ।
पूर्वद्वारें त्रिकुट देखियेलें ।
रजोदृष्टि ब्रह्मासी जिंकियेलें ॥ २ ॥

तेथुनि ऊर्ध्वपंथें पश्चिम मार्गें पाहे ।
सत्वगुणीं श्रीहारीं विष्णु आहे ।
तया वळंघोनी वरता जाय ।
तमो गोल्हाटीं रुद्र दिसताहे ॥ ३ ॥

ज्ञानशस्त्र घेऊनियां हातीं ।
केली तमो—अज्ञानाची शांति ।
पुण्यगिरी तेथुनि देखे पुढती ।
शुद्ध अधिष्ठानीं विश्वमूर्ति ॥ ४ ॥

उभा राहोनि तया गिरीवरी ।
देखे भ्रमरगुंफा गडद ओवरी ।
औटपीठा वरुती शोभे वरी ।
परमानंद आहे तया घरीं ॥ ५ ॥

बोधबळिया प्रवेशलों तेथ ।
अहंकार झाला वाताहत ।
विजयदुंदुभि वाजति अनुहत ।
ब्रह्मदृष्टींत पावलों निजविश्रांत ॥ ६ ॥

भक्तिनिशाण चढविलें वरी ।
जें कां ब्रह्म भासत चराचरीं ।
रामनामें गर्जती जयजयकारीं ।
दासपण न उरे तेथें उरीं ॥ ७ ॥

"अहंकारावर स्वार होऊन त्याचा पाडाव केल्यावर अनुहताच्या विजयदुंदुभि वाजतात व "सर्वत्र तदीक्षण" रूपी एकांत भक्ति उत्पन्न होते" असा ह्या पदाचा मतितार्थ आहे.

## श्रीकल्याणांचें एक पद : आणखी ऊहापोह

दहाव्या सुमनहाराच्या चौथ्या लेखांकांत आम्हीं श्री कल्याणांच्या एका पदाची थोडी चर्चा केली आहे. त्यावर संपादकांनीं अशी टीप दिली आहे कीं, श्री. नानासाहेब देवांच्या मतें हें पद कल्याणांचें नाहीं व तें सभेच्या संग्रहांत असलेल्या कोणत्याहि बाडांत आढळत नाहीं.

श्रीकल्याणांच्या इतर पदांच्या भाषेशीं व इतर गोष्टींशीं तुलना करून हें विशिष्ट पद त्यांचें नव्हे असें सिद्ध व्हावयास पाहिजे. तसेंच हें पद सभेच्या संग्रहीं असलेल्या कोणत्याहि बाडांत आढळत नाहीं हें कारण दाखवावयाचें म्हणजे असें समजायचें कीं काय कीं आतां रामदासी ग्रंथांचें संशोधन संपलें व सभेच्या संग्रहीं असलेल्या वाङ्मयाव्यतिरिक्त आतां कोठेंहि तें वाङ्मय मिळावयाचें नाहीं ?

या पदाबद्दल शोध घेतां घेतां तें श्री. अनंतदास रामदासी यांनीं प्रसिद्ध केलेला जो 'श्रीसमर्थांचा गाथा' आहे, त्यांत तें आढळून आलें. त्यांत तें कल्याणांचें नसून तें श्रीसमर्थांच्या नांवावर असलेलें आढळून आलें. आम्हीं पूर्वीं दिलेल्या पदांतील पाठ व गाथ्यांतील पाठ यांत बरेंच अंतर आहे. दोनहि पदांतील पाठान्तरें ताडून पहाण्यासाठीं 'गाथ्यांतील' पद पुढें देत आहें :—

लागली बत्ती । ती कशि रे विझवूं पाहाती ॥ ध्रु० ॥

बत्ती लागली दारुला । दारुसगट बुधला गेला ।
धुर अस्मानीं दाटला । न ये तो पुढती ॥ १ ॥
बत्ती लागली तोफेला । पुरें धणीच उभा केला ।
काय भीड त्या तोफेला । उडवुनि देती ॥ २ ॥
बत्ति लागली कर्पूरा । ज्योति स्वरूप भरला सारा ।
आला मुळिंचेया घरा । न राहे बत्ती ॥ ३ ॥

ऐसी सद्गुरु माउली । दासा बत्ती लाउन दिधली ।
निज वस्तु ते दाविली । स्वयंम ज्योति ॥ ४ ॥

सभेनें प्रसिद्ध केलेल्या 'श्रीसमर्थांचीं पदपदांतरें' या भागांत नाहीं त्यावरून तें पद श्रीसमर्थांचेंसुद्धां नसलें पाहिजे असें संपादक म्हणणार. पण त्यांस नम्रपणें विचारावेंसें वाटतें कीं सभेनें संग्रहित केलेले ग्रन्थ सांप्रदायिक मठांतून व इतर ठिकाणांतूनच केले ना ? आणि श्री. अनन्तदास हे श्रीसांप्रदायिकच ना ? त्यांच्या संग्रहीं तें सांपडावें या गोष्टीला कांहीं महत्त्व नको का द्यावयाला ?

हें पद आणखी कांहीं ठिकाणीं कोणास संशोधनांत आढळल्यास कालान्तरानें हेंच पद श्रीसमर्थांचें किंवा श्रीकल्याणांचें या गोष्टीचा निकाल लागेलच. आमचा त्याबाबत आग्रह कोणताच नाहीं.

## श्रीसमर्थांच्या एका अभंगाची चर्चा

संशोधनखंडांतील बाडांक ७८३ वरील टिपणांत संपादकांनीं एक अपूर्ण अभंग दिलेला आहे:

............ । दूध पाजी मानदेव ॥ ३ ॥
विप्रें अमान्य चि केलें । मुखीं रेडा वेद बोले ॥ ४ ॥
तारी तुकयाचें पुस्तक । देव ब्रह्मांड नायक ॥ ५ ॥
हांका मारी कृष्णातीरीं । दासा भेटे जळांतरी ॥ ६ ॥

श्रीअनंतदास रामदासींनीं प्रसिद्ध केलेल्या श्रीसमर्थांच्या गाथेंत पुढील अभंग आहे:—

अनन्याचे पाळीलळे । पायीं ब्रोदावळी रुळे ॥ १ ॥
महामुद्गलाचे प्रेमें । रणछोडी आला राम ॥ २ ॥
तारी तुकयाचें पुस्तक । देव ब्रह्मांड नायक ॥ ३ ॥
कृष्णातीरीं हांका मारी । दासा भेटी द्या अंतरीं ॥ ४ ॥
॥ ४६३ ॥

यांतील शेवटच्या चरणांतील 'द्या अंतरीं'च्या जागीं 'जळांतरी' असें पाठांतर तळटीपेंत दिलेलें आहे.

बाडांकांतील ( ७८३ ) वर उद्धृत केलेला अभंग सहा चरणांचा तर अनंतदासांनीं दिलेला अभंग चार चरणांचा आहे दोहोंचे शेवटचे दोन चरण एकच आहेत. त्यावरून असें स्पष्ट अनुमान बांधण्यास हरकत नाहीं कीं अनंतदासांच्या गाथेंतील त्यांनीं दिलेला अभंग अपूर्ण असून बाडांक ७८३ तील अभंगांतील ३ रा व ४ था असे दोन चरण त्यांत नाहींत व अनंतदासांच्या अभंगांतील पहिले दोन चरण बा. ७८३ मधील अभंगांत नसल्यानें तो अपूर्ण राहिला. हे दोन अभंग मिळून बा. ७८३ तील सहा चरणी अभंग पूर्ण होतो तो असा:—

अनन्याचे पाळी लळे । पायीं ब्रीदावळी रुळे ॥ १ ॥
महामुद्गलाचे प्रेमें । रणछोडीं आला राम ॥ २ ॥
............. । दूध पाजी नामदेव ॥ ३ ॥
विप्रें अमान्य चि केलें । मुखीं रेडा वेद बोले ॥ ४ ॥
तारी तुकयाचें पुस्तक । देव ब्रह्मांडनायक ॥ ५ ॥
हाकां मारी कृष्णातीरीं अथवा कृष्णातीरीं हांका मारी ।
दासा भेटी द्या अंतरीं अथवा दासा भेटे जळांतरीं ॥ ६ ॥

वरीलप्रमाणें दोनहि अभंग मिळून एक अभंग होत असावा. ३ ऱ्या चरणाचा पूर्वार्ध दुर्दैवानें मिळालेला नाहीं. तो मिळता तर काय मौज झाली असती! त्याचा पूर्वार्ध

भक्त प्रेमा भुलला देव ।

असा असेल काय? अर्थात् हा चरण स्वकपोसकल्पित आहे.

'तारी तुकयाचें पुस्तक । देव ब्रह्मांड नायक ।' या चरणानें श्रीतुकाराम महाराज व श्रीसमर्थ या उभयतांचा परस्पर संबंध कोणता असावा यावर चांगला प्रकाश पडतो. या उभयतां महापुरुषांचा संबंध तितकासा प्रेमाचा नसावा या कांहीं जणांच्या भ्रममूलक अनुमानास या चरणानें कायमचा हरताळ फांसला आहे. असें अम्हांस वाटतें. तसेंच श्रीतुकाराम महाराज हे श्रीसमर्थांचे शिष्य असावेत असें सिद्ध करण्याचा ज्यांचा प्रयत्न चाललेला आहे त्यांनाहि यांत समर्पक उत्तर आहेसें वाटतें.

शके १५६० च्या आसपास इंद्रायणीच्या डोहांत अभंगाच्या वह्या बुडविल्या गेल्याचा प्रसंग झालेला आहे. श्रीसमर्थ १५६६ त तीर्थाटन संपवून कृष्णातीरास आलेले आहेत. त्यांनीं केलेल्या त्या संतांच्या आरतींत श्रीतुकारामांचा निर्देश नाहीं ( सां. वि. वि. भा. १ ला लेखांक ४१ पहा ). श्रीएकनाथांचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा कीं तीर्थाटन संपवून परत येईतोपर्यंत श्रीसमर्थांना श्रीतुकारामांची माहिति विशेषशी झालेली नव्हती. दक्षिणेंत आल्याबरोबर मात्र आपल्या त्यांनीं त्या कालाच्या सर्व कर्त्या पुरुषांची माहिती करून घेतली असावी व त्याच सुमारास हा अभंग केला असावा.

डोहांत बुडविलेल्या अभंगाच्या वह्या देवानें बाहेर कोरड्या काढल्या हा चमत्कार श्रीसमर्थांसारखा चिकित्सक पुरुष स्वतः तोंडानें सांगत आहे. तेव्हां या गोष्टीस फार महत्त्व आहे.

REFBK-0013742